**NUTA BULLETIN**

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

**YEAR : 45) 30th December 2020 ( No. of Pages 60 ) ( No : 14**

# *वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना*

*लेखन*

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना : विशेषांक**

# वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना

### *लेखकाचे प्रास्ताविक*

**१.** महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळी संलग्न महाविद्यालयांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचे सूत्र महाराष्ट्राच्या सर्व भागात सारखे नव्हते. महाविद्यालयांना मिळणाऱ्या अनुदानाची १९६४-६५ पर्यंतची व्यवस्था ही राज्याच्या तीनही भागात वेगवेगळी होती. जुन्या मध्यप्रदेशामध्ये महाविद्यालयांना अनुदानाचे जे सूत्र लागू होते त्या सूत्रानुसार विदर्भातील महाविद्यालयांना सन १९६४-६५ पर्यंत अनुदान मिळत होते. जुन्या हैदराबाद राज्यात अनुदानाचे जे सूत्र होते त्याप्रमाणे मराठवाड्यातील महाविद्यालयांना १९६४-६५ पर्यंत अनुदान मिळत राहिले. महाराष्ट्राच्या इतर भागात जुन्या मुंबई राज्यामध्ये महाविद्यालयांना अनुदान देण्याचे जे शासननिर्णय होते, त्यामधील सूत्रानुसार अनुदान प्रदान सुरू राहिले.

**२.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या सर्वच भागात महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानाचे एकच सूत्र असावे अशा प्रकारची मागणी सर्व स्तरावरून केली जात होती. त्याप्रमाणे सन १९६४-६५ या वर्षापासून अनुदानाचे नवीन सूत्र सुरू झाले. या सूत्रानुसार मिळणारे अनुदान हे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून ओळखले जात असे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व समाजकल्याण विभागाने १३ डिसेंबर १९६२ रोजी निर्गमित केलेल्या एका शासननिर्णयाने (No.NGC 1262-U) या अनुदान सूत्राची निर्मिती केली. मुळातील या शासननिर्णयाला दुरुस्ती सुचविणारा दुसरा एक शासननिर्णय (No.NGC 1262-U) शिक्षण व समाजकल्याण विभागाने ८ जानेवारी १९६४ रोजी निर्गमित केला. या दोन शासननिर्णयांनी तयार केलेली अनुदानाची ही व्यवस्था परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) या नावाने ओळखली जाऊ लागली. तुटीच्या आधारावर अनुदान देण्याच्या अंगभूत व्यवस्थेमुळे तूट अनुदान (Deficit Grant) या नावाने सुद्धा ही व्यवस्था ओळखली जात असे.

**३.** परिरक्षा अनुदानाच्या या व्यवस्थेप्रमाणे मागील वर्षाच्या तुटीवर या वर्षी परीरक्षा अनुदान दिले जात असे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या एक हजार पेक्षा कमी असेल तर प्रत्यक्ष तुटीच्या ५० टक्के अधिक एकूण मान्य खर्चाच्या १० टक्के एवढी रक्कम त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून दिली जाई. महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या एक हजारापेक्षा जास्त असेल तर प्रत्यक्ष तुटीच्या ५० टक्के अधिक एकूण मान्य खर्चाच्या ५ टक्के एवढी रक्कम परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून त्या महाविद्यालयाला दिली जाई. उपरोक्त दोनही प्रकारामध्ये देण्यात येणारे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) **एकूण मान्य खर्चाच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त कोणत्याही परिस्थितीत असणार नाही. याचा अर्थ असा की, मागील वर्षामध्ये महाविद्यालयाच्या परिचालनावर ९९ रूपये एकूण मान्य खर्च असेल तर परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हे कोणत्याही परिस्थितीत ३३ रुपयांपेक्षा जास्त असणार नाही.** एखाद्या महाविद्यालयामध्ये मागील वर्षाच्या परिचालनात तूट आलेली नसेल व एकूण मान्य खर्चापेक्षा एकूण थेट उत्पन्न जास्त (surplus) असेल तर त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) मिळणार नाही. संचित शिल्लक (accumulated surplus) ही ज्या महाविद्यालयाजवळ एक लाख रूपया पेक्षा जास्त असेल त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) मिळणार नाही. अशी ही व्यवस्था होती.

**४.** परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) ही व्यवस्था काही गृहित तत्वांवर आधारलेली होती. शिक्षण संस्था चालविणाऱ्या व्यवस्थापकांनी काही निधी या कामासाठी समाजाकडून गोळा केला पाहिजे व तसा ते गोळा करतील व करत राहतील असे या योजनेमध्ये गृहित धरण्यात आले होते. किंबहूना परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) व्यवस्थेचा तो एक महत्त्वपूर्ण आधार होता. एखादी थोर व्यक्ती आयुष्यभर त्याच पद्धतीने समाजाकडून मदत मिळवू शकेल असे गृहित धरले तरी पिढ्यान्‌पिढ्या ते काम देणग्यांच्या भरवशावर चालेल असे गृहित धरणे हा या व्यवस्थेचा **पहिला प्रमुख दोष होता.** परीरक्षा अनुदानाच्या (Maintenance Grant) या योजनेमध्ये जबाबदारी स्वीकारणे हे शासनाचे काम नाही. स्वयंसेवी संस्थांना मदत करण्याची शासनाची भूमिका असेल हे अधोरेखित करण्यात आलेले होते. **हा दुसरा दोष म्हणून सांगता येईल.** शासनाजवळ निधी उपलब्ध असेल तरच आणि निधी उपलब्ध असेल तेव्हाच असे अनुदान दिले जाईल या गृहितकावर ही व्यवस्था बांधलेली होती. उपलब्ध निधीच्या प्रमाणात अनुदान दिले जाईल अशी परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) बांधणी करण्यात आल्यामुळे कोणत्याही संस्थेला हक्क म्हणून अनुदान मागता येणार नाही अशीही या अनुदानाच्या व्यवस्थेची बैठक होती.

**५.** सारांश काय तर परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हाच या व्यवस्थेचा मुख्य गाभा होता. हे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) तुटीवर आधारलेले असायचे. तूट ही वर्षाकाठी होणाऱ्या उत्पन्न व मान्य खर्चाच्या फरकावर आधारित असे आणि वर्षाकाठी होणारे उत्पन्न मुख्यत्वे विद्यार्थ्यांची संख्या व त्या विद्यार्थ्यांकडून येणारी 'फी' यावर

***परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हाच त्या व्यवस्थेचा मुख्य गाभा होता. हे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) तुटीवर आधारलेले असायचे. तूट ही वर्षाकाठी होणाऱ्या उत्पन्न व मान्य खर्चाच्या फरकावर आधारित असे आणि वर्षाकाठी होणारे उत्पन्न मुख्यत्वे विद्यार्थ्यांची संख्या व त्या विद्यार्थ्यांकडून येणारी 'फी' यावर आधारित असे. या विद्यार्थ्यांची संख्या कोणत्याही कारणाने कमी झाली तर त्याचा परिणाम हा प्रत्यक्ष एकूण उत्पन्नावर होत असे.***

*(परिच्छेद ७४ पहा.)*

***परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हे मूळ नाव असलेल्या ज्या अनुदान पद्धतीचे दुसरे नाव तूट अनुदान (Deficit Grant) असे होते, त्या अनुदान पद्धतीमध्येच फार मोठा दोष होता. महाविद्यालयांचे व्यवस्थापक दरवर्षी समाजातून महाविद्यालयाच्या संचालनार्थ मोठा निधी गोळा करून आणतील या गृहितकावर ती अनुदान व्यवस्था बांधलेली होती, हा तो दोष होय.***

*(परिच्छेद ९१ पहा.)*

आधारित असे. या विद्यार्थ्यांची संख्या कोणत्याही कारणाने कमी झाली तर त्याचा परिणाम हा प्रत्यक्ष एकूण उत्पन्नावर होत असे. सन १९७५-७६ च्या दरम्यान १४ वर्षांचा शैक्षणिक आकृतिबंध १५ वर्षांचा झाला व तो महाविद्यालयात येऊन धडकला तेव्हा 'गॅप इअर' व 'हाफ इअर' मुळे विदर्भ-मराठवाड्यात महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली.

**६.** संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतन वितरण व्यवस्थेची दुर्दशा हा एक अतिशय संवदेनशिल असा विषय १९७५-७६ व त्या पुढच्या काळात झालेला होता. तत्कालीन अनुदान सूत्रामुळे अनेक महाविद्यालयांमध्ये ६ ते ११ महिन्यांच्या विलंबाने कसेतरी वेतन होत असे. सबंध राज्यभर या समस्येने उच्च शिक्षण क्षेत्र ग्रासलेले होते. "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना" या मथळ्याची लेखमाला 'दैनिक हिंदुस्थान'च्या "विधानमंडळात आमचे प्रश्न" या सदरामध्ये दिनांक ५ जानेवारी २०२० रोजी सुरू झाली. रविवार, दिनांक २२ मार्च २०२० रोजी त्या लेखमालेतील १२ वा लेख प्रकाशित झाला. परिच्छेद १ ते १२१ पर्यंतचा मजकूर व २२ सहपत्रे या लेखमालेतून प्रसिद्ध झालीत.

**७.** कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२ मार्च २०२० नंतर सबंध देशभर "लॉकडाऊन"च्या घोषणेचा अंमल सुरू झाला व त्यामुळे त्या घोषणेचे अनेक क्षेत्रावर अनेक प्रकारे परिणाम झाले. विशेषतः वृत्तपत्र सृष्टीवर त्या घोषणेचा बराच विपरित परिणाम दिसून आला. सर्वत्र कामकाज बंद पडल्यामुळे वृत्तपत्रांकडे येणारा जाहिरातीचा ओघ हा मोठ्या प्रमाणात कमी झाला. वृत्तपत्रांचे वितरण करावे की, करू नये याबाबतच्या आदेशाच्या सावटाखाली काही दिवस वृत्तपत्रांचे वितरण सुद्धा बंद पडले. काही वृत्तपत्रांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात काही दिवस वृत्तपत्रांचे प्रकाशन केले. वृत्तपत्रांचे धड वितरण करता येत नसेल तर वृत्तपत्रे छापायची तरी कशासाठी? असा प्रश्न त्यातून निर्माण झाला. जाहिरातींचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटल्यामुळे काही वृत्तपत्रांनी त्यांच्या आवृत्त्या कमी केल्या. मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या एका नामांकित वृत्तपत्राने आपल्या प्रादेशिक स्तरावरील तीन आवृत्त्यांचे प्रकाशन बंद केले. या "लॉकडाऊन"चा दैनिक 'हिंदुस्थान'वर सुद्धा परिणाम झाल्याशिवाय राहीला नाही. दर रविवारी मूळ अंकासोबत प्रसिद्ध होणाऱ्या "साहित्य मैफिल" या पुरवणीचे प्रकाशन काही काळासाठी थांबले. या घालमेलीमध्ये "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना" या विषयावरील रविवार, दिनांक २२ मार्च २०२० रोजी प्रकाशित झालेला १२ वा लेखांक हा या विषयावरील शेवटचा लेखांक ठरला. दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक श्री. विलास मराठे यांनी मला त्याबाबतची कल्पना दिली. अशाही कठीण परिस्थितीत किमान पृष्ठांचा अंक दररोज प्रकाशित करण्याचा क्रम दैनिक हिंदुस्थानने श्रमपूर्वक सुरू ठेवला.

**८.** "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना" हा महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न होता आणि "विधानमंडळात आमचे प्रश्न" या सदरात प्रकाशित करणे चालू राहिले असते तर निदान आणखी ५ ते ६ महिने तरी ती लेखमाला सुरू राहिली असती. मात्र "लॉकडाऊन"मुळे उद्‌भवलेल्या स्थितीमध्ये या लिखाणाचा वेग आणखी वाढविणे मला सहज शक्य झाले. या लेखमालेसाठी आवश्यक अशा आधारभूत साधनसामुग्रीची जुळवाजुळव ही "विधानमंडळात आमचे प्रश्न" या सदरासाठी लेखन करण्याच्या निमित्ताने झालेलीच होती. ही एक गोष्ट व दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे "लॉकडाऊन"च्या कालखंडामध्ये नुटाच्या कार्यकारी मंडळाची बोलाविलेली बैठक स्थगित झाली. नुटाची बोलाविण्यात आलेली आमसभा सुद्धा स्थगित झाली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची व जनरल कौन्सिलची बैठक सुद्धा स्थगित करण्यात आली. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या स्तरावरील बैठकांच्या बाबतची परिस्थिती सुद्धा अशीच होती. त्यामुळे "लॉकडाऊन"च्या काळात ही लेखमाला एकहाती पूर्ण करण्यास भरपूर वेळ उपलब्ध झाला व जवळ जवळ **एप्रिल महिन्यामध्ये** या विषयावरील सारे तपशील एकहाती लिहून काढण्यास वेळ मिळाला. उपलब्ध झालेल्या भरपूर वेळेत "एकला नयनाला विषय तो जाहला" अशी या विषयांवरील लिखाणाची परिस्थिती होती. "न्यायाधिकरणाची स्थापना" या विषयावरील लिखाण **मे महिन्यात** मला पूर्ण करता आले. "चौथ्या वेतन आयोगाचा संघर्ष" या अतिशय महत्त्वाच्या विषयावरील लेखनाला अंतिम स्वरूप देण्याचा विचार आता समोर आहे.

**९.** वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना या विशेषांकामध्ये २१ सप्टेंबर १९७७ रोजीच्या शासननिर्णयाने स्थापन केलेली व्यवस्था, योजनेची अंमलबजावणी उत्तमरीतीने सुरू झाली असतांना कालांतराने योजनेवर आलेली व येऊ शकणारी संकटे, १९७७ पूर्वी याबाबतीत काय स्थिति होती, नव्या शैक्षणिक आकृतिबंधाचे परिणाम, त्या आकृतिबंधामुळे महाविद्यालयातून विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणे, शेकडो शिक्षक अतिरिक्त होण्याची निर्माण झालेली स्थिती, दोषपूर्ण अनुदानसूत्र व विद्यार्थ्यांची कमी झालेली संख्या त्यामुळे अनेक महिन्यांच्या विलंबाने वेतन अदा होण्याचे निर्माण झालेले संकट, कोणत्याही महाविद्यालयीन शिक्षकाला सेवेत कायम करण्यावर कायदा करून शासनाने आणलेली बंदी, याबरोबरच वेतन वितरण व्यवस्थेच्या स्थापनेसाठी बेमुदत कामबंद आंदोलनाचा कार्यक्रम घोषित करून हा संघर्ष फक्त नुटाच्या क्षेत्रामध्ये का म्हणून करावा लागला, याबाबतचे तपशील या विशेषांकामध्ये वाचकांना आढळून येतील.

**प्रा.बी.टी.देशमुख**

**३० डिसेंबर २०२०**

*माजी विधान परिषद सदस्य व*

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

## *संघटनेला मिळालेली व प्रत्यक्ष अंमलात आलेली आश्वासने*

**(1) "Government orders sanctioning a Scheme to ensure regular and full payment of due salary and allowances to the teaching and non-teaching staff of aided non-Government Arts, Science, Commerce and Education Colleges will also be issued on or before 30th September 1977."**

**(2) " The Scheme contemplates the release of adhoc assistance to these Colleges of the order of their three months' salary bill, in general. The Scheme also provides that, if need be, with the prior approval of Government, an adhoc assistance even in excess of three months' salary bill may be given to Colleges to fulfil the requirements of the Scheme."**

*(परिच्छेद १६५.४ पहा.)*

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## *संघटनेच्या अध्यक्षांचे मनोगत*

**१.** नुटा बुलेटीनला २५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने सन २००१ मध्ये नुटा बुलेटीनची रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशित करण्यात आली होती. या विशेषांक मालिकेमध्ये ११ विशेषांक पुढीलप्रमाणे प्रकाशित करण्यात आले होते. (१) विशेषांक पहिला, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ विशेषांक (२) विशेषांक दुसरा, 'नुटा बुलेटीन' (१९७६ ते २०००) अनुक्रमणिका - विशेषांक (३) विशेषांक तिसरा, शिक्षणाचे वाटोळेकरण - विशेषांक (४) विशेषांक चौथा, नेट/सेट - विशेषांक (५) विशेषांक पाचवा, 'वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती' सुविधा विशेषांक (६) विशेषांक सहावा, सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना विशेषांक (७) विशेषांक सातवा, रजा प्रवास सवलत विशेषांक (८) विशेषांक आठवा, वेतन व्यवस्था विशेषांक (९) विशेषांक नववा, संघटना - संस्थापना विशेषांक (१०) विशेषांक दहावा, महत्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक (११) विशेषांक अकरावा, नेट/सेट (दुसरा) विशेषांक. या ११ विशेषांकाशिवाय शब्दयुद्ध विशेषांक म्हणून १५ विशेषांक काढण्यात आले होते.

**२.** सन २०१३ मध्ये झालेल्या आंदोलनात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला शासनातर्फे चर्चेसाठी निमंत्रण आले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळासोबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ही चर्चा सुरू झाली. या बैठकीला मा. मुख्यमंत्र्याशिवाय मा. शिक्षण मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) अप्पर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, वित्त व इतर अधिकारी उपस्थित होते. बैठक बराच वेळ चालली. नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मा. उच्च शिक्षणमंत्री श्री.राजेश टोपे हे पुन्हा पुन्हा सभेत सांगत होते की, विधी विभागाच्या सचिवांनी मंत्रिमंडळामध्ये याबाबतीत विरोध केला. दोन-तीन वेळा श्री.राजेश टोपे यांनी विधी सचिवांनी विरोध केला असा उल्लेख केला. त्यावर प्रा.बी.टी.देशमुख यांनी असे उद्‌गार काढले की, "पुन्हा पुन्हा तुम्ही विधी सचिवांनी विरोध केला असे सांगत आहात. याबाबत विधी सचिवांनी जी टिपणी तयार केलेली आहे ती मी काळजीपूर्वक वाचलेली आहे आणि त्या टिपणीच्या पहिल्याच परिच्छेदात विधी सचिवांनी राजसिंग विरुद्ध दिल्ली विद्यापीठ या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने १९९४ मध्ये दिलेल्या निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. त्या निर्णयात मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात असे नमूद केलेले आहे की, "नेट-सेटची पात्रता तुम्हाला पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही." आता विधी सचिवांनी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आपल्या टिपणीमध्ये पहिल्याच परिच्छेदात लक्षात आणून दिल्यावर तुम्हाला ही बाब विधी सचिवांवर ढकलता येणार नाही." प्रा.बी.टी.देशमुख यांचे हे म्हणणे ऐकून घेतल्यावर श्री.राजेश टोपे यांनी विधी सचिवांकडे पाहून उद्‌गार काढले ते असे की, विधी सचिवांनी याबाबतीत त्यांचे म्हणणे मांडले पाहिजे.

**३.** उच्च शिक्षणमंत्र्यांच्या उपरोक्त उद्‌गारानंतर विधी सचिवांनी खणखणीत आवाजात असे सांगितले की, "पूर्वलक्षी प्रभावाने नेट-सेटची पात्रता लागू करता येत नाही, हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला १९९४ चा निर्णय आहे. हे प्रा.बी.टी.देशमुख यांचे प्रतिपादन बिनतोड आहे. त्याच्या विरोधात काही बोलता येणार नाही." एवढेच बोलून वित्त सचिव थांबले नाही तर त्यांनी पुढे असेही सांगितले की, "अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामाला राज्याच्या मुख्य सचिवांनी स्थगिती दिली होती त्यावेळेला प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्या विरोधात एक याचिका अमरावतीचे ज्येष्ठ विधिज्ञ श्री.एस.झेड.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली होती. त्यावेळेला मी श्री.एस.झेड.पाटील यांचा ज्युनिअर म्हणून काम करीत होतो. कायद्याच्या बाबतचे जे मुद्दे प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यावेळी समोर केले होते ते बिनतोड होते. आजही मा.सर्वोच्च न्यायालयाचा जो मुद्दा त्यांनी मांडलेला आहे तो बिनतोड आहे." एवढे प्रतिपादन केल्यानंतर त्या सभेतच विधी सचिवांनी "बी.टी. सर एकदा तुम्ही माझ्याकडे जेवायला या." असे आमंत्रण दिले. त्यावर प्रा.बी.टी.देशमुख यांनी "हे सारे एकदा आता होऊन जाऊ द्या त्यानंतर मी जरुर येईन." असे उद्‌गार काढले.

**४.** उपरोक्त घटनाक्रमानंतरच्या दोन-तीन आठवड्याने विधी सचिवांची उच्च न्यायालयाचे मा.न्यायाधीश म्हणून नियुक्त झाली असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या. त्या दरम्यान महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीसाठी आम्ही मुंबई येथे गेलो असता प्रा.बी.टी.देशमुख यांच्या सूचनेवरून आम्ही दोघेही फोनने वेळ ठरवून विधी सचिवांच्या चर्चगेट स्थित शासकीय निवासस्थानी त्यांचे अभिनंदन करण्याकरीता गेलो असता विधी सचिवांनी याबाबतची माहिती आम्हाला सांगितली ती अशी की, "उच्च शिक्षण विभागाचे अधिकारी माझ्याकडे नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या शासननिर्णयाची नस्ती घेऊन आले त्यावेळेला मी त्यांना स्पष्टपणे असे सांगितले की, "सप्टेंबर १९९१ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेटचे जे रेग्युलेशन काढले ते तुम्ही महाराष्ट्रात केव्हा अंमलात आणले ते मला सांगा. कारण पूर्वलक्षी प्रभावाने तुम्हाला नेट-सेट पात्रतेच्या अटी लागू करता येणार नाहीत." उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय हा माझ्यासमोर दाखल केला. त्यावेळेला मी त्यांना असे सांगितले की, १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोबर १९९२ या कालखंडात सेवेत आलेल्या शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने ही पात्रता लागू करता येणार नाही."

**५.** दिनांक २७ जून २०१३ चा शासननिर्णय निर्गमित झाला. या शासननिर्णयाच्या १४ व्या परिच्छेदामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. :-

"१४ प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १९.०९.१९९१ ची अधिसूचना राज्यात दि. २३.१०.१९९२ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली, त्यामुळे **सदर शासन निर्णयातील तरतूदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही.** सबब दि. २३.१०.१९९२ पूर्वी नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १९.०९.१९९१ च्या अधिसूचनेतील अर्हता लागू राहणार नाही."

या शासननिर्णयावर संघटनेची प्रतिक्रिया देण्यासाठी नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक सोमवार, दिनांक २२ जुलै २०१३ रोजी वर्धा येथे झाली असता या बैठकीमध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी असे सांगितले की, " २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय पुढच्या ३०-४० दिवसात २७ नोव्हेंबर १९९२ च्या दुसऱ्या शासननिर्णयाने रद्द करण्यात आलेला आहे." हे ऐकून कार्यकारी मंडळाच्या आम्हा सर्व सदस्यांना आश्चर्य वाटले. २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय रद्द करणारा २३ नोव्हेंबर १९९२ चा शासननिर्णय कोठे मिळेल? याची धावाधाव सुरु झाली तेव्हा तो नुटा बुलेटीन रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेत प्रकाशित करण्यात आलेल्या चौथ्या नेट-सेट विशेषांकामध्ये सन २००१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २४७ वर प्रसिद्ध करण्यात आल्याचे आढळून आले. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनासुद्धा जी गोष्ट ठाऊक नव्हती ती आमच्या त्या विशेषांकाने अधिकृतपणे समोर आणली.

**६.** दिनांक २२ जुलै २०१३ च्या बैठकीत या विषयावर नुटाच्या कार्यकारी मंडळाने जो ठराव संमत केला त्याच्या परिच्छेद १० व ११ मध्ये हा सर्व घटनाक्रम (*P57EX-2013*) नमूद आहे. पुढे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ९ ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनेक सुधारणांसह या विषयावर एक तपशीलवार ठराव संमत करण्यात आला. त्यामध्ये उपरोक्त परिच्छेद १० व ११ हे जसेच्या तसे समाविष्ट करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे :-

"**१०.** सदर शासन निर्णयातील तरतूदी दिनांक १९.०९.१९९१ पासून

***शिक्षकांच्या संघटनांनी तीव्रतेने व तर्कशुद्ध पद्धतीने आपले प्रश्न मांडल्याशिवाय व त्या प्रश्नांच्या तीव्रतेचे प्रमाण लक्षात घेऊन तेवढ्याच तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटत नाहीत हे तर खरेच आहे.***

*(परिच्छेद १६३ पहा.)*

***व्यावसायिक जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांची तर्कशुद्ध पद्धतीने निवड करणे, निवड केलेल्या प्रश्नांची शास्त्रीय आधारावर मांडणी करणे, प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीची तीव्रता आपल्या सदस्यांच्या लक्षात आणून देणे, ज्यांचे प्रश्न त्यांनाच सोडवावे लागतात हे खरे असले तरी ढोबळमानाने प्रश्नांच्या तीव्रतेबाबत समाज मनामध्ये जाणीव निर्माण करणे, या समाजाचा भाग असलेल्या आपल्या विद्यार्थ्यांच्या मनाचा कल सांभाळणे, हे शिक्षक संघटनांसाठी महत्त्वाचे काम असते.***

*(परिच्छेद १६३ पहा.)*

पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही. असे या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. दिल्लीच्या बहादुरशहा जफर मार्गावर १९.९.९१ ला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयातून अधिसूचना निघाली की आकाशवाणी झाल्याप्रमाणे ती साऱ्या महाराष्ट्रभर त्याच दिवशी लागू होत नव्हती ही गोष्ट उच्च शिक्षण विभागातील काही लोकांना २० वर्षांनंतर का होईना पण कळली याबद्दल या ठरावाच्या सुरुवातीलाच समाधान व्यक्त करण्यात आले आहे. **१९.९.९१ पासून नेटसेट सक्तीने लागू झाले नसून ते २३.१०.९२ पासून सक्तीचे झाले अशी भूमिका आता शासनाने घेतली आहे. मात्र त्यापुढच्या ३५ दिवसात २३.१०.१९९२ च्या त्या शासननिर्णयाचे दुःखद निधन झाले होते ही गोष्ट मंत्रालयात कोणालाच ठाऊक नसावी ही सुद्धा मुळातच अति दुःखद घटना म्हणावी लागेल.**"

"**११.** पुढच्या ३५ दिवसाच्या आत दिनांक २७ नोव्हेंबर १९९२ च्या दुसऱ्या शासन निर्णयाने (Resolution No. NGC 1792/(2224)/UNI-4, Dated : 27th November, 1992.) २३ ऑक्टोबर १९९२ च्या पहिल्या शासननिर्णयाचे 'तेरावे' घातले. कारण दुसऱ्या शासननिर्णयाच्या दुसऱ्याच परिच्छेदात पहिला शासन निर्णय निष्प्रभावित (Supersede) करण्याचा उल्लेख असून तो शासननिर्णय मागे घेण्यात आल्याचे (Withdraw) दुसऱ्या शासन निर्णयाच्या तिसऱ्या परिच्छेदात नमुद आहे."

दिनांक २७ नोव्हेंबर १९९२ चा म्हणजे जवळ जवळ २०-२१ वर्षापूर्वीचा हा शासननिर्णय बुलेटीनच्या विशेषांकामुळे सहजपणे उपलब्ध झाल्याने संघटनांना याबाबत न्यायालयात व न्यायालयाबाहेर ठाम भूमिका घेता आली.

**७.** विशेषांकाच्या संदर्भ समृद्धीच्या उपयुक्ततेचे आणखी एक उदाहरण नमूद करावेसे वाटते. परीक्षेचे काम हे महाराष्ट्रामध्ये व देशामध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनदेय कामाचा भाग कधीही नव्हते व आजही ते तसे नाही. तिसऱ्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळी "विद्यापीठीय परीक्षांचे काम" हे शिक्षकांच्या "वेतनदेय कामाचा भाग" करण्याचा प्रयत्न झाला होता, पण तो पूर्णपणे अयशस्वी झाला. मा. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेमध्ये एकामागून एक मुद्दे सुटत गेले. २३ एप्रिल १९७७ ते २३ ऑगस्ट १९७७ या चार महिन्याच्या काळात खुद्द मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठका होऊन ३ मतैक्यपत्रे नोंदविली गेलीत. या तीनही मतैक्यपत्रांवर आधारित समझोतापत्र (Terms of Settlement) तयार करून न्यायालयामध्ये दाखल करण्यासाठी उभयपक्षांना न्यायालयाने १३.९.१९७७ ही तारीख दिली होती. काही एकदोन मुद्यांवर आणखी खुलासा हवा असल्याने हे समझोतापत्र (Terms of Settlement) मा.न्यायालयाने दिलेल्या पुढच्या तारखेला म्हणजे दिनांक २२ सप्टेंबर १९७७ रोजी न्यायालयात सादर झाले. त्याप्रमाणे पुढे २५ ऑक्टोबरचा शासननिर्णय निर्गमित झाला व परीक्षेचे काम हे शिक्षकांच्या वेतनदेय कामाचा भाग बनविणारी तरतूद रद्दबातल होऊन पूर्वस्थिती स्थापीत झाली.

**८.** पुढे 'हम करे सो कायदा' या वृत्तीने काम करणाऱ्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी ६ मार्च २०१३ रोजी परीक्षेच्या कामाशी असहकार केला म्हणून ७१ दिवसांचे वेतन अदा न करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मुंबई उच्च न्यायालयामध्ये सन २०१३ ची याचिका क्रमांक १९१३ दाखल केली. ही याचिका सादर करतांना १९७७ मध्ये दाखल करण्यात आलेल्या समझोता पत्राची (Terms of Settlement) प्रकर्षाने आठवण झाली. ३०-४० वर्षापूर्वीचे हे समझोता पत्र उपलब्ध होणे आवश्यक होते. "महत्त्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक" या २००१ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या नुटा बुलेटीनच्या विशेषांकात ते पृष्ठ ५४५ वर शब्दश प्रसृत करण्यात आले होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या सन २०१३ च्या याचिका क्रमांक १९१३ मध्ये या समझोतापत्राची (Copy of Terms of Settlement) छाया प्रत (Xerox Copy) "2001-NUTA Bulletin-545" या शीर्षस्थ पृष्ठांकनासह सहपत्र म्हणून जोडलेली आहे. या याचिकेच्या दस्तऐवजामध्ये पृष्ठ १४९ ते १५१ वर "सहपत्र : आय" म्हणून हे समझोतापत्र दाखल झालेले आपणास दिसून येते.

**९.** सन २०१९ मध्ये नुटा बुलेटीनचा १४ वा अंक विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेल्या तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतच्या संघर्षाबाबतची माहिती देणारा "वेतन आयोग संघर्ष विशेषांक" म्हणून यापूर्वी प्रकाशित करण्यात आलेला आहे. आज "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना विशेषांक" प्रकाशित करतांना मला मनापासून आनंद होत आहे. (१) सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था - स्वेच्छानिवृत्तीसह (२) परिविक्षाधिन कालावधी व स्थायीकरणाची व्यवस्था (३) सेवामुक्त शिक्षकासाठी न्यायाधिकरणाची व्यवस्था (४) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची व्यवस्था (५) चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगासाठी करण्यात आलेला संघर्ष याबाबतचे विशेषांक प्रकाशित करण्याची बाब संघटनेच्या विचाराधीन असून हे फार मोठ्या अर्थभाराचे काम आहे, याची संघटनेला जाणीव आहे. नुटाच्या कार्यकारी मंडळामध्ये याबाबतीत तपशीलवारपणे विचारविनिमय करण्यात आलेला असून केवळ आर्थिक बळाच्या अभावी अशा विशेषांकांच्या प्रकाशनाचे काम थांबू नये असाही निर्णय कार्यकारी मंडळाने घेतलेला आहे. या कामाचे महत्त्व लक्षात घेता यासाठी आर्थिक साधनसामुग्रीची जुळवाजूळव करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या इतर घटक संघटनांचे व महासंघाचे सुद्धा सहकार्य घेण्यात यावे असाही विचार करण्यात आलेला आहे. वेतन वितरण व्यवस्था हा आमच्या व्यावसायिक जीवनाचा पायाभूत आधारस्तंभ आहे. त्यामुळे वाचक या विशेषांकाचे मनापासून स्वागत करतील याविषयी मला खात्री आहे.

**डॉ. प्रवीण रघुवंशी**
*अध्यक्ष नुटा*

**३० डिसेंबर २०२०**

*****

***आपल्या विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करणाऱ्या व आपला व्यवसाय निष्ठापूर्वक सांभाळणाऱ्या शिक्षकांचा व शिक्षक नेत्यांचा समूह संघटनेच्या सर्व स्तरावरील नेतृत्त्व मंडळात कार्यरत असेल तर लाभणारे विद्यार्थ्यांचे उदंड पाठबळ हा त्या संघटनेच्या वैभवाचा भाग असतो. जबाबदारीची जाणीव ठेवून या वैभवाचा वापर करावा लागतो.***

*(परिच्छेद १६३ पहा.)*

# वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना

*लेखन*

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

### वेतन वितरण कोसळले

**१.** सन १९७६ मध्ये महाविद्यालयीन शिक्षकांचे वेतन नियमित होण्याच्या संदर्भात काय परिस्थिती होती? हे लक्षात घेतले तर असे दिसून येते की, पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय, सर परशुरामभाऊ महाविद्यालय आणि गरवारे महाविद्यालय या तीनही नामांकित महाविद्यालयांवर त्यापूर्वीच्या ५० वर्षात ओढवला नाही असा प्रसंग ओढवला होता व तो म्हणजे या तीनही महाविद्यालयातील शिक्षकांचे मासिक वेतन अदा करता येत नाही अशा स्थितीला व्यवस्थापकांना तोंड द्यावे लागत होते. महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी आपल्या शिक्षक वर्गाची बैठक बोलावून आर्थिक स्थितीची त्यांना माहिती दिली व काही दिवस ही स्थिती सहन करावी लागेल याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. इतर अनेक महाविद्यालयांमध्ये तर अशी चर्चा शिक्षकांशी करण्याचे सौजन्य तेथील व्यवस्थापकांनी दाखविले नाही. ग्रामीण भागातील शिक्षणाची ही व्यवस्था सावरून धरण्यासाठी तुम्हाला काही त्याग करावा लागेल अशी चर्चा सर्वत्र सुरू झाली होती. सातारा येथील एका महाविद्यालयाच्या १९ शिक्षकांनी गेल्या एक वर्षापासून आमचे वेतन झालेले नाही अशी लेखी तक्रार राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे केली होती. **ही माहिती गुरूवार, दिनांक ३० डिसेंबर १९७६ रोजीच्या मुंबईहून प्रसिद्ध झालेल्या 'टाईम्स ऑफ इंडिया' मधील मजकूरावरून दिलेली आहे. हा मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणेः-**

"For the first time in more than 50 years, educational societies running such institutions as Fergusson College, Sir Parshurambhau College and Garware College in Pune withheld the staff salaries. They explained the financial position and requested the staff members to bear with them for some time.

Such consideration was not reportedly shown to the staff in other areas. At several places politicians unconnected with education asked the college staff to make sacrifices for spreading education to the rural masses. The college staff finds the situation unbearable as is evident from a letter sent by 19 Professors of a college in Satara to the Chief Minister pointing out that they have not been paid for a year.

Closedown Likely

Unless the education department acts, fast, the worsening financial conditions may compel the societies to close down colleges. This will not only make the college staff jobless, but also retard the spread of higher education."

### नव्या आकृतिबंधाचे आगमन

**२.** १९७६ च्या डिसेंबर महिन्यामध्ये या संदर्भात काय स्थिती होती? या बाबतचा तपशील 'टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये प्रकाशित झालेल्या उपरोक्त मजकुरावरून आपल्या लक्षात येईल. १९७४, १९७५ व १९७६ या तीन वर्षांमध्ये याबाबतीत काय स्थिती होती? याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या सेकंडरी एज्युकेशन कमिशनने ११+२+२ चा आकृतिबंध टाकून द्यावा व त्याऐवजी १०+१+३ किंवा ११+३ ची व्यवस्था स्वीकारावी, अशी शिफारस केली. त्यावेळच्या मध्यप्रदेश सरकारने हा बदल स्वीकारला व क्रमशः १९५८ मध्ये मुदलीयार पॅटर्न महाविद्यालयामध्ये येऊन थडकला व त्यामुळे विदर्भातील आकृतिबंध १४ वर्षांचा झाला व तसा तो १९७५ पर्यंत टिकलाही. उलट त्यावेळच्या मुंबई सरकारने मुदलीयार पॅटर्न स्वीकारला नाही व त्यामुळे मुंबई, पुणे, कोल्हापूर विद्यापीठांतून मूळ १५ वर्षांचा आकृतिबंध १९७५ पावेतो अबाधित राहिला. कोठारी कमिशनचा अहवाल आला आणि १०+२+३ ची अंमलबजावणी सुरू झाली व १९७४-१९७५ च्या दरम्यान हा आकृतिबंध महाविद्यालयाच्या दारात येऊन ठेपला. अधिक दोनचे वर्ग या नव्या आकृतिबंधानुसार विद्यालयातून राहावे, अशी कोठारी कमिशनने शिफारस केली होती.

### तिहेरी फटका

**३.** आकृतीबंधाची ही जी वाटचाल महाराष्ट्रामध्ये सुरू झाली त्याचा दुहेरी फटका महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्थेला बसला. विशेष कारणांमुळे विदर्भात बसलेला हा फटका तिहेरी स्वरूपाचा होता. या तिहेरी फटक्यातील (१) पहिला फटका म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या काही काळासाठी फार मोठ्या प्रमाणात कमी होणार. (२) दुसरा फटका म्हणजे काही काळासाठी का होईना महाविद्यालयातून शेकडो शिक्षक अतिरिक्त होणार. ही शक्यता लक्षात घेऊन त्यांना काढून टाकणे पुढे कठीण जाऊ नये म्हणून १९७३ मध्येच महाराष्ट्राच्या राज्यपालांनी एक वटहुकूम (Ordinance No. IX of 1973) काढून कोणत्याही महाविद्यालयीन शिक्षकाला सेवेत कायम (Confirm) करू नये असा कायदाच केला होता. (३) तिसरा व सर्वात मोठा फटका म्हणजे सर्वच महाविद्यालयातील वेतन वितरण व्यवस्था पार कोसळून पडली होती. खरे म्हणजे याबाबत कोणतीही व्यवस्थाच अस्तित्वात नव्हती. विद्यार्थ्यांच्या फी मधून सारे भागवायचे. तुट पडल्यास तुटीच्या काही प्रमाणात अनुदान मिळत असे. त्यावेळेच्या 'डेफिसिट ग्रँट'च्या फॉर्म्युल्या प्रमाणे मिळणाऱ्या अनुदानामुळे व विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे हे संकट ओढवलेले होते. या तीनही घटकांची तपशीलवार माहिती करून घेणे आवश्यक आहे.

### विद्यार्थी संख्येला फटका बसणार

**४.** नव्या आकृतीबंधामुळे विद्यार्थी संख्येवर कसा परिणाम झाला होता याबाबत मी स्वतः काही लिहिण्यापेक्षा आमचे ज्येष्ठ सहकारी व संघटनेचे हितचिंतक प्राचार्य ग.शि. उर्फ अण्णासाहेब वैद्य यांनी लिहिलेल्या एका लेखामध्ये मांडलेले विचार उधृत करणे मला जास्त श्रेयस्कर वाटते. नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या दै. 'तरूण भारत' मध्ये दिनांक ३० सप्टेंबर १९७४ रोजीच्या अंकात पृष्ठ २ वर "**नव्या आकृतीबंधाने कॉलेजे ओस पडतील**" या मथळ्याच्या प्राचार्य अण्णासाहेब वैद्य यांनी लिहिलेल्या लेखातील पुढील मजकूर (शब्दशः) पहा :-

"अमरावती जिल्ह्यात असणाऱ्या महाविद्यालयातील पूर्व विद्यापीठ वर्गात (१९७४ साली) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास ५००० इतकी आहे. (१९७५ साली) निकाल कितीही चांगले असले तरी अमरावती जिल्ह्यात ५००० पेक्षा अधिक विद्यार्थी (अकरावीला) असणार नाहीत. ११ वीला बोर्डाची परीक्षा आहे. निकाल ६० टक्के लागला असे गृहित धरले तर बारावीत ३००० विद्यार्थी येतील पुन्हा बारावीची परीक्षा बोर्ड घेणार. निकाल ६० टक्के म्हणजे १८०० विद्यार्थी उत्तीर्ण होणार. यात २०० विद्यार्थी इंजिनियरिंग व मेडिकलकडे जातील. काही विद्यार्थी नोकरी करतील. काही व्यावसायिक शिक्षणाकडे जातील तर काहींना पुढे शिकणे शक्य होणार नाही. इंजिनियरिंग धरून या जिल्ह्यात २६ महाविद्यालये आहेत. सर्व विद्यार्थी शिकतील असे गृहीत धरले तरी १८०० विद्यार्थी या २६ महाविद्यालयांत विभागले जातील. म्हणजे पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्गासाठी सरासरी ७० विद्यार्थी मिळतील. प्रत्येक महाविद्यालयात किमानपक्षी दोन विद्याशाखा तरी आहेतच. हे ७० विद्यार्थी या दोन विद्याशाखात विभागले जातील. पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्गाची परीक्षा झाली. म्हणजे दुसऱ्या वर्गासाठी ३५ व नंतर तिसऱ्या वर्गासाठी २० विद्यार्थी असतील म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या पदवी परीक्षेची तीन वर्षे मिळून जेमतेम १५० च्या घरांत जाईल."

### पर्यायी व्यवस्था काही केली नाही

**५.** याच लेखात प्राचार्य अण्णासाहेब वैद्य पुढे लिहितात :-

"महाविद्यालयात अतिशयच कमी विद्यार्थी आल्याने अनेक महाविद्यालये बंद करावी लागणे हा या नव्या आकृतीबंधाचा विदर्भाच्या शैक्षणिक जीवनावर होणारा अपरिहार्य परिणाम होय. या आकृतिबंधामुळे आजची शैक्षणिक घडी उध्वस्त होईल. बरे या जागी नवी घडी उभारणे तरी जमणार आहे का?

वेगवेगळ्या प्रकारचे धंदे शिक्षण सुरू करणे हा नव्या आकृतिबंधाचा पाया आहे. त्या शिक्षणाचीही व्यवस्था पुरेशी तर सोडाच पण थोडी तरी केली जाईल की नाही ही शंकाच आहे. बंद झालेल्या शिक्षण संस्थामुळे ज्यांचे जीवन उध्वस्त झाले. अशा प्राध्यापकांचा व शिक्षकांचा वर्ग समाज जीवनात आला तर तो हे सर्व मुकाट्याने सहन करील ही अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल."

अण्णासाहेब वैद्य यांचा हा लेख काळजीपूर्वक वाचला तर ही गोष्ट सहज लक्षात येते की, ६०० ते ७०० विद्यार्थ्यांना पुरेसे शिक्षक, इमारती, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय इत्यादी सोई ज्या महाविद्यालयाजवळ उपलब्ध आहे. त्या महाविद्यालयामध्ये मधली काही वर्षे तरी जास्तीत जास्त १५० विद्यार्थी रहाणार. नव्हे अनेक महाविद्यालये ह्यामुळे बंद पडणार.

**१९७३ चा महाराष्ट्राचा कायदा**
**क्रमांक 33**

६. कृत्रिम कारणांनी विद्यार्थी संख्या कमी होण्याचे जे चित्र १९७४ मध्ये दिसू लागले. त्याचे गांभीर्य एक वर्ष अगोदर महाराष्ट्र शासनाने केलेल्या एका कृतीमुळे आणखीच गडद झाले होते. डॉ. कोठारी कमिशनने सुचविलेल्या १०+२+३ ची अंमलबजावणी करण्यासाठी भारतामध्ये कोणत्याही राज्य सरकारने उचलले नसेल असे क्रांतिकारक पाऊल म्हणून महाराष्ट्र शासनाच्या १९७३ च्या अधिनियम क्रमांक (Maharashtra College Teachers (Temporary

*(सहपत्र एक : परिच्छेद ३, ६ व २१ पहा)*

**(भाग चार) महाराष्ट्र शासन राजपत्र, जून ७, १९७३ गुरूवार, मे ३१, १९७३**

Education Department Sachivalaya Annexe, Bombay-32, 31st May 1973

# Maharashtra Ordinance No. IX of 1973

An ordinance to provide for the postponement of confirmation in service of teachers in affiliated and constituent colleges of certain Universities in view of proposed revision of the pattern of education.

**WHEREAS** at present courses for the degree of Bachelor of Art, Science, Commerce or Engineering take four years and courses in the schools in the State ten or eleven years;

**AND WHEREAS** it is proposed to revise the pattern of education and colleges in the State, so as to have a ten years course for secondary education, two years courses for higher secondary education, and three or more years courses for the degree of Bachelor of Arts, Science, Commerce or Engineering;

**AND WHEREAS** it is proposed to introduce in colleges and selected higher secondary schools, a two year course of higher secondary education;

**AND WHEREAS** as a consequence of the aforesaid, the number of teachers in the affiliated or constituent colleges under certain Universities may have to be reduced, and it is necessary to provide for the postponement of the confirmation in service of teachers of colleges;

**AND WHEREAS** both Houses of the Legislature of the State are not in session;

**AND WHEREAS** the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to make a law for the purpose aforesaid and for matters connected therewith or incidental thereto;

**Now, therefore,** in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby makes and promulgates the following Ordinance, namely;

***1. Short title and commencement*** - (1) This Ordinance may be called the Maharashtra College Teachers (Temporary postponement of confirmation) Ordinance, 1973.

***2. Definitions*** - In this Ordinance, unless the context otherwise requires, -

**(a)** "**college**" means an affiliated or constituent college (but does not include a Government college.);

**(b)** "**relevant Act**" means the Poona University Act 1978, the Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University Act 1949, the Bombay University Act 1953, the Marathwada University Act 1958, the Shivaji University Act 1962 or the Nagpur University Act 1963, as the case may be, under which the particular University is established;

**(c)** "**University**" in relation to a college, means the University of Poona, the Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University, the University of Bombay, the Marathwada University, the Shivaji University or the Nagpur University, as the case may be, to which it is affiliated or of which it is a constituent college;

(d) words and expressions used in this Ordinance and not defined shall have the meanings assigned to them in the relevant Act.

*3. Temporary postponement of confirmation of teachers in colleges* - Notwithstanding anything contained in the relevant Act (and in the Statutes, Ordinances, Regulations and Rules made thereunder), or in any other law for the time being in force, or in any contract, a teacher of a college, who is a temporary employee or on probation and not confirmed immediately before the commencement of this Ordinance, shall not be confirmed until such date as the State Government may by notification in the Official Gazette appoint and **his services shall be liable to be terminated at any time by the management of the college by giving him one month's notice, or salary in lieu therof.**

**STATEMENT**

Now that the State and Central Government have at the level of the Chief Ministers Conference approved of the 10+2+3 pattern of education and colleges will be only in-charge of the three or more years Bachelor degree courses and post graduate education, a certain number of lecturers and tutors employed in colleges at present may be rendered surplus and would have to join as higher secondary school teachers. It appears that according to the Statutes and rules of some of the Universities in Maharashtra, a tutor or lecturer or professor in non-Government affiliated or constituent colleges get automatic confirmation within two years after his joining or is accorded confirmation automatically. **Since these tutors, lecturers, etc. who are likely to be rendered surplus may have to be given notices of discharge** or persuaded to teach higher secondary classes that would be run in their colleges, it is necessary immediately to postpone their confirmation, so that the difficulty in transfer of the first two years college education to the higher secondary schools or higher secondary classes run in colleges will be solved smoothly and will involve no administrative or monetary problems. **It is, therefore, necessary to postpone the confirmation of all tutors, lecturers and professors** who are serving in the colleges in the State and who have not been confirmed so far. This has to be done immediately as normally new recruits join during June on the opening of colleges and their two years completion period normally coincides with the first fortnight of June.

2. As both Houses of the State Legislature are not in session, and immediate action is required to make necessary law for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

**Ali Yavar Jung,**
**Government of Maharashtra**

Dated the 31st day of May, 1973

by order and in the name of the Governor of Maharashtra.

**A.U.Shaikh**
**Secretary to Government.**

**टीप** : उपरोक्त अध्यादेशाचे पुढे कायद्यात रुपांतर करण्यात आले. तो कायदा म्हणजे ८ सप्टेंबर १९७३ रोजी अंमलात आलेला सन १९७३ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ होय. त्याच्या तरतुदी ३१ मे १९७३ पासून अंमलात आल्याचे समजले जाईल असे त्या कायद्यातच नमूद होते.

*****

postponement of confirmation Act, 1973 Maharashtra Act No. 33 of 1973) ३३ चे सांगता येईल. सुरूवातीला वटहुकूम काढून हा कायदा प्रख्यापित करण्यात आला होता. (Maharashtra Ordinance No. IX of 1973)

### या कायद्याचे स्वरूप व दुष्परिणाम

**७.** "३१ मे १९७३ या दिवसापासून तर राज्य सरकार पुढे राजपत्रात जाहीर करील त्या तारेखपर्यंत कोणत्याही प्राध्यापकाला सेवेमध्ये कायम (confirm) केले जाणार नाही इतकेच नव्हे तर त्याला एक महिन्याचा पगार किंवा एक महिन्याची नोटीस देऊन व्यवस्थापक केव्हाही काढून टाकू शकतील." असे या कायद्याचे थोडक्यात स्वरूप सांगता येईल. हा कायदा का म्हणून करण्यात आला याविषयीची कारण मीमांसा विधयेकाला जोडण्यात आलेल्या हेतू विवरण पत्रामध्ये (Statement of Objects and Reasons) दिसून येते. ९ ऑगस्ट १९७३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग ५ मध्ये पृष्ठ २०८ वर प्रसिद्ध झालेल्या या हेतूपत्रकाचा थोडक्यात सारांश असा - "काही विद्यापीठांमध्ये परिनियमानुसार प्राध्यापक दोन वर्षांनी आपोआप 'कन्फर्म' होतात. १०+२+३ च्या आकृतिबंधामुळे काही प्राध्यापक हे महाविद्यालयात जादा होतील. त्यांना एकतर सेवेतून काढून द्यावे लागेल किंवा 'हायर सेकंडरी'कडे शिक्षक म्हणून जावे लागेल. हे काम सुकर व्हावे म्हणून हा कायदा करण्यात आला आहे."

### कोणत्याही आकडेवारी शिवाय केलेला कायदा

**८.** खरोखरच कोणत्याही प्रकारची आकडेवारी व माहिती गोळा न करता अत्यंत बेजाबदारीने हा अध्यादेश काढण्यात आला होता. चर्चेत वारंवार सरप्लस किती लोक होतात? असा प्रश्न विचारण्यात आल्यावरही सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी दिलेले उत्तर पाहिले की, ही बेजबाबदारी जास्तच स्पष्ट होते. ते म्हणाले, "मी आपल्याला सांगितले की, प्रत्येक संस्थेमध्ये किती सरप्लस होतील ते सांगता येणार नाही. कारण काही लोकांचे एक वर्ष पुर्ण झाले की, पुढील वर्षामध्ये कन्फर्मेशन व्हायचे असते. काही लोक कन्फर्म होण्याच्या स्थितीमध्ये असतात. मी काही चित्रगुप्त नाही की, प्रत्येक गोष्टीची मोजदाद करू शकेन." (महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, दिनांक ६.८.१९७३)

### सुरक्षितता व असुरक्षितता

**९.** शेकडो प्राध्यापक अस्थायी राहिल्यामुळे या क्षेत्रात जी असुरक्षितता निर्माण झालेली आहे, त्याचा शैक्षणिक दर्जावर अतिशय वाईट परिणाम होणार आहे. या वटहुकूमावर बोलतांना विधानपरिषदेत सन्माननीय सभासद श्री.ग.प्र.प्रधान यांनी ही स्थिती अत्यंत समर्पक शब्दात सांगितली. ते म्हणाले "ज्याने एम्.ए. होऊन दोन वर्षे एखाद्या संस्थेत उत्तम काम केलेले आहे. त्याच्या मनात भितीची आणि असुरक्षिततेची आपण भावना निर्माण करतो म्हणजे त्याच्या जीवनाला योग्य चालना देतो काय? याचा आपण विचार केला पाहिजे. तो जर आपल्या भविष्याविषयी साशंक असेल तर त्याचे मन आपल्या कामात लागणार नाही. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होईल. या गोष्टीची आम्हाला चांगली कल्पना आहे की, जर आपल्या मनांत असुरक्षिततेचे वातावरण असेल तर आपण जे काम करतो त्यात रस घेऊन चांगल्या प्रकारचे काम करावे असे वाटेल?" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, पृष्ठ १०१४)

"शिक्षकांना सुरक्षितता देण्यासाठी कायद्यात तरतुदी करा" असे म्हटले तर 'कायद्यात अशा तरतुदी टाकता येत नाहीत. त्या विद्यापीठांना स्टॅट्युटने कराव्या लागतील" अशी उत्तरे अधिकृतपणे शासनाकडून त्यापूर्वी वारंवार दिल्या गेली होती. मात्र असुरक्षितता प्रदान करणारा कायदा मात्र शासनाने स्वतः केलेला होता."

### अतिरिक्त शिक्षक ठरविण्यासाठी कार्यशाळा

**१०.** पंधरा वर्षांचा शैक्षणिक आकृतीबंध पंधरा वर्षांचाच राहिल्यामुळे पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयातून ओस पडलेला वर्ग व त्या मागोमाग अतिरिक्त ठरत असलेला वर्ग त्या ठिकाणी पाहायला मिळाला नाही. विदर्भात मात्र १४ वर्षांचा आकृतीबंध १५ वर्षांचा झाल्यामुळे दहावीचे विद्यार्थी ज्यावेळेला ११ व्या वर्गात गेले त्यावेळेला

---

*(सहपत्र दोन : परिच्छेद ८ पहा)*

## *मी काही चित्रगुप्त नाही की, प्रत्येक गोष्टीची मोजदाद करू शकेन.*

*( विधानसभेच्या अधिकृत प्रतिवेदनातील लागूपुरता उतारा )*

"**श्री.त्र्यं.सी.कारखानीस :** सरप्लस किती होते ते सांगा.

**श्री.अ.ना.नामजोशी :** मी आपल्याला सांगितले की, प्रत्येक संस्थेमध्ये सरप्लस किती होतो ते सांगता येणार नाही. कारण काही लोकांचे एक वर्ष पूर्ण झाले की, पुढील वर्षामध्ये कन्फर्मेशन व्हावयाचे असते. काही लोक कन्फर्म होण्याच्या स्थितीमध्ये असतात. **मी काही चित्रगुप्त नाही की, प्रत्येक गोष्टीची मोजदाद करू शकेन.** मी आपल्याला पूर्वी सांगितलेच आहे की, ह्याच्यासंबंधी जे विधेयक घेतले होते त्याचा उद्देश एवढाच होता की, नवीन जबाबदाऱ्या संस्थांवर राहू नयेत. यापलीकडे याचा तसा काहीच उद्देश नाही. आम्हाला याच्यामध्ये जास्त विद्यार्थी सामावून घ्यावयाचे आहेत. परंतु ह्या सगळ्या गोष्टी गणिताने करता येणार नाहीत. त्याला आपणास परिस्थिती समजावून घ्यावी लागेल. एखाद्या शाळेमधील उत्तम शिक्षक असेल तर त्याला कदाचित हायर सेकंडरी मिळेल या गोष्टीची शक्यता आहे आणि या संदर्भाने मी खुलासा केला आहे. म्हणून अध्यक्ष महाराज, मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, शासनाच्या हेतूविषयी मनामध्ये कोठल्याही प्रकारची शंका ठेवू नका. **त्याचप्रमाणे मी आपणास सांगतो की, प्राध्यापकांवर अशा तऱ्हेची कुऱ्हाड येणार आहे असे नाही. त्यांना शक्य तेथे सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.** तेव्हा यात शंका बाळगण्याचे कारण नाही आणि याचा बाऊ करण्याचेही कारण नाही." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाहीःसोमवार, दिनांक ६ ऑगस्ट १९७३ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ३८, क्रमांक ०६, पृष्ठ ५००-५०१)*

---

*(सहपत्र तीन : परिच्छेद ९ पहा)*

## *त्याच्या मनात भितीची आणि असुरक्षिततेची आपण भावना निर्माण करतो म्हणजे त्याच्या जीवनाला योग्य चालना देतो काय?*

*( विधानपरिषदेच्या अधिकृत प्रतिवेदनातील लागूपुरता उतारा )*

"**श्री.ग.प्र.प्रधान :** ज्याने एम्.ए. होऊन दोन वर्षे एखाद्या संस्थेत उत्तम काम केलेले आहे. **त्याच्या मनात भितीची आणि असुरक्षिततेची आपण भावना निर्माण करतो म्हणजे त्याच्या जीवनाला योग्य चालना देतो काय? याचा आपण विचार केला पाहिजे. तो जर आपल्या** भविष्याविषयी साशंक असेल तर त्याचे मन आपल्या कामात लागणार नाही. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होईल. या गोष्टीची आम्हाला चांगली कल्पना आहे की, जर आपल्या मनांत असुरक्षिततेचे वातावरण असेल तर आपण जे काम करतो त्यात रस घेऊन चांगल्या प्रकारचे काम करावे असे वाटेल?" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, पृष्ठ १०१४)*

***** ***** *****

"**श्री.ग.प्र.प्रधान :** अध्यक्ष महाराज, मला एक माहिती विचारावयाची आहे. समजा १९७१ साली एक शिक्षक घेतला. तेव्हा त्याचे वेतन रुपये ३०० होते. त्यावर त्याचे कन्फर्मेशन झाले नाही. कन्फर्मेशन १९७५ पर्यंत पोस्टपोन केले. त्या कालावधीत त्याला समजा दोन इन्क्रीमेंट्स मिळाली असतील तर ती प्रोटक्ट झाली पाहिजेत. तशी होतील की नाही?" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : गुरूवार, दिनांक ३० ऑगस्ट १९७३ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ३८, क्रमांक २१, पृष्ठ १२८३)*

**टीप :** दिनांक ३० ऑगस्ट १९७३ ची विधानपरिषद चर्चेची अधिकृत प्रतिवेदने काळजीपूर्वक वाचली तर असे लक्षात येते की, श्री.ग.प्र.प्रधान यांच्या या प्रश्नाला शिक्षणमंत्र्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. (१) पुढे संघटनेने 'होय' असे या प्रश्नाचे उत्तर शासनाकडून मिळविले. (२) कनिष्ठ महाविद्यालयात कार्यभार दिला तरी "वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक" हा दर्जा व त्यासाठीची वेतनश्रेणी अबाधित राहील ही उपलब्धी मिळविली पण त्यासाठी संघटनेला बराच संघर्ष करावा लागला.

महाविद्यालयातील 'प्री-युनिर्व्हसिटी'चा वर्ग पूर्णपणे बंद पडला. त्यामुळे विद्यार्थी संख्येवर मोठाच परिणाम झाला. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण करण्यासाठी १९७६ च्या उन्हाळ्यामध्ये शासनाने मुंबई येथे सिडनहॅम कॉलेजमध्ये एक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेला उच्च शिक्षण विभागातील बहुतेक उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर विद्यापीठाकडून दोन प्रतिनिधी मागविण्यात आले होते. प्राचार्य संघटनेचे पदाधिकारी व धनवटे नॅशनल कॉलेजचे प्राचार्य श्री. मो. म. लांजेवार व 'नुटा'चे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख असे दोघेजण या कार्यशाळेला नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

## नागपूर व अमरावती विभागाकरिता वेगवेगळ्या समित्या

**११.** शिक्षक अतिरिक्त कसे ठरविण्यात यावेत याचे प्रशिक्षण दिले जात असतांना विदर्भातील महाविद्यालयांवर आणि विद्यार्थी संख्येवर नव्या आकृतीबंधाचा कसा विपरित परिणाम झालेला आहे? ही गोष्ट अतिशय आक्रमकपणे मी स्वतः या कार्यशाळेमध्ये मांडली व "विदर्भातील महाविद्यालयातील शिक्षक अतिरिक्त ठरवितांना एका वर्षाची विद्यार्थी संख्या ही गृहित धरून अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण करण्यात यावे" अशी मागणी केली. ही गोष्ट त्या कार्यशाळेमध्ये मान्य झाली. कार्यशाळा संपल्यानंतर एक ज्येष्ठ शासकीय अधिकारी व एक विद्यापीठाचा प्रतिनिधी अशा दोघांची एक समिती नेमून महाविद्यालयातील अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण करण्यात यावे अशा प्रकारचा निर्णय झाला. शासनाला या कामाची इतकी घाई होती की, सर्व नागपूर विद्यापीठाकरीता नागपूर येथेच एका ठिकाणी काम केले तर उशीर होईल म्हणून विदर्भातील नागपूर विभागाकरीता त्यावेळेचे शिक्षण उपसंचालक श्री.दुबे व प्राचार्य लांजेवार या दोघांच्या समितीने नागपूर विभागाकरीता नागपूर येथे काम करावे व शासकीय शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सराफ व प्रा.बी.टी.देशमुख या दोघांच्या समितीने अमरावती येथे नागपूरी गेटजवळील शासकीय शिक्षण महाविद्यालयात बैठका घेऊन हे काम पूर्ण करावे असे शासनाचे आदेश झाले व या दोनही समित्यांनी नागपूर व अमरावती येथे आपल्या कामाला सुरूवात केली.

## प्रत्येक विषयाच्या तासिकांबाबतचा गोंधळ

**१२.** या समितीमध्ये काम करीत असतांना आणखी एका महत्त्वाच्या गोंधळाला आम्हाला तोंड द्यावे लागले. तो गोंधळ कोणत्या स्वरूपाचा होता, हे पाहू. नागपूर विद्यापीठ स्थापन झाल्यापासून तर १९७६ या वर्षापर्यंत कला, समाजशास्त्र व वाणिज्य या विद्याशाखांतील कोणत्या विषयाला किती तासिका दर आठवड्याला देण्यात याव्यात? ही गोष्ट कधीही लेखी स्वरूपात ठरविण्यात आलेली नव्हती व विद्यापीठातर्फे कोणत्याच वर्गाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये (Prospectus) तसे प्रसिद्ध करण्यात येत नव्हते, आलेले नव्हते. त्या मागचे कारण साधे, सरळ व सोपे होते. अर्थशास्त्र या विषयाचे उदाहरण घेऊ. समजा 'प्री-युनिर्व्हसिटी' व पदवीचे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष असे मिळून ४ वर्ग त्या महाविद्यालयामध्ये असतील तर अर्थशास्त्र या विषयाला दर आठवड्याला ५ तासिका द्यायच्या व समजा 'प्री-युनिर्व्हसिटी' करीता दोन सेक्शन असल्यामुळे एकूण त्या महाविद्यालयात ५ वर्ग असतील तर अर्थशास्त्र या विषयाला आठवड्याला ४ तासिका द्यायच्या अशा गणिताप्रमाणे विषयवार तासिकांचे वाटप केल्या जात असे. वाणिज्य शाखेतसुद्धा अशीच परिस्थिती होती. सारांश काय तर, एका विषयाला आठवड्याला किती तासिका असाव्या याला महत्त्व नव्हते तर एका शिक्षकाला पूर्ण काम देणे यावर भर होता आणि त्यामुळे ५ वर्ग असतील तर त्या विषयाला आठवड्याला ४ तासिका व ४ वर्ग असतील तर आठवड्याला ५ तासिका अशी पद्धत रूढ झाली होती. कला, समाजशास्त्र व वाणिज्य विद्याशाखेच्या बहुतेक विषयांच्या बाबतीत अशीच परिस्थिती होती. याच्या उलट परिस्थिती ही विज्ञान शाखेमध्ये होती. विज्ञान शाखेमध्ये कोणत्या विषयाला किती तासिका असाव्यात हे काटेकोरपणे ठरविण्यात आले होते व विज्ञान शाखेच्या प्रत्येक अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये ते विद्यापीठातर्फे छापून प्रसिद्ध सुद्धा केल्या जात असे.

## पाच तासिकांचा कार्यभार

**१३.** ग्रामीण भागातील बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये चारच वर्ग राहत असत आणि त्यामुळे प्रत्येक विषयाला आठवड्याला ५ तासिका दिल्या जात असत. त्यामुळे बहुसंख्य ग्रामीण भागातील गेल्या दोन वर्षांतील वेळापत्रकांच्या प्रती आम्ही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विनंती करून प्राचार्यांमार्फत सराफ व दुबे समितीसमोर दाखल करवून घेतल्या. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण करतांना एकाच विषयाला काही ठिकाणी ४ तासिका व काही ठिकाणी ५ तासिका असे करणे हे दुबे व सराफ यांच्या समितीला शक्य नव्हते व त्यामुळे बहुतेक ठिकाणी विषयनिहाय ५ तासिकांचा कार्यभार निश्चित करण्यात आला होता. शिक्षकनिहाय आठवड्याला २० तासिका याबाबत वाद नव्हता.

## दोनही समित्यांचे काम रद्द ठरविण्यात आले

**१४.** नागपूर येथे दुबे-लांजेवार समितीचे कामकाज तेथील शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयात व अमरावती येथे सराफ-बी.टी.देशमुख समितीचे कामकाज नागपूरी गेट परिसरातील शासकीय शिक्षण महाविद्यालयामध्ये पार पडले. एका बाजूला मुंबईच्या कार्यशाळेमध्ये एका वर्षाची विद्यार्थी संख्या काल्पनिकरीत्या गृहित धरुन विदर्भात कार्यभार मोजण्याची बाब मंजूर झालेली असल्यामुळे व दुसऱ्या बाजूला कला, समाजशास्त्रे व वाणिज्य या विद्याशाखेमध्ये प्रत्येक विषयाला ५ तासिका द्यायचा निर्णय कायम करण्यात आलेला असल्यामुळे अतिरिक्त शिक्षक फारच कमी निघाले. ज्या नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये शेकडोच्या संख्येत अतिरिक्त शिक्षक निर्धारित होतील अशी शासनाला अपेक्षा होती, त्या नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये दोनही समित्यांचे कामकाज पार पडल्यानंतर दोन आकड्यांच्या संख्येतसुद्धा शिक्षक अतिरिक्त झाले नाहीत. या गोष्टीमुळे शासनात फार मोठी खळबळ उडाली व प्रा.बी.टी.देशमुख व प्राचार्य लांजेवार यांनी विषयवार तासिका वाढवून घेतल्यामुळे फारसे शिक्षक अतिरिक्त झाले नाहीत असा शासनामध्ये ग्रह करून देण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की, या दोनही समित्यांनी केलेले कामकाज शासनाने पूर्णपणे रद्दबातल ठरविले व विद्यापीठ स्तरावर एक समिती नेमून हे काम पुन्हा करण्यात यावे असे आदेशित करण्यात आले.

## अस्तित्वात असलेल्या निकषाप्रमाणेच काम करा

**१५.** उच्च शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १९ मे १९७६ रोजी एक परिपत्रक (No.HSG-1976/A) काढून याबाबतच्या मार्गदर्शक सूचना विद्यापीठाकडे व सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे पाठविल्या. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण करण्यासाठी पाठविलेल्या या मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद 2(a) मध्ये स्पष्टपणे पुढीलप्रमाणे उल्लेख होता :-

"Existing norms of the University be taken into account while calculating the workload at the collegiate level."

असा उल्लेख असण्याचा मुख्य हेतू म्हणजे दर आठवड्याला दर विषयाला किती तासिका असाव्या याबाबत अस्तित्वात असलेले निकषच धरण्यात यावे. नव्याने तुम्ही काही ठरवू नका हे नमूद करणे हा होता.

## अतिरिक्त शिक्षकांच्या जागा संपुष्टात आणा

**१६.** या कवायतीमध्ये जे शिक्षक अतिरिक्त ठरतील त्या शिक्षकांची पदे संपुष्टात आणण्यासाठी महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी विद्यापीठाकडून परवानगी घ्यावी आणि आवश्यक असतील तेवढेच शिक्षक महाविद्यालयामध्ये ठेवावे अशीही स्पष्ट सूचना उच्च शिक्षण संचालकांनी या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केली होती. या मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद ७ मधील उल्लेख शब्दश पुढीलप्रमाणे:-

"The managements of colleges should approach the University authorities for **the abolition of the surplus posts at the college level** in the light of the calculation of the subjectwise workload available at the collegiate level so that they may retain only the required number of teachers as college teachers."

## २ जूनच्या अगोदर काम आटोपले पाहिजे

**१७.** शेकडो शिक्षकांना अतिरिक्त ठरविल्यामुळे शासनाचे लक्षावधी रुपये वाचविल्याचे श्रेय मिळविण्यासाठी घाई करणाऱ्या अधिकाऱ्यांनी ही सर्व कवायत कोणत्याही परिस्थितीत २ जूनच्या अगोदर आटोपली पाहिजे असेही ठरविले होते. उच्च शिक्षण संचालकांच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये परिच्छेद ८ मध्ये तसे स्पष्टपणे नमूद होते. ते पुढील शब्दात :-

"Every effort should be made to complete the entire work latest by the 2nd of the first week of June, 1976."

## मार्च १९७५ मधील समस्या

**१८.** सन १९७६ मधील हा घटनाक्रम विदित करतांना मार्च १९७५ मधील एका घडामोडीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. बहिष्कार आंदोलनामुळे अनेक विद्यापीठात परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. त्यामुळे प्राध्यापकांशी चर्चा केली पाहिजे अशा प्रकारची जी भावना तीव्रतेने शासनस्तरावर दिसून आली, तिला सामोरे जाण्यासाठी चर्चा करतांना प्राध्यापकांच्यावतीने बाजू मांडण्यासाठी डॉ.एल. बी. केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त यांच्या नेतृत्त्वामध्ये एक प्रतिनिधी मंडळ तयार करण्यात आले. आम्ही प्रतिनिधी मंडळाच्या सर्व सदस्यांनी 'बुक्टु'च्या किमतराय बिल्डिंगच्या कार्यालयामध्ये बसून समस्यापत्रक तयार केले व ते शासनाकडे पाठविण्यात आले. त्यातील प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे होत्या :- (१) तिसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष, विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस

केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या, वेतनश्रेण्या महाराष्ट्रात जशाच्या तशा अंमलात आणल्या जाव्यात. (२) सातत्याने वेतन उशिराने होण्याच्या प्रश्नावर उपाययोजना म्हणून सर्व शिक्षकांचे वेतन माध्यमिक शिक्षकांप्रमाणे कोषागारामार्फत केले जावे. (३) सन १९७३ चा अध्यादेश क्रमांक ३३ प्रख्यापित करून प्राध्यापकांच्या स्थायीकरणावर शासनाने आणलेली बंदी ताबडतोब उठविण्यात यावी व दोन वर्षांची सेवा झालेल्या सर्व शिक्षकांना सेवेत कायम करण्यात यावे. (४) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी सेवाशाश्वती लाभाच्या तरतुदी ह्या ताबडतोबीने केल्या जाव्यात. (५) नवीन आकृतिबंधामुळे ७ फेब्रुवारी १९७५ रोजी स्पष्ट रिक्त पदावर काम करीत असलेल्या शिक्षकांच्या संख्येमध्ये कपात होता कामा नये व त्यांच्या वेतनश्रेण्या सुद्धा संरक्षित केल्या जाव्यात. (६) विद्यापीठ अनुदान आयोगाने डेमॉन्स्ट्रेटर व ट्युटरची पदे ही बरखास्त केलेली असून पात्र असलेल्या अशा सर्व शिक्षकांना अधिव्याख्याता म्हणून बढती दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने याबाबतची कार्यवाही तत्परतेने पूर्ण करावी.

## शासनाचे विधानसभेत निवेदन

**१९.** मार्च १९७५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या मा.शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांनी प्राध्यापकांच्या प्रतिनिधी मंडळाशी निदान चार-पाच वेळा तरी चर्चा केली. शासनाच्या बाजूने सचिव श्री. के. के. मोघे हे त्यांच्या मदतीला होते. प्रत्येक प्रश्न त्यांनी बारकाईने समजून घेतला व समजून घेतल्यानंतर जवळ जवळ सर्वच मागण्यांच्या बाबतीत त्या होकारार्थी आहेत असे वातावरण निदान चर्चेच्या वेळी तयार झालेले होते. दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी सभागृहामध्ये मा. शिक्षणमंत्र्यांनी याबाबतचे तपशीलवार निवेदन केले. *(P196NB2019)* महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या अनेक प्रश्नाबाबत विधानमंडळाच्या इतिहासामध्ये प्राध्यापकांशी चर्चा करून पहिल्यांदाच अशा प्रकारचे निवेदन विधानसभेत करण्यात आले होते.

## वेतन वितरण व्यवस्थेबाबत

**२०.** मा.शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत हे जे निवेदन केले, त्या निवेदनात सातत्त्याने वेतन उशिराने होण्याच्या प्रश्नावर उपाययोजना म्हणून सर्व शिक्षकांचे वेतन माध्यमिक शिक्षकांप्रमाणे कोषागारामार्फत केले जावे या मागणीबाबत पुढीलप्रमाणे नमूद केले होते. :-

"(२) **शासकीय कोषागारांमार्फत पगार वाटप :-** काही प्राध्यापकांचा पगार मिळण्याबाबत तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. यासंबंधी प्राध्यापकांची मागणी अशी आहे की, त्यांना शासकीय कोषागारांमार्फत पगार मिळावा. नियमाप्रमाणे देय असलेला पगार सेवकांना मिळाला पाहिजे असे शासनास वाटते. **चालकांद्वारा शिक्षकांना चेकने वेतन मिळावे हे शासनाने तत्त्वतः मान्य केले आहे.** ही बाब चालकांद्वारा प्रत्यक्षात कशी कार्यान्वित करावी याबद्दल शासन प्रयत्नशील राहील." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९७५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३, क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८)*

## स्थायीकरणावर बंदी

**२१.** सन १९७३ चा अध्यादेश क्रमांक ९ प्रख्यापित करून प्राध्यापकांच्या स्थायीकरणावर शासनाने आणलेली बंदी ताबडतोब उठविण्यात यावी व दोन वर्षांची सेवा झालेल्या सर्व शिक्षकांना सेवेत कायम करण्यात यावे अशी जी मागणी करण्यात आली होती त्याबाबत मा. शिक्षणमंत्र्यांच्या या निवेदनामध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते. :-

"(३) **स्थायीकरणाचा कायदा :-** कायम करण्याबाबत लावलेला गतीरोध शासनाने, दिनांक १२ फेब्रुवारी १९७५ रोजी **अधिसूचना काढून रद्द केला आहे.** त्या आधी जे शिक्षक कायम होण्यास पात्र होते, त्यांनाही त्या त्या तारखेपासून **कायम करण्याकरिता योग्य त्या शासकीय सूचना** सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. इतके करूनही जर काही ठिकाणी कायद्याच्या आधारावर अडचण येण्याची शक्यता असेल तर ती दूर करण्याच्या उद्देशाने संबंधित कायद्यात योग्य तो फेरबदल करण्याची कार्यवाही शासनाने हाती घेतलेली आहे. या गतिरोधाचा फायदा घेऊन मध्यंतरीच्या ३१ मे १९७३ ते १२ फेब्रुवारी १९७५ या काळात सुडबुद्धीने वा किरकोळ कारणांवरून जर कोणाला नोकरीतून कमी करण्यात आले असेल तर विद्यापीठाच्या अधिपत्याखाली संबंधितांची एक समिती याबाबत गुणवत्तेनुसार प्रत्येक तक्रारीचे निवारण करेल." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९७५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३, क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८)*

## कारवाई जोरात सुरूच होती

**२२.** स्थायीकरणावर बंदी घालणारा गतिरोध १२ फेब्रुवारी १९७५ रोजी अधिसूचना काढून शासनाने रद्द केला आहे असे विधानसभेत सांगितले तरी इकडे पुरेसे सरप्लस निघाले नाही म्हणून दुबे-लांजेवार व सराफ-बी.टी.देशमुख समित्यांचे काम शासनाने रद्द ठरविले होते. १९ मे १९७६ रोजी पत्रक काढून उच्च शिक्षण संचालकांनी जे शिक्षक अतिरिक्त ठरतील त्यांची पदे संपुष्टात आणण्याची कारवाई २ जून १९७६ च्या पूर्वी पूर्ण करा असा तगादा लावला होता व त्यासाठी ॲडहॉक कमेटी नेमण्याची कारवाई विद्यापीठस्तरावर सुरू झाली होती.

## विद्यापीठाच्या ॲडहॉक समितीची नेमणूक

**२३.** नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.डी.वाय.गोहोकार यांनी शासनाच्या सूचनेप्रमाणे १३ सदस्यांची एक ॲडहॉक समिती या कामासाठी नेमली. विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.बाबासाहेब घारफळकर हे या समितीचे अध्यक्ष होते. समिती नेमतांना त्या समितीमध्ये शिक्षकांचे प्रतिनिधी नेमू नयेत अशा तोंडी सूचना शासनाकडून करण्यात आल्या असता मा.कुलगुरू डॉ.गोहोकार यांनी शासनाला स्पष्टपणे सांगितले, "विद्यापीठातर्फे समिती नेमली जाणार असेल तर त्यामध्ये शिक्षक, प्राचार्य, व्यवस्थापक या सर्वांचे प्रतिनिधी राहतील. एकतर्फी समिती नेमायची असेल तर ती शासनाने नेमावी. ती जबाबदारी विद्यापीठावर टाकू नये." डॉ.गोहोकार यांच्या या धोरणामुळेच या समितीवर 'नुटा'चे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख, सचिव डॉ.अरविंद बारहाते व अमरावती जिल्हा नुटा युनिटचे अध्यक्ष प्रा.रघुनाथराव तट्टे या तीन सदस्यांची नेमणूक झाली होती. **या समितीचे कामकाज जेव्हा सुरू झाले तेव्हा पहिल्याच बैठकीमध्ये विषयवार किती तासिका असाव्यात याबाबतचा विषय चर्चेला आला.**

## ॲडहॉक समितीने निकष ठरविले

**२४.** विज्ञान शाखेमध्ये कोणत्या विषयाला आठवड्याला किती तासिका द्याव्यात याबाबतचे निश्चित नियम होते. दरवर्षी विद्यापीठातर्फे प्रकाशित होणाऱ्या अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये ते नियम प्रसिद्ध केले जात असत. त्यामुळे त्या विद्याशाखेत त्याबाबतीत कोणताही वाद नव्हता. मात्र कला, समाजविज्ञान व वाणिज्य शाखेमध्ये नागपूर विद्यापीठ स्थापन झाल्यापासून तर १९७६ पर्यंत कोणतेही निकष उपलब्ध नव्हते. (फक्त इंग्रजी विषय व त्या विषयाच्या स्वाध्याय तासिकांचे निकष हे अपवाद होते.) "अस्तित्वात असलेलेच निकष धरण्यात यावे." असा शासनाचा तगादा होता. "जेथे निकषच अस्तित्वात नाही तेथे काय धरण्यात यावे" याचा निर्णय केल्याशिवाय ॲडहॉक समितीचे काम पुढे सरकू शकत नव्हते. याबाबतची चर्चा समितीमध्ये सुरू झाली. यावेळी 'नुटा'च्या सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी खूपच मेहनत घेऊन काम केले. दुबे व सराफ समितीप्रमाणे यावेळीसुद्धा गावोगाव दौरे करून त्या त्या महाविद्यालयांच्या प्राचार्यामार्फत गेल्या दोन वर्षातील वेळापत्रके समितीसमोर दाखल करण्यात आली. ग्रामीण भागातील बहुतेक महाविद्यालयांमध्ये ४ वर्ग असल्यामुळे प्रत्येक विषयाला ५ तासिका दिल्या जात असत. प्रत्येक विषयाला दर आठवड्याला किती तासिका देण्यात याव्यात याबाबत नियम या समितीला ठरविणे भाग होते. तो नियम काय असावा याविषयीची खुप तपशीलवार चर्चा झाली आणि ५ तासिकांचा नियम मान्य करण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उरला नाही.

## इंग्रजी ट्युटोरिअल बद्दलचा वाद

**२५.** ॲडहॉक समितीमध्ये सर्वात जास्त वाद झाला तो इंग्रजी या विषयाच्या "स्वाध्याय तासिका" किती असाव्यात व त्यासाठी एका बॅचमध्ये किती विद्यार्थी असावेत यावरून झाला. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, स्वाध्याय तासिकेबाबतचा नियम हा गेल्या अनेक वर्षांपासून अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये छापून प्रसिद्ध केल्या जात असे. "**एका बॅचमध्ये १० पेक्षा जास्त विद्यार्थी असता कामा नये व एका बॅचला आठवड्याला दोन तासिका देण्यात याव्यात**" असा तो नियम होता व तो नियम अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये (Prospectus) वर्षानुवर्षे छापल्या जात होता. प्रत्यक्ष त्या नियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे कुठेही होत नसे. इंग्रजी विषयाचे शिक्षक मिळत नसत. त्यामुळे मिळालेल्या शिक्षकाचे विषय तासिकांचे काम आटोपून त्याला वेळ शिल्लक राहिल्यास स्वाध्याय तासिका दिल्या जात असत. आम्ही विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिका समितीसमोर सादर केल्या व त्या नियमाप्रमाणेच कार्यभार निश्चित करावा असा आग्रह धरला. "अस्तित्वात असलेल्या निकषाप्रमाणेच काम झाले पाहिजे" असा शासनाचा तगादा होता. इंग्रजी या विषयाचा एकही शिक्षक अतिरिक्त ठरणार नाही, असा हा एक लेखी सुवर्ण नियम आमच्या बाजूला होता.

## निकष ठरविण्यासाठी झालेली बैठक

**२६.** प्रत्येक महाविद्यालय निहाय अतिरिक्त शिक्षक निर्धारित करण्याचे काम सुरू करण्यापूर्वी निकष ठरविणे आवश्यक होते. दिनांक ७ व ८ ऑगस्ट १९७६ रोजी झालेल्या बैठकीत निकष ठरविण्याचे काम या समितीने हातावेगळे केले. त्यादिवशी या समितीच्या बैठकीला कोणकोण उपस्थित होते, याबाबतचा कार्यवृत्तातील भाग पुढीलप्रमाणे:-

"**NAGPUR UNIVERSITY :- Minutes of the Ad-hoc Committee** appointed by the Vice-Chancellor for assessment of surplus teaching staff held on 7th August at 5.00 P.M. and on 8th August, 1976 at 12 Noon, in the Nagpur University

Convocation Hall.

**Members Present :-** (1) Shri R.J.Gharphalkar (Chairman) (2) Shri G.J.Agrawal (3) Dr. G.M.Kulkarni (4) Shri B.L. Mishra (5) Shri L.D.Deshmukh (6) Shri R.G.Tatte (7) Justice Shri N.L.Abhyankar (8) Dr.B.R.Ashtikar (9) Shri M.M.Lanjewar (10) Shri R.N.Kharche (11) Shri B.D.Wanmali, (12) Shri B.T.Deshmukh (13) Prof.A.B. Barhate."

### स्वाध्याय तासिकांवर गाडे अडले

**२७.** दिनांक ७ ऑगस्ट १९७६ रोजीच्या बैठकीत हे निकष ठरवितांना विज्ञान शाखेबाबत कोणताही वाद नव्हता. कला, समाजविज्ञान व वाणिज्य शाखेत भाषाविषय सोडून प्रत्येक विषयाला ५ तासिका असाव्यात हा नियम मान्य झाला. कारण कोणताही लिखित नियम अस्तित्वात नव्हता पण बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये ४ वर्ग असल्यामुळे ५ तासिका दर आठवड्याला दिल्या जात असत. इंग्रजी विषयाच्या स्वाध्याय तासिकाबाबत मात्र बराच वाद झाला. आमचे म्हणणे असे की, अस्तित्वात असलेल्या लेखी निकषाप्रमाणेच निर्धारण व्हावे. प्राचार्यांचे विशेषतः प्राचार्य श्री.खर्चे यांचे म्हणणे असे होते की, "**त्यामुळे नुकसानच होईल. या समितीचे कामकाजच त्यामुळे अपघातग्रस्त होईल.**" समितीचे अध्यक्ष श्री.बाबासाहेब घारफळकर यांनी या चर्चेचा रागरंग ओळखून असा निर्णय दिला की, "आज या विषयावरची चर्चा आपण थांबवू व उद्या याबाबतीत अंतिम निर्णय करू" त्याप्रमाणे ७ ऑगस्ट रोजीची बैठक तहकूब झाली.

### प्राचार्य खर्चे यांचे प्रतिपादन

**२८.** बैठक तहकूब झाल्यावर श्री.बाबासाहेब घारफळकर यांनी स्वाध्याय तासिकांच्या बाजूने व विरोधात मते मांडणाऱ्या सदस्यांशी बोलून "संध्याकाळी ७ वाजता आपण बसू" असे सांगितले. त्याप्रमाणे त्यादिवशी सायंकाळी ७ वाजता धनवटे नॅशनल कॉलेजच्या बाजूला असलेल्या गेस्ट हाऊसमध्ये बाबासाहेबांच्या मुक्कामी आमची अनौपचारिक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये अतिशय अनौपचारिक वातावरणात प्राचार्य खर्चे यांनी म्हणणे मांडले ते असे की, "१० विद्यार्थ्यांची बॅच व प्रत्येक बॅचला आठवड्याला २ तासिका हा लेखी नियम आहे, हे खरे आहे. अनेक दिवसांपासून तो नियम अभ्यासक्रम पुस्तिकेत छापल्या जात आहे, हेही खरे आहे. पण प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी कुठेही होत नाही. काटेकोरपणे त्यांची अंमलबजावणी केली तर सरप्लस तर कोणी होणार नाहीच, पण डझनावारी शिक्षक नेमावे लागतील." प्राचार्य खर्चे यांच्या प्रतिपादनानंतर लिखीत नियमाप्रमाणे इंग्रजीचे प्राध्यापक किती नेमावे लागतील याचे गणीत सर्वांनी बसल्या बसल्या सुरू केले. तो आकडा बराच मोठा निघत होता. बाबासाहेब घारफळकरांनी थेट मुद्दा आपल्या हाती घेतला. ते म्हणाले, "बी.टी.! दुबे समितीचे व सराफ समितीचे काम शासनाने रद्द ठरविले. उद्या आपल्या समितीचे काम रद्द ठरविल्यावर त्यातून कोणाच्याच पदरात काहीच पडणार नाही. यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे."

### अनौपचारिक एकमत झाले

**२९.** प्रा.खर्चे यांचे म्हणणे बिनचूक होते. विशेषतः स्वाध्याय तासिकांच्या तरतुदींची अक्षरशः अंमलबजावणी करण्यामुळे डझनावारी शिक्षक नव्याने नेमण्याची वेळ आली व त्यामुळे या समितीचे कामकाजसुद्धा रद्द होणार असेल तर ती गोष्ट आम्हा कुणालाही नको होती. खर्चे यांचे युक्तीवाद खोडून काढण्यासारखे मुद्दे आम्हा तेथे उपस्थित असलेल्या तीनही शिक्षक प्रतिनिधी जवळ नव्हते. **इंग्रजी विषयाचे शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती एवढा एकच मुद्दा महत्त्वाचा होता.** बाबासाहेब घारफळकर यांच्या हस्तक्षेपामुळे तो मुद्दा सुद्धा निकाली निघाला. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर बाबासाहेब घारफळकरांनी त्यांचे म्हणणे सांगितले ते असे की, "बी.टी.! दहा विद्यार्थ्यांची बॅच व प्रत्येक बॅचला आठवड्याला दोन तासिका हा आग्रह सोडा. तुम्ही व तुमचे सहकारी प्रा.खर्चे व प्रा.लांजेवार यांच्याशी चर्चा करून योग्य तो निकष ठरवा. तो आपण उद्याच्या बैठकीत अंतिम करू. त्याप्रमाणे सर्व काम आटोपल्यावर इंग्रजी या विषयातील अतिरिक्त शिक्षकांची संख्या "दोन आकडी" निघाली तर आपण आपल्या निकषाचा पूर्नविचार करू. **शेवटी तुम्ही ज्या नियमाच्या आधारे बोलत आहात तो नियम लेखीच असल्यामुळे त्यांचा आधार आपल्याला केव्हाही घेता येईल.**" बाबासाहेबांच्या या उद्‌गारानंतर तेथे उपस्थित असलेल्या आम्हा शिक्षक व प्राचार्यांच्या प्रतिनिधींचे ढोबळमानाने "२५ विद्यार्थ्यांची बॅच व प्रत्येक आठवड्याला एका बॅचला एक तासिका" असा निकष ठरविण्यावर एकमत झाले.

### औपचारिक निर्णय झाला

**३०.** अगोदरच्या दिवशी म्हणजे दिनांक ७ रोजी सायंकाळच्या बैठकीत अनौपचारिकपणे जो निकष बाबासाहेब घारफळकरांच्या उपस्थितीत एकमताने ठरला तो दुसऱ्या दिवशीच्या म्हणजे ८ ऑगस्ट १९७६ रोजीच्या ॲडहॉक समितीच्या औपचारिक बैठकीत एकमताने अंतिम करण्यात आला. इंग्रजी विषयाच्या स्वाध्याय तासिकांबाबतचा या दिवशीच्या कार्यवृत्तामध्ये समाविष्ट असलेला निकष शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"Norms regarding workload for various subjects in various faculties** were decided as follows :-

ARTS

Compulsory English

Pre Arts. : 4 Lectures and 1 tutorial.

B.A. Part I : 4 Lectures and 1 tutorial.

B.A. Part II and III : 2 Lectures and 1 tutorial.

(Note :- The batches will be decided as follows)

One batch : 1 to 25 students.

Two batches : 26 to 50 students.

Three batches : 51 to 75 students.

Four batches : 76 and above.

(This will apply for Tutorial Classes in Arts, and Pre-Commerce, and B.Com, Part II, Classes in English.)"

येथे फक्त कार्यवृत्तातील इंग्रजी विषय व त्या विषयाच्या स्वाध्याय तासिकांबाबतचा मजकूर उधृत केलेला आहे. इतर विषयांच्या बाबतचे निकष नमूद असलेला मजकूर उधृत करण्याची आवश्यकता नाही.

### ॲडहॉक कमेटीची कार्यरिती

**३१.** एकदा सर्व विषयांच्या तासिका दिनांक ७ व ८ ऑगस्ट १९७६ रोजीच्या बैठकीमध्ये निश्चित झाल्यानंतर समितीचे कामकाज जोरात सुरू झाले. समितीने ठरविलेली कार्यरिती पुढीलप्रमाणे होती :-

(१) समितीने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विहित नमुन्यात कामाचे वाटप करावे. (२) याबाबतचे विवरणपत्र समितीसमोर सादर करावे. (३) त्या विवरणपत्रामध्ये प्रत्येक शिक्षकाची स्थिती निश्चित केलेली असावी. (४) असे करतांना प्रत्येक शिक्षकाला त्याची स्थिती विहित नमुन्यात व्यक्तीशः कळवावी व त्याबाबतची पोच घेतल्याची प्रत समितीसमोर सादर करावी. (५) स्थिती कळविण्यात आल्या दिवसापासून १५ दिवसांच्या आत त्या शिक्षकाने अर्जाद्वारे आपले काही म्हणणे असल्यास प्राचार्यामार्फत समितीकडे ते दाखल करावे. (६) ते दाखल करतांना त्यासोबतच प्राचार्यांचे त्याबाबत जे काय म्हणणे असेल तेही प्राचार्यांनी समितीसमोर दाखल करावे (७) अशा प्रत्येक अर्जाची प्राचार्यांसमक्ष समितीसमोर सुनावणी होऊन त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून त्याबाबत समिती आपला अंतिम निर्णय देईल. अशी ही कार्यरिती होती.

### इंग्रजीच्या शिक्षकांमध्ये असंतोष

**३२.** नागपूर विद्यापीठाच्या कॉनव्होकेशन हॉलमध्ये शिक्षकांची मोठी गर्दी रोज पहायला मिळत असे. पहिल्या मजल्यावरील समिती कक्षात समितीचे कामकाज चालत असे. समितीचे कामकाज पारदर्शक पद्धतीने चालत असल्यामुळे सर्वच निकष सर्वांनाच ज्ञात झालेले होते. इंग्रजी विषयाच्या शिक्षकांमध्ये त्यामुळे तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. "**१० विद्यार्थ्यांची तुकडी व एका तुकडीला आठवड्याला दोन तासिका**" हा नियम बदलवून "**२५ विद्यार्थ्यांची तुकडी व आठवड्याला एक तासिका**" असा नवा नियम तयार करण्याचा अधिकार या समितीला कोणी दिलेला आहे? ह्या प्रतिपादनावर हा असंतोष आधारित होता व तो नियमाला धरून होता.

### शिक्षक प्रतिनिधींचे प्रतिपादन

**३३.** इंग्रजी विषयाच्या शिक्षकांच्या या असंतोषाला तोंड देण्याचे टाळणे आम्हा शिक्षक प्रतिनिधींना शक्य नव्हते. आपण अतिरिक्त ठरविले जाऊ व जो अतिरिक्त ठरेल त्याला काढून टाकण्याचे आदेश शासनाने यापूर्वीच दिलेले आहेत, याची माहिती असल्यामुळे हा असंतोष अत्यंत तीव्र व आक्रमकपणे व्यक्त होत होता. मी स्वतः, प्रा.अरविंद बारहाते व प्रा.आर.जी.तट्टे अशा आम्ही तीघांनी खाली हॉलमध्ये उपलब्ध असलेल्या ३०-४० इंग्रजीच्या प्राध्यापकांची तेथेच हॉलच्या एका कोपऱ्यात बैठक घेतली. आम्ही या शिक्षकांना असे सांगितले की, "शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याची ही प्रक्रिया हे एक मोठे संकटच आहे. अशा वेळी प्रत्येक शिक्षकाने जागरुकपणे काम केले पाहिजे. आम्ही शिक्षक प्रतिनिधी म्हणून अतिशय जागरुकपणे या समितीत काम करीत आहोत. इंग्रजी या विषयाच्या स्वाध्याय तासिकांबाबतचा समितीचा निर्णय हा एकमताचा निर्णय आहे. त्यामुळे आम्ही त्या निर्णयाला बांधील आहोत. प्रत्येक शिक्षकाला व्यक्तिशः त्याची स्थिती समितीच्या आदेशाप्रमाणे कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये नियमाला सोडून काहीही झाले असेल तर व्यथित शिक्षकांनी जागरुकपणे

त्याबाबतच्या तक्रारी समितीसमोर नोंदविल्या पाहिजेत. यात हयगय होता कामा नये." या लहानशा सभेमुळे त्या शिक्षकांचे त्यावेळी किती समाधान झाले असेल ते काही मला सांगता येणार नाही. पण इंग्रजीच्या प्रत्येक शिक्षकाला वेगवेगळे समजावून सांगण्याच्या कामातून आम्हा तीनही शिक्षक प्रतिनिधींना मुक्तता मिळाली हे मात्र निश्चित. या लहानशा सभेमुळे शिक्षक प्रतिनिधींचे काय म्हणणे आहे? हे सर्वांपर्यंत पोचले. संकटकाळात संदेशांचे दळणवळण फार वेगाने होते, हे दिसून आले.

## इंग्रजीच्या एका नामवंत शिक्षकाने नोंदविलेली तक्रार

**३४.** संघटनाशास्त्राप्रमाणे जीवंतपणा व जागरुकता हे गुण असलेला प्रत्येक सभासद संघटनेचे वैभव वाढवित असतो. आम्ही जेव्हा तक्रार करायला सांगतो तेव्हा त्यात काही अर्थ असला पाहिजे असे समजून अतिरिक्त ठरण्याची शक्यता असलेल्या इंग्रजीच्या बहुतेक शिक्षकांनी आपापले म्हणणे लेखी निवेदनाद्वारे समितीसमोर मांडले. त्यातील एखादे निवेदन व त्यावर समितीचा निर्णय, नमुना म्हणून उधृत करावा यासाठी अशा निवेदनांचा ढीग ज्यावेळेला मी आज पहातो, त्यावेळी विभागप्रमुख म्हणून काम करीत असल्याने अजिबात अतिरिक्त ठरण्याची शक्यता नसलेल्या संघटनेच्या एका जागरुक व नामवंत सभासदाने सादर केलेले एक निवेदन समोर येते. काटोल येथील इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख व संघटनेचे एक ज्येष्ठ सभासद प्रा.डी.एस.राव यांनी दिलेले हे निवेदन चांगलेच रेखीव आहे. नियम काय आहेत? समितीने काय केलेले आहे? ते कसे चुकीचे आहे? याची मोठी बिनचूक नोंद त्यांच्या निवेदनात आहे. हे निवेदन त्यांनी उच्च शिक्षण संचालकांना व मा.कुलगुरूंना व समितीला सादर केले होते. दिनांक २९ सप्टेंबर १९७६ रोजी झालेल्या बैठकीत पूर्ण ॲडहॉक कमेटीने "नबिरा महाविद्यालय, काटोलसाठीच्या उपसमितीचा अहवाल क्रमांक ४८" **विचारात घेतला व संमत केला.** संमत केलेल्या त्या अहवालातील इंग्रजी या विषयाबाबतचा भाग मी शब्दशः उधृत करू इच्छितो. तो पुढीलप्रमाणेः-

"**Nabira Mahavidyalaya, Katol :** This college has all three Faculties of Arts, Commerce, and Science. The Principal Shri. G.N.Chandak was present when some statements were recorded before committee.

**Department of English**

(1) The workload returned is of 31 periods, presumably for all the Faculties. **Shri Rao who is the seniormost teacher in the Department in the grade of Rs. 400-800 has sent a letter to the Director of Higher Education, Maharashtra on 20th August, 76 with a copy to the Vice-Chancellor. He has made a complaint in his letter protesting against the change in the norms assumed by the Ad-hoc Committee which a college was asked to follow contrary to what is laid down by the University for the academic year 1975-76.**

He has made this grievance pointedly in respect of calculation of workload for English language. **According to Shri Rao, the University prospectus for 75-76 prescribed 4 lectures and 2 tutorial periods per week for B.A. Part-I, B.A. Part-II and B.A. Part-III classes. The number of students for each tutorial batch for B.A. Part-I is to be not more than 10.**

Shri Rao has observed that instead of following this norms the Ad-hoc Committee has prescribed the norms of its own showing scant respect to the constitutional bodies of the University. The lecture periods for B.A. Part-II and B.A. Part-III have been reduced to 2 per week with batch of 25 students each for tutorial. Shri Rao has also observed that it is not known how the Ad-hoc Committee assumed authority on issues like size of tutorial batch, number of periods per class or total tutorial periods for B.Sc. Part-I or B.Com. Final classes.

**His complaint will have to be taken into account in determining the surplusage of teachers in the department of English whenever necessary."**

## राव यांच्या तक्रारीची रास्त दखल

**३५.** नबिरा महाविद्यालय, काटोलचा अहवाल समितीने २९ सप्टेंबर १९७६ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व संमत केला. या अहवालामध्ये इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख प्रा.डी.एस.राव यांच्या निवेदनाची अतिशय यथायोग्य दखल घेण्यात आलेली होती. प्रा.डी.एस.राव हे त्या महाविद्यालयातील त्या विषयाचे सर्वात ज्येष्ठ शिक्षक आहेत व त्यांनी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे व विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंकडे याबाबतीत तक्रार नोंदविलेली आहे, ही गोष्ट या अहवालामध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली होती. :- "Shri Rao who is the seniormost teacher in the Department in the grade of Rs. 400-800 has sent a letter to the Director of Higher Education, Maharashtra on 20th August, 76 with a copy to the Vice-Chancellor." विद्यापीठाने प्रसृत केलेल्या सन १९७५-७६ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये याबाबत जे निकष ठरविण्यात आलेले आहेत त्यामध्ये ॲडहॉक कमेटीने विपरीत बदल केलेले आहेत याबाबतची त्यांनी नोंदविलेली तक्रार या अहवालात पुढील शब्दात नमूद आहे :- "He has made a complaint in his letter protesting against the change in the norms assumed by the Ad-hoc Committee which a college was asked to follow contrary to what is laid down by the University for the academic year 1975-76." बी.ए. भाग १, २ व ३ या वर्गांच्याकरीता सन १९७५-७६ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेत दर आठवड्याला ४ तासिका व २ स्वाध्याय तासिका नमूद केलेल्या असून स्वाध्याय तासिकेच्या बॅचमध्ये १० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थी असू नयेत असेही या अभ्यासक्रम पुस्तिकेत नमूद केलेले आहे, असे प्रा.डी.एस.राव यांनी सादर केले होते; ते या अहवालात नमूद आहे ते पुढील शब्दात :- "According to Shri Rao, the University prospectus for 75-76 prescribed 4 lectures and 2 tutorial periods per week for B.A. Part-I, B.A. Part-II and B.A. Part-III classes. The number of students for each tutorial batch for B.A. Part-I is to be not more than 10."

## गरज पडल्यास तक्रार विचारात घेऊ

**३६.** कायद्याने स्थापीत केलेल्या विद्यापीठाच्या प्राधिकरणांनी तयार केलेल्या निकषांचे पालन करण्याऐवजी ॲडहॉक कमेटीने आपलेच स्वतःचे निकष तयार करून विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा अवमान केलेला आहे. हे राव यांचे म्हणणे या अहवालात पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले होते. :- "Shri Rao has observed that instead of following this norms the Ad-hoc Committee has prescribed the norms of its own showing scant respect to the constitutional bodies of the University." समितीने मान्य केलेल्या या अहवालाच्या शेवटी प्रा.राव यांची विनंती लक्षात घेऊन योग्य वेळी त्याबाबात आवश्यकता वाटल्यास विचार करावा लागेल असेही समितीच्या अहवालात नमूद होते.

## हेच 'ते' डी.एस.राव

**३७.** प्रा.डी.एस.राव यांनी इंग्रजी या विषयाच्या तासिकांची ॲडहॉक समितीने मोडतोड केली याबद्दल अत्यंत जागरूकपणे मा.उच्च शिक्षण संचालकांकडे, मा.कुलगुरूंकडे व समितीकडे जी तक्रार नोंदविली त्यांचा चांगलाच उपयोग झाला. नव्या निकषाप्रमाणे या विषयात किती शिक्षक अतिरिक्त होतात ते पाहून या निकषाचे आपण पूनर्विलोकन करू हा समितीचा अनौपचारिक निर्णय प्रा.राव यांच्या तक्रारीमुळे औपचारिकरित्या नोंदबद्ध झाला. तो पुढील शब्दात :- "His complaint will have to be taken into account in determining the surplusage of teachers in the department of English whenever necessary." याच प्रा.डी.एस.राव यांची एक आठवण या निमित्ताने नमूद करणे मला आवश्यक वाटते. सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या सहाव्या वेतन पूनर्विलोकन समितीने पुणे विद्यापीठ परिसरातील सेट भवनामध्ये दिनांक ५ जून २००८ रोजी सुनावणी ठेवली होती. संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी समितीसमोर उपस्थित राहून एक तपशीलवार निवेदन त्या समितीला संघटनेच्या वतीने सादर केले होते. हे निवेदन सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८४ व ८५ वर प्रसृत करण्यात आले होते. संघटनेचे एक ज्येष्ठ नेते व नुटाचे सभासद क्रमांक एक (१) श्री.भय्यासाहेब ऊर्फ बी.एन.गर्गे यांनी एक ठराव आमसभेच्या विचारार्थ पाठविला होता. दिनांक ९ नोव्हेंबर २००८ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळच्या सभागृहात झालेल्या आमसभेच्या बैठकीच्या कामकाज पत्रिकेमध्ये हा ठराव विषय क्रमांक ४८१ वर ठेवण्यात आला होता. तो पुढीलप्रमाणेः-

"**ITEM NO. 481 :** SUGGESTIONS TO THE PAY REVIEW COMMITTEE : Prof. B.N.Garge will move the following resolution:-

"Resolved to Appreciate sincere efforts of President Prof.B.T.Deshmukh for giving valuable suggestions to the Pay Review Committee of the University Grants Commission." *(P127NB2008)*

या विषयावर आमसभेत चर्चा सुरू असतांना कोणीतरी वेगळा काहीतरी विचार मांडला. त्यावेळेला मागच्या बेंचवर बसलेले एक वयोवृद्ध गृहस्थ पूर्णपणे त्या मांडणीचा प्रतिवाद करू लागले व ठराव कसा योग्य आहे हे जोरजोरात सांगू लागले. सभागृहातील सर्व सदस्य मागे वळून पाहू लागले. तेव्हा हे सदस्य कोण आहेत? हे कोणाच्याही लक्षात येईना. अध्यक्षस्थानी काम करीत असलेले प्रा.बी.टी.देशमुख यांच्या, ते काटोल येथून १०-१५ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डी.एस.राव आहेत, हे लक्षात आले. प्रा.राव यांना अध्यक्षांनी व्यासपीठावर बोलाविले व सभागृहाला त्यांची ओळख करून दिली. प्रा.राव यांनी त्या सभेत असे सांगितले की, "आमसभेची पूर्वसूचना व कामकाज पत्रिका ही बरीच अगोदर येते. मी विजयवाड्याला राहत असलो तरी 'नुटा बुलेटीन' मला नियमितपणे मिळत असते. आमसभेची नोटीस आल्याबरोबर रेल्वेचे रिझर्व्हेशन केले. आपली संघटना व आपली आमसभा कशी काम करीत आहे हेही या निमित्ताने पहावे अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झाली. हा जो ठराव आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आपण आमसभेला हजर राहिले पाहिजे असे मला वाटले. आमची संघटना व आमचे पदाधिकारी यांचा आम्हाला अभिमान वाटतो." हा घटनाक्रम आमसभेच्या त्या दिवशीच्या कार्यवृत्तामध्ये सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १५८ वर नोंदबद्ध झालेला आहे. थोडक्यात नमूद असलेला हा वृत्तांत पुढीलप्रमाणे :-

"(C) १५-२० वर्षापूर्वी काटोलच्या नबिरा महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले व सध्या विजयवाडा येथे वास्तव्यास असलेले संघटनेचे ज्येष्ठ सदस्य प्रा.डी.एस. राव यांनी याबाबत आपले विचार मांडतांना असे सांगितले की, "या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी मुद्दाम आज विजयवाड्याहून या आमसभेसाठी आलो आहे. मी सेवानिवृत्त होऊन अनेक वर्षे झालेली असली तरी आम्हाला आमच्या संघटनेचा व पदाधिकाऱ्यांचा अभिमान वाटतो." या वयात सुद्धा प्रा.श्री.डी.एस.राव हे विजयवाड्याहून मुद्दाम आमसभेला उपस्थित राहतात ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे **असे विचार अध्यक्षांनी व्यक्त केले.**" *(P158NB2008)*

## स्वाध्याय तासिकेच्या बॅचमधील संख्या कमी करण्यात आली

**३८.** सर्व महाविद्यालयातून दाखल करण्यात आलेल्या इंग्रजी विषयाच्या विवरणपत्रांचा विचार करता सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच समितीच्या असे लक्षात आले होते की, स्वाध्याय तासिकांकरीता २५ विद्यार्थ्यांची बॅच न करता विद्यार्थ्यांची संख्या कमी केल्यास अतिरिक्त शिक्षकांची संख्या आणखी कमी होऊ शकते आणि म्हणून समितीने तसा निर्णयसुद्धा घेतला. नागपूर विद्यापीठातर्फे सर्व महाविद्यालयांना तसे कळविण्यात आलेले होते. नागपूर विद्यापीठाच्या उप कुलसचिवांनी दिनांक ८ सप्टेंबर १९७६ रोजी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र (No.AC/CO/G/514) रवाना केले. या पत्रातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"Sir,

The Ad-hoc Committee **reconsidered** the norms laid down earlier for English and has made the following changes. You are requested to send the two proforma showing the load of work in the Department of English and absorption of teachers according to the work-load as prescribed below :-

| Class | Lectures | Tutorials | For a batch of 20 students per week. |
|---|---|---|---|
| Pre-Univ.Arts | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-I | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-II | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-III | 4 | 1 | -do- |
| Pre-Uni.Commr. | 4 | 1 | -do- |
| B.Com-Part-I | 4 | 1 | -do- |
| B.Com-Part-III | 5 | - | .. |
| Pre.Uni.Sci. | 4 | 1 | For a batch |
| B.Sc.Part-I | 4 | 1 | of 20 students week |

Note :- (1) A batch will not exceed 20 by more than 10 p.c. of 20.

(2) Tutorials will be treated as equivalent to theory periods for calculations of the workload.

As regards the workload prescribed for supplmentary English and English Liturature there is no change, the same should be calculated as per the norms already sent to you."

## पूर्णपणे अतिरिक्त शिक्षकांची संख्या बरीच कमी झाली

**३९.** विद्यापीठाच्या ८ सप्टेंबर १९७६ रोजीच्या या पत्राप्रमाणे सुधारित निकषानुसार निरनिराळ्या महाविद्यालयातून विवरणपत्रे दाखल करण्याचे काम सुरू झाले होते. २५ ऐवजी २० ची बॅच धरल्यामुळे अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या आणखी बरीच कमी झाली. अंतिमतः ॲडहॉक कमेटीने जे सुधारित निकष तयार केले त्यानुसार नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये म्हणजे पूर्ण विदर्भात इंग्रजी या विषयाचे ७ शिक्षक अतिरिक्त झाले. कॉलेज स्तरावर पूर्णपणे सामावून घेतलेल्या शिक्षकांना Fully absorbed. *(P12EX-1976)* सिनिअर कॉलेज स्तरावर काही कार्यभार उपलब्ध असतांना त्याच महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयाचा उर्वरित कार्यभार देऊन ज्यांना सामावून घेण्यात आले त्यांचे वर्णन partially surplus असे करण्यात येत होते. *(P12EX-1976)* साऱ्या कवायतीनंतर अजिबात कार्यभार नसलेल्या शिक्षकांना fully surplus म्हणून पूर्णपणे अतिरिक्त ठरविण्यात आले होते. इंग्रजी विषयामध्ये पूर्णपणे अतिरिक्त शिक्षकांची संख्या ही ७ निश्चित झाली होती. येथे हेही नमूद केले पाहिजे की, संघटनेच्या प्रयत्नांमुळे कनिष्ठ महाविद्यालयांवर कार्यभार देण्यात आलेला असला तरी वेतनश्रेणी ही वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणूनच दिली जाईल, तसेच fully surplus शिक्षकाला दुसऱ्या महाविद्यालयामध्ये सामावून घेतले जाईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये कोणताही विपरित बदल होणार नाही ही गोष्ट संघटनेने शासनाकडून मान्य करवून घेतली होती.

## शिक्षकांमध्ये समाधानाची भावना

**४०.** ॲडहॉक कमेटीचे कामकाज अशारीतीने समाधानकारकपणे पार पडले व त्यामुळे स्वाभाविकपणे या शिक्षकांमधला असंतोष संपुष्टात आला. दिनांक २८ नोव्हेंबर १९७६ रोजी नॉर्थ अंबाझरी रोड येथील नागपूर विद्यापीठ ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये रूम नंबर २८ मध्ये नुटाची आमसभा पार पडली. त्यामध्ये **विषय क्रमांक ७ वर पुढील प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आलेला होता.** :-

"The members of the General Body of NUTA resolve to express their deep gratitude to all the members of the Adhoc Committee for Surplus and Absorption of teachers in the Nagpur University for their sympathetic attitude towards the problems of the college teachers, and for the successful completion of the entrusted work to the committee.

They also resolve to express their indebtedness to its Chairman Shri R.J.alias Babasaheb Gharpalkar, for his kind and impartial attitude, compromising ability, unifying spirit and magnanimous personality which enabled to transform the heterogenous committee into a singular force in solving the problem of the teachers amicably and satisfactorily." *(P78NB1976)*

प्रस्ताव मांडणारे सदस्य हे इंग्रजी विषयाचेच होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## वार्षिक अहवालातील उल्लेख

**४१.** नुटाच्या घटनेतील परिच्छेद (vi) (b) (iii) मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे संघटनेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल सचिव तयार करतात व कार्यकारी मंडळामध्ये संमत झाल्यानंतर तो अहवाल मान्यतेसाठी नुटाच्या आमसभेसमोर ठेवला जातो. ३१ डिसेंबर १९७६ रोजी संपलेल्या कॅलेंडर वर्षाचा वार्षिक अहवाल *(P20NB1977)* नुटाच्या आमसभेने रविवार, दिनांक २७ मार्च १९७७ रोजी झालेल्या बैठकीत एकमताने संमत केला. या अहवालातील ॲडहॉक कमेटीच्या कामकाजाबाबतचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे :-

**"The separation of teachers of Junior and Senior (degree) colleges had created an unprecedented tensions and uncertainties in the minds of many teachers.** Fully surplus, partial surplus, fully absorbed and similar problems like that were engrossing their minds. At one stage it was felt that a large no. of **teachers will be rendered surplus but due to considerate view adopted by the Ad-hoc Committee this number was minimised."** *(P156NB2013)*

## उशिरा वेतन होण्याच्या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले

४२. सन १९७६ या वर्षभर उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये केवढी खदखद होती याबाबतची तपशीलवार माहिती यापूर्वीच्या परिच्छेदातून नमूद केलेली आहे. अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न सन १९७६ च्या शेवटी शेवटी समाधानकारकपणे निकाली निघालेला असला तरी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी होण्याचा प्रश्न प्रलंबित होता. त्याचबरोबर **अनेक महिन्यांचे महाविद्यालयीन शिक्षकांचे वेतन अदा न होणे या प्रश्नाने खूपच गंभीर स्वरूप धारण केलेले होते.** सन १९७६ च्या शेवटच्या दोन-तीन महिन्यात व १९७७ च्या सुरुवातीच्या एक-दोन महिन्यात आम्ही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निरनिराळ्या जिल्ह्यात जे दौरे व जी अधिवेशने आयोजित केली त्यामध्ये "**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची ऐशीतैशी, मिळत आहे ते वेतन धडपणे व वेळेवर मिळाले पाहिजे यासाठी आपण शासनाबरोबर संघर्ष करावा**" अशा भाषेत सदस्यांकडून सभेत विषय मांडले जाऊ लागले होते. उशिरा वेतन होण्याच्या या प्रश्नाने खूपच उग्र स्वरूप धारण केलेले होते.

### Problem of U.G.C.Scales became a secondary issue

४३. व्यथा कथन करतांना एखाद्या शिक्षकाने असभ्यतेकडे झुकणारा एखादा शब्द वापरला तर त्या शब्दाच्या उचिततेबद्दल चर्चा होऊ शकेल, मात्र अनेक ठिकाणी त्याच शब्दात भावना व्यक्त होत असतील तर असंतोषाची खोली समजून घेण्यासाठीच त्या बाबीचा वापर झाला पाहिजे. शब्द वेगळे असतील पण आम शिक्षकांची तीच भावना होती. सन १९७६ या कॅलेंडर वर्षाचा आमसभेने संमत केलेला वार्षिक अहवाल हा १९७७ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २० ते २२ वर प्रकाशित करण्यात आला आहे. त्यातील उशिरा वेतन होण्याबाबतचा परिच्छेद पुढीलप्रमाणेः-

"The teachers of this University can never forget the year of 1976. It was nothing short of a nightmare. It started with the G.R. envisaging the separation of the teachers of degree and Jr.Colleges and **the problem of non-payment of salary haunted us through out the year. It reached such an alarming stage that the problem of U.G.C.Scales became a secondary issue.** Thousands of teachers and non-teachers had to carry out their duties without salaries for months together. The exemplary restrain shown by them in these trying months is a clear manifestation of their realisation of social obligations.**The Govt, of Maharashtra, however, reciprocates this gesture by adopting the most casual approach towards this burning problem.** The Chief Minister did not think it necessary to even meet our delegation. Letters sent to him and the Education Minister often remained unanswered. It was certainly not expected from a state wedded to social justice." *(P155NB2013)*

## वेतन वितरण उशीराने होण्यामुळे लकवा झाल्यासारखी परिस्थिती

४४. दिनांक २ जानेवारी १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची मुंबई येथे जी बैठक झाली, त्या बैठकीमध्ये सुद्धा या वेतन

*(सहपत्र चार : परिच्छेद ४४ पहा)*

**Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations**

(Kimatrai Building, 79, Maharashi Karve Marg, Bombay-400002)

### 3rd January, 1977 : Press Release

The following two Resolutions have been adopted unanimously at the meeting of the Executive Committee of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organization held on 2nd January 1977 in Bombay. They are being released to the Press for publication.[1]

**RESOLUTION NO. 2 :**

This meeting of the Executive Committee of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations, representing all University and College Teachers in Maharashtra, held on 2nd January 1977 under the Chairmanship of Prof. V.B.Kamath, the officiating President, **views with grave concern the financial plight of several teachers as a result of non-payment of any salary to a number of teachers for many months,** partial payment to some teachers and undue delay in payment of Salary in a number of institutions. Of late this tragic state has spread to a few of the renowned colleges as well, as has been clearly depicted in a signed Pune based Article by B.M.Purandare under the heading "Private College Staff Not Paid for One Year" in the Times of India of Thursday, December, 30, 1976. To quote from the report

"For the first time in more than 50 years, educational societies running such institutions as Fergusson College, Sir Parshurambhau College and Garware College in Pune withheld the staff salaries. They explained the financial position and requested the staff members to bear with them for some time.

Such consideration was not reportedly shown to the staff in other areas. At several places politicians unconnected with education asked the college staff to make sacrifices for spreading education to the rural masses. The college staff finds the situation unbearable as is evident from a letter sent by 19 Professors of a college in Satara to the Chief Minister pointing out that they have not been paid for a year.

CLOSEDOWN LIKELY

Unless the education department acts, fast, the worsening financial conditions may compel the societies to close down colleges. This will not only make the college staff jobless, but also retard the spread of higher education."

During the negotiations with the State Government in March-April 1975 when circumstances compelled over 10,000 college and University teachers all over Maharashtra to boycott University Examinations, one of the vital issues discussed was payment of salary to all teachers through Treasury. **In response to this demand the Minister of Education declared on the floor of the Legislature on 4.4.1975 that the Government had accepted its responsibility for prompt and full payment of salaries to all teachers.** With a view to implementing this measure the MFUCTO delegation was invited to meet Shri. K.K. Moghe, the then Secretary to the Government of Maharashtra, Education Department on 17.11.1976 to discuss a Draft Scheme which was later revised in the light of our discussion. The scheme is finalised for prompt and full payment of salary through Scheduled Banks was to be brought into effect from 1.4.1976.

It is most unfortunate that such solemn assurance and important decisions are not implemented and the whole community of teachers is pushed into a pathetic and ugly economic situation. It is needless to point out that several teachers have been retrenched in the past and despite the decisions of the Universities, on the initiative of the Government, to reinstate many of them, college managements have not paid heed to the University directives. To add to this ugly situations a large number of Professors who have been teaching degree classes for many years have been condemned to teach at the Junior College level only, and have been denied the new UGC Pay scales, which ought to have come into force in 1971.

**The latest stroke which has paralysed the whole teacher fraternity is the delay in the payment of monthly salary on which alone the teachers depend for their bread and butter.**

The situation, therefore, is extremely grave and demands quick action on the part of the Government. If the Government fails to act promptly the whole machinery of higher education may even collapse. **It is the fervent hope of the MFUCTO that the scheme of payment of salary through Scheduled Bank/ Treasury formulated by the Government is implemented forthwith** with such amendments as are necessitated by the latest situation prevailing in some colleges."

s/d- (E.N. Manjrekar)
Officiating Secretary.

1 Resolution No.1 : not printed (P1,2NB77)

उशिरा होण्याच्या प्रश्नावर खुपच जोरदार चर्चा झाली व त्या दिवशीच्या बैठकीत जे दोन ठराव मंजूर करण्यात आलेत, त्यातील दुसरा ठराव हा वेतन उशीराने होण्यासंबंधीचा होता. मार्च १९७५ मध्ये सबंध राज्यभर शिक्षकांनी परीक्षेच्या कामावर बहिष्कार टाकलेला होता. त्यावेळेला मा.उच्च शिक्षण मंत्र्यांशी या प्रश्नावर चर्चा झाली होती व **त्यांनी विधानमंडळामध्ये दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी एक निवेदन करून या मागण्यांबाबत अनुकूलता दर्शविली होती.** पण प्रत्यक्षात त्याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही. असे या ठरावात नमूद करण्यात आले होते. या ठरावात पुढे असेही नमूद करण्यात आले होते की, त्या नंतरच्या काळात शिक्षण विभागाचे सचिव श्री.के.के.मोघे यांनी वेतन वितरण नियमित होण्यासाठी तयार केलेल्या एका योजनेच्या मसुद्यावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाशी दिनांक २७ नोव्हेंबर १९७६ रोजी चर्चा केली होती. १ एप्रिल १९७६ पासून ती योजना अंमलात आणण्याचा विचार होता असेही त्या बैठकीत त्यांनी सांगितले होते. पण याबाबतीत कोणतीही कार्यवाही झाली नाही. वेतन वितरण उशीराने होण्याच्या या प्रश्नाने उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये लकवा झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असून शासनाने याची ताबडतोब नोंद घेतली पाहिजे अशी मागणी या ठरावामध्ये करण्यात आलेली होती. त्या दिवशीच्या बैठकीत संमत करण्यात आलेला ठराव क्रमांक दोन **सहपत्र : चार** म्हणून सोबत प्रसृत करण्यात आला आहे.

### नुटाच्या कार्यकारी मंडळामध्ये ठराव

**४५.** वेतन वितरण विलंबाच्या प्रश्नाने विदर्भात तीव्र स्वरूप धारण केले होते. नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक २५ फेब्रुवारी १९७७ रोजी बोलाविण्यात आलेली होती. नागपूर येथे झालेल्या नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या या बैठकीमध्ये एक ठराव संमत करण्यात आला. या ठरावामध्ये शासन नियंत्रित नियमित पगाराची व्यवस्था ताबडतोब प्रस्थापित होणे आजची तातडीची गरज आहे, अशी मागणी करण्यात आली होती. असे होऊ न शकल्यास १ ऑगस्ट १९७७ पासून बहि:शाल कार्यक्रमाच्या संचालनामध्ये शिक्षक कोणतेही सहकार्य करणार नाहीत व ५ सप्टेंबर १९७७ पासून शिकविण्याचे काम सुद्धा बंद करतील असे नमूद करण्यात आले होते. नुटाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २५ फेब्रुवारी १९७७ रोजीच्या बैठकीत हा जो १९७७ चा ठराव क्रमांक सहा मंजूर केला तो सोबत **सहपत्र : पाच** म्हणून प्रसृत करण्यात आलेला आहे. हा ठराव मंजूर करीत असतांना दिनांक २ जानेवारी १९७७ च्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेची व ठरावाची माहिती आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत नुटाच्या कार्यकारी मंडळाला झालेली होती. महासंघात मंजूर झालेल्या ठरावात आंदोलनाच्या तारखांचा उल्लेख नव्हता. याबाबतचा प्रस्ताव आपण आता पाठवावा व आंदोलनाच्या तारखा निश्चित करण्याबाबत शिक्षकांची तीव्र भावना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाकडे नमूद करावी जेणेकरून महाराष्ट्रभर एकसारखा कार्यक्रम राबविता येईल असाही विचार नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत हा ठराव करतेवेळी करण्यात आला.

### तातडीच्या अभियाचित सभेची मागणी

**४६.** नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये अतिशय तीव्र असंतोषाची भावना होती. याचे पुढील उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. 'नुटा' ही BPT Act 1950 नुसार पंजीबद्ध संघटना असून वर्षातून किमान आमसभेच्या दोन बैठका झाल्या पाहिजेत असे घटनेच्या खंड ६ मध्ये नमूद आहे. त्याप्रमाणे तशा दोन बैठका प्रत्येक वर्षात होतात. गेल्या ५० वर्षांमध्ये याला अपवाद झालेला नाही. याशिवाय नुटाच्या घटनेमध्ये तातडीने अभियाचित सभा बोलाविण्याची तरतूदसुद्धा आहे. सभा बोलाविण्याची ही तरतूद पुढीलप्रमाणे:-

**"(a) The General body shall :-** (i) Hold two meetings every year, one in the first term and the other in the last term of the academic session; the latter shall be the annual meeting.

An emergent meeting of the General Body may be called by the President upon requisition in writing either by the Executive Committee or by one fourth of the membership of the Association."

याबाबतीत असंतोष इतका होता की, नुटाच्या तातडीच्या अभियाचित आमसभेची बैठक बोलाविली पाहिजे अशी भावना अनेक शिक्षक व्यक्त करीत होते. निदान एक चतुर्थांश सभासदांनी मागणी केली असेल तरच अशा तातडीच्या अभियाचित सभेची मागणी संघटनेच्या अध्यक्षांकडे करता येते. १९७७ च्या फेब्रुवारी महिन्यात अशा अभियाचित सभेची मागणी करण्यासाठीच्या अर्जावर संघटनेच्या सभासदांच्या सह्या गोळा करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू झालेले होते. अध्यक्ष या नात्याने व्यक्तिशः मला तसेच इतर पदाधिकाऱ्यांना व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना "त्या अभियाचित सभेच्या मागणीपत्रावर आम्ही स्वाक्षरी करावी काय?" अशी विचारणा अनेक शिक्षक करीत असत. "कोणता ठराव संमत करण्यासाठी अशी सभा बोलाविली जात आहे ते पाहून तुम्ही ते ठरवा" असे आम्ही सांगत होतो.

### अभियाचित सभेची सूचना

**४७.** पुरेशा शिक्षकांचे पाठबळ मिळाल्यानंतर अशा मागणीची सूचना करणाऱ्या शिक्षक नेत्यांनी फोनवरून वेळ ठरवून दिनांक २६ फेब्रुवारी १९७७ रोजी तातडीच्या अभियाचित सभेची मागणारी करणारी सूचना (नोटीस) ही माझ्या निवासस्थानी माझ्याकडे सुपूर्त केली. पुढची कारवाई म्हणजे सभेची तारीख, वेळ व स्थळ ठरविण्याची. ती कारवाई अध्यक्ष या नात्याने मलाच पार पाडावयाची होती. अशी नोटीस देण्यासाठी आलेल्या सर्व शिक्षक सभासदांशी चर्चा करूनच या बाबी मला ठरवावयाच्या आहेत असे मी मागणीकर्त्यांना सांगितले. त्यांच्याशी झालेल्या चर्चेत ठरल्याप्रमाणे ही सभा शुक्रवार, दिनांक ४ मार्च १९७७ रोजी भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे सकाळी ११.३० वाजता बोलवावी असे ठरले. तातडीच्या अभियाचित सभेची मागणी करणाऱ्या

*(सहपत्र पाच : परिच्छेद ४५ पहा)*

## *नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ*

***नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाने दि. २५.२.७७ च्या बैठकीत घेतलेला निर्णय.***

**१९७७ चा ठराव क्र. ६**

विदर्भातील महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार उशिरा होण्याच्या बाबतीत निर्माण झालेली स्थिती ही भयावह असून त्याकडे समाजाने ताबडतोब लक्ष देणे आवश्यक आहे व त्यासाठी **शासननियंत्रित नियमित पगारवाटपाची व्यवस्था ताबडतोब प्रस्थापित होणे** ही आज उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेच्या संदर्भात तातडीची निकड आहे. माननीय पंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना शेकडो प्राध्यापकांनी पत्रे पाठवून या स्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भातील वृत्तपत्रांनी या प्रश्नाकडे अग्रलेखांच्या माध्यमातून व अन्य मार्गाने शासनाचे व समाजाचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांच्या संघटनांनी व ठिकठिकाणी नागरिकांच्या सभांतून नगरपालिका व महानगरपालिकांच्या ठरावातूनसुद्धा शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्यात आले. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाची कोणतीही सोडवणूक होऊ शकली नाही.

शासनाने दोन महिन्याच्या पगारापूरती रक्कम महाविद्यालयांना अग्रिम म्हणून देण्याचा निर्णय घेतल्यामुळे तात्पुरती डागडुजी होणार असली तरी उशीरा पगाराचा प्रश्न सुटण्यास त्यामुळे मुळीसुद्धा मदत होणार नाही. उलट ही रक्कम पुढे महाविद्यालयाला मिळणाऱ्या अनुदानातून एकहाती कापून घेतली जाणार असल्याने मार्च महिना आटोपल्यावर ही समस्या अतिगंभीर स्वरूप धारण करील अशी साधार भिती वाटते. "ही जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयांच्या व्यवस्थापकांची आहे" ही भूमिका सोडून "त्यात शासनाचीही काही भूमिका आहे" ही गोष्ट शासनाने मान्य केली हीच त्यातील समाधानाची बाब होय." तेव्हा शासननियंत्रित नियमित पगारवाटपाची व्यवस्था ताबडतोब प्रस्थापित केली जावी अशी महाराष्ट्र शासनाला ही संघटना कळकळीची विनंती करीत आहे. दुर्दैवाने असे होऊ न शकल्यास **१ ऑगस्ट १९७७ पासून महाविद्यालयीन शिक्षक कोणत्याही Extra Curicular Activities च्या संदर्भात महाविद्यालयामध्ये आपल्याकडे सोपविण्यात आलेले काम पार पाडण्यास नम्र नकार देतील.** पगार नियमित मिळणार नसेल तर आम्हाला आमचे शिकविण्याचे काम सुद्धा पार पाडता येणार नाही अशा नोटीसेस आपापल्या व्यवस्थापकांना देतील व **शिक्षक दिनापासून (५ सप्टेंबर १९७७) शिकविण्याचे कामसुद्धा बंद करतील."**

समाजाच्या सर्व घटकांनी या वेठबिगारीतून बाहेर पडण्याच्या महाविद्यालयीन शिक्षकांच्या या प्रयत्नाला सहकार्य द्यावे अशी कळकळीची विनंती संघटना करीत आहे. केंद्र सरकारने व विद्यापीठ अनुदान आयोगाने नवीन वेतनश्रेणी ज्या अटींवर महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकांना लागू केली त्या पेक्षा वेगळ्या व अन्याय अटी लादण्याचा दुराग्रह महाराष्ट्र शासनाने सोडून द्यावा व ही वेतनश्रेणी ताबडतोब लागू करावी असा आग्रह संघटना करीत आहे.

*(Agenda on page 19, Minutes on page 35 and Enclosure on page 30 of 1977-Ex-File. Published on page 7 of 1977 NUTA Bulletin)*

शिक्षकांनी पुढील दोन ठराव मांडले होते :-

**"Resolution No.1 :** "We the members of the NUTA resolve **to stop working with effect from 10 th March, 1977 including teaching examination and other such work** of the college either assigned by the college authorities or by the Nagpur University, **if the salaries are not paid up to date before 9th March, 1977."**

**Resolution No.2 :** "Resolved that the salaries of the teachers, non teaching staff in Non-Government colleges be paid regularly through the Government Treasury from 1st April, 1977."

संघटनेचा अध्यक्ष या नात्याने अभियाचित सभेचे आयोजन करण्यात येत असल्याची सूचना (नोटीस) मी दिनांक २८ फेब्रुवारी १९७७ रोजी प्रसृत केली. ही नोटीस **सहपत्र : सहा** म्हणून सोबत दिलेली आहे.

## तातडीच्या अभियाचित आमसभेचे निर्णय

**४८.** ठरल्याप्रमाणे दिनांक ४ मार्च १९७७ रोजी भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे ही तातडीची अभियाचित आमसभा पार पडली. प्रश्नाच्या तिव्रतेमुळे सभेला उपस्थिती भरगच्च होती. दोनही ठराव सभेसमोर मांडण्यात आले व त्यावर खूपच तपशीलवारपणे चर्चा झाली. नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकारी मंडळाच्या ज्येष्ठ सदस्यांनी व अध्यक्ष या नात्याने मी स्वतः सभेमध्ये असे मत मांडले की,:-

(१) "१० मार्च १९७७ पासून कामबंद आंदोलन नुटाच्या क्षेत्रात सुरू करण्याचे पहिल्या ठरावात प्रस्तावित करण्यात आलेले आहे. (२) वेतन विलंबाने होण्याचा प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे व तो राज्यव्यापी प्रश्न आहे. (३) अशा स्थितीत विद्यापीठ स्तरीय घटक संघटनांनी प्रत्यक्ष आंदोलनाचे वेगवेगळे कार्यक्रम हाती घेणे हे योग्य नाही. (४) नुटाच्या कार्यकारी मंडळात याबाबतीत अगोदरच विचार झालेला असून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पातळीवर एकसारखा निर्णय होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. (५) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची स्थापना होऊन दोन-तीन वर्षांचा कालखंड सुद्धा झालेला नाही. (६) याबाबतीत सर्व राज्यभर एकच कृती झाली पाहिजे व अशी कृती ही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्तरावरच होऊ शकते. (७) त्यामुळे पहिला ठराव सभागृहाने आहे त्या स्वरूपात मंजूर करू नये तर दुरुस्तीसह मंजूर करावा. दुसरा ठराव मंजूर करण्याला कोणाचीही कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही."

---

*(सहपत्र सहा : परिच्छेद ४७ पहा)*

**Nagpur University Teachers' Association**

From :-
Prof.B.T.Deshmukh,
President, NUTA,
Near Vidarbha Mahavidyalaya,
Amravati. Pin : 444 604

**DATED 28.02.1977**

To,
All the Members of NUTA

**NOTICE**

Whereas the required number of members of the Association have given a notice for convening an Emergent Requisitioned meeting of the General Body of Nagpur University Teachers' Association; and

Whereas it is necessary to convene a meeting of the General Body for the consideration of the resolutions contained in the above mentioned notice.

Now therefore I Prof.B.T.Deshmukh, President of the Nagpur University Teachers' Association in exercise of the powers vested in me under article vi(a) (i) of the Constitution of NUTA hereby convene the meeting of the General Body of NUTA to meet at the time, place and date mentioned below to consider the following resolutions.

**RESOLUTION NO.1 :**

"We the members of NUTA resolve to **stop working with effect from 10 th March, 1977** including teaching examination and other such work of the college either assigned by the college authorities or by the Nagpur University, if the salaries are not paid up to date before 9th March, 1977."

**RESOLUTION NO.2 :**

"Resolved that the salaries of the teachers, non teaching staff in Non-Government colleges be paid regularly through the Government Treasury from 1st April, 1977."

I therefore request you to make it convenient to attend the meeting.

Yours Sincerely,
(B.T.Deshmukh)
President, NUTA

**Place of Meeting**
Bharatiya Mahavidyalaya, Amravati.
**Date and Time**
Friday 4.3.1977 at 11.30 AM.

(P12NB77)

---

बऱ्याच तपशीलवार चर्चेनंतर पहिला व दुसरा ठराव दुरूस्त स्वरूपात मंजूर करण्यात आला. या बैठकीचे कार्यवृत्त १९७७ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४ वर नोंदबद्ध झालेले आहे. ते पुढीलप्रमाणे:-

**"At No. 1 : The following resolution was for the consideration of the house. :-**

"We the members of the NUTA resolve to stop working with effect from 10th March, 1977 including teaching, examination and other such work of the college either assigned by the college authorities or by the Nagpur University, if the salaries are not paid up to date before 9th March, 1977."

Resolution was moved by Shri. V.S.Kulkarni and seconded By Shri. S.B.Chinchamalatpure. **After considerable discussion house decided as follows :-**

"Resolved to request the Maharashtra Federation of University and College Teachers' Organization to consider the Examination bycott part of the Resolution with all seriousness".

**At No. 2 : The resolution was passed in the following form:-**

"Resolved that the salaries of the teachers and non teaching staff in Non-Government Colleges be paid regularly through the Government Treasury from 1st April, 1977." संघटना स्थापन झाल्यापासून तर आजपावेतो घटनेतील तरतुदीप्रमाणे बोलाविण्यात आलेली ही एकमेव अभियाचित सभा होय.

## ५ सप्टेंबर १९७७ पासून कामबंद आंदोलन

**४९.** प्रश्नांची तीव्रता व उग्रता इतकी होती की, १९७७ च्या मार्च व एप्रिल महिन्यामध्ये एकामागून एक घडामोडी घडत होत्या. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची एक राज्यस्तरीय परिषद (Conference) ६ व ७ मार्च १९७७ रोजी मुंबई विद्यापीठाच्या फोर्टमधील दीक्षांत सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये ठराव क्रमांक एक हा सबंध राज्यभर वेतन वितरण विलंबाने होण्यासंबंधीचा होता. त्या ठरावाच्या सुरुवातीलाच असे नमूद होते की, "**पगार नियमित होण्याच्या दृष्टीने निश्चित उपाययोजना जून १९७६ पासून केली जाईल**" असे आश्वासन शिक्षण मंत्र्यांनी दिले होते. मात्र त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. शिक्षकांना नियमित वेतन मिळत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असून यावर ताबडतोब उपाययोजना न झाल्यास प्रथम बहिःशाल कामकाजाशी असहकार्य केले जाईल व त्यानंतर **५ सप्टेंबर १९७७ पासून कामबंद आंदोलन** सुरू केले जाईल असे या ठरावात नमूद करण्यात आले होते. या परिषदेमध्ये एकूण आठ ठराव संमत करण्यात आले, त्यापैकी क्रमांक एक वरील हा संपूर्ण ठराव **सहपत्र : सात** म्हणून सोबत प्रसृत करण्यात आला आहे.

## 'नुटा' तर्फे ठराव

**५०.** दिनांक ४ मार्च १९७७ रोजीची नुटाची तातडीची अभियाचित सभा पार पडल्यानंतर त्या सभेत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाकडे यथोचित ठराव पाठविणे ही जबाबदारी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने माझ्याकडे होती. त्या दृष्टीने दिनांक २९ मार्च १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह प्रा. किशोर ठेकेदत्त यांच्याकडे मी एक ठराव पाठविला. तो ठराव पुढीलप्रमाणे :-

"महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने आकसाची वृत्ती सोडून द्यावी, दडपशाहीचा विचार मनातून काढून टाकावा व त्यांच्या न्याय्य मागण्या ताबडतोब मान्य कराव्यात. **अन्यथा दिनांक १५-४-१९७७ पासून महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक विद्यापीठ परीक्षेच्या कामाशी संपूर्णपणे असहकार करतील.**"

प्रा. किशोर ठेकेदत्त यांनी ३१ मार्च १९७७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ४ एप्रिल १९७७ रोजी होणाऱ्या बैठकीमध्ये हा ठराव विचारात घेतला जाईल असे महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांना कळविले. *(P204NB2019)*

### महासंघात परीक्षा बहिष्कार आंदोलनाचा ठराव

**५१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ४ एप्रिल १९७७ रोजीच्या बैठकीमध्ये या संपूर्ण ठरावाचा विचार करण्यात आला व परीक्षा बहिष्कार आंदोलनाचा ठराव संमत करण्यात आला. असे आंदोलन सुरू केल्याशिवाय कोणत्याही मागणीच्या बाबतीत ती कितीही योग्य असली तरी शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही असे या ठरावात ठामपणे नमूद करण्यात आले. ते पुढील शब्दात:-

"This meeting of the Executive Committee of the MFUCTO, held on 4th April 1977 in Bombay, has come to a firm conclusion **that without a total boycott of all university and related examinations by all College and university teachers, the authorities concerned are not likely to concede our long standing and reasonable demands.** Neither the government nor the universities have solved the problems of the teachers so far, especially those created by them during the last two years. They cannot be expected to tackle them to our satisfaction without a proper demonstration of our strength, solidarity and solidity of our organisation."

### महाराष्ट्रातील गतिमान राजकीय स्थिती

**५२.** परीक्षा बहिष्कार आंदोलनाशिवाय कोणताही मार्ग शिल्लक राहिलेला नाही हे या ४ एप्रिलच्या ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले असले तरी देशातील परिस्थिती आणि विशेषतः महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती तासा-तासांनी बदलत असल्यामुळे या राजकीय बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष परीक्षा बहिष्कार आंदोलन कोणत्या तारखेपासून सुरू करावे याबाबतीत निर्णय असा झाला की, १० एप्रिल पासून तर १३ एप्रिल १९७७ पर्यंत महासंघाचे कार्यकारी मंडळ रोज बैठकीत असेल. ११ एप्रिल रोजी मा. शिक्षण मंत्र्यांशी जी चर्चा होऊ घातलेली आहे त्या चर्चेचे फलित लक्षात घेऊन परीक्षा बहिष्कार आंदोलनाची तारीख नक्की करण्यात येईल असेही या ठरावात नमूद करण्यात आले होते. ते पुढील शब्दात :-

"MFUCTO is prepared to negotiate with the State Government and the universities at any time, and it is our keen desire to come to a fair understanding with these authorities as quickly as possible. The MFUCTO is scheduled to start its negotiations with the Minister of Education Maharashtra, from 11th April 1977 and the **Executive Committee will remain in continuous session from 10th to 13th April on which day it will formulate its final plan of action including the fixing of a date from which the total boycott of all examination work will commence."**

महाराष्ट्रातील १२ हजार विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी पुढील संघर्षासाठी उत्तम तयारी करावी असेही या ठरावात नमूद करण्यात आले होते. ते पुढील शब्दात :- "This is a call to all the 12,000 college and university teachers in Maharashtra to get well prepared for this struggle." *(P204NB2019)*

### महासंघाचे १५ एप्रिल ७७ चे निवेदन

**५३.** सन १९७७ च्या एप्रिल महिन्यातील सुरुवातीच्या पंधरा दिवसांत महाराष्ट्रामध्ये राजकीय दृष्टीने अत्यंत अस्थिरतेचे वातावरण होते. तत्कालीन शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांनी १३ एप्रिल १९७५ रोजी महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. सर्वच प्रश्नांवर चर्चा झाली, पण कोणताही निर्णय होत नव्हता. या सर्व बाबी निर्णयासाठी मंत्रिमंडळासमोर न्याव्या लागतील असे त्यांचे म्हणणे होते. आणखी एक कारण म्हणजे ज्या सरकारमध्ये त्या मंत्री होत्या ते सरकारच मूळात राहते की जाते? अशा स्थितीत होते. १३ एप्रिलची बैठक संपतांना १५ एप्रिल रोजी पुन्हा बैठक घेऊ असे मा. शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. मात्र १५ एप्रिल १९७७ च्या बैठकीला त्या स्वतः उपस्थित राहिल्या नाहीत. शिक्षण सचिवांशी चर्चा झाली पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. महासंघाच्या कार्यकारी मंडळाने त्याच दिवशी काही महत्त्वाचे निर्णय घेतले व महासंघाचे सरकार्यवाह प्रा. किशोर ठेकेदत्त यांनी ते एका तपशीलवार निवेदनाद्वारे जाहीर केले. **(सहपत्र : आठ)** त्यामध्ये शिक्षण मंत्र्यांच्या भूमिकेबाबत पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते. :-

"The MFUCTO had expected the Education Minister to make a statement at the end of these talks conceding **at least some of our major demands like these pertaining to non payment of salary,** retrenchment and demotion of teachers and UGC scales. It is deeply disappointing the Minister should state that this discussion had been conducted by her when she had no authority to decide on any issue, and that **the decisions would have to be taken by the cabinet."**

### २५ एप्रिल ७७ पासून बहिष्काराचा ठाम निर्णय

**५४.** या अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय वातावरणामध्ये महासंघाने परीक्षा बहिष्कार आंदोलन दिनांक २५ एप्रिल १९७७ पासून सुरू होईल असा निर्णय घेतला. तो पुढीलप्रमाणे :-

"The MFUCTO does realise the special situation prevailing at the State Government level, and therefore desires to give the Government about a week's time to consider our fair proposals and suggestions. **However, the constituent units of the Federation have their own organisational constraints and we cannot allow matters to hang on for an indefinite period. It has therefore been decided by the Executive Committee to commence our total boycott of all Examinations work like**

*(सहपत्र सात : परिच्छेद ४९ पहा)*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS ORGANIZATION
Text of the resolutions passed in the Conference held on 6th and 7th of March 1977 in the Convocation Hall, University of Bombay, Bombay.

**ठराव क्रमांक : १**

पगार नियमित करण्याच्या दृष्टीने निश्चित उपाययोजना जून १९७६ पासून केली जाईल असे आश्वासन शिक्षणमंत्र्यांनी दिल्यानंतरही शिक्षकांना नियमित वेतन न मिळणे, शिक्षकांच्या कामाच्या तासामध्ये दुराग्रहाने व आकसाने मनमानेल तशी वाढ करणे तसे वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे व त्यामुळे शिक्षकांच्या संख्येमध्ये कपात होण्याची संभावना निर्माण होणे, मुळात नसलेल्या अटी लादून नवीन वेतनश्रेणी लावण्याचा प्रयत्न करणे, अनेक शिक्षकांना पदावनत करणे व त्याद्वारे त्यांना नवीन वेतनश्रेणी पासून वंचित ठेवणे, अंशकालिक शिक्षकांना सेवा संरक्षणापासून वगळणे, संरक्षण प्राप्त शिक्षकांपैकी काढून टाकण्यात आलेल्या शिक्षकांना परत न घेणे, कुलगुरूंच्या संयुक्त परिषदेत तयार केलेले सेवा शर्तीचे अत्यंत प्रतिगामी नियम लागू करण्याचा प्रयत्न करणे, अनेक महाविद्यालये, ज्ञानशाखा व विषय बंद करण्याचा योजनाबद्ध प्रयत्न करणे. ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण पाठनिर्देशक यांना नवीन वेतनश्रेणी पासून वंचित ठेवणे, नवीन आकृतीबंधाची कार्यवाही करतांना शिक्षकांच्या प्रतिनिधींना वगळून व त्यांच्याशी सल्लामसलत न करता पुनर्रचना करणे या प्रश्नांची शासनाने चर्चेच्या माध्यमातून समाधानकारक सोडवणूक करावी अशी आग्रहाची विनंती ही संघटना शासनास करीत आहे.

यापूर्वी केलेल्या चर्चेच्या आवाहनास शासनाचा यत्किंचीतही प्रतिसाद मिळू नये ही बाब अतिशय दुःखद आहे. अशा परिस्थितीत चर्चा आणि विचार विनिमयाच्या माध्यमातून उपरोक्त प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक न होऊ शकल्यास जुलै व ऑगस्ट १९७७ मध्ये विद्यापीठ पातळीवरील संघटना ठरवतील त्या तारखेपासून Extra Curicular Activities च्या संबंधात शिक्षकांच्याकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास शिक्षक नम्र नकार देतील व संबंध महाराष्ट्रभर शिक्षक दिनापासून (**५ सप्टेंबर १९७७**) शिकविण्याचे कामसुद्धा बंद करतील.

*(ठराव क्रमांक २ ते ८ : अमुद्रित)* *(P15NB77)*

**invigilation, assessment of answer scripts, conduct of practical and theory examinations, finalization of Marks Sheets etc. with effect from Monday, the 25th day of April 1977.** This decision has been communicated to the Secretary, Education Department.''

त्याच दिवशी महासंघाने २५ एप्रिल ७७ पासून सुरू होणाऱ्या आंदोलनाचा निर्णय या निवेदनामध्ये ठामपणे व्यक्त केला होता. तो पुढील शब्दात :-

**"The MFUCTO gives a call to all college and University teachers in Maharashtra to cease all work connected with examinations from 6 a.m. on Monday 25th April, 1977."**

दिनांक २५ एप्रिल १९७७ पासून सुरू होणाऱ्या परीक्षा बहिष्कार आंदोलनामध्ये शिक्षकांनी कशारितीने कृतिपर असले पाहिजे याबाबतच्या तपशीलवार सूचना (Detailed Instructions) महासंघाने निर्गमित केल्या होत्या. **(सहपत्र नऊ)** या सूचना काळजीपूर्वक पाहिल्या तर महासंघाच्या स्तरावर किती काटेकोरपणे बारीकसारीक तपशील ठरविले जात होते हे जाणकारांच्या लक्षात येईल.

## नव्या मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी निमंत्रण दिले

**५५.** महाराष्ट्रातील राजकीय वातावरण झपाट्याने बदलत होते. सत्ताधारी पक्षाच्या अंतर्गत घडामोडीत मा.श्री. शंकरराव चव्हाण यांचे सरकार संपुष्टात येवून त्यांच्या जागी मा.श्री.वसंतदादा पाटील यांची सत्ताधारी विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली व ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाले

*(सहपत्र आठ : परिच्छेद ५३ पहा)*

Maharashtra Federation of University and College Teachers Organizations

## Statement issued by MFUCTO on 15.04.1977

**The Executive Committee of the MFUCTO has been in continuous session from 13th April, 1977.** The MFUCTO Executive Committee met the Education Minister Mrs. Prabha Rao on 13.04.1975, when the problems and grievances of the College and University teachers were discussed in great details. Though a second meeting had been scheduled today (15.04.1977) the Minister could not make it and the Executive Committee met the Secretary, Education Department.

The MFUCTO had expected the Education Minister to make a statement at the end of these talks conceding **at least some of our major demands like these pertaining to non payment of salary,** retrenchment and demotion of teachers and UGC scales. It is deeply disappointing the Minister should state that this discussion had been conducted by her when she had no authority to decide on any issue, and that **the decisions would have to be taken by the cabinet.**

The problems of the teachers have been pending with the Government for over 3 years, and no one will be convinced with the argument that these issues could not have been settled earlier. It is common knowledge that over 10,000 teachers in Maharashtra had boycotted all Examinations in April 1975 and had lifted their boycott then on the clear assurance given by the Minister of Education Mrs. Rao on the floor of the Assembly to the press and to the MFUCTO. It is tragic that the emergency declared on June 25th 1975 was misused by the Government of Maharashtra to deny to the teachers what was due to them and what had been agreed upon in the negotiation in March-April, 1975.

In an instance, when it was agreed that all existing teachers with University Qualifications would attract the new UGC Scales, the Government of Maharashtra in their letter No.USG 1175/U. dated 21.04.1975 addressed to the Government of India put down the following stipulations :

"The revised scales of pay will be given to those who possess qualification prescribed by the University Grants Commission and also to those who, at present, possess the qualifications prescribed by the Universities. In case of latter however, they will be required to acquire qualifications laid down by the University Grants Commission, within a period of five years, failing which, they will cease to draw further increments. Those who do not possess either of these qualifications (those prescribed by the UGC or respective University) will continue to draw their existing scales."

Even the Government of India in its letter No. F, 1-9/74-U-1 dated 7th June 1975 refuted this condition and invited the attention of the State Government to the earlier instructions issued by the Central Government on 02.11.1974 vis. that

"The existing lecturers in colleges who did not possess at the time of their initial recruitment minimum qualifications as prescribed by the University concerned should be required to attain these qualifications within five years from the date of placement in the revised scale. If they are unable to do so during this period, they shall not be allowed to earn any future increments till they have satisfied this condition."

They further clarified that

"As such, even those lecturers in colleges who do not possess the minimum qualifications prescribed by the Universities concerned, are eligible for the revised scales under the Scheme but are required to attain the qualifications prescribed by the University concerned within five years failing which they shall cease to draw further increments. The existing Lecturers in colleges who possess the minimum qualifications prescribed by the University concerned will continue to draw their increments till they reach the stage of Rs. 1300 whereupon there will be an assessment."

The Executive Committee expressed its deep disappointment at the substandard attitude exhibited by the State Government through this correspondence. Still the MFUCTO agreed to continue the negotiations.

The MFUCTO does realise the special situation prevailing at the State Government level, and therefore desires to give the Government about a week's time to consider our fair proposals and suggestions. However, the constituent units of the Federation have their own organisational constraints and we cannot allow matters to hang on for an indefinite period. **It has therefore been decided by the Executive Committee to commence our total boycott of all Examinations work like invigilation, assessment of answer scripts, conduct of practical and theory examinations, finalization of Marks Sheets etc. with effect from Monday, the 25th day of April 1977.** This decision has been communicated to the Secretary, Education Department.

It is hoped that the State Government will find its way to settle our demands satisfactorily in time so that the inconvenience and hardship caused to students and parents are averted.

The teaching community has always been aware of its responsibilities to the students. The present situation is in fact created by the callous and unsympathetic attitude of the Government of Maharashtra towards the pressing problems of the teachers like retrenchment from 1975, demotion to junior colleges and non payment of salaries involving over 5000 teachers for periods ranging from 3 months to 13 months. The students on their part have supported our demands and expressed their solidarity with our action. While appreciating this gesture of the student community, the MFUCTO wishes to state that this boycott action has been forced on us by the State Government.

**The MFUCTO gives a call to all college and University teachers in Maharashtra to cease all work connected with examinations from 6 a.m. on Monday 25th April, 1977.**

sd/- K.K.Theckedath
General Secretary, MFUCTO

(P26-27NB1977)

होते. चर्चगेट जवळील रिट्झ हॉटेलमध्ये भेटून महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मागण्यांचे व परीक्षा बहिष्काराच्या निर्णयाचे निवेदन त्यांना सादर केले. त्याच दिवशी त्यांनी २२ एप्रिल १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास चर्चेसाठी निमंत्रण दिले. ती चर्चा त्या दिवशी झाली. एका नव्या ऐतिहासिक पर्वाची ही सुरुवात होती.

## महासंघाने सादर केलेले मुद्यांचे टिपण

**५६.** राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक २२ एप्रिल १९७७ रोजी चर्चेसाठी बोलाविल्यानंतर अतिशय मेहनतीने तयार केलेले १२ मुद्यांवरील एक टिपण संघटनेच्या वतीने अध्यक्ष डॉ.एल.बी.केणी, सरकार्यवाह प्रा.किशोर ठेकेदत्त व कोषाध्यक्ष श्री.व्ही.बी.कामथ या तिघांच्या सहीने एक दिवस अगोदर मा. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आले. प्रत्येक मुद्याच्या बाबतीत समस्या काय होती? शासनाने काय मान्य केले होते? पण त्याबाबत कोणतीही कारवाई मात्र झाली नाही. आता पुढे काय व्हायला पाहिजे? याबाबत निरनिराळ्या १२ मुद्यांवर तपशीलवार माहिती या टिपणामध्ये नमूद केलेली होती. एखाद्या संघटनेने शासनाकडे चर्चेसाठी जातांना मुद्यांचे तयार केलेले टिपण कसे असावे याचा एक उत्तम नमूना म्हणून या टिपणाकडे पहाता येईल व त्यासाठी ते मुळातूनच पहावे लागेल. येथे फक्त मुद्दे नमूद केलेले आहेत. ते १२ मुद्दे पुढीलप्रमाणे :-

**"Points for Discussion with C.M. on 22.04.77 at 11.30 a.m. : (1)** Payment through Treasury **(2)** Delay in Payment **(3)** Retrenchment cases in 1975 **(4)** Retrenchment and demotion in 1976 (Part times, Junior Colleges) **(a)** Retrenchment **(b)** Demotion to Junior Colleges **(5)** Common cadre of teachers in Junior Colleges and Degree colleges as on 15.07.1976 **(6)** Librarians, Directors of Physical Education and Method Masters **(7)** Upgradation of Demonstrators and Tutors and Method Masters **(8)** Norms for strength of Classes and Divisions **(9)** Requirement of New Format **(10)** Work load - 13 Clock Hours of Lecturing, Demonstration work and Tutorials **(11)** Code of Conduct **(12)** UGC Scales for other Faculties" *(P32-34NB1977)*

## तीन मुद्यांवरील तपशीलवार टिपण

**५७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या तीन शीर्षस्थ नेत्यांनी दिनांक २२ एप्रिल १९७७ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीसाठी जे बारा मुद्यांचे तपशीलवार टिपण मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाला सादर केले होते त्यामध्ये **(1)** Payment through Treasury **(2)** Delay in Payment **(3)** Retrenchment cases in 1975 या तीन मुद्यांबाबतचे टिपण प्रस्तुत लेखविषयाशी संबंधित आहे. त्या टिपणामध्ये माध्यमिक शिक्षकांप्रमाणे शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्था महाराष्ट्रात सुरू करण्याची मागणी करण्यात आलेली होती. तसेच उत्तरप्रदेशामध्ये अशी व्यवस्था आज अस्तित्वात असतांना महाराष्ट्रामध्ये ती का सुरू करता येत नाही? याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही असेही या टिपणामध्ये नमूद करण्यात आले होते. महाराष्ट्रातील जवळ जवळ ५ हजार शिक्षकांचे ३ महिन्यांपासून तर १३ महिन्यांपर्यंतचे वेतन थकित आहे, असेही या टिपणामध्ये नमूद करण्यात आले होते. १२ मुद्यांवरील हे तपशीलवार टिपण विस्तारभयास्तव येथे नमूद करणे शक्य नसले तरी त्यातील उपरोक्त तीन मुद्यांच्या बाबतीत करण्यात आलेली मांडणी शब्दशः लक्षात यावी म्हणून सोबत **सहपत्र : दहा** म्हणून तेवढा भाग प्रसृत करण्यात आलेला आहे.

## महत्वाच्या मुद्यांवर मतैक्य

**५८.** दिनांक २२ एप्रिल १९७७ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा सुरू झाली. मा. मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील हे अध्यक्षस्थानी होते. शासनाच्या वतीने त्यांच्याशिवाय महाराष्ट्राचे नवनियुक्त अर्थमंत्री श्री. यशवंतराव मोहिते व नवनियुक्त शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील ह्या चर्चेला उपस्थित होत्या. २२ तारखेला जवळ जवळ ३-४ तास ही चर्चा सुरू होती. चर्चा अपूरी राहिल्याने बैठक २३ तारखेला सुरूच राहिली. या दोनही दिवसाच्या चर्चेचा तपशीलवार वृत्तांत मी यापूर्वी नमूद केलेला आहे. *(P207NB19)* त्यामुळे तो पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. अनेक प्रश्नांवर चर्चा झाली व काही प्रश्नांवर त्याच दिवशी निर्णय सुद्धा झाले. नुसते निर्णयच झाले असे नव्हे तर ज्या ज्या मुद्यांवर एकमत झाले त्या मुद्यांचे तपशील एकत्र करून एक मतैक्यपत्र *(P208NB19)* तयार करण्यात आले. हे मतैक्यपत्र २३ एप्रिल १९७७ रोजी स्वाक्षरीत करण्यात आले. शासनाच्या वतीने शिक्षण खात्याचे सचिव श्री.सुकथनकर यांनी ते स्वाक्षरीत केले असून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने अध्यक्ष प्रा. एल.बी.केणी, सरकार्यवाह प्रा.किशोर ठेकेदत्त कोषाध्यक्ष प्रा.व्ही.बी.कामथ यांनी ते स्वाक्षरीत केले आहे. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजीच्या मतैक्यपत्रामध्ये वेतन वितरणाची व्यवस्था स्थापीत करणे तसेच थकित पगाराचा निपटारा करणे या दोन विषयावर समाविष्ट असलेला भाग परिच्छेद २ मध्ये असून तो शब्दशः पुढीलप्रमाणे आहे:-

**"2. Clearance of accumulated arrears regarding pay and allowances** of teaching and non-teaching staff of non-Government affiliated Colleges in the State and enforcement of a scheme or institutionalised arrangement for securing prompt and full payment of the said staff. The M.F.U.C.T.O. invited attention in this connection to what the Minister for Education had said in her statement on the 4th April, 1975 on the floor of the Assembly. **The relevant portion of the statement is as follows :-** "Government feels that College Teachers should get their pay in full and on due dates. Government also agree in principle that college teachers should get their salaries by cheques to be issued by the Management. It will be the

*(सहपत्र नऊ : परिच्छेद ५४ पहा)*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS ORGANIZATIONS

**Boycott of all Examinations from Monday the 25th April, 1977**

**DETAILED INSTRUCTIONS**

**Objective :** The intention is to bring about a complete stoppage of all examination work from 6 a.m. on Monday, the 25th of April, 1977. Our efforts to arrive at a reasonable settlement has not borne any fruits. Hence the call for boycott and it is a duty and obligation of every teachers to observe the following instructions scrupulously :-

**(1) Conduct of Examination :** Teachers who are performing or are scheduled to perform the duties of Officers in charge, co-officers, invigilators or examiners, Internal or External examiner at practical examinations etc. will stop their work with effect from 25th April, 1977 at 6 a.m. when boycott of examinations comes into force. All teachers, therefore, should handover the charge, keys etc. to the Principal of the College or if he himself is a Principal then to the Officer of the University appointed for the purpose at the close of the Session on Saturday, the 23rd April 1977 or 24th of April 1977.

**(2) Assessment of Answer Books : (A)** Those examiners who are already in receipt of answer books but have not started the assessment, should inform the University forthwith that in response to the call from NUTA/MFUCTO for boycott of all examination work, they are unable to undertake the valuation work and hence he should be informed by the University as to what should be done with the bundle of answerbooks lying with them. **(B)** Those teachers, who have already started valuation of answerbooks, should stop further assessment forthwith. They should inform the University that they are unable to do any further valuation work. They should also inform the University that even in respect of those answerbooks they have assessed, it will not be possible for them to certify their valuation assessment, and hence they will not sign and submit the marksheets. **(C)** Teachers who are examiners but have not received the answerbooks so far, should, on receipt of the bundle of answerbooks, inform the University in accordance with the instruction (A) above.

**(3) No teacher should return any answerbook** to the University, unless he receives specific instructions from the NUTA/MFUCTO despite any instructions from the University or from any other Authorities.

(P28GB1977)

endeavour of Government to see that the Management actually translate this proposal in practice with a view to ensuring full and timely payment to college teachers". **In her further statement made on 5.4.1975, the Minister for Education had stated as follows :-** "I have categorically promised to ensure that private managements pay the salaries regularly and for full amounts through cheques". **It was agreed that to fulfil these commitments made by Government, a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries** of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges will be evolved after consultation with the Managements of Colleges and the M.F.U.C.T.O. The scheme **will be finalised before the end of June, 1977.** As regards accumulated arrears of pay and allowances, the Chief Minister assured that Government will examine the question of giving further **adhoc assistance to the colleges so that these arrears could be cleared as early as possible."** *(P208NB2019)*

## आंदोलन मागे घेण्यात आले

**५९.** दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी पहिले मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले. अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांवर लिखित स्वरूपात मतैक्य झाल्यामुळे व इतर महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करून निर्णय घेण्याचे शासनाकडून लिखित स्वरूपात मान्य करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने २५ एप्रिल पासून सुरू होणारे परीक्षा बहिष्कार आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी दिनांक २४ एप्रिल १९७७ रोजी एक निवेदन *(P206NB19)* प्रसृत करून हा निर्णय जाहीर केला. या निवेदनातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे:-

"7. In view of the assurances contained in this statement the MFUCTO Executive Committee **declares the withdrawal of the boycott of examinations** scheduled to begin on 25th April 1977."

वेतन वितरण व्यवस्थेबाबत या निवेदनाच्या पहिल्याच परिच्छेदात पुढीलप्रमाणे माहिती होती :-

"1. **Suitable scheme to ensure prompt and full payment of salaries** of the teaching and non-teaching staff of non government affiliated colleges will be evolved. The scheme will be finalised before the end of June 77."

## नागपूर विद्यापीठ क्षेत्रात एक नवेच प्रकरण

**६०.** दिनांक २२ एप्रिल ते २४ एप्रिल १९७७ दरम्यान मुंबई येथील घटनाक्रम आटोपून आम्ही नुटाचे प्रतिनिधी परत आलो तर नागपूर विद्यापीठाच्या स्तरावर एक नवीनच प्रकरण आमच्यासाठी वाढून ठेवले होते. दिनांक १५ एप्रिल १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २५ एप्रिल १९७७ पासून ठामपणे परीक्षा बहिष्कार आंदोलन सुरू करण्याचा निर्णय जाहीर केलेला होता. सबंध महाराष्ट्रभर या परीक्षा बहिष्कार आंदोलनाची सर्व घटक संघटनांनी जोरदार तयारी सुरू केलेली होती. खुद्द महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने परीक्षा बहिष्कार आंदोलनामध्ये सर्व प्राध्यापकांनी कशाप्रकारे कार्य केले पाहिजे याविषयीच्या तपशीलवार सूचना निर्गमित केल्या होत्या. १५ एप्रिल नंतरच्या पुढच्या २-४ दिवसांत महाराष्ट्रभर ही तयारी सुरू होती. शासकीय कर्मचारी संघटनेचे ज्येष्ठ नेते श्री.र.ग.कर्णिक यांनी एक पत्रक काढून "आम्ही आमची नियमित कामे करू, परीक्षा बहिष्कार फोडणारी कामे करणार नाही" असे जाहीर केले होते. नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात काम करणारे संघटनेचे ज्येष्ठ नेते व नुटाचे कोषाध्यक्ष डॉ.अरूण सातपुतळे (जे पुढे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झालेत.) हे त्यावेळेला विद्यापीठातील कर्मचारी संघाचे अध्यक्ष होते. त्यांनी दिनांक २२ एप्रिल १९७७ रोजी एक पत्रकार परिषद घेऊन "**विद्यापीठ कर्मचारी संघाचे सदस्य त्यांची नियमित कामे करतील पण परीक्षा बहिष्कार फोडणाऱ्या कोणत्याही कामात सहभागी होणार नाहीत**" अशाप्रकारचे एक निवेदन प्रसिद्ध केले. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजीच्या नागपूरच्या सर्व वृत्तपत्रांमध्ये या निवेदनाला ठळक प्रसिद्धी मिळाली होती.

## डॉ. अरूण सातपुतळे यांना कारणे दाखवा नोटीस

**६१.** नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळामध्ये दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी या प्रश्नावर काही सदस्यांनी नकारात्मक चर्चा उपस्थित केली. संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख हे विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असले तरी, २२ व २३ तारखेला मुंबई येथे मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीला उपस्थित असल्यामुळे कार्यकारी मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहू शकले नव्हते. कार्यकारी मंडळामध्ये जी चर्चा झाली ती अशी की, डॉ. अरूण सातपुतळे हे विद्यापीठाचे शिक्षक कर्मचारी आहेत व त्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अशाप्रकारे चिथावणी देणे योग्य नाही, तेव्हा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. त्यांच्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेण्यात यावी. त्यांची ही कृती अयोग्य (improper) आहे म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी, असाही निर्णय त्या ठिकाणी झाला व त्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीसही डॉ.अरूण सातपुतळे यांना देण्यात आली. एक-दोन महिन्यांपूर्वी याच कार्यकारी मंडळाने डॉ.अरूण सातपुतळे यांची विद्यापीठ वसतीगृहाचे वार्डन म्हणून नेमणूक केली होती. डॉ.सातपुतळे यांनी केलेल्या उपरोक्त 'अपराधा'मुळे आता त्या वार्डनच्या कामाचा सुद्धा कार्यभार त्यांच्याकडे सोपविला जाणार नाही अशाही अफवा जोरात पसरलेल्या होत्या.

## नुटाच्या अध्यक्षांचे मा. कुलगुरूंना पत्र

**६२.** दिनांक ३ मे १९७७ रोजी संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी

*(सहपत्र दहा : परिच्छेद ५७ पहा)*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERSORGANIZATION**

**Points for Discussion with C.M. on 22.4.77 at 11.30 A.M.**

0. Regarding the four points relating to the G.R. dated 4.10.1975 (High Court Matter) viz. (a) qualifications, (b) Work load, (c) Vacation and (d) Remuneration for examinations, please see Memo dated 15.4.77 submitted with our letter dated 17.4.77 to C.M. copies given to P.S.

**1. PAYMENT THROUGH TREASURY :** In March/April 1975, one of the major questions taken up in the negotiation was payment through Treasury. Government has given clear assurance of its responsibility for prompt and full payment for all teachers. To fulfil this promise we demand payment through Treasury on the lines of payment to school teachers. **We see no reason why this cannot be done by Maharashtra Govt. if the U.P. Govt. has done so.**

**2. DELAY IN PAYMENT :** In the absence of the implementation of the scheme, the irregularities and substandard methods in the payment of salaries continue unabated and the situation has gone from bad to worse, in **as much as over 5000 teachers in Maharashtra have not received their salaries for periods ranging from 3 months to 13 months.** The economic condition of the teachers is such that some teachers' families have had to sell their personal effects to maintain their bare existence. The small steps taken by the Government in the form of release of advances have proved far short of the needs and expectations. Effective steps should be taken of the needs and expectations. Effective steps should be taken forthwith so that all arrears of salary are cleared immediately.

**3. Retrenchment Cases in 1975 :** A serious problem that was discussed with the State Government in March-April, 1975 was that of heavy retrenchment created by the anti-teacher **Government policy of postponing confirmation through an ordinance of even teacher who had completed the maximum period of two years.** The situation was further aggravated by the malpractices of some of the managements of wrongfully terminating teachers before they completed two years. In view of a special machinery instituted by the Universities after due deliberations, submitted their reports in each case and the **Executive Councils recommended the reinstatement of teachers. It is tragic that inspite of these recommendations as many as 117 teachers are jobless.** It is necessary to mention that some of these teachers have put in 12 years of service. Government through an ordinance amending the act or through any other means, should see that all these teachers are put back in their position latest by 1st June 1977.

(P32NB1977)

मा. कुलगुरूंना एक पत्र लिहून त्या पत्रामध्ये "संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी माझ्या असे लक्षात आणून दिले आहे की, या निवेदनाचे निमित्त करून डॉ. सातपुतळे यांना भिवविण्याचा व धाक दाखविण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून होत आहे. त्यांच्या उपरोक्त निवेदनाची गंभीर दखल घेण्याचा व त्यांची कृती Improper आहे म्हणून त्यांनी कारणे दाखवावीत अशी लेखी विचारणासुद्धा डॉ.सातपुतळे यांचेकडे विद्यापीठ अधिकाऱ्यांनी केली असल्याचे समजले आहे." असे नमूद केले होते व त्याच पत्रात पुढे असेही नमूद करण्यात आले होते की, "वस्तुतः "आम्ही आमची नियमित कामे करू बहिष्कार फोडणारी कामे करणार नाही" असे पत्रक शासकीय कर्मचारी संघाचे श्री.कर्णिक यांनीही काढले होते. पण त्याची "गंभीर दखल" महाराष्ट्र शासनाने घेतली नाही. मुंबई विद्यापीठातील कर्मचारी संघाच्या अध्यक्षांनी सुद्धा असेच निवेदन काढले होते. पण महान हुकुमशहा कुलगुरू श्री. टोपे यांनीही त्यांची "गंभीर दखल" घेतली नाही. असे असतांना संघटनांच्या निर्णयाबद्दल पदाधिकाऱ्यांना व्यक्तिशः वेचून काढून ठेचून काढण्याचे हे जे नवे तंत्र आपण आपल्या विद्यापीठात सुरु केले आहे, त्याचा सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मनःपूर्वक अधिक्षेपच करतील."

नुटाच्या अध्यक्षांनी या पत्रात पुढे असेही नमूद केले होते की, "व्यक्तिगत सेवक आणि संघटनेचा पदाधिकारी यांचे उत्तरदायित्व हे भिन्न स्तरावरून पहावयाचे असते हे माझ्यासारख्यांनी आपल्या लक्षात आणून दिले पाहिजे असे नाही. आपले हे तंत्र असेच चालू राहीले तर कोणत्याही संघटनेला आपले काम करणे अशक्य होईल. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बहिष्कार मोडून काढण्यासाठी लादलेल्या हुकूमांची तामील करणे एवढेच काम मान्यताप्राप्त संघटनांनी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी करावे **असे जर आपले मत असेल तर अनेक महिन्यांपासून पगार न मिळाल्यामुळे मेटाकुटीला व जेरीला आलेली मने आपल्या या मताची इज्जत करणार नाहीत, एवढे मी नम्रपणे आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो.**" शेवटी मा.कुलगुरूंना या पत्रान्वये अशी विनंती केली होती की, "सदरहू परिस्थितीत माझी आपणास अशी विनंती आहे की, आपण उपरोक्त आदेश ताबडतोब मागे घेण्याच्या सूचना आपल्या कार्यालयाला द्याव्या व कोणत्याही प्रकारची सुडबुद्धीची कारवाई कोणत्याही पदाधिकाऱ्यावर करण्याचा आपला हेतू नाही असे स्पष्ट लेखी आश्वासन द्यावे." हे पत्र **सहपत्र : अकरा** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

## नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक

**६३.** डॉ.अरूण सातपुतळे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसमुळे विद्यापीठ क्षेत्रात मोठीच खळबळ उडालेली होती. दिनांक ३ मे १९७७ रोजी नुटाच्या कार्यकारी मंडळाची नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये डॉ.अरूण सातपुतळे यांनी घेतलेली पत्रकार परिषद व मा.कुलगुरूंनी केलेली कारवाई यातून निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. ही पत्रकार परिषद व्यक्तीशः डॉ.सातपुतळे यांनी घेतलेली नव्हती तर शिक्षकेतर कर्मचारी संघाचे अध्यक्ष या नात्याने डॉ.अरूण सातपुतळे यांनी ही पत्रकार परिषद घेतली होती. शिक्षकेतर कर्मचारी संघाचे अध्यक्ष या नात्याने केलेल्या निवेदनावर व पत्रकार परिषदेवर कारणे दाखवा नोटीस विद्यापीठ प्रशासनाने काढावी ही बाब गांभीर्याने घेण्यात यावी व त्याबाबत करावयाच्या कारवाईचा त्या दिवशीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत विचार करण्यात आला. त्याच दिवशी नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक तहकूब करून पूर्ण कार्यकारी मंडळ अध्यक्षांच्या नेतृत्त्वाखाली रात्रौ ८.३० वाजता मा.कुलगुरू डॉ.दे.य.गोहोकार यांच्या निवासस्थानी भेटीसाठी गेले. परिस्थितीचे गांभीर्य कुलगुरूंच्या लक्षात आणून देण्यात आले. उद्या दुपारी कुलगुरूंच्या कार्यालयात नुटाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करून आपण मार्ग काढू असे मा. कुलगुरूंनी कार्यकारी मंडळाला सांगितले.

## विद्यापीठ व संघटना यांच्या संयुक्त बैठकीचे कार्यवृत्त

**६४.** दिनांक ४ मे १९७७ रोजी दुपारी २ वाजता विद्यापीठातील मा. कुलगुरूंच्या कार्यालयात नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांनी कुलगुरू डॉ.दे.य.गोहोकार यांची भेट घेतली. या चर्चेमध्ये याबाबतच्या तीव्र भावना संघटनेच्या अध्यक्षांनी कुलगुरूंच्या कानावर घातल्या. कुलगुरूंनी या सबंध प्रकारात कोणावरही सुडबुद्धीने कारवाई करण्याचा माझा कोणताही हेतू नाही असे स्पष्ट केले. त्यांनी असेही सांगितले की, कार्यकारी मंडळाने निदेश दिल्याप्रमाणे पत्रकार परिषदेबाबतची माहिती डॉ.अरूण सातपुतळे यांच्याकडून मिळविण्यासाठी कार्यालयाला सूचना दिल्या होत्या. त्यामागे सुडबुद्धीने कारवाई करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. आता डॉ.अरूण सातपुतळे यांचा खुलासा प्राप्त झाला असून तो कार्यकारी मंडळासमोर ठेवला जाईल. कोणत्याही प्रकारची सुडबुद्धीची

*(सहपत्र अकरा : परिच्छेद ६२ पहा)*

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

[B.P.T.A.Regn.No.F-1564 & Soc. Regn.- Act Regn.No.MAH/15/73(NGP)

प्रा.बी.टी.देशमुख, अध्यक्ष विदर्भ महाविद्यालय जवळ, अमरावती - ४४४६०४ फोन नं. ३६४६

**दिनांक :- ३ मे, १९७७**

**माननीय कुलगुरु महोदय,**

महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांनी आपल्या न्याय्य मागण्यांच्या पूर्तीसाठी परीक्षा बहिष्कार आंदोलन जाहीर केलेले असतांना त्या आंदोलनात शिक्षकांना सहानुभूती दाखविणारा एक ठराव नागपूर विद्यापीठ कर्मचारी संघाने मंजूर केला होता. संघाचे अध्यक्ष या नात्याने डॉ. अ.शं.सातपुतळे यांनी एका निवेदनाच्या द्वारे हा ठराव वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी दिला होता.

(२) संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी माझ्या असे लक्षात आणून दिले आहे की, या निवेदनाचे निमित्त करून डॉ. सातपुतळे यांना भिवविण्याचा व धाक दाखविण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून होत आहे. त्यांच्या उपरोक्त निवेदनाची गंभीर दखल घेण्याचा व त्यांची कृती Improper आहे म्हणून त्यांनी कारणे दाखवावीत अशी लेखी विचारणासुद्धा डॉ.सातपुतळे यांचेकडे विद्यापीठ अधिकाऱ्यांनी केली असल्याचे समजले आहे.

(३) संघटनेच्या कार्यकर्त्यांनी माझ्या असेही लक्षात आणून दिले आहे की, या सर्व बाबी आपल्या पूर्व परवानगीने होत आहेत.

(४) आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बाजूला काढून त्यांच्यावर सुड उगविण्याचा हा प्रयत्न नागूपर विद्यापीठाच्या इतिहासामध्ये अपूर्व असाच आहे व या प्रयत्नाची पायाभरणी करण्याचा बहुमान आपल्यासारख्या कुलगुरूंनी घ्यावा ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

(५) वस्तुतः "आम्ही आमची नियमित कामे करू बहिष्कार फोडणारी कामे करणार नाही" असे पत्रक शासकीय कर्मचारी संघाचे श्री.कर्णिक यांनीही काढले होते. पण त्याची "गंभीर दखल" महाराष्ट्र शासनाने घेतली नाही. मुंबई विद्यापीठातील कर्मचारी संघाच्या अध्यक्षांनी सुद्धा असेच निवेदन काढले होते. पण **महान हुकुमशहा कुलगुरू श्री. टोपे यांनीही त्यांची "गंभीर दखल" घेतली नाही.** असे असतांना संघटनांच्या निर्णयाबद्दल पदाधिकाऱ्यांना वेचून काढून ठेचून काढण्याचे हे जे नवे तंत्र आपण आपल्या विद्यापीठात सुरु केले आहे, त्याचा सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मनःपूर्वक अधिक्षेपच करतील.

(६) व्यक्तिगत सेवक आणि संघटनेचा पदाधिकारी यांचे उत्तरदायित्व हे भिन्न स्तरावरून पहावयाचे असते हे माझ्यासारख्यांनी आपल्या लक्षात आणून दिले पाहिजे असे नाही. आपले हे तंत्र असेच चालू राहीले तर कोणत्याही संघटनेला आपले काम करणे अशक्य होईल. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बहिष्कार मोडून काढण्यासाठी लादलेल्या हुकूमांची तामील करणे एवढेच काम मान्यताप्राप्त संघटनांनी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी करावे **असे जर आपले मत असेल तर अनेक महिन्यांपासून पगार न मिळाल्यामुळे मेटाकुटीला व जेरीला आलेली मने आपल्या या मताची इज्जत करणार नाहीत, एवढे मी नम्रपणे आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो.**

(७) आपण ज्या दृष्ट वृत्तीची सुरुवात करीत आहात तीची वाढ होता कामा नये याची काळजी घेणे ही गोष्ट ज्यांचे अनेक मुलभूत प्रश्न अजून सुटलेले नाहीत अशा कर्मचाऱ्यांच्या व शिक्षकांच्या संघटनेचे कार्यकर्ते म्हणून आम्हाला अत्यंत मोलाची वाटते. **आपल्या या वृत्तीचा समाजामध्ये व विशेषतः विदर्भाच्या महाविद्यालयीन क्षेत्रामध्ये धिक्कारच केला जाईल.**

(८) सदरहू परिस्थितीत माझी आपणास अशी विनंती आहे की, आपण **उपरोक्त आदेश ताबडतोब मागे घेण्याच्या सूचना आपल्या कार्यालयाला द्याव्या** व कोणत्याही प्रकारची सुडबुद्धीची कारवाई कोणत्याही पदाधिकाऱ्यावर करण्याचा आपला हेतू नाही असे स्पष्ट लेखी आश्वासन द्यावे.

आपला,

**बी.टी.देशमुख, अध्यक्ष, नुटा**

*(P52-EX-77)*

कारवाई करण्याचा हेतू आपल्या मनामध्ये असणार नाही व डॉ.अरूण सातपुतळे यांना हॉस्टेल वार्डन म्हणून नेमण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने यापूर्वीच घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी केली जाईल. कुलगुरूंशी ही जी चर्चा त्यांच्या कार्यालयामध्ये झाली त्या चर्चेचे कार्यवृत्त तयार करण्यात आले. विद्यापीठाचे कुलसचिव श्री.बलराज अहेर व संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी ते कार्यवृत्त उभय पक्षाच्या वतीने स्वाक्षरीत केलेले आहे. या कार्यवृत्तातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"(3) The Vice-Chancellor has also assured the deputation that he had never entertain any idea of victimisation of any office bearer of any Organisation and in this particular case he does not entertain the same and as such he will execute the decision of the Executive Council taken earlier about the appointment of the University Hostel Warden."

हे पूर्ण कार्यवृत्त **सहपत्र : बारा** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

## वेतन वितरण योजना तयार करण्यासाठी समिती

**६५.** दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यामध्ये जे पहिले मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले त्या मतैक्यपत्राच्या परिच्छेद २ मध्ये महाविद्यालयीन शिक्षकांचे वेतन नियमितपणे व पूर्णपणे व्हावे यासाठी यथायोग्य योजना तयार करण्यासाठी व्यवस्थापकांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व शासनाचे प्रतिनिधी यांची एक समिती स्थापन केली जाईल. वेतन वितरणाची योजना या समितीने सादर करावयाची असून त्या योजनेला जून १९७७ च्या आत अंतिम स्वरूप दिले जाईल असेही या मतैक्यपत्रात नमूद होते. मतैक्यपत्रातील तो मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**It was agreed that to fulfil these commitments made by Government, a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries** of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges will be evolved after consultation with the Managements of Colleges and the M.F.U.C.T.O. The scheme **will be finalised before the end of June, 1977.**" *(P209NB19)*

## राज्यस्तरीय समितीची नेमणूक

**६६.** संघटनेशी झालेल्या या मतैक्यपत्रात मान्य झाल्याप्रमाणे दिनांक ५ मे १९७७ रोजी "Constitution of a Committee for formulation of a scheme to ensure prompt and full payment by the College Managements of the due salaries and allowances of the Teaching and non-Teaching Staff in Non-Government affiliated Colleges in Maharashtra." या मथळ्याचा एक शासननिर्णय शिक्षण विभागाने निर्गमित केला. उच्च शिक्षण संचालक हे या राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष होते. त्या शिवाय मंत्रालयातील या विभागाचे उपसचिव हे या समितीचे शासकीय सदस्य होते. ११ सदस्यांच्या या समितीमध्ये सर्वश्री. प्रा.बी.टी.देशमुख, संभाजीराव जाधव, श्रीमती एम.जी. तारळेकर व श्री. वसंत पुजारी हे ४ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.बाबासाहेब घारफळकर हे एक, मौलाना आझाद शिक्षण संस्था औरंगाबादचे सचिव श्री. जुल्फिकार हुसैन हे दुसरे, रयत शिक्षण संस्था अहमदनगरचे अध्यक्ष श्री. शंकरराव काळे हे तिसरे व शांती निकेतन महाविद्यालय सांगलीचे प्राचार्य पी.बी.पाटील असे व्यवस्थापकांचे ४ प्रतिनिधी या समितीमध्ये नेमण्यात आले होते. मुंबईच्या उच्च शिक्षण विभागाच्या कार्यालयातील अधिक्षक श्री.एस.आर.रायरीकर यांची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करण्यात आली होती. अशी ही ११ सदस्यांची राज्यस्तरीय समिती या शासननिर्णयाप्रमाणे नेमण्यात आली. हा शासननिर्णय **सहपत्र : तेरा** म्हणून सोबत प्रसृत केलेला आहे.

## समितीच्या कार्यकक्षा

**६७.** ज्या शासननिर्णयाने ही राज्यस्तरीय समिती नेमली होती, त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये या समितीच्या कार्यकक्षासुद्धा नमूद केलेल्या होत्या. एका बाजूला यापुढे नियमित व पूर्ण वेतन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देता येईल अशी योजना या समितीने तयार करावयाची होती, तर दुसऱ्या बाजूला ही योजना बांधत असतांना शासनाचे जे विद्यमान अनुदान सूत्र आहे त्या विद्यमान अनुदान सुत्रानुसार महाविद्यालयांना होणारे उत्पन्न व खर्चाच्या मान्य अनुज्ञेय बाबी यांचा विचार करून ही योजना तयार करावयाची आहे असे या कार्यकक्षेच्या परिच्छेदात नमूद करण्यात आले होते. खरे म्हणजे या दोनही बाबी परस्पर विरोधी असाव्यात असे वरवर पाहणाराला वाटत असे. कार्यकक्षेविषयीचा हा दुसरा परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणेः-

*(सहपत्र बारा : परिच्छेद ६४ पहा)*

## *Nagpur University, Nagpur*

**Minutes of the meeting of Vice-Chancellor, Registrar with Shri.B.T.Deshumukh, President of NUTA, Shri. A.V.Barhate and other Office Bearers of NUTA**

**Minutes of the meeting of Vice-Chancellor, Registrar with Shri.B.T.Deshumukh, President of NUTA, Shri. A.V.Barhate and other Office Bearers of NUTA** and Shri Dehankar, Secretary, Collegiate Non-Teaching Staff Association, held on 4th May, 1977 at 2.00 PM.

At the outset Shri B.T.Deshmukh invited the attention of the Hon'ble Vice-Chancellor to the letter addressed to Dr.A.S.Satputaley, President, Nagpur Vidyapeeth Karmachari Sangh on the basis of the directive of the Executive Council, which met on 23rd April, 1977. Shri Deshmukh expressed that such kind of letter amounts to act of vindictveness on the part of the University, and he, therefore, requested the Vice-Chancellor to reconsider the same, **because in his opinion if this system continues no welfare Association of any cadre either teaching or non-teaching staff will be able to function.**

The deputation also requested the Vice-Chancellor to make his stand clear in the light of this letter **whether he has any intention to victimise any office bearer of the Association.** If it is not so, the appointment of Dr. Satputaley as Warden be done immediately as per previous Executive Council's Resolution.

The deputation also requested the Vice-Chancellor that any resolution that may come up before the Executive Council in this connection should only come through regular agenda in the form of Resolution.

**Dr.D.Y.Gohokar, Vice-Chancellor discussed the various aspects of the observations made by Shri Deshmukh and his colleagues and informed them as under :-**

(1) Since the Executive Council directed him to collect the information pertaining to the press-statement made by Dr.A.S.Satputaley, he has instructed the office to send a letter. This letter does not carry any intention of victimisation of the person concerned. Since an explanation by Dr. A.S.Satputaley is submitted, he had informed the deputation that the same will be sent to the Executive Councillors for information **and the matter has been closed from his side.** He will report this to Executive Council in its next meeting.

(2) He has accepted the suggestion of the deputation that any resolution on this subject will be placed before the Executive Council, if it comes from any Member of the Council in the form of regular resolution as a part of regular Agenda of the meeting of the Executive Council.

(3) The Vice-Chancellor has also assured the deputation that **he had never entertain any idea of victimisation of any office bearer of any Organisation** and in this particular case he does not entertain the same and as such he will execute the decision of the Executive Council taken earlier about the appointment of the University Hostel Warden.

**4.5.1977** — Sd/- B.Y.Aher, Registrar, Nagpur University

*(P54EX-77)* — Sd/ - B.T.Deshmukh, President, NUTA

"2. The terms of reference of the above Committee should be as follows :

To formulate and recommend to Government for its consideration a suitable scheme to ensure, henceforth, regular and full payment of due salaries and allowances of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges in the State by the College Managements, after taking into account the existing sources of receipts (i.e. fees and Government grants as per existing grant-in-aid formula) and items of admissible expenditure of the Colleges."

## समितीला अहवाल सादर करण्यासाठी देण्यात आलेली मुदत

**६८.** समितीचा अहवाल विचारात घेऊन १९७७ च्या जून महिन्याच्या आत याबाबतच्या योजनेला अंतिम रूप दिल्या जाईल असे शासनाने मतैक्यपत्रामध्ये मान्य केले होते आणि त्यामुळे समितीच्या नेमणुकीच्या या शासननिर्णयाने समितीला ५ जून १९७७ पावेतो अहवाल सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. याचा अर्थ ५ मे १९७७ रोजी नेमण्यात आलेल्या या समितीने १ महिन्यात म्हणजे ५ जून १९७७ पर्यंत आपला अहवाल शासनाला सादर करावयाचा होता. शासननिर्णयातील याबाबतचा परिच्छेद ४ पुढीलप्रमाणे :-

"The Committee should be requested to submit its report to Government within one month, i.e. on or before 5th June 1977."

## सन १९६४-६५ पर्यंत अस्तित्वात असलेले अनुदान सूत्र

**६९.** समितीची पहिली बैठक दिनांक १६ मे रोजी होणार असल्याच्या सूचना समितीच्या अध्यक्षांच्या कार्यालयातून आम्हा समितीच्या सदस्यांना प्राप्त झाल्या होत्या. अनुदान सूत्राची विद्यमान व्यवस्था बदलवून नवीन व्यवस्था अस्तित्वात येण्याच्या या प्रक्रियेमध्ये या समितीच्या बैठका व तयार होणारा अहवाल हा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. कोणत्याही अस्तित्वातील व्यवस्थेमध्ये बदल करून नवीन व्यवस्था स्थापीत करणारांना मूळ व्यवस्था आतून बाहेरून नीट ठाऊक असेल तरच ते काम यशस्वीरित्या करता येते. त्यावेळी अस्तित्वात असलेले अनुदान सूत्र कसे होते? याची माहिती करून घेऊ. **महाविद्यालयांना मिळणाऱ्या अनुदानाची १९६४-६५ पर्यंतची व्यवस्था ही राज्याच्या तीनही भागात सारखी नव्हती.** राज्यपुनर्रचनेच्या वेळी सन १९५६ मध्ये निर्माण झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्यात व त्यानंतर १९६० मध्ये अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झालेल्या तीनही विभागामध्ये याबाबत तीन प्रकारची व्यवस्था कार्यरत होती. जुन्या मध्यप्रदेशामध्ये महाविद्यालयांना अनुदानाचे जे सूत्र लागू होते त्या सूत्रानुसार विदर्भातील महाविद्यालयांना सन १९६४-६५ पर्यंत अनुदान मिळत होते. जुन्या हैदराबाद राज्यात अनुदानाचे जे सूत्र होते त्याप्रमाणे मराठवाड्यातील महाविद्यालयांना १९६४-६५ पर्यंत अनुदान मिळत राहिले. महाराष्ट्राच्या इतर भागात जुन्या मुंबई राज्यामध्ये महाविद्यालयांना अनुदान देण्याचे जे शासननिर्णय होते, त्यामधील सूत्रानुसार अनुदान प्रदान सुरू राहिले.

## सन १९६४-६५ नंतर निर्माण झालेली परीक्षा अनुदान व्यवस्था

**७०.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या सर्वच भागात महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानाचे एकच सूत्र असावे अशा प्रकारची मागणी सर्व स्तरावरून केली जात होती. त्याप्रमाणे सन १९६४-६५ या वर्षापासून अनुदानाचे नवीन सूत्र सुरू झाले. या सूत्रानुसार मिळणारे अनुदान हे परीक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून ओळखले जात असे. महाराष्ट्र शासनाच्या

*(सहपत्र तेरा : परिच्छेद ६६ पहा)*

*Constitution of a Committee for formulation of a scheme to ensure prompt and full payment by the College Managements of the due salaries and allowances of the Teaching and non-Teaching Staff in Non-Government affiliated Colleges in Maharashtra.*

### GOVERNMENT OF MAHARASHTRA

***Education & Youth Services Department, Mantralaya Annexe, Bombay-400 032, 5th May, 1977.***

**Read :** *Record of consensus reached in the discussions of the Representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers Organisations with the Chief Minister of Maharashtra on 22nd and 23rd April, 1977.*

**Resolution :** In the recent discussions with the representatives of College Teachers Organisation, Government has assured the Federation, inter alia, that a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries etc. of the teaching and non-teaching staff by the Managements of non-Government affiliated Colleges in the State will be evolved and that the scheme will be finalised before the end of June 1977. In pursuance of this assurance, Government has decided to appoint a Committee under the Chairmanship of the Director of Higher Education, Maharashtra State, Poona, with four non-official members, each, representing (i) the Managements of Colleges and (ii) the teachers to be nominated by the Maharashtra Federation of University and College Teachers Organisation, to examine the matter and submit for the consideration of Government a specific draft scheme in this regard. The Committee shall consist of the following persons:

1. Director of Higher Education... **Chairman**

2. Deputy Secretary, Education & Youth Services Department, Government of Maharashtra... **Member**

**Representatives of the College Managements**

3. Shri Zulfikar Hussain, Secretary, Maulana Azad Education Society, Aurangabad... **Member**

4. Shri Babasaheb Gharfalkar, President, Shivaji Education Society, Amravati... **Member**

5. Shri Shankarrao Kale, Chairman, Rayat Shikshan Sanstha, Ahmednagar... **Member**

6. Shri. P.B. Patil, Shanti Niketan Mahavidyalaya, Sangli... **Member**

**Representatives of MFUCTO.**

7. Professor B.T. Deshmukh, President, Nagpur University Teacher's Association, Near V.M.V. Amravati... **Member**

8. Prof. (Mrs.) M.G. Tarlekar Deopur, Dhulia... **Member**

9. Prof.Sambhaji Jadhav, 1116, Sykes Extension, Kolhapur... **Member**

10. Prof. Vasant Pujari, Milind Science College, Aurangabad... **Member**

11. Shri S.R. Rairikar, Superintendent, Inspection and Audit Squad, for Colleges, Greater Bombay, Bombay... **Member-Secretary**

**2.** The terms of reference of the above Committee should be as follows :

To formulate and recommend to Government for its consideration a suitable scheme to ensure, henceforth, regular and full payment of due salaries and allowances of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges in the State by the College Managements, after taking into account the existing sources of receipts (i.e. fees and Government grants as per existing grant-in-aid formula) and items of admissible expenditure of the Colleges.

**3.** The Chairman is authorised to call upon any of his subordinate or others to attend any meetings of the Committee to assist him, as and when he may consider necessary to do so.

**4.** The Committee should be requested to submit its report to Government within one month, i.e. on or before 5th June 1977.

**5.** This Committee should be treated as State Level Committee & the Non-official members of the Committee will be eligible for travelling allowance and daily allowance as admissible to members of a State level Committee in accordance with scale I of Rule I (i) (b) Section I of Appendix-XIII A of the Bombay Civil Service rules Vol II as amended from time to time. The Travelling allowance and Dearness allowance bills of non-official members of this State Level Committee should be countersigned by the Director of Higher Education and the Expenditure met from the sanctioned grants at his disposal.

**6.** This Government Resolution issues with the concurrence of the Finance Department.

******

शिक्षण व समाजकल्याण विभागाने १३ डिसेंबर १९६२ रोजी निर्गमित केलेल्या एका शासननिर्णयाने (No.NGC 1262-U) या अनुदान सूत्राची निर्मिती केली. मुळातील या शासननिर्णयाला दुरुस्ती सुचविणारा दुसरा एक शासननिर्णय (No.NGC 1262-U) शिक्षण व समाजकल्याण विभागाने ८ जानेवारी १९६४ रोजी निर्गमित केला. या दोन शासननिर्णयांनी महाराष्ट्रामध्ये परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) व्यवस्था स्थापीत झाली.

## परीरक्षा अनुदान व्यवस्थेतील विविध संज्ञा

**७१.** परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) सन १९६४-६५ पासून सुरू झालेली व्यवस्था १९७७ पर्यंत अस्तित्वात होती. १३ डिसेंबर १९६२ व ८ जानेवारी १९६४ या दोनही शासननिर्णयांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास या व्यवस्थेमध्ये वापरण्यात आलेल्या विविध संज्ञाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल. :-

**(१) प्रत्यक्ष खर्च (Actual Expenditure) :** प्रत्यक्ष खर्च याचा अर्थ असा की, त्या व्यवस्थापनाने महाविद्यालयाच्या परिचालनावर त्या वर्षात निरनिराळ्या बाबींवर प्रत्यक्षात केलेला एकूण खर्च.

**(२) अमान्य खर्च (Inadmissible Expenditure) :** अमान्य खर्च याचा अर्थ असा की, शासननिर्णयाने खर्चासाठी मान्यता दिलेल्या बाबींवरील (approved items of expenditure) खर्चाशिवाय इतर बाबींवर करण्यात आलेला खर्च.

**(३) एकूण मान्य खर्च (Total Approved Expenditure) :** एकूण मान्य खर्च याचा अर्थ असा की, एकूण खर्चातून अमान्य खर्च वजा केल्यानंतर उरलेला खर्च म्हणजे एकूण मान्य खर्च.

**(४) एकूण थेट उत्पन्न (Total Direct Receipts) :** एका वर्षाच्या कालखंडामध्ये महाविद्यालयाला विविध बाजूने मिळालेले एकूण उत्पन्न. यामध्ये मुख्य उत्पन्न हे 'फी' वर आधारित होते हे सहज लक्षात येईल.

**(५) प्रत्यक्ष तूट (Actual Deficit) :** प्रत्यक्ष तूट याचा अर्थ असा की, एकूण मान्य खर्चाच्या रकमेतून एकूण थेट उत्पन्न वजा केल्यानंतर जी रक्कम निघेल ती म्हणजे प्रत्यक्ष तूट.

## परीरक्षा अनुदानाचे परिमाण

**७२.** उपरोक्त संज्ञा एकदा समजून घेतल्यानंतर आता परीरक्षा अनुदानाचे निर्धारण कसे ठरविले जात होते ते विचारात घेऊ. मागील वर्षाच्या तुटीवर या वर्षी परीरक्षा अनुदान दिले जाईल. त्या अनुदानाचे परिमाण पुढीलप्रमाणे असेल:-

(१) महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या एक हजार पेक्षा कमी असेल तर प्रत्यक्ष तुटीच्या ५० टक्के अधिक एकूण मान्य खर्चाच्या १० टक्के एवढी रक्कम त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून दिली जाईल.

(२) महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या एक हजारापेक्षा जास्त असेल तर प्रत्यक्ष तुटीच्या ५० टक्के अधिक एकूण मान्य खर्चाच्या ५ टक्के एवढी रक्कम परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) म्हणून त्या महाविद्यालयाला दिली जाईल.

(३) उपरोक्त दोनही प्रकारामध्ये देण्यात येणारे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) **एकूण मान्य खर्चाच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त कोणत्याही परिस्थितीत असणार नाही.** याचा अर्थ असा की, मागील वर्षामध्ये महाविद्यालयाच्या परिचालनावर ९९ रूपये एकूण मान्य खर्च असेल तर परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हे कोणत्याही परिस्थितीत ३३ रुपयांपेक्षा जास्त असणार नाही.

(४) एखाद्या महाविद्यालयामध्ये मागील वर्षाच्या परिचालनात तूट आलेली नसेल व एकूण मान्य खर्चापेक्षा एकूण थेट उत्पन्न जास्त (surplus) असेल तर त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) मिळणार नाही.

(५) संचित शिल्लक (accumulated surplus) ही ज्या महाविद्यालयाजवळ एक लाख रूपया पेक्षा जास्त असेल त्या महाविद्यालयाला परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) मिळणार नाही.

## आणखी दोन अनुदाने

**७३.** परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हे सुरूवातीला महाविद्यालयांना मिळणारे एकमेव अनुदान होते. पुढच्या दोन-तीन वर्षामध्ये आणखी दोन अनुदानाची भर त्यामध्ये पडली. ती म्हणजे महागाई भत्ता अनुदान व वेतनश्रेणी वाढीवरील अनुदान.

**महागाई भत्ता अनुदान (DA Grant) :** शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निर्धारित दराने देण्यात येत असलेल्या महागाई भत्त्यामध्ये वर्षातून दोन वेळा वाढ होते. ही वाढ अनुदानित शाळा व महाविद्यालयांमधून सुद्धा लागू केली जाते. त्यामुळे दरवर्षी या मथळ्यावरील खर्चामध्ये वाढ होत राहते. त्यामुळेच सन १९६७-६८ या वर्षापासून महागाई भत्ता वाढीमुळे येणारा वाढीव भार कमी करण्याच्या प्रयोजनार्थ महागाई भत्ता अनुदान (DA Grant) सुरू करण्यात आले. सुरूवातीला हे अनुदान महागाई भत्त्यावर करण्यात आलेल्या खर्चाच्या १५ टक्के दिल्या जात असे. सन १९६८-६९ मध्ये ते १५ टक्क्यावरून ३३. १/३ टक्के करण्यात आले.

**वेतन सुधारणा अनुदान (ISS Grant) :** दिनांक १ एप्रिल १९६६ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारित वेतन श्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्यात आल्या. त्या पोटी येणाऱ्या जादा खर्चाच्या ८० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान म्हणून मिळत होती व उरलेली रक्कम राज्यशासनाने अदा करावयाची होती. १ एप्रिल १९६६ च्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या पदांच्या वाढीव खर्चावर १०० टक्के अनुदान दिल्या जात असे. दिनांक ३१ मार्च १९७१ या तारखेपासून केंद्राची याबाबतीत मिळणारी ८० टक्के मदत बंद झाली व त्यामुळे तो सर्व भार राज्यशासनाला अनुदानाच्या रूपाने द्यावा लागत असे. (१ एप्रिल १९६६ या तारखेनंतर अस्तित्वात आलेल्या महाविद्यालयांना किंवा पदांना कोणतेही अनुदान केंद्रशासनाकडून मिळत नसे.) हे अनुदान वेतनश्रेण्या सुधारणा अनुदान (improved salary scale grant - ISS Grant) या नावाने ओळखल्या जात असे.

## तुटीवर आधारित अनुदान

**७४.** सारांश काय तर सन १९७५-७६ च्या दरम्यान महाविद्यालयांना मिळणारे अनुदान हे मुख्यत्वे तीन प्रकारचे होते. एक म्हणजे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant), दुसरे म्हणजे महागाई भत्ता अनुदान (DA Grant) व तिसरे म्हणजे वेतनश्रेणी सुधारणा अनुदान (ISS Grant). यापैकी दुसरे आणि तिसरे अनुदान हे त्या त्या खर्चासाठी असल्यामुळे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हाच त्या व्यवस्थेचा मुख्य गाभा होता. हे परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) तुटीवर आधारलेले असायचे. तूट ही वर्षाकाठी होणाऱ्या उत्पन्न व मान्य खर्चाच्या फरकावर आधारित असे आणि वर्षाकाठी होणारे उत्पन्न मुख्यत्वे विद्यार्थ्यांची संख्या व त्या विद्यार्थ्यांकडून येणारी 'फी' यावर आधारित असे. या विद्यार्थ्यांची संख्या कोणत्याही कारणाने कमी झाली तर त्याचा परिणाम हा प्रत्यक्ष एकूण उत्पन्नावर होत असे. दिनांक १३ डिसेंबर १९६२ व ८ जानेवारी १९६४ च्या दोन शासननिर्णयांनी तयार केलेली अनुदानाची ही व्यवस्था परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) या नावाने ओळखली जाऊ लागली. तुटीच्या आधारावर अनुदान देण्याच्या अंगभूत व्यवस्थेमुळे तूट अनुदान (Deficit Grant) या नावाने सुद्धा ही व्यवस्था ओळखली जात असे.

## काही गृहितकावर आधारित अनुदान व्यवस्था

**७५.** परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) ही व्यवस्था काही गृहित तत्वांवर आधारलेली होती.

(१) शिक्षण संस्था चालविणाऱ्या व्यवस्थापकांनी काही निधी या कामासाठी समाजाकडून गोळा केला पाहिजे व तसा ते गोळा करतील व करत राहतील असे या योजनेमध्ये गृहित धरण्यात आले होते. किंबहूना परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) व्यवस्थेचा तो एक महत्त्वपूर्ण आधार होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये शासनाची मदत या कामी मिळणार नाही म्हणून समाजाने मदत उभी करावी हे ठिक आहे. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसुद्धा शासन ही जबाबदारी स्वीकारणार नाही हे अयोग्य होय. एखादी थोर व्यक्ती आयुष्यभर त्याच पद्धतीने समाजाकडून मदत मिळवू शकेल असे गृहित धरले तरी पिढ्यान्‌पिढ्या ते काम समाजाच्या भरवशावर चालेल असे गृहित धरणे हा या व्यवस्थेचा प्रमुख दोष होता.

(२) परीरक्षा अनुदानाच्या (Maintenance Grant) या योजनेमध्ये जबाबदारी स्वीकारणे हे शासनाचे काम नाही. स्वयंसेवी संस्थांना मदत करण्याची शासनाची भूमिका असेल हे अधोरेखित करण्यात आलेले होते.

(३) शासनाजवळ निधी उपलब्ध असेल तरच आणि निधी उपलब्ध असेल तेव्हाच असे अनुदान दिले जाईल या गृहितकावर ही व्यवस्था बांधलेली होती.

(४) उपलब्ध निधीच्या प्रमाणात अनुदान दिले जाईल अशी परीरक्षा अनुदानाची (Maintenance Grant) बांधणी करण्यात आल्यामुळे कोणत्याही संस्थेला हक्क म्हणून अनुदान मागता येणार नाही अशीही या अनुदानाच्या व्यवस्थेची बैठक होती.

(५) विधानमंडळाने अनुदान मंजूर केल्यानंतरच ते देण्यात येईल व ते त्या मंजुरातीच्या प्रमाणात दिले जाईल असेही या योजनेमध्ये अभिप्रेत होते. घटनेतील व कायद्यातील तरतुदी लक्षात घेता त्यात काही चुकीचे होते असे नव्हे.

(६) राज्याच्या संचित निधीतून ज्या रकमा मंजूर होतील त्या प्रमाणात उच्च शिक्षण संचालक या अनुदानाचे प्रत्यक्ष वितरण करतील अशी ही एक प्रशासकीय व्यवस्था या योजनेमध्ये होती व ती पूर्णपणे प्रशासकीय असल्यामुळे त्यात काही

चुकीचे होते असे नव्हे.

## अनुदान व्यवस्थेच्या अभ्यासावर आधारित निष्कर्ष

**७६.** १९७७ च्या मे महिन्याच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये परीरक्षा अनुदानाचा (Maintenance Grant) पूर्ण अभ्यास करण्यासाठी आम्ही नुटाच्या काही पदाधिकाऱ्यांनी अनौपचारिकरीत्या अमरावती येथे २-३ बैठका घेतल्या. या बैठका मुख्यत्वे भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे होत असत आणि या बैठकीला प्रा.श्री.अण्णासाहेब वैद्य, प्रा.बी.एस.ऊर्फ डॅडी देशमुख, प्रा.श्री.व.चिंचमलातपूरे, प्रा.बाळासाहेब कुलकर्णी, प्रा.शरद कळणावत, प्रा.बी.बी.हेडा तसेच संघटनेचे सचिव प्रा.अरविंद बारहाते इत्यादींची उपस्थिती असे. समिती सदस्य या नात्याने पहिल्या बैठकीच्या सूचनेबरोबर जी कागदपत्रे व तक्ते सोबत आलेले होते त्याचाही अभ्यास या बैठकीमध्ये करण्यात आला. **या अनुदानाच्या सूत्राचा पूर्ण अभ्यास केल्यानंतर आम्ही या निष्कर्षाला आलो की, या अनुदान सूत्राप्रमाणे कोणत्याही महाविद्यालयातील शिक्षकांचे जेमतेम ८-९ महिन्यांचे वेतन अदा करता येऊ शकेल अशी ही विद्यमान अनुदान व्यवस्था आहे.** निरनिराळ्या दृष्टीने परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) मिळण्याच्या सर्व प्रकारांचा अभ्यास केल्यानंतरसुद्धा यापेक्षा वेगळा निष्कर्ष निघू शकत नाही अशी आमची खात्री झाली होती.

## कार्यकक्षेवरून वाद

**७७.** पुणे येथे झालेल्या समितीच्या दिनांक १६ व १७ मे १९७७ रोजीच्या पहिल्या बैठकीमध्ये समितीच्या कार्यकक्षेबाबतच वाद झाला. कार्यकक्षेच्या परिच्छेदातील उत्तरार्ध वाचून दाखवून अनुदानाचे नवीन सूत्र शासनाच्या विचाराधीन आहे. ते नवे सूत्र शासन जोवर मान्य करीत नाही तोवर सॅलरी स्कीम वगैरे आपल्याला काही करता येणे शक्य नाही. विद्यमान अनुदान सूत्राच्या मर्यादेत आपल्याला अहवाल सादर करावा लागेल असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक व उपसचिव यांच्यामार्फत केल्या गेले. कार्यकक्षेच्या पूर्वार्धाचा भाग वाचून दाखवून आम्ही शिक्षक प्रतिनिधींनी पुन्हा पुन्हा ही गोष्ट मांडली की, नियमित व पूर्ण वेतन होण्यासाठीचे सूत्र तयार करणे व त्यासाठी आवश्यक त्या शिफारशी करणे हे या समितीचे मुख्य काम आहे.

## कार्यकक्षेचा पूर्वार्ध व उत्तरार्ध

**७८.** शासननिर्णयाच्या परिच्छेद दोनमध्ये समितीची कार्यकक्षा ठरवून देण्यात आलेली होती. खरे म्हणजे हा परिच्छेद दोन हा लहानसा परिच्छेद आहे. लहानसा म्हणजे किती लहानसा? तर एका वाक्याचा. त्या एका वाक्याचा पूर्वार्ध महत्त्वाचा की, उत्तरार्ध महत्त्वाचा यावरून शासकीय प्रतिनिधी व शिक्षक प्रतिनिधी यांच्यात बैठकीच्या पहिल्याच दिवशी वाद झाला. हा वाद समजून घेण्यासाठी कार्यकक्षेचा पूर्वार्ध व उत्तरार्ध पाहू.

**कार्यकक्षेचा पूर्वार्ध :** "To formulate and recommend to Government for its consideration a suitable scheme to ensure, henceforth, regular and full payment of due salaries and allowances of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges in the State by the College Managements,"

**कार्यकक्षेचा उत्तरार्ध :** "after taking into account the existing sources of receipts (i.e. fees and Government grants as per existing grant-in-aid formula) and items of admissible expenditure of the Colleges."

## पूर्वार्ध प्रभावी ठरला

**७९.** कार्यकक्षेच्या उत्तर भागामध्ये विद्यमान अनुदान सूत्राप्रमाणे महाविद्यालयाचे उत्पन्न व खर्च शिफारस करतांना विचारात घ्या एवढेच म्हटलेले आहे. विद्यमान अनुदान सूत्राच्या कक्षेतच शिफारशी करा असा त्याचा अर्थ लावायचा तर मग या समितीची काहीच आवश्यकता नव्हती. या समितीचे मुख्य काम वेळेवर व नियमितपणे वेतन होईल अशा योजनेची शासनाला शिफारस करणे हे आहे व तसे कार्यकक्षेच्या पूर्वार्धात नमूद आहे असा युक्तिवाद आम्ही शिक्षक प्रतिनिधींनी पहिल्याच बैठकीत केला. व्यवस्थापकांच्या प्रतिनिधींनी आमच्या म्हणण्याला पाठिंबा दिला. उच्च शिक्षण संचालक श्री.सु.द.बाळ यांनी स्वतः नागपूर व अमरावती येथे शासकीय महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून काम केलेले होते. त्यांना अशासकीय महाविद्यालयांच्या व्यवस्थेची माहिती होती त्यामुळे त्यांनी त्यांचे म्हणणे फारसे ताणून धरले नाही. उपसचिव श्री.टेंबे यांनी कार्यकक्षेच्या उत्तरार्धाचा किल्ला बराच लढवून पाहिला पण सर्व समिती एका बाजूला झाल्यासारख्या स्थितीत त्यांनीही फारसा जोर धरला नाही.

## परीरक्षा अनुदान त्रुटीचा स्पष्ट उल्लेख

**८०.** समितीची बैठक सुरू होण्याच्या पूर्वी २-४ दिवस अगोदर महाविद्यालयांची आर्थिक स्थिती नमूद असलेले तक्ते आम्हाला समिती सदस्य या नात्याने उपलब्ध झाल्याने आमचे काम बरेच सोपे झाले होते. विद्यमान अनुदान सूत्रानुसार जेमतेम ८-९ महिन्यांचे वेतन अदा करणे शक्य होऊ शकते हे त्यातून स्पष्ट दिसत होते. तो निष्कर्ष अहवालात नोंदला जाणे आवश्यक होते. विद्यार्थ्यांची संख्या कमी होणे, खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणे व विद्यमान अनुदान सूत्राप्रमाणे मिळणारे अनुदान अपूरे असणे या बाबींची नोंद अहवालात करणारा परिच्छेद पहिल्याच बैठकीत तयार झाला. तो पुढीलप्रमाणे :-

" A close review of the financial and statistical tables (vide App.E) will show that colleges in the state generally are in a position to pay salaries to their teaching and non-teaching staff regularly for about 8 to 9 months over a year. This, as has been pointed out earlier (vide Chapter-III) is primarily due to a decline in enrolment, a steep rise in expenditure and grants paid as per the existing grant formula being inadequate. The long term solution therefore lies in a suitable revision of the formula."

हा उपपरिच्छेद पुढे अहवालाच्या आठव्या प्रकरणातील परिच्छेद ६ मध्ये जसाच्या तसा समाविष्ट करण्यात आला.

## तीन महिन्याच्या अतिरिक्त अनुदानाची स्पष्ट शिफारस

**८१.** एकदा परीरक्षा अनुदानाचे सूत्र हे दोषपूर्ण आहे असा निष्कर्ष निश्चित झाल्यावर अनुदान सूत्रामध्ये बदल करावा लागेल हे ओघानेच आले. असा बदल होत नाही तो पर्यंत काय उपाययोजना करावी लागेल हे नमूद करणे अपरिहार्य होते. तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम अतिरिक्त अनुदान म्हणून देण्याची शिफारस त्यातूनच समोर आली ती पुढील शब्दात :-

"Pending the revision of the existing grant-in-aid formula the shortfalls in the Salary Account under the scheme will have to be made good so as to bridge the gap and enable colleges to meet their annual expenditure on salaries and allowances of their employees over the year fully and regularly. **Such additional fund in the circumstances obtaining today could only come from the Government.** The Committee therefore recommends to the Government that the Government should consider the Question of payment of an additional salary grant to a college equal to its 3 months salary expenditure. Such a grant be released in the manner shown below: **(a)** First instalment equal to one month's salary along with the advance maintenance grant; **(b)** Second instalment equal to one month's salary expenditure be released along with the advance I.S.S. grants. **(c)** The third instalment equal to one month's salary expenditure be released on receipt of the report of final assessment of grant-in-aid to the college from the Superintendent of the inspection and Audit Squad."

हा उपपरिच्छेद पुढे अहवालाच्या आठव्या प्रकरणातील परिच्छेद ६ मध्ये जसाच्या तसा समाविष्ट करण्यात आला.

## गरज पडल्यास तीन महिन्यापेक्षा जास्त अनुदान

**८२.** नवीन अनुदान सूत्र अस्तित्वात येण्याच्या पूर्वीच्या काळात विद्यमान अनुदान सूत्राप्रमाणे मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त तीन महिन्याच्या वेतनाइतके अतिरिक्त अनुदान देऊनही एखाद्या महाविद्यालयात वेतन नियमित होत नसेल अशा अपवादभूत परिस्थितीत काय उपाययोजना करावी याबाबतच्या शिफारशीचा परिच्छेद पुढीलप्रमाणे होता. :-

**"Exception :** The non-Government colleges which find it difficult to meet their annual salary expenditure fully even after receipt of three instalments of salary grant equal to 3 months salary, (referred to in 6 above) a further additional fourth instalment of grant equal to one month's salary expenditure of the college be released by the Director of Higher Education after (a) having ascertained the financial position of the college and the need for the payment of such additional assistance and (b) after obtaining final orders from the State Government to that effect. The payment of the fourth instalment should entirely depend upon the decision of the state Government."

हा उपपरिच्छेद पुढे अहवालाच्या आठव्या प्रकरणातील परिच्छेद ६ मध्ये

जसाच्या तसा समाविष्ट करण्यात आला.

### समितीच्या बैठका

**८३.** प्रत्यक्ष शासननिर्णयाने अहवाल सादर करण्यासाठी ५ जून १९७७ अशी मुदत घालून दिल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत त्या मुदतीत समितीचा अहवाल तयार झाला पाहिजे अशी भावना तीनही शासकीय अधिकाऱ्यांच्या मनामध्ये होती. आम्हा चार शिक्षक प्रतिनिधींना सुद्धा बैठकीच्या दिवशी कितीही वेळ काम करावे लागले तरी चालेल पण दिलेल्या मुदतीत हा अहवाल तयार झाला पाहिजे असे वाटत होते. व्यवस्थापकांच्या प्रतिनिधींचा सुद्धा याबाबतीत पाठिंबा होता. समितीने या कामाला त्यामुळेच जोमाने सुरुवात केली. १६ व १७ मे १९७७ रोजी पुणे येथे समितीची पहिली बैठक झाली. या पहिल्या बैठकीमध्ये ढोबळमानाने अहवालातील शिफारशींचा आराखडा कसा असावा? याबाबतची चर्चा झाली. समितीला देण्यात आलेल्या कार्यकक्षेबाबत सुद्धा शासकीय प्रतिनिधींशी बराच वाद झाला. त्यानंतर पुढची बैठक ही ३१ मे १९७७ रोजी मुंबई येथे झाली व त्यानंतरची समितीची बैठक दिनांक १० जून १९७७ रोजी मुंबई येथे झाली व समितीने आपला अहवाल अंतिम केला. समितीसमोर असलेल्या कामांचा आवाका लक्षात घेता समितीला अहवाल सादर करण्यास १५ दिवसांचा उशीर झाला व ५ जून ऐवजी २० जून १९७७ रोजी अहवाल सादर झाला.

### अहवाल शासनाला सादर

**८४.** समितीने आपला अहवाल दिनांक २० जून १९७७ रोजी शासनाला सादर केला. हा एकमताचा अहवाल असून त्यामध्ये एकूण ८ प्रकरणे समाविष्ट आहेत. आठव्या प्रकरणामध्ये पुढे शासननिर्णय निर्गमित करण्यासाठी उपयुक्त असा योजनेचा मसुदा समाविष्ट केलेला आहे. अतिशय मेहनतीने तयार केलेला हा अहवाल (*P483-493NB2001*) मुळातून वाचण्यासारखा आहे. निरनिराळ्या आठ प्रकरणांमध्ये प्रकरणनिहाय कोणती माहिती समाविष्ट आहे याचे तपशील सोबत **सहपत्र : चौदा** म्हणून प्रसृत केलेले आहेत.

### वेतन वितरण व्यवस्था स्थापित झाली नाही

**८५.** महाविद्यालयीन शिक्षकांसाठी वेतन वितरण प्रणालीची शासन नियंत्रित व्यवस्था स्थापन होण्याच्या दृष्टीने जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर १९७७ या तीन महिन्यातील घटनाक्रमाचा आढावा घेणे या संदर्भात महत्त्वाचे आहे. जून १९७७ मध्ये यासाठी नेमलेल्या राज्यस्तरीय समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला होता. ठरवून दिलेल्या मुदतीपेक्षा १५ दिवस हा अहवाल उशीराने सादर झाला. मुळात शासनाने जून १९७७ च्या आत या योजनेला अंतिम स्वरूप दिल्या जाईल असे आश्वासन दिले होते. १५ दिवस या राज्यस्तरीय समितीचा अहवाल उशिरा सादर झाल्याने राज्यशासनाला योजना अंतिम करण्यास १५ दिवसांचा उशीर होऊ शकतो असे गृहित धरले तरी ही योजना कोणत्याही परिस्थितीमध्ये जुलै १९७७ च्या शेवटापर्यंत प्रत्यक्ष अंमलात येणे आवश्यक होते. पण तसे झाले नाही.

### वेतन वितरण व्यवस्थेबाबत शासनातर्फे देण्यात आलेली आश्वासने

**८६.** शासनाने या संदर्भात एका मागून एक अनेक आश्वासने दिली होती. ती आश्वासने कोणत्या स्थितीत व कोणत्या तारखेला दिली होती याचा आढावा पुढीलप्रमाणे :-

**(१)** मा.शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी पुढीलप्रमाणे आश्वासन दिले होते. :-

"**शासकीय कोषागारांमार्फत पगार वाटप** :- काही प्राध्यापकांचा पगार मिळण्याबाबत तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. यासंबंधी प्राध्यापकांची मागणी अशी आहे की, त्यांना शासकीय कोषागारांमार्फत पगार मिळावा. नियमाप्रमाणे देय असलेला पगार सेवकांना मिळाला पाहिजे असे शासनास वाटते. **चालकांद्वारा शिक्षकांना चेकने वेतन मिळावे हे शासनाने तत्त्वतः मान्य केले आहे.** ही बाब चालकांद्वारा प्रत्यक्षात कशी कार्यान्वित करावी याबद्दल शासन प्रयत्नशील राहील." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९७५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३, क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८)*

**(२)** त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ५ एप्रिल १९७५ रोजी मा.शिक्षणमंत्र्यांनी विधानमंडळाला आणखी दिलेल्या आश्वासनाबाबतचा अधिकृत कागदपत्रातील उल्लेख पुढीलप्रमाणे :-

*(सहपत्र चौदा : परिच्छेद ८४ पहा)*

## REPORT OF THE COMMITTEE

Constituted by Govt. to Frame A Scheme to ensure Prompt and Full payment of Salaries to Teaching & Non-Teaching Staff in Colleges in Maharashtra.

( Directorate of Higher-Education Maharashtra State, Pune. )

**20 th JUNE, 1977**

**PREFACE**

**CHAPTER-I :** Introduction

**CHAPTER-II :** Historical Background

**CHAPTER-III :** A Review of The Causes Contributing To The Deterioration In The Finances Of Colleges In Maharashtra

**CHAPTER -IV :** Conclusions and Recommendations arising out of the Study of College statistics.

**CHAPTER-V :** Recommendations regarding the administration of the scheme.

**CHAPTER-VI :** Financial Implications

**CHAPTER-VII :** Summary of Findings, observations and Recommendations

**CHAPTER - VIII :** Draft scheme to ensure prompt and full payment by the college managements of the due salaries and allowances to the teaching and non-teaching staff in non-government affiliated arts, science, commerce & education colleges in Maharashtra.

******

(Sd) S.D. Bal, Chairman

(1) Zulfikar Hussain, Member
(2) Babasaheb Gharfalkar, Member
(3) Shankarrao Kale, Member
(4) P.B. Patil, Member
(5) B.T. Deshmukh, Member
(6) M.G. Tarlekar, Member
(7) Sambhaji Jadhav, Member
(8) Vasant Pujari, Member

(9) (Sd) S.V. Tember, Member : (10) (Sd) S.R. Rairikar, Member

***** (Full Text P 483 NB 2001) *****

**"In her further statement made on 5.4.1975, the Minister for Education had stated as follows :-** "I have categorically promised to ensure that private managements pay the salaries regularly and for full amounts through cheques." *(P209NB2019)*

**(३)** राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या चर्चेमध्ये महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यामध्ये दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी पहिले मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले. त्यामध्ये शासनातर्फे या संदर्भात एकूण तीन आश्वासने देण्यात आली होती. ती शब्दशः पुढीलप्रमाणे :- **(एक)** "It was agreed that to fulfil these commitments made by Government, a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges will be evolved after consultation with the Managements of Colleges and the M.F.U.C.T.O." **(दोन)** "The scheme will be **finalised before the end of June, 1977." (तीन)** "As regards accumulated arrears of pay and allowances, the Chief Minister assured that Government will examine the question of giving further adhoc assistance to the colleges so that these arrears could be cleared as early as possible." *(P208NB2019)*

### ५ सप्टेंबर १९७७ पासून कामबंद आंदोलन

**८७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची एक राज्यस्तरीय परिषद (Conference) ६ व ७ मार्च १९७७ रोजी मुंबई विद्यापीठाच्या फोर्टमधील दीक्षांत सभागृहामध्ये पार पडली. या परिषदेमध्ये ठराव क्रमांक एक हा सबंध राज्यभर वेतन वितरण विलंबाने होण्यासंबंधीचा होता. त्या ठरावाच्या सुरुवातीलाच असे नमूद होते की, **"पगार नियमित होण्याच्या दृष्टीने निश्चित उपाययोजना जून १९७६ पासून केली जाईल"** असे आश्वासन मा. शिक्षणमंत्र्यांनी दिले होते. मात्र त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. "यावर ताबडतोब उपाययोजना न झाल्यास प्रथम बहिःशाल कामकाजाशी असहकार्य केले जाईल व त्यानंतर **५ सप्टेंबर १९७७ पासून कामबंद आंदोलन** सुरू केले जाईल" असेही या ठरावात नमूद करण्यात आले होते. नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक २५ फेब्रुवारी १९७७ रोजी बोलाविण्यात आलेल्या बैठकीमध्ये एक ठराव संमत करण्यात आला होता. या ठरावामध्ये शासन नियंत्रित नियमित पगाराची व्यवस्था ताबडतोब प्रस्थापित होणे आजची तातडीची गरज आहे, अशी मागणी करण्यात आली होती. असे होऊ न शकल्यास १ ऑगस्ट १९७७ पासून बहिःशाल कार्यक्रमाच्या संचालनामध्ये शिक्षक कोणतेही सहकार्य करणार नाहीत व ५ सप्टेंबर १९७७ पासून शिकविण्याचे काम सुद्धा बंद करतील असे नमूद करण्यात आले होते.

### युजीसी वेतनश्रेण्यांचा प्रश्न समाधानकारकपणे मार्गी लागला

**८८.** सन १९७७ च्या ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रामध्ये अंमलात आणण्याच्या मार्गात असलेल्या सर्व अडचणी जवळ जवळ दूर झालेल्या होत्या. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली एका बाजूला महाराष्ट्र शासन व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य यांच्यामध्ये या कालखंडात तीन मतैक्यपत्रे स्वाक्षरीत झालेली होती. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी स्वाक्षरीत झालेल्या **पहिल्या मतैक्यपत्रामध्ये** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करतांना शैक्षणिक पात्रतेचा (educational qualifications) मुद्दा पूर्णपणे निकाली निघालेला होता. एम.फीलची पात्रता ही नव्याने भरतीच्या वेळी लागू केली जाईल व सेवेत असलेल्या प्राध्यापकांना सेवेत दाखल होतांना त्या विद्यापीठाची पात्रता ते धारण करीत असतील तर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या दिल्या जातील अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची योजना होती. ती जशीच्या तशी महाराष्ट्रामध्ये लागू करण्याचे आता पुन्हा मान्य करण्यात आले होते. **दुसरे मतैक्यपत्र** दिनांक १५ जुलै १९७७ रोजी स्वाक्षरीत झाले. त्या बैठकीला विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या किती असावी? हा एक मुद्दा व सुट्ट्यांचा कालखंड हा दुसरा मुद्दा या दोनही बाबत एकमत झाले. दिनांक २२ ऑगस्ट १९७७ रोजी उभयपक्षी बैठक होऊन **तिसरे मतैक्यपत्र** स्वाक्षरीत झाले व या तिसऱ्या मतैक्यपत्राने कार्यभाराचा मुद्दा पूर्णपणे निकाली निघाला. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेची पूर्णपणे मोडतोड केलेली होती. तो शासननिर्णय रद्द करण्याचे शासनाने मान्य केले होते. इतकेच नव्हे तर नवीन वेतनश्रेण्यांच्या पोटी प्रत्येक शिक्षकाला ७५० रुपये आगाऊ रक्कम देण्याचे सुद्धा शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात मान्य करण्यात आले होते. अशारीतीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांचा प्रश्न पूर्णपणे निकाली निघाला होता व ही बाब महाराष्ट्र शासनाच्या सर्वोच्च नेत्यांच्या बैठकीत अंतिम झालेली होती. विद्यापीठांचे कुलगुरू सुद्धा त्या बैठकीला उपस्थित होते. आता फक्त मान्य झालेल्या बाबींप्रमाणे उच्च न्यायालयामध्ये समझोतापत्र (Pursis) दाखल करणे व याबाबत शासननिर्णय निर्गमित होणे एवढीच औपचारिकता शिल्लक राहीलेली होती.

### वेतन वितरण व्यवस्थेचे भिजते घोंगडे

**८९.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागलेला असतांना वेतन वितरण व्यवस्थेचे घोंगडे मात्र भिजत पडलेले होते. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी स्वाक्षरीत झालेल्या पहिल्या मतैक्यपत्रामध्ये याबाबत " The scheme will be finalised before the end of June, 1977." असा उल्लेख नमूद आहे. वस्तुतः याबाबतच्या समितीने आपला अहवाल दिनांक २० जून १९७७ रोजी सादर केलेला होता. पण याबाबत शासनस्तरावर कोणताही अंतिम निर्णय होऊ शकला नाही. दिनांक १५ जुलै १९७७ रोजी दुसरे मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले. त्या मतैक्यपत्रामध्ये सुद्धा या योजनेचा शासननिर्णय निर्गमित होण्याबाबत कोणताही उल्लेख नाही. तिसरे मतैक्यपत्र दिनांक २२ ऑगस्ट १९७७ रोजी स्वाक्षरीत झाले. त्यामध्ये सुद्धा या योजनेबाबतचा शासननिर्णय निर्गमित होण्याबाबत एका शब्दाने सुद्धा उल्लेख नाही. चर्चेमध्ये ही बाब आम्ही मांडली तर समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे एवढेच फक्त सांगण्यात आले. पण त्या अहवालावर केलेली कार्यवाही व निर्गमित करावयाचा शासननिर्णय याबाबतचा एका वाक्याचाही उल्लेख पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या मतैक्यपत्रात दिसून येत नाही.

### वेतन विलंबाने व्यापलेला महाराष्ट्र

**९०.** अनेक महिन्यांचे वेतन न होणे, अनेक महिन्यांच्या विलंबाने वेतन होणे या समस्येने साऱ्या महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र ग्रासलेले होते. एखाद्याच महाविद्यालयामध्ये वेतन नियमितपणे होत असे. बाकी इतर महाविद्यालयांमध्ये 'उजेड'च होता. त्या काळात अशा 'अनुभवग्रस्त' शिक्षकांनी याबाबतीत फारसे लिखाण करून ठेवलेले आढळत नाही.

'सुटा'च्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या "प्रा.संभाजीराव जाधव : शैक्षणिक चळवळीचा मानदंड" या स्मृतिग्रंथामध्ये काही ज्येष्ठ प्राध्यापकांनी या प्रश्नावरील आपले विचार शब्दबद्ध करून ठेवलेले आहेत. त्यांचा धावता आढावा घेणे उचित होईल, असे मला वाटते.

**(i)** 'सुटा'चे माजी अध्यक्ष प्रा.एस.जी.पाटील यांच्या लेखामध्ये याबाबतचे विचार पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहेत. :-

"१९६२ ते १९६७-१९६८ पर्यंत ग्रामीण व शहरी भागांत अनेक नवीन आर्टस्, कॉमर्स व सायन्स कॉलेजेस सुरू झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शिक्षकांच्या नेमणुका केल्या गेल्या; **परंतु ठोस सेवाशर्तीअभावी व अनियमित पगार या दोन बाबींमुळे बहुतांश शिक्षक भरडले गेले. वर्षातून ७ ते ८ महिन्यांचेच पगार होत असल्यामुळे शिक्षकांना घरे भाड्याने मिळण्यापासून ते कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यामध्ये अनंत अडचणी निर्माण होत होत्या.** तसेच दरवर्षी १५ मार्च द्वितीय सत्रसमाप्तीच्या तारखेस अनेक महाविद्यालयांतून शिक्षकांना काढले जावयाचे. काही कॉलेजमध्ये रीतसर पुन्हा महिन्याची नोटीस देऊन, तर काही ठिकाणी तोंडी आदेशावरून शिक्षकांना काढून टाकीत असत. त्यामुळे मार्च महिन्यामध्ये कोणत्या कॉलेजमध्ये किती शिक्षकांना काढले व कोणकोणते शिक्षक कोणकोणत्या कॉलेजमध्ये जाणार, याच्याच चर्चा सर्व स्टाफरूममध्ये सुरू असत." *(पृष्ठ ११८)*

**(ii)** 'सुटा'चे एक ज्येष्ठ नेते प्रा.पुरूषोत्तम शेठ यांनी त्यांच्या लेखामध्ये पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केलेले आहेत. :-

"मी सातारा जिल्ह्यात प्राध्यापक संघटनेचे काम सुरू केले. **प्राध्यापकांना सहा-सहा महिने पगार नसायचे. पत्नीचे दागिने गहाण ठेवायचे, गावाकडून धान्य आणायचे, वाण्याने उधारीला तगादा मागे लावू नये म्हणून उघड्या छत्रीने वाण्याची नजर चुकवायची,** घरमालक थकलेले भाडे देण्यासाठी हांजी हांजी करायचे. त्या काळात बहुसंख्य प्राध्यापक सुट-कोट घालायचे. कोल्हापूरच्या शिवाजी चौकातील कांबळे टेलरकडून 'हप्त्याने पैसे देईन' या अटीवर सुट-कोट आणायचा. नोकरीत संस्थाचालकांची दहशत. गावाकडच्या आईवडिलांना मदत करू शकत नाही, याची खंत." *(पृष्ठ १०९)*

**(iii)** महावीर महाविद्यालय, कोल्हापूरचे माजी प्राचार्य डॉ.सुनीलकुमार लवटे यांच्या लेखातील पुढील मजकूर पहा. :-

"मी काही तुम्हास साठाउत्तराची कहाणी नाही सांगत... हा काळ अवघा पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीचा. ध्येयवादाने स्थापन झालेल्या (एखादा सन्मान्य अपवाद वगळता) सर्व शिक्षण संस्था संस्थानिक झालेल्या... संस्थाचालकांचा शब्द हाच कायदा... त्यांच्या तोंडावर येईल तो पगार... त्यांच्या मनात असेल तोवरच नोकरी... वेतनमान निश्चित झालं तरी मस्टरवर एक पगार... हाती

कपात... ३१ मार्चचा दिवस... (नंतर तो ३० एप्रिल झाला.)... अशाश्वत सूर्य घेऊन उगवायचा... त्या दिवशी संस्थाचालक ज्यांची नावं वाचतील त्यांनीच पुढं येणाऱ्या जूनला कॉलेजात यायचं... प्राध्यापक संघटना झाली तरी प्राध्यापकांचे प्रतिनिधी संस्थाचालक, प्राचार्य ठरवत... **पगाराचा दिवस म्हणजे कपिलाषष्ठीचा योग... आवई उठायची, आज पगार होणार... मग कळायचं, चेअरमन गावी गेलेत... मग चेक आला... आज बँक बंद... आज पाकिटं झाली नाहीत...** आय.ए.एस. करणारे, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, न्यायाधीश, पंतप्रधान, राष्ट्रपतींना शिकविणारे प्राध्यापक मात्र दोन वेळच्या भाकरीला महाग... भाडं तटलेलं... दुधाचं बिल थकलेलं... किराणा उधार बंद..." *(पृष्ठ १७१)*

**(iv)** माजी प्राचार्य डी.आर कोण्णूर यांनी लिहिलेल्या लेखामध्ये मांडलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत.:-

"१९६०-७० च्या दशकात प्राध्यापकांना कोणतीच शाश्वती नव्हती. वेठबिगार बरा, अशी अवस्था. थकलेला पगार मागावा, तर व्यवस्थापन नाराज; विद्यापीठात तक्रार करावी तर नोकरीवर गदा, अशा काळात प्रस्थापितांशी दोन हात करणे फार कठीण होते; पण संभाजीरावांनी व त्यांच्या राज्यस्तरावरील सहकाऱ्यांनी हे आव्हान पेलले. गेल्या पाच दशकांत प्राध्यापकांना त्यांचे योग्य व न्याय्य हक्क प्राप्त करून दिले. प्राध्यापकांना बँकेमार्फत पगार, सेवाशाश्वती, १०० टक्के वेतन अनुदान, महाविद्यालय व विद्यापीठ स्तरांवर न्यायाधिकरण, सेवानिवृत्ती योजना हे संघटनेच्या यशोगाथेतील मैलाचे टप्पे आहेत." *(पृष्ठ १९३)*

**(v)** 'सुटा'चे ज्येष्ठ नेते प्रा. कमलाकर दीक्षित यांच्या लेखात पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. :-

"त्या काळी सर्वांचाच आणि प्राध्यापकांचाही पगार तुटपुंजा होता. **अनुदान ३३ टक्के होते. त्यामुळे पगार वेळेवर कधीच होत नसत.** पूर्ण पगारही हाती पडत नसे. कोल्हापूरचे कॉलेज ऑफ कॉमर्स आणि कराडचे सायन्स कॉलेज या दोनच कॉलेजात पगार एक तारखेला होत असत." *(पृष्ठ ३७२)*

## एखाद्याच महाविद्यालयात नियमित वेतन

**९१.** उपरोक्त दोन महाविद्यालयांमध्ये वेतन नियमित होत होते असा उल्लेख प्रा. कमलाकर दीक्षित यांच्या लेखामध्ये आलेला आहे. त्यावरून आठवले म्हणून नमूद करावेसे वाटते. विदर्भामध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेज या एका महाविद्यालयामध्ये त्या काळात वेतन नियमितपणे होत असे. त्या वेळेला मी स्वतः काही सहकाऱ्यांसह त्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.दादासाहेब लांजेवार यांच्याशी याबाबत चर्चा केली व त्या एकाच महाविद्यालयात वेतन नियमितपणे कसे होते? हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. ते त्या वेळेला आम्हाला काही समजले नाही. कालांतराने सन २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या "कालचक्र" या दादासाहेब लांजेवार यांच्या आत्मचरित्रामध्ये याबाबतचा संक्षिप्त उल्लेख आहे तो पुढीलप्रमाणे:-

"वित्तीय स्थैर्यत्वाच्या दृष्टीने सत्राच्या आरंभी आणि शिष्यवृत्ती प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांच्या फीच्या रकमेतून तसेच शासकीय अनुदानातून दर महिन्याच्या पगाराला पुरेल एवढ्या रकमेची बँकेत स्थायी निक्षेपात गुंतवणूक करीत असू. ही प्रथा आम्ही शेवटपर्यंत चालू ठेवली. दर महिन्याच्या पहिल्या तारखेला (सुटीच्या दिवसाचा अपवाद सोडून) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पगार देण्याच्या नियमात खंड पडू दिला नाही. १९७६-७७ मध्ये अनेक महाविद्यालयांत पगार देणे बंद पडू लागले तरी आमचा हा नित्यक्रम कधीच चुकला नाही." *(पृष्ठ ९२-९३)*

आजही हा उल्लेख काळजीपूर्वक वाचला तर त्यावरून इतर महाविद्यालयात वेतन नियमितपणे का होत नव्हते? याचा बोध होत नाही. मला स्वतःला याबाबतीत असे ठामपणे नमूद करावेसे वाटते की, परीरक्षा अनुदान (Maintenance Grant) हे मूळ नाव असलेल्या ज्या अनुदान पद्धतीचे दुसरे नाव तूट अनुदान (Deficit Grant) असे होते, त्या अनुदान पद्धतीमध्येच फार मोठा दोष होता. महाविद्यालयांचे व्यवस्थापक दरवर्षी समाजातून महाविद्यालयाच्या संचालनार्थ मोठा निधी गोळा करून आणतील या गृहितकावर ती अनुदान व्यवस्था बांधलेली होती, हा तो दोष होय.

## अभ्यासेतर कामाशी असहकार आंदोलन सुरू झाले

**९२.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दिनांक ६ व ७ मार्च १९७७ रोजी मुंबईच्या फोर्ट विभागातील मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय परिषदेमध्ये पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला होता. :-

"अशा परिस्थितीत चर्चा आणि विचार विनिमयाच्या माध्यमातून उपरोक्त प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक न होऊ शकल्यास जुलै व ऑगस्ट १९७७ मध्ये विद्यापीठ पातळीवरील संघटना ठरवतील त्या तारखेपासून Extra Curicular Activities च्या संबंधात शिक्षकांच्याकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास शिक्षक नम्र नकार देतील व संबंध महाराष्ट्रभर शिक्षक दिनापासून **(५ सप्टेंबर १९७७)** शिकविण्याचे कामसुद्धा बंद करतील." नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २५ फेब्रुवारी १९७७ रोजीच्या सभेत पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला होता. :-

"आपल्या न्याय्य मागण्यांच्या पूर्तीसाठी १ ऑगस्ट १९७७ पासून कोणत्याही अभ्यासेतर कामाच्या संदर्भात महाविद्यालयामध्ये शिक्षकाकडे सोपविण्यात आलेली कामे करण्यास शिक्षक नम्र नकार देतील व ५ सप्टेंबर १९७७ पासून शिकविण्याच्या कामावरही संपूर्ण बहिष्कार टाकतील."

दिनांक २९ जुलै १९७७ रोजी नुटाच्या कार्यकारी मंडळाची एक सभा होऊन या सभेमध्ये प्रत्यक्ष आंदोलन सुरू करण्याचा एक तपशीलवार ठराव संमत करण्यात आला. या ठरावामध्ये "उपरोक्त परिस्थितीत दि. १ ऑगस्ट व ५ सप्टेंबर या तारखांपासून सुरू करावयाचे म्हणून ठरलेले आंदोलन प्रत्यक्षात सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाही असे या कार्यकारी मंडळाचे मत आहे." असे नमूद केले होते. हा संपूर्ण ठराव सोबत **सहपत्र : पंधरा** म्हणून दिलेला आहे व त्याप्रमाणे दिनांक १ ऑगस्ट १९७७ या दिवसापासून अभ्यासेतर कामांशी असहकार आंदोलन सुरू झाले.

## विद्यार्थ्यांमध्ये असंतोष

**९३.** दिनांक १ ऑगस्ट १९७७ या दिवसापासून अभ्यासेतर कामांवर बहिष्कार टाकण्याच्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. त्याचा फार मोठा फटका विद्यार्थ्यांच्या निवडणूक संचालनाला बसला. त्यावेळच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम महाविद्यालयात विद्यार्थी संघाच्या निवडणुका होत असत व सर्व महाविद्यालयांचे प्रतिनिधी मिळून विद्यापीठ विद्यार्थी संघाची रचना होत असे. विद्यार्थ्यांच्या निवडणूका हा विद्यार्थ्यांच्या अतिशय जिव्हाळ्याचा असा विषय असतो. या कामावर शिक्षकांनी टाकलेल्या बहिष्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी होती व त्यामुळे निर्माण झालेला असंतोष व राग विद्यार्थी विद्यापीठांवर व शासनावर काढत होते. विद्यार्थ्यांचा हा असंतोष किती तीव्र होता? हे लक्षात घेण्यासाठी नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. मो.म.लांजेवार यांनी त्यांच्या 'कालचक्र' या आत्मचरित्रामध्ये नमूद केलेली हकीकत याठिकाणी उधृत करणे मला आवश्यक वाटते. ती पुढीलप्रमाणे :-

विद्यार्थी संघाच्या निवडणुका त्यावेळच्या "विद्यापीठ कायद्यानुसार ऑगस्ट महिन्याच्या, कुलगुरूंनी निर्धारित केलेल्या तारखेला घेणे बंधनकारक होते. प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे प्राचार्यांनी त्याबाबत आपली असमर्थता व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे म्हणणे असे की, निवडणुका लक्षात घेता त्यांनी प्रचारकार्याला सुरुवात केली होती आणि त्यासाठी बराच खर्चही केला होता. ह्या निवडणुका घेण्यासाठी कुलगुरूंनी निवडणुकीची तारीख घोषित करावी. यासाठी निरनिराळ्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे मोर्चे वाज्यागाज्यांसह (म्हणजे विद्यापीठाच्या इमारतीच्या खिडक्यांची तावदाने फोडत) येऊ लागले. पहिला मोर्चा हिस्लॉप कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा." *(पृष्ठ १२२)*

## विद्यार्थ्यांच्या सभांचे आयोजन

**९४.** आपल्या शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत, यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातसुद्धा तीव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली होती. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांच्या सभांचे आयोजन करून आपण आपली भूमिका त्यांना समजावून सांगावी अशा प्रकारचे एक परिपत्रक संघटनेचे सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी शिक्षक संघटनेच्या सर्वस्तरीय पदाधिकाऱ्यांकडे पाठविले होते. ते लहानसे परिपत्रक शब्दश पुढीलप्रमाणे:-

"**विद्यार्थ्यांच्या सभांचे आयोजन** :- शिक्षकांनी उशिरा पगार होण्याच्या प्रश्नावर अनेक दिवस पर्यंत मुका मार सहन केलेला आहे. आपल्या अडचणी विद्यार्थ्यांना सांगण्याचा आतापर्यंत त्यांना संकोच वाटत आलेला आहे. पण अनेक हितसंबंधी लोक विद्यार्थ्यांना चुकीच्या व खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांची दिशाभूल करीत आहेत. त्यामुळे सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या ठिकठिकाणी सभा घेऊन त्यांना आपले प्रश्न समजावून सांगणे आवश्यक आहे. नुटाच्या कार्यकारी मंडळातर्फे सर्व शिक्षकांना अशा प्रकारच्या सभांचे आयोजन करण्याविषयी विनंती करण्यात येत आहे. - **अरविंद बारहाते, सचिव, नुटा**" (*P76NB77*)

## अमरावती येथे विद्यार्थ्यांची सभा

**९५.** विद्यार्थ्यांच्या सभा आयोजित करण्याचा व त्यांना शिक्षकांची बाजू समजावून सांगण्याचा संघटनेच्या पातळीवर निर्णय झाल्यानंतर दिनांक २३ ऑगस्ट १९७७ रोजी विद्यार्थी व प्राध्यापकांची एक सभा अमरावती येथे श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेली होती. या सभेला विद्यार्थ्यांची फार मोठी गर्दी झालेली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री.शिरीष मोहोड हे होते व सभेत

नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व नुटाचे ज्येष्ठ नेते प्रा.बाळासाहेब कुळकर्णी यांची भाषणे झालीत. या सभेचा वृत्तांत निरनिराळ्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाला होता व त्याबाबतचे वृत्तपत्रीय प्रसारण नुटा बुलेटीनमध्ये सुद्धा प्रकाशित करण्यात आले होते. शब्दशः पुढीलप्रमाणेः-

**"विद्यार्थी संघटनांचा नुटाच्या कार्यक्रमाला पाठींबा**

अमरावती येथील विविध विद्यार्थी संघटनांनी विनंती केल्यावरून 'नुटा' तर्फे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या संयुक्त सभेचे आयोजन मंगळवार, दि. २३ ऑगस्ट ७७ रोजी श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात करण्यात आले होते. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री.शिरीष मोहोड सभेचे अध्यक्ष होते. या सभेत 'नुटा'चे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व प्रा. वि.स.कुळकर्णी यांनी प्राध्यापकांच्या प्रश्नांची व आंदोलनाची भूमिका विषद केली. २० विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी आंदोलनाला आपला पाठींबा व्यक्त केला. जवळपास ५०० चे वर विद्यार्थी उपस्थित होते. या सभेत खालील ठराव एकमताने मंजूर झाले.

(१) विद्यार्थी प्रतिनिधींच्या सभेमध्ये नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने चालविलेल्या लढ्याला संपूर्ण पाठींबा देण्याचा ठराव करण्यात येत आहे.

(२) शिक्षकांच्या प्रतिनिधींशी त्यांच्या मागण्यांबाबत झालेल्या कराराची तावडतोब अंमलबजावणी करावी. अन्यथा होणाऱ्या गंभीर दुष्परिणामाची जबाबदारी फक्त शासनावर राहील.

(३) दरम्यानच्या काळात कोठल्याही महाविद्यालयामध्ये किंवा विद्यापीठ पातळीवर निवडणूक घेण्याचा प्रयत्न अधिकारी वर्गाने केल्यास त्याचा विद्यार्थी व शिक्षक मिळून जबरदस्त प्रतिकार करतील.

(४) शिक्षकांचे पगार नियमित होतील अशी शासन नियंत्रित पगार वाटपाची व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सर्वशक्तिनिशी लढा देणे हे आम्ही विद्यार्थी आमचे पवित्र कर्तव्य समजतो." *(P76NB77)*

**नागपूर येथे कृती समितीची स्थापना**

**९६.** नागपूर येथे विद्यापीठ इमारतीच्या मागच्या बाजूला नागपूरातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची एक सभा दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक २४ ऑगस्ट १९७७ रोजी पार पडली. या सभेला दिडशेच्या वर प्राध्यापक उपस्थित होते. या सभेमध्ये नागपूरात आंदोलन चालविण्यासाठी दहा ज्येष्ठ शिक्षकांची एक कृती समिती स्थापन करण्यात आली. याबाबतचा वृत्तांत त्यावेळेला वृत्तपत्रांमध्ये व नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित झाला होता. तो वृत्तांत शब्दशः पुढीलप्रमाणेः-

**"Action Committee for Nagpur City**

Meeting of the University and College teachers of Nagpur was held on 24th August 1977 at 6.30 pm behind University Building at Nagpur. More than 150 teachers were present. Prof.B.T.Deshmukh President NUTA presided over the meeting. An Action Committee consisting of the following members was formed to carry out the agitation at Nagpur City as per the directive of NUTA.

(1) Dr.R.B.Phansalkar (Chairman), M.M.College, Nagpur

(2) Shri Arvind Barhate, Secretary, (Secretary NUTA)

(3) Shri A.S.Satputaley, Dept of Geology

(4) Dr.M.G.Bokare, G.S. College, Nagpur

(5) Shri N.S. Vaidya, Hislop College

(6) Dr.Shanaware, Dharampeth M.V.

(7) Dr.V.S.Shenwai, S.B.City College

(8) Shri Y.W.Wadaskar, D.National College

(9) Shri P.P.Sohani, C.P. & Berar College

(10) Shri Wankar, P.W.S. College" *(P76NB77)*

**नागपूरमध्ये विद्यार्थ्यांच्या सभांचा धडाका**

**९७.** नागपूर येथे कृती समिती स्थापन झाल्यानंतर नागपूरातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थ्यांच्या सभा आयोजित करण्याचा धडाका त्या समितीने लावला. कृती समितीचे अध्यक्ष डॉ.आर.बी.फणसाळकर हे नुटाचे उपाध्यक्ष होते. कृती समितीचे सचिव प्रा.अरविंद बारहाते हे नुटाचे सचिव होते. नुटाचे कोषाध्यक्ष प्रा.अरुण सातपुतळे (जे पुढे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झाले.) हे कृती समितीचे सदस्य होते. कृती समितीचे चौथे सदस्य डॉ.एम.जी.बोकरे (जे पुढे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झाले.) हे नुटाचे संस्थापक सदस्य होते. दिनांक १७ मार्च १९६३ रोजी नुटाची स्थापना झाली त्यावेळेला पाच सदस्यांचे जे अंतरिम कार्यकारी मंडळ नेमण्यात आले त्यात ते एक सदस्य होते. विदर्भातील कृषी प्रश्नांचा अतिशय दांडगा अभ्यास असलेले डॉ.बोकरे हे कापूस उत्पादक संघाचे एक ज्येष्ठ नेते होते. कृती समितीचे आणखी एक सदस्य श्री.यादवराव वडसकर हे नुटाचे माजी अध्यक्ष होते. प्रा.वानकर, प्रा.पी.पी.सोहनी, प्रा.व्ही.एस.शेणवाई, डॉ.शनवारे, प्रा.एन.एस.वैद्य हे संघटनेमध्ये काम करणारे ज्येष्ठ नेते होते. अशा या कृती समितीने नागपूरात विद्यार्थ्यांच्या सभांचा जोरदार धडाका लावला. शासन वारंवार एखादी गोष्ट कबूल करते पण त्याप्रमाणे कृती मात्र करीत नाही. ही गोष्ट विद्यार्थ्यांच्या कानापर्यंत गेल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये स्वाभाविकपणे क्षोभ निर्माण झाला. विद्यार्थ्यांच्या सभा घेण्याचा हा सपाटा विदर्भभर निरनिराळ्या शहरांमध्ये तिथल्या तिथल्या 'नुटा' नेत्यांनी जोरदारपणे

*(सहपत्र पंधरा : परिच्छेद ९२ पहा)*

## शासनाने शिक्षकांना आंदोलनाशिवाय पर्याय ठेवलेला नाही

*नुटाच्या कार्यकारिणीने दि. २९ जुलै १९७७ च्या सभेत पारित केलेला ठराव*

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाने दि. २५.२.७७ च्या सभेत आपल्या न्याय्य मागण्यांच्या पूर्तीसाठी १ ऑगस्ट १९७७ पासून कोणत्याही अभ्यासेतर कामाच्या संदर्भात महाविद्यालयामध्ये शिक्षकाकडे सोपविण्यात आलेली कामे करण्यास शिक्षक नम्र नकार देतील व ५ सप्टेंबर १९७७ पासून शिकविण्याच्या कामावरही संपूर्ण बहिष्कार टाकतील असा ठराव केला होता.

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत शिक्षकांच्या प्रतिनिधींशी लेखी स्वरूपात या मागण्यांच्या संदर्भात काही आश्वासने दिली होती व ३० जून १९७७ पर्यंत त्या आश्वासनांची पूर्ती केली जाईल अशा प्रकारचे लेखी अभिवचन महाराष्ट्र शासनाने दिले होते. त्यामुळे दि. २३ एप्रिल १९७७ रोजी महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी विद्यापीठ परीक्षांवरील आपला बहिष्कार परत घेतला होता. पण ३० जुलै १९७७ पर्यंत म्हणजे पूर्ण एक महिना अधिक लोटला असतांना सुद्धा कोणत्याही प्रश्नावर समाधानकारक निर्णय बाहेर पडू शकला नाही. केवळ वाटाघाटी समाधानकारक असणे व त्या आधारावर अक्षम्य विलंब लावणे यामुळे शिक्षकांची मने प्रक्षुब्ध झालेली असून चर्चा आणि वाटाघाटीने आपला प्रश्न शासन सोडविण्यास तयार नाही अशी भावना रास्तपणे त्यांच्या मनात येत आहे.

सेवामुक्त शिक्षकांसाठी न्यायाधिकरणाची व्यवस्था करणाऱ्या विधेयकात न्यायाधीशाच्या जोडीला अनेक हितसंबंधी अपात्र व्यक्तींना बसविण्याची तरतूद अत्यंत संतापजनक आहे. यात शिक्षकांना न्याय मिळण्याऐवजी त्यांच्यावरील अन्यायावर शिक्कामोर्तब करण्याची सोय झाल्याचे शासनाच्या लक्षात येऊ नये हे अत्यंत आश्चर्याचे आहे. उपरोक्त परिस्थितीत दि. १ ऑगस्ट व ५ सप्टेंबर या तारखांपासून सुरू करावयाचे म्हणून ठरलेले आंदोलन प्रत्यक्षात सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाही असे या कार्यकारी मंडळाचे मत आहे. दिलेले आश्वासन महाराष्ट्र शासनाने पूर्ण करावे म्हणून महाविद्यालयीन शिक्षकांना याशिवाय अन्य कोणताही पर्याय उरला नाही हे सखेद नमूद करावेसे वाटते.

**बहिष्कारावाबत सूचना :-** (१) प्रत्येक महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी आपापल्या प्राचार्यांकडे एक लेखी अर्ज देऊन १ ऑगस्ट व ५ सप्टेंबर पासूनच्या बहिष्काराविषयीची सूचना द्यावी. (२) अर्ज एकच असावा व त्यावर त्या महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांनी सह्या कराव्यात. प्रत्येकाने वेगवेगळा अर्ज करू नये. (३) या अर्जाची एक प्रत अध्यक्ष, प्रा.बी.टी.देशमुख, विदर्भ महाविद्यालयाजवळ, ४४४६०४ या पत्त्यावर व एक प्रत सचिव, अरविंद बारहाते २५८, धरमपेठ नागपूर ४४००१० या पत्त्यावर पाठवावी. (४) आपापल्या महाविद्यालयातील किंवा शहरातील सर्व प्राध्यापकांची सभा घेऊन त्यांना बहिष्कार आंदोलनाबाबत कल्पना द्यावी.

(P 55 NB 1977)

सुरू ठेवलेला होता.

## नुटा बुलेटीन : पहिला मुद्रित अंक प्रकाशित झाला

**९८.** आंदोलनामध्ये अंतर्भूत असलेले मुद्दे व संघटनेची बाजू समाजासमोर व मुख्यत्वे शिक्षकांपुढे मांडण्यासाठी 'नुटा बुलेटीन'चा पहिला मुद्रित अंक दिनांक १५ ऑगस्ट १९७७ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यापूर्वी संघटना म्हणून आमच्याजवळ नुटा बुलेटीनसारखी काय व्यवस्था होती? याबाबतची माहिती नमूद करणे आवश्यक वाटते. संघटनेच्या वतीने सर्व शिक्षकांशी संपर्क साधण्यासाठीच्या माध्यमाच्या अभावी येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी लहान लहान पुस्तिका काढण्याची व्यवस्था १९७३ च्या दरम्यान सुरू करण्यात आली. *"कॉलेज कोड नव्याने येवू घातलेले", "प्राध्यापक रस्त्यावर कां आले?", "नवे विद्यापीठ विधेयक : एक कैफियत", "नवीन वेतनश्रेणीबाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन"* ह्या त्या काळात संघटनेच्या वतीने काढण्यात आलेल्या पुस्तिका नियतकालिकाच्या अभावी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनियतकालीकांच्या स्वरुपात होत्या हे मान्य करावेच लागेल.

तहान लागल्यावर विहीर खणण्याच्या या अनियतकालिक प्रकारातून नियतकालिकाचा विचार पुढे आला. अगदीच नियमितपणे ठरलेल्या वेळीच हे नियतकालिक प्रकाशित होऊ शकणार नाही याची कल्पना असल्यामुळे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालखंडात एकामागून एकचे पृष्ठ क्रमांक व वर्षाच्या शेवटी अनुक्रमणिका देण्याचा निर्णय झाला. बिनचुक व समप्रकारची संकलन सुलभता हा लाभ त्यातून मिळेल असे त्यावेळी वाटले. सनदी लेखापालांनी अंकेक्षीत केलेल्या ३१ मार्च १९७४ रोजी संपलेल्या संघटनेच्या 'उत्पन्न व खर्च लेख्या' मध्ये खर्चाच्या बाजूला रुपये २३३९.२७ एवढी रक्कम असून त्यातसुद्धा उत्पन्नाच्या बाजूला ८०२.०० रुपये ही 'उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झालेली रक्कम' म्हणून दाखविलेली आहे. वर्षाकाठी एकूण २५०० रुपये सुद्धा खर्च करण्याची शक्ती नसल्याने मुद्रण ही गोष्ट आवाक्याबाहेर वाटत होती व तशी ती होतीही. आवाका येईपर्यंत वाट पहात बसण्यापेक्षा आवाक्यात येईल त्या पद्धतीने काम सुरू करावे असे ठरले व त्यामुळे १९७६ मध्ये एकामागुन एक चक्रमुद्रीत पृष्ठे प्रसृत व्हायला लागली. छापून काढणे महाग पडणार म्हणून चक्रमुद्रित प्रसारण सुरू झाले. १९७६ मध्ये अशी १ ते ८३ पृष्ठे प्रसारित करण्यात आली. १९७७ या वर्षातील सुरुवातीची १ ते ६३ पृष्ठे ही चक्रमुद्रित स्वरुपातच प्रसृत करण्यात आली.

निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या सभांमध्ये वेतनव्यवस्थेबाबतच्या शिक्षकांच्या भावना एवढ्या तीव्र होत्या की, "जो काय लागेल तो संघर्ष निधी आम्ही संघटनेकडे जमा करतो. आता हे चक्रमुद्रण बंद करा व मुद्रित स्वरुपातच बुलेटीन प्रकाशित झाले पाहिजे." अशा भावना शिक्षक व्यक्त करीत होते.

## प्राध्यापकांना आंदोलनाचा मार्ग कां स्वीकारावा लागला?"

**९९.** दिनांक १५ ऑगस्ट १९७७ रोजी प्रसिद्ध झालेल्या नुटा बुलेटीनच्या पहिल्या मुद्रित अंकात संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी शब्दबद्ध केलेले **"प्राध्यापकांना आंदोलनाचा मार्ग कां स्वीकारावा लागला?"** या मथळ्याचे तपशीलवार निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. या निवेदनामध्ये अनियमित वेतन व्यवस्थेबाबत असे नमूद करण्यात आले होते की,

"**अनियमित वेतन व्यवस्था** : दहादहा महिन्याचे पगार थकून पडण्याच्या क्रूर कटकटीने कातावून गेलेल्या प्राध्यापकांनी विद्यालयातून ज्या व्यवस्थेने पगार होतात त्याच व्यवस्थेने आपले पगार व्हावेत व त्याकरीता अनुदान सूत्रामध्ये आवश्यक तो बदल केला जावा अशी अनेक दिवसापासून मागणी केली होती. २३ एप्रिल १९७७ रोजी नोंदविलेल्या मतैक्याच्या दुसऱ्या परिच्छेदात "प्राध्यापकांना त्यांचा पगार वेळच्या वेळी कपात न होता मिळावा यासाठीच्या योजनेला (Scheme to ensure prompt and full payment) ३० जून १९७७ च्या आत अंतिम स्वरूप दिले जाईल" असे नोंदलेले आहे. २३ एप्रिलला हे ठरले. ५ मे रोजी एक शासननिर्णय काढून शासनाने अशा योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी व्यवस्थापक, प्राध्यापक व शासनाचे प्रतिनिधी यांची एक समिती नेमली. तेव्हा शासन कळकळीने आपल्या प्रश्नाकडे लक्ष देत आहे असे स्वाभाविकपणेच प्राध्यापकांना वाटले पण प्रत्यक्ष या समितीकडे जे काम सोपविण्यात आले, त्याबाबतच्या शासननिर्णयामध्ये म्हटले आहे की, "नियमित पगाराच्या व्यवस्थेचा (Scheme) मसुदा तयार करून समितीने शासनाकडे त्याची शिफारस करावयाची आहे (२) याबाबतचा अंतिम निर्णय शासन घेणार आहे. (३) विद्यमान अनुदान सूत्र जसे आहे तसेच ठेवून ही व्यवस्था सुचवावयाची आहे."

## शिक्षकांची मने क्षुब्ध झाल्यास त्यांना दोष देता येणार नाही

**१००.** नुटाच्या अध्यक्षांनी व सचिवांनी प्रसारित केलेल्या याच निवेदनामध्ये पुढे असेही नमूद करण्यात आले होते की,

"समितीने ५ जूनच्या आत आपला अहवाल सादर करावा असेही शासननिर्णयात म्हटले होते. या समितीचा अहवाल १० दिवस उशीरा सादर झाला. त्यामुळे शासनाकडून झालाच तर ८-१० दिवस उशीर होईल असे शिक्षकांना वाटत होते. पण अहवाल सादर झाल्यानंतरच्या ८-१० दिवसांत मा. मुख्यमंत्र्यांनी अनुदान सूत्र बदलविण्याचा शासनाचा विचार असल्याचे जाहीर भाषणातून सांगितले व त्यामुळे स्वाभाविकपणे अनुदान सूत्रामध्ये आवश्यक तो बदल करुन (तात्पुरती मदत (Adhoc Assistance) करुन नव्हे) विद्यालयासारखी पगार वितरणाची व्यवस्था शासन करीत आहे असे शिक्षकांना वाटले; पण ३० जून गेली, ३० जुलै सुद्धा गेली तरी अशी कोणतीही योजना बाहेर येत नसल्यामुळे **शिक्षकांची मने क्षुब्ध झाल्यास त्यांना दोष देता येणार नाही.** आजही ८ ते १० महिन्यांचा पगार न झालेली कितीतरी महाविद्यालये दिसून येतील. तेव्हा मा. मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे (व शिक्षकांशी मतैक्य नोंदवून) जे आश्वासन दिले आहे त्यानुसार अनुदान सूत्रामध्ये ताबडतोब बदल करावा व नियमित पगार वाटपांची शासन नियंत्रित व्यवस्था लागू करावी अशी शिक्षकांची मागणी आहे."

## पदाधिकाऱ्यांचे दौरे, सभा व बैठका

**१०१.** संघटनेचे सचिव प्रा.अरविंद बारहाते, उपाध्यक्ष प्रा.शरद कळणावत, प्रा.फणसाळकर, कोषाध्यक्ष प्रा.अरूण सातपुतळे, सहसचिव प्रा.एकनाथ कठाळे, नुटा बुलेटीनचे संपादक प्रा.ब्रिजमोहन हेडा या सर्वांनीच जिल्हास्तरावर व विविध महाविद्यालयांच्या ठिकाणी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सभा घेऊन त्यांच्यासमोर संघटनेची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडण्याचा धडाका लावला होता. दिनांक १ ऑगस्ट १९७७ पासून शिकविण्याच्या कामाव्यतिरिक्त इतर बहिःशाल कामकाजाशी पूर्णपणे असहकार आंदोलन प्रत्यक्षात सुरू झालेले होते. याचा एक परिणाम म्हणजे, विद्यार्थ्यांच्या निवडणूकांचे संचालन पुढे ढकलण्यात आले होते व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. विद्यार्थ्यांचा हा असंतोष शासनाच्या विरोधात होता. सन १९७७ च्या ऑगस्ट महिन्यातील पहिल्या आठवड्यांमध्ये हा सभांचा जोरदार धडाका सुरू झाल्यामुळे ५ सप्टेंबर १९७७ पासून सुरू करावयाच्या बेमुदत कामबंद आंदोलनाची जोरात तयारी सुरू झालेली होती.

## असे आंदोलन प्रथमच होत होते

**१०२.** संघटनेचा अध्यक्ष या नात्याने मी स्वतः या कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणात सभांचे आयोजन केले व दौरे करून संघटनेची बाजू शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर मांडली. सन १९७४ पासून तर २०११ पर्यंत नुटाचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. या प्रदीर्घ कालखंडामध्ये संघटनेच्या कामासाठी ऑगस्ट १९७७ मध्ये मी जेवढ्या बैठका घेतल्या व दौरे केले तेवढे नंतरच्या कालखंडामध्ये करावे लागले नाहीत. यावेळी एवढी मेहनत घेण्याची दोन प्रमुख कारणे सांगता येतील. (१) केवळ मी अध्यक्ष झाल्यापासूनच नव्हे तर नुटाची स्थापना झाल्यापासून बेमुदत कामबंद आंदोलन हे पहिल्यांदा घोषित करण्यात आले होते व केले जाणार होते. (२) दहा-अकरा महिने पगार विलंबाने होण्याच्या प्रश्नाने शिक्षकांमध्ये खरोखर आणि मनापासून तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करण्यासारखा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न या आंदोलनामध्ये गुंतलेला होता. त्यामुळे संघटनेचे सर्वच पदाधिकारी अतिशय मेहनतीने आंदोलनाची तयारी करीत होते.

## नागपूर येथे आंदोलनाची उत्तम तयारी

**१०३.** दिनांक २३ ऑगस्ट १९७७ रोजी अमरावती येथे केशरबाई लाहोटी महाविद्यालयात विद्यार्थी व प्राध्यापकांची सभा घेऊन दिनांक २४ ऑगस्ट १९७७ रोजी मी नागपूर येथील प्राध्यापकांच्या सभेला उपस्थित राहिलो. त्या प्राध्यापकांच्या सभेमध्ये आंदोलन यशस्वीरितीने चालविण्यासाठी कृती समितीची स्थापना करण्यात आली. याबाबतचा उल्लेख वर आलेलाच आहे. आंदोलन यशस्वी करण्याच्या दृष्टीने नागपूर शहरामध्ये अतिशय उत्साहाचे व जोशपूर्ण वातावरण होते. वेतन विलंबाने होण्याचा हा प्रश्न आता एकदा पूर्ण निकाली लावूनच टाका अशा प्रकारच्या भावना शिक्षक व्यक्त करीत होते. नागपूरात असलेल्या या वातावरणाचा इतर जिल्ह्यांवरही परिणाम होत होता. दिनांक २४ ऑगस्ट १९७७ रोजी नागपूरच्या या मुक्कामातच दिनांक २८ ऑगस्ट १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्यात आलेली आहे अशी बातमी मला नागपूर येथेच कळली.

## २८ ऑगस्ट १९७७ ची महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक

**१०४.** दिनांक २८ ऑगस्ट १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक मुंबई येथे सुरू झाली. दिनांक ५ सप्टेंबर १९७७ पासून सुरू करावयाचे बेमुदत कामबंद आंदोलन हे आता यशस्वी होऊ शकणार नाही व त्यामुळे ते मागे घेण्यात यावे अशाप्रकारच्या चर्चेला सुरुवात झाली. बहुसंख्य प्रतिनिधींनी हे मत उचलून धरले. हे मत मांडणाऱ्यांचे म्हणणे असे होते की,

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रामध्ये लागू करण्याच्या बाबतीत असलेल्या सर्व अडचणी मतैक्यपत्रातून आता दूर झालेल्या आहेत.

(२) नव्या वेतनश्रेण्या लागू करणारा शासननिर्णय प्रत्यक्षात निघालेला नसला तरी शासनाने न्यायालयात समझोतापत्र (Pursis) दाखल करून असा सुधारित शासननिर्णय निर्गमित करण्याचे मान्य केलेले आहे.

(३) इतकेच नव्हे तर नव्या वेतनश्रेण्या लागू करण्याच्या पोटी प्रत्येक शिक्षकाला ७५० रुपये इतकी रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्याचे सुद्धा शासनाने मान्य केलेले आहे.

(४) अशा परिस्थितीत ५ सप्टेंबर १९७७ पासून आपण आंदोलन सुरू केले तर ते यशस्वी होणे शक्य नाही व आंदोलन सुरू केल्यामुळे २-४ दिवसातच नव्या वेतनश्रेण्या लागू करणारा शासननिर्णय निर्गमित झाला तर ते आंदोलन पूर्णपणे कोसळून पडेल व त्यामुळे आंदोलन अयशस्वी होण्याचा असा हा धोका पत्करण्यापेक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या पदरात पडत आहेत व वेतन वितरण व्यवस्थेबाबत शासनाने निश्चित आश्वासन दिलेले आहे, हे लक्षात घेऊन आंदोलन मागे घेण्यात यावे.

### आंदोलन मागे न घेण्याची बाजू

**१०५.** आंदोलन मागे घेण्याच्या या ठरावाला सर्वात जास्त विरोध नुटाच्या प्रतिनिधींनी या बैठकीमध्ये केला. त्यांच्या तर्फे जी बाजू मांडण्यात आली ती अशी की, (१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू होण्याचा शासननिर्णय निर्गमित होईल हे गृहित धरले तरी ८-१० महिने विलंबाने वेतन वितरित होण्याच्या या व्यवस्थेमुळे त्याचा कोणताही लाभ शिक्षकांना होणार नाही. (२) निरनिराळ्या जिल्ह्यांच्या ठिकाणी, तालुक्यांच्या ठिकाणी व महाविद्यालयांच्या ठिकाणी सभा घेऊन वेतन वितरण व्यवस्था स्थापीत झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही अशाप्रकारचे आश्वासन आपण शिक्षकांना दिले आहे आणि आता अचानक आंदोलन मागे घेतल्यास शिक्षकांचा आपण अवसानघात केलेला आहे अशी भावना निर्माण होईल. (३) आज आंदोलन मागे घेतल्यानंतर वेतन वितरणाची व्यवस्था पदरी पाडून घेण्यासाठीचे जबरदस्त आंदोलन पुन्हा उभे करता येणार नाही, त्यामुळे आंदोलन मागे न घेता ते ठामपणे सुरू ठेवण्यात यावे.

### आंदोलनाचा निर्णय मागे घेण्यात यावा

**१०६.** दिनांक ५ सप्टेंबर १९७७ पासून सुरू होऊ घातलेले आंदोलन मागे घेण्यात यावे असे म्हणणारा पक्ष व ते चालू ठेवावे असे ठामपणे म्हणणारा पक्ष यांच्यामध्ये टोकाची खडाजंगी या बैठकीमध्ये झाली. कार्यकारी मंडळाचे बहुसंख्य सदस्य हे आंदोलन मागे घेण्यात यावे या बाजूने होते हे स्पष्टपणे दिसत होते. त्याचे महत्त्वाचे कारण असे की, वेतन विलंबाने होण्याचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या सर्वच भागात भेडसावणारा प्रश्न असला तरी नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये त्याची तीव्रता अधिक होती. त्या खालोखाल ती मराठवाड्यामध्ये सुद्धा होती व इतर भागात हा प्रश्न भेडसावत असला तरी त्याची तीव्रता एवढी जाणवत नव्हती असे नमूद करता येईल. शिवाय आंदोलन सुरू झाल्यावर २-४ दिवसातच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन वेतनश्रेण्या लागू करणारा शासननिर्णय निर्गमित झाला तर आंदोलनावर त्याचा विपरित परिणाम होईल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन वेतनश्रेण्या लागू होण्याची निश्चितता महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना ठाऊक असल्यामुळे काही भागात तर आंदोलन धडपणे सुरू सुद्धा होणार नाही असेही मत काही प्रतिनिधींनी व्यक्त केले.

### नुटा प्रतिनिधीचे प्रतिपादन

**१०७.** नुटाच्या प्रतिनिधींची परिस्थिती ही फार वेगळी होती. गावोगाव सभा घेऊन या आंदोलनाची तयारी करण्यामध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी बरेच श्रम घेतलेले होते. नुटाच्या अभियाचित आमसभेमध्ये आम्ही सर्व पदाधिकाऱ्यांनी असे सांगितले होते की, महाराष्ट्राच्या एकाच भागामध्ये आंदोलन सुरू करणे हे योग्य नाही. हा संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांचा प्रश्न असल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पातळीवरच आंदोलनाचा निर्णय घेतला जाईल. त्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पातळीवर ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आणि ७-८ दिवसांनी सुरू करावयाचे आंदोलन जर आज आता मागे घेतले तर शिक्षकांच्या मनोधैर्यावर त्याचा विपरित परिणाम होईल. विलंबाने वेतन वितरित होण्याच्या प्रकाराने ग्रस्त झालेल्या शिक्षकांचा आपण अवसानघात करतो आहे अशा प्रकारची भावना तीव्रपणे सभेत व्यक्त केल्या गेली. ही तीव्रता इतकी होती की, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ आंदोलन मागे घेण्याचा ठराव करणार असेल तर आम्ही वेगळी संघटना काढून त्या संघटनेमार्फत आंदोलन चालविले जाईल. अशीही टोकाची भाषा सभेत वापरल्या गेली.

### सभा तहकूब झाल्यावर मार्ग निघाला

**१०८.** उभय पक्षामधील तणाव लक्षात घेता ही सभा काही वेळासाठी तहकूब करावी अशी मी स्वतः अध्यक्षांना विनंती केली व त्याप्रमाणे सभा तहकूब करण्यात आली. सभा तहकूब झाल्यानंतर महासंघाचे ज्येष्ठ नेते अध्यक्ष डॉ.एल.बी.केणी, सचिव प्रा.किशोर ठेकेदत्त, कोषाध्यक्ष प्रा.व्ही.बी.कामथ, प्रा.संभाजीराव जाधव, प्रा.बी.टी.देशमुख व अरविंद बारहाते अशी आमच्यामध्ये चर्चा झाली. या चर्चेमध्ये या परिस्थितीतून काही तरी मार्ग काढला पाहिजे अशी भावना दिसून आली. मुख्यत्वे आंदोलन मागे घेण्यात येत आहे असा ठराव करण्यात आला तर नुटाच्या क्षेत्रामध्ये महासंघाच्या विरोधात तीव्र क्षोभ व्यक्त होईल. "आम्ही उत्तम तयारी केली आहे. आम्हाला निदान नुटाच्या क्षेत्रात तरी संघर्ष करू द्या" हे आमचे म्हणणे शीर्षस्थ नेत्यांच्या लक्षात आणून देण्यात आम्हाला यश मिळाले. निदान नुटाच्या क्षेत्रात तरी संघर्ष करण्यास कोणतीही अडचण येणार नाही अशी ठरावाची मांडणी असावी असे ठरले. घटक संघटनांना १५-२० दिवसानंतर केंव्हातरी या आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी मुभा असावी अशी शब्दरचना ठेवण्याची चर्चा झाली व त्याप्रमाणे ठरावाचा मसुदा तयार करण्यात आला व हा ठराव एकमताने सभेत संमत करण्यात आला.

### शेवटी एकमताचा ठराव

**१०९.** संमत करण्यात आलेला हा ठराव काळजीपूर्वक पाहिला तर असे लक्षात येईल की, (१) शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्ती न केल्यामुळे ६ व ७ मार्च १९७७ रोजीच्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या परिषदेमध्ये संमत केलेल्या ठरावाप्रमाणे ५ सप्टेंबर १९७७ पासूनचे आंदोलन सुरू करण्याशिवाय कोणताही पर्याय शिक्षकांसमोर उरलेला नाही असे या ठरावात नमूद करण्यात आलेले होते. (२) विद्यमान परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत कामबंद आंदोलन टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे आपल्या सर्व घटक संघटनांना या ठरावाने आदेश दिले होते. (३) ५ सप्टेंबर १९७७ पासून तर १९ सप्टेंबर १९७७ या कालखंडामध्ये आपआपल्या क्षेत्रात आंदोलन केव्हा सुरू करावयाचे याची तारीख ठरविण्याचा अधिकार त्या त्या घटक संघटनांना या ठरावान्वये देण्यात आला होता. (४)

*(सहपत्र सोळा : परिच्छेद १०९ पहा)*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**

## RESOLUTION

Adopted in the meeting of the Executive Committee of MFUCTO held on 28.08.1977 at Bombay

"The MFUCTO having reviewed the consensus reached between Maharashtra Federation and the Govt. of Maharashtra on 23rd April, 77 wherein it was clearly stated that the issues raised in paras 1 to 5 should be finalised on or before 30th June 1977, and having noted that none of these have been implemented, the executive committee of MFUCTO after due deliberations has come to the conclusion that it has no alternative other than implementing the operative part of resolution no. 1 passed at the conference held on 6th and 7th March, 1977. Taking into consideration the present situation, accordingly the MFUCTO directs all its constituent units to go on a **total boycott of all work in a phased manner commencing on 5th Sept. Each unit has to determine its precise date between the 5th Sept. and 19th Sept.** to start the boycott in its own area. The MFUCTO directs to all its units to observe 5th Sept. as BLACK DAY." (*P77NB1977*)

नुटाच्या कार्यकारी मंडळाने ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्याचा निर्णय पूर्वीच घेतलेला असल्यामुळे तेथे आंदोलन ठरल्याप्रमाणे त्याच दिवशी सुरू होणार होते. (५) ५ सप्टेंबर १९७७ रोजी एक दिवस सर्वत्र काळा दिवस पालन करण्याचा निर्णयसुद्धा त्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. उपरोक्त ठराव एकमताने संमत करण्यात आला. अतिशय कठिण अशा पेचप्रसंगातून संघटनेचा प्रवास पुढे नेणारा हा ठराव शब्दशः सोबत **सहपत्र : सोळा** म्हणून प्रसृत केलेला आहे.

### नुटा बुलेटीनचे संपादकीय

**११०.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने २८ ऑगस्ट रोजी केलेल्या ठरावामुळे **५ सप्टेंबर १९७७ रोजी सुरू होणारे आंदोलन मागे घेण्याची नामुष्की दूर झालेली होती. त्याचबरोबर हे आंदोलन फक्त नागपूर विद्यापीठाच्याच क्षेत्रात होणार हेही स्पष्ट झाले होते.** मुंबई वरून परत आल्याबरोबर पुढच्या एक आठवड्याभराचे दौरे व बैठकांचा भरगच्च कार्यक्रम नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी ठरविला होता. दिनांक १ सप्टेंबर १९७७ रोजी नुटा बुलेटीनचा दुसरा मुद्रित अंक प्रकाशित करण्यात आला. या अंकामध्ये नुटा बुलेटीनचे संपादक प्रा.ब्रिजमोहन हेडा यांनी लिहिलेले एक संपादकीय प्रकाशित करण्यात आले होते. या संपादकीयामध्ये शिक्षकांना कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे याबाबतचे मोठे तपशीलवार वर्णन पुढील शब्दात करण्यात आले होते. :-

"कुणी सॅलरी अर्नर्स क्रेडीट को ऑपरेटीव्ह सोसायटीचे कर्ज काढले तर कोणी अर्बन को-ऑपरेटीव्हचे! अनेकांनी चिजवस्तू गहाण ठेऊन संसाराचा गाडा सुरू ठेवला आहे. हप्ते न भरल्याने अनेकाच्या विमा पॉलिसीज बुडाल्या आहेत. सी.टी.डी. ची खाती योजना बाद्य झाली आहेत. मेला नाही म्हणून जिवंत असलेला शिक्षक वर्गात जातो तर काही कुठे नुकसान झाले आहे हे ज्यांच्या डोळ्यांच्या गारगोट्या झाल्या आहेत त्यांना कसे दिसणार? शिक्षक मित्रांनो! आपण आपला हा सारा तपशील विद्यार्थ्यांना समजावून सांगितला पाहिजे. शासनाच्या अवती भोवती गोंडा घोळणारी हाताच्या बोटावर मोजण्या इतकी आपल्यात जी भगत मंडळी आहे ती सध्या विद्यार्थ्यांना नुकसानापासून वाचविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कानात फुसक्या सोडीत आहेत. आंदोलन सुरू झाले की, सुरुवातीला ही भगत मंडळी गुपचाप बसतील. नवीन वेतनश्रेणी देणारा शासकीय ठराव आला (तो येतो की नाही हे ईश्वर जाणे पण यायचा झाला तर तो अगोदर येईल कारण तेथे ८० टक्के रक्कम केंद्रसरकार देणार आहे) की यांची कोल्हेकुई सुरू होईल. आता झाले ना? नवीन स्केल मिळाले. विद्यार्थ्यांचे नुकसान होते. आंदोलन मागे घ्या असा आवाज काढणारे अनेक तंबोरे वाजायला लागतील." (*P78NB1977*)

हा संघर्ष का सुरू करावा लागला? याची मोठी तपशीलवार माहिती नमूद करण्यात आलेली असल्यामुळे ते संपादकीय शब्दशः जसेच्या तसे **सहपत्र : सतरा** म्हणून सोबत दिलेले आहे.

### माध्यमिक शाळांसाठी असलेली व्यवस्था महाविद्यालयांसाठी कां नको?

**१११.** १ सप्टेंबर १९७७ रोजीच्या नुटा बुलेटीनच्या अंकामध्ये नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी लिहिलेला "शाळांसारखी शासननियंत्रित नियमित पगार वाटप व्यवस्था" या मथळ्याचा एक लेख प्रसिद्ध करण्यात आला होता. या लेखातील एक परिच्छेद पुढीलप्रमाणे:-

"ही गोष्ट खरी आहे की, माध्यमिक शिक्षकांना प्रदीर्घ चळवळीनंतर ही व्यवस्था मिळाली. अनेकांना अनेक महिने पगार न मिळणे, वर्षानुवर्षे कमी पगार मिळणे, ह्या विरुद्ध संप, मोर्चे, निदर्शने इत्यादी प्रखर अशा मार्गांनी लढत दिल्यानंतरच त्यांना ह्या बाबी प्राप्त झाल्यात. एवढा एक फरक सोडला तर महाविद्यालयीन शिक्षकांना वेतनविषयक उपरोक्त व्यवस्था का लागू करू नये याबाबत शासनाजवळ काही संयुक्तिक कारण असेल असे वाटत नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळात शिक्षणसंस्थाच कमी होत्या. कारण सरकारचे धोरण शिक्षण प्रसाराला प्रतिकूल होते. स्वातंत्र्यानंतर स्वाभाविकपणे लोकांकडून शिक्षणाच्या सोयीची मागणी व्हायला लागली. त्याचाच परिणाम म्हणून मध्यप्रदेशासारख्या

*(सहपत्र सतरा : परिच्छेद ११० पहा)*

## *नुटा बुलेटीन : ०१.०९.१९७७ : संपादकीय*

### *- प्रा.बी.बी.हेडा*

मित्रहो! लढा सुरू होत आहे. हा लढा आहे अन्यायाविरुद्ध न्याय असा. तसे पाहिले तर कुणालाही आपली बाजू न्याय्य आहे असेच वाटत असते. पण आम्ही जो 'न्याय' म्हणतो तो न्याय आहे असे महाराष्ट्र शासनासही मान्य आहे, असे मानावे लागेल. कारण त्यामुळेच शासनाने आमच्या महत्त्वाच्या मागण्या मान्य करून त्यांची ३० जून ७७ पर्यंत परिपूर्ती करण्याचे आश्वासन आम्हाला दिले होते. पण अजूनही त्या आश्वासनांची परिपूर्ती नाही वा न्यायाधिकरणाची तरतूद करतांना आश्वासनाचा लहानसा भाग पूर्ण करण्याचा जो प्रयत्न झाला तोही अत्यंत अप्रामाणिकपणाचा. अशा परिस्थितीत स्वाभिमानाने जगायचे असेल तर लढ्याशिवाय तरणोपाय नाही अशी आजची अवस्था आहे. सहनशक्तिलाही अखेर सीमा असते. आज आमच्या सहनशक्तिच्या पलिकडे शासनाने बेपर्वाईचे धोरण स्वीकारल्यामुळेच आम्ही आंदोलन उभारले आहे.

पण एकदा आंदोलन सुरू झाले की, विद्यार्थ्यांच्या हिताचा पुळका असणारे अनेक भोंदू पुढे येतात. परीक्षा बहिष्कारामुळे नुकसान होते. शिक्षकांनी काम बंद केले की, शिकविण्याचे नुकसान होते; आता तर काय अभ्यासेतर काम शिक्षकांनी बंद केल्यामुळे सुद्धा नुकसान होते, असे म्हणणारे भगत पुढे आले आहेत. ६ ते १२ महिन्यांचा पगार ज्याला मिळाला नाही असा शिक्षक आपले पोट बांधून जेव्हा वर्गात जातो तेव्हा त्यामुळे होणारे नुकसान या फुटक्या डोळ्यांना दिसत नाही.

कुणी सॅलरी अर्नर्स क्रेडीट को ऑपरेटीव्ह सोसायटीचे कर्ज काढले तर कोणी अर्बन को-ऑपरेटीव्हचे! अनेकांनी चिजवस्तू गहाण ठेऊन संसाराचा गाडा सुरू ठेवला आहे. हप्ते न भरल्याने अनेकाच्या विमा पॉलिसीज बुडाल्या आहेत. सी.टी.डी. ची खाती योजना बाद्य झाली आहेत. मेला नाही म्हणून जिवंत असलेला शिक्षक वर्गात जातो तर काही कुठे नुकसान झाले आहे हे ज्यांच्या डोळ्यांच्या गारगोट्या झाल्या आहेत त्यांना कसे दिसणार?

शिक्षक मित्रांनो! आपण आपला हा सारा तपशील विद्यार्थ्यांना समजावून सांगितला पाहिजे. शासनाच्या अवती भोवती गोंडा घोळणारी हाताच्या बोटावर मोजण्या इतकी आपल्यात जी भगत मंडळी आहे ती सध्या विद्यार्थ्यांना नुकसानापासून वाचविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कानात फुसक्या सोडीत आहेत. आंदोलन सुरू झाले की, सुरुवातीला ही भगत मंडळी गुपचाप बसतील. नवीन वेतनश्रेणी देणारा शासकीय ठराव आला (तो येतो की नाही हे ईश्वर जाणे पण यायचा झाला तर तो अगोदर येईल कारण तेथे ८० टक्के रक्कम केंद्रसरकार देणार आहे) की यांची कोल्हेकुई सुरू होईल. आता झाले ना? नवीन स्केल मिळाले. विद्यार्थ्यांचे नुकसान होते. आंदोलन मागे घ्या, असा आवाज काढणारे अनेक तंबोरे वाजायला लागतील. १९७५ च्या बहिष्कार आंदोलनाच्या वेळी त्यावेळच्या शिक्षणमंत्र्यांनी ४ एप्रिल १९७५ रोजी आश्वासने देणारे एक निवेदन विधानसभेत केले. (यातील अनेक आश्वासनांची पूर्ती आजपावेतो झालेली नाही.) व इकडे बहिष्कार मोडण्यासाठी सद्या गोळा करणारी भगत मंडळी कधीच न सुरू केलेले आंदोलन मागे घ्यायला त्वरेने पुढे सरसावली होती हे आपण विसरला नसाल. अजूनही हे घरभेदे टपून बसले आहेत हे लक्षात ठेवा.

नुसते नवीन स्केल मिळून काय उपयोग आहे? ते पदरात पडले पाहिजे. जुनेच वेळेवर पदरात पडत नाही (आणि पडलेच तर अनेक ठिकाणी ते पदर फाटून बाहेर जाते) तर नव्याचे कौतुक काय? तेव्हा मुख्य प्रश्न आहे, नवीन स्केल तर लागू झालेच पाहिजे पण त्याबरोबर शाळांप्रमाणे शासननियंत्रित नियमित पगार वाटपाची व्यवस्था शासन लागू करायला तयार आहे की नाही हा? आणि अशी कोणतीही व्यवस्था ही जुन्या साऱ्या थकीत बाकीचा निपटारा करून (तसे शासनाने लेखी कबूल केलेले आहे.) सुरू झाली तरच ती प्रमाणिकपणाची आहे असे शिक्षकांना वाटेल. थकित बाकीच्या निपटाऱ्यासह पुढे नियमित वेतन मिळू शकेल अशी विद्यालयीन शिक्षकांना लागू असलेली वेतन वितरणाची यंत्रणा महाविद्यालयांकरीता लागू करणारा शासकीय आदेश (केवळ आश्वासन नव्हे कारण ते अगोदरच मिळाले आहे.) निघाला पाहिजे. न्यायाधिकरणाचा जो कायदा करण्यात आलेला आहे त्यातील अन्याय बाजूला काढला पाहिजे. स्थानिक व्यवस्थापन समितीची कायद्यामध्ये दुरूस्ती करून पुनर्रचना झाला पाहिजे. समानसेवा शर्तीखाली काम करणारा एकच शिक्षकवर्ग महाविद्यालयांना जोडण्यात आलेल्या सर्व वर्गासाठी असला पाहिजे. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी एकजुटीने या लढ्यामध्ये सामिल झाले पाहिजे. आम्ही एक असू तर विजय दूर नाही. रणशिंग फुंकले आहे आता माघार नाही. (*P 78 NB 1977*)

राज्यामध्ये तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा शासकीय महाविद्यालये उघडल्या गेली. जिल्ह्याच्या ठिकाणी सर्व सोयींनी युक्त अशी पदव्युत्तर महाविद्यालये शासनामार्फत उघडली गेली. जवळजवळ ९० टक्के महाविद्यालये ही मध्यप्रदेशामध्ये शासकीय महाविद्यालये आहेत. सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रामध्ये खाजगी संस्थांनी समाजहितबुद्धीने हे काम शिरावर घेतले व ते बऱ्याच संस्थांनी बऱ्याच काळापर्यंत व काही संस्थांनी अजूनही यशस्वीपणे चालू ठेवले आहे. खाजगी व्यक्तींच्या मिळून बनलेल्या संस्थाचा एक महत्त्वपूर्ण दोष असा असतो की, एखादी व्यक्ती कितीही थोर असली तरी त्या व्यक्तीचा थोरपणा वंशपरंपरेने पुढे पिढ्यान्‌पिढ्या चालत राहील याची हमी नसते."

**११२.** "शाळांसारखी शासननियंत्रित नियमित पगार वाटप व्यवस्था" या उपरोक्त लेखामध्ये आकृतिबंधाच्या वाटचालीमुळे विदर्भातील उच्च शिक्षणाची कशी दैना झालेली आहे याचे तपशीलवार वर्णन करण्यात आलेले होते. ते पुढीलप्रमाणे :-

"विदर्भात आज तर प्रामाणिकपणे शिक्षण संस्था चालविणाऱ्या व्यवस्थापकांना सुद्धा शासनाने आपल्या धोरणामुळे हे काम करणे अशक्य करून टाकणारी परिस्थिती आणून ठेवली आहे. मुंबईमध्ये बसून सबंध महाराष्ट्राचे दृश्य पहाणाऱ्या अधिकारी मंडळीच्या हे लक्षात येत नाही की, महाराष्ट्रामध्ये विदर्भ या नावाचाही एक विभाग आहे व विदर्भामध्ये पदवी परीक्षेच्या महाविद्यालयामध्ये असलेल्या ३ वर्गाची स्थिती मुंबई विभागापेक्षा संख्येच्या दृष्टीने एकदम भिन्न आहे. तिकडे ३ पदवीवर्ग पूर्ण भरणा असलेले अस्तित्वात आहेत तर इकडे विदर्भातील महाविद्यालयातून पदवीचा फक्त दिडच वर्ग अस्तित्वात आहे व त्यामुळे बहुसंख्य महाविद्यालयांच्या आर्थिक परिस्थितीवर जबरदस्त ताण पडलेला आहे. याची जबाबदारी ही जशी शिक्षकांवर नाही तशीच ती व्यवस्थापकांवरही टाकता येत नाही, तर केवळ शासनाने आणलेल्या आकृतिबंधावरच आहे व ही स्थिती १९८० या वर्षापर्यंत राहणार आहे. विदर्भातील महाविद्यालयांमध्ये पदवी परीक्षेचे अर्धवट भरणा असलेले तीन वर्ग कसे राहतील हे पुढील विवेचनावरून लक्षात येईल.

नवीन आकृतिबंधाची वाटचाल महाराष्ट्रामध्ये होत असतांना मुंबई विद्यापीठामध्ये असलेली परिस्थिती व नागपूर विद्यापीठामध्ये असलेली परिस्थिती यामध्ये अंगभूत भिन्नता असलेली स्पष्टपणे दिसून येते. मुंबई विद्यापीठ विभागामध्ये मूळ व्यवस्था ही ११ + ४ = १५ अशी होती तर नागपूर विभागामध्ये ती १० + १ + ३ = १४ अशी किंवा ११ + ३ = १४ अशी होती. मूळ व्यवस्था भिन्न असल्यामुळे आकृतिबंधाची वाटचाल होत असतांना त्याचे भिन्न परिणाम स्वाभाविकपणेच होत आहेत. उदा. नागपूर विभागात नवीन आकृतिबंधाची पहिली तुकडी १९७५ च्या वार्षिकमध्ये १० व्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण होऊन जून महिन्यात नव्या आकृतिबंधाच्या ११ व्या वर्गात दाखल झाली व पूर्व विद्यापीठ परीक्षेचा वर्ग ओस पडला. बंद झाला. पण याच वर्षी मुंबई विभागामध्ये १० वी ची पहिली तुकडी नव्या अकराव्या वर्गामध्ये गेली व जुन्या अकरावीची शेवटची तुकडी प्रथम वर्ष वर्गाला गेली.

ह्याच्याच पुढच्या वर्षी म्हणजे १९७६ ची वार्षिक परीक्षा करून नागपूर विद्यापीठ विभागात नवीन आकृतिबंधाची पहिली तुकडी जून ७६ मध्ये १२ व्या वर्गात शिरली व त्यामुळे प्रथम वर्षाचा वर्ग इथे ओस पडला. बंद झाला. याउलट मुंबई विद्यापीठामध्ये याच वेळी महाविद्यालयातून नियमित भरणा असलेले तीन पदवी वर्ग (द्वितीय, तृतीय, चतुर्थ) अस्तित्वात होते."

### डॉ.म.गो.बोकरे यांचा खळबळजनक लेख

**११३.** प्राध्यापक चळवळीचे ज्येष्ठ नेते व नुटाच्या स्थापनेच्या वेळी नेमण्यात आलेल्या पाच सदस्यांच्या पहिल्या अंतरिम कार्यकारी मंडळाचे एक सदस्य, कापूस उत्पादक संघाचे ज्येष्ठ नेते डॉ.एम.जी.बोकरे (पुढे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू) यांच्या "100% Grant on the current expenses of the Private Colleges is a must." या मथळ्याखालील लेखाने विदर्भात सर्वत्र खळबळ उडवून दिली होती. विदर्भातील अनेक वृत्तपत्रांनी त्यांचा हा लेख प्रसिद्ध केलेला होता. विद्यापीठाच्या वार्षिक अहवालामध्ये निरनिराळ्या महाविद्यालयांची जी आकडेवारी प्रसिद्ध होते, त्या अधिकृत आकडेवारीचा आधार घेऊन प्रा.बोकरे यांनी या लेखामध्ये असे प्रतिपादन केले होते की, शासकीय महाविद्यालयांमध्ये दरडोई विद्यार्थ्यांवर होणाऱ्या खर्चाच्या कितीतरी पट कमी खर्चामध्ये खाजगी महाविद्यालयामध्ये तेच काम केले जाते. उदाहरणार्थ अमरावती येथील विदर्भ महाविद्यालय या शासकीय महाविद्यालयामध्ये दरवर्षी दर विद्यार्थ्यामागे होणारा खर्च हा रूपये २१६० इतका आहे. तर तो त्याच वर्षी खाजगी महाविद्यालयातून पुढीलप्रमाणे आहे : यशवंत महाविद्यालय वर्धा येथे २५७ रूपये, जिजामाता महाविद्यालय बुलडाणा येथे २८३ रूपये, जी.एस. कॉमर्स कॉलेज वर्धा २३० रूपये, जी.एस.कॉमर्स कॉलेज नागपूर येथे ३६१ रूपये, श्री शिवाजी महाविद्यालय अमरावती येथे ४३५ रूपये, धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे तो ४५६ रूपये दरडोई आहे.

खाजगी अशासकीय महाविद्यालयातून कमी खर्चात हे काम केल्या जाते हा त्यांचा गुन्हा आहे का? अशा प्रकारच्या डॉ.बोकरे यांच्या प्रतिपादनाने त्यावेळेला एक नवीच माहिती समोर आली होती. डॉ.बोकरे यांनी या लेखामध्ये १०+२+३ या आकृतीबंधामुळे हे संकट विदर्भावर ओढवलेले आहे असेही नमूद केले होते. आकडेवारी देणारे अनेक तक्ते त्यांनी या लेखासोबत जोडलेले होते. सर्व तक्ते वगळून त्यांच्या लेखातील सुरुवातीच्या परिच्छेदांमध्ये त्यांनी केलेली मांडणी आजही वाचनीय आहे, म्हणून ते परिच्छेद **सहपत्र : अठरा** म्हणून सोबत

*(सहपत्र अठरा : परिच्छेद ११३ पहा)*

## 100% GRANT ON THE CURRENT EXPENSES OF THE PRIVATE COLLEGES IS A MUST.

**Dr. M.G.Bokare**

G.S.College of Commerce and Economics, Nagpur

The comparative statistics of the private colleges and the colleges managed by the Govt. of Maharashtra show that the social outlay on the private colleges on the average is much lower than the Government Colleges. The outlay is much less, both absolutely and also per capita (student) basis. The private management have been managing their colleges more economically.

The Government should consider the comparative expenditure patterns, and come to help the private colleges, which have sprouted in the last ten to fifteen years. If not, these colleges would be wound up very soon. The flow of the students in the Ten-Two-Three pattern will increase after 1980-81. The rural population will again need University level classes as a result of this increased flow. The existing private colleges if closed down will be total loss to the society and with the bitter experience, the social leaders will not come forward to start University classes again. The Government can easily finance these small and large size colleges now during the transition period.

Readers may please note that the data is for the year 1975-76 when the colleges had no impact of 10+2+3 pattern. Almost all the colleges in the rural area had assuring strength. After this year due to new pattern, the college strength has gone down to a level wherefrom they will have no alternative but to close down the institutions. The proposed minimum in the faculty for receiving the grant will adversely affect the finances of the colleges.

It is necessary that the Government should give 100% grant on the expenses on current account. The Government should also give capital grant of about one lac rupees to the private colleges once in five years so that the necessary environment around the colleges could be usefully promoted. Such capital grant once in five years, will help them to obtain matching grant from the UGC.

The financial burden on the Government can be easily estimated from the data given in the below mentioned tables. *(P84NB1977)*

प्रसुत केलेले आहे.

### विद्यार्थ्यांवर निवडणुकांच्या बाबतीत होणारा अन्याय सहन केला जाणार नाही

**११४.** विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार महाविद्यालयीन विद्यार्थी संघाच्या व विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुका त्यावेळी होत असत. जेथे निवडणुका होतील तेथे त्या होतील व शिक्षकांच्या आंदोलनामुळे जेथे निवडणुका होणार नाहीत तेथील विद्यार्थी वंचित राहतील, अशा जोरदार अफवा पसरविण्यात येत होत्या. नुटाच्या कार्यकारी मंडळाची तावडतोब बैठक घेऊन याबाबतचे संघटनेचे धोरण जाहीर करण्यात आले. ते पुढील शब्दात :-

"विद्यार्थ्यांच्या निवडणूकी विषयी नुटाच्या कार्यकारी मंडळाची भूमिका काय आहे? हे स्पष्ट शब्दात नमूद करणे आम्हाला आवश्यक वाटते. दिनांक १ ऑगस्ट पासून अभ्यासेतर कामावर व ५ सप्टेंबर पासून शिकविण्याच्या कामावरसुद्धा बहिष्कार पुकारण्यात आलेला असल्यामुळे या कामाशी शिक्षकांनी सहकार्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अनेक महिन्यांचे पगार थकलेले असतांना तसे करा असे आम्हाला सांगण्याचा नैतिक अधिकार कुणालाही आहे असे आम्ही मानत नाही. होमगार्डाच्या मदतीने महाविद्यालयामध्ये निवडणुका घेण्याची योजना कुणी आखल्यास त्याला विरोध करण्याचे आम्हाला काही कारण नाही. त्या त्या ठिकाणचे शिक्षक संघटीतपणे त्या होमगार्डांना विनंती करतील तो त्यांचा अधिकार आहे.

आमच्या विद्यार्थी मित्रांना आम्ही एवढेच आश्वासन देतो की, कायद्याप्रमाणे नागपूर विद्यापीठात जे 'स्टुडटंस कौन्सिल' निवडले जाते त्याची बांधणी आमच्या बहिष्कारामुळे जेथे निवडणुका होऊ शकल्या नाहीत तेथील विद्यार्थ्यांना वगळून करण्याचा प्रयत्न कुणीही केल्यास त्याला आम्ही जबरदस्त विरोध करू व ज्या तारखेला या निवडणुका घेण्याचा प्रयत्न होईल त्या तारखेला विदर्भातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी नागपूरच्या पूर्णचंद्रराव बुटी मेमोरियल हॉलवर प्रचंड मोर्चा नेऊन हा प्रयत्न हाणून पाडतील." *(P78NB1977)*

### भितीपत्रकांचे वाटप

**११५.** दिनांक ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू होणार व महाराष्ट्रात ते फक्त नागपूर विद्यापीठ क्षेत्रातच होणार याची कल्पना असल्यामुळे नुटाची जबाबदारी वाढलेली होती व त्यामुळे सर्वच पदाधिकारी जोमाने कामाला लागले होते. ५ तारखेला सुरू होणाऱ्या आंदोलनाचा भाग म्हणून मोर्चे व मिरवणुका यांचा एक कार्यक्रम नुटाच्या वतीने आखण्यात आला होता व त्याला प्रसिद्धी देणारे एक भित्तीपत्रक (poster) सुद्धा विदर्भभर वाटण्यात आले होते. त्या वर्षीच्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७५ वर सुद्धा ते प्रसिद्ध करण्यात आले होते. नमूना म्हणून ते पोस्टर **सहपत्र : एकोणवीस** म्हणून सोबत दिलेले आहे.

### आंदोलनात उपस्थित करण्यात आलेले प्रश्न

**११६.** वेतन नियमित होण्याचा प्रश्न सबंध महाराष्ट्रामध्ये असतांना फक्त विदर्भातच आंदोलन होत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतर भागात आंदोलन का नाही? याबाबतीत अनेक ठिकाणी सभांमधून प्रश्न विचारण्यात येत होते. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन सर्व प्रश्नांच्या बाबतीत चर्चा केल्यानंतर आता का म्हणून आंदोलन होत आहे? असाही प्रश्न विचारल्या जात होता. उपस्थित करण्यात आलेले प्रश्न काय होते? व त्याला काय उत्तरे देण्यात आली? हे नमूद असलेले एक पत्रक "**आंदोलनाची दिशा व आंदोलनातील धोक्याचा जागा**" या मथळ्याखाली काढण्यात आले होते. या सर्व प्रश्नांना नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेली उत्तरे समाविष्ट असलेले ते पत्रक त्या वर्षीच्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७९ वर मुद्रित करून तो मजकूर सर्व घटक संघटनांकडे रवाना करण्यात आला होता. त्यावेळेच्या स्थितीचे अतिशय स्पष्ट दर्शन या पत्रकातून होत असल्यामुळे ते **सहपत्र : वीस** म्हणून सोबत प्रसृत करण्यात आले आहे.

### शिक्षण खात्याचे आवाहन

**११७.** आंदोलनाची तारीख जसजशी जवळ यायला लागली तस तशा शासनाच्या पातळीवरील हालचाली मोठ्या प्रमाणात वाढायला लागल्या होत्या. दिनांक २ सप्टेंबर १९७७ रोजी राज्याच्या शिक्षण खात्याने एक वृत्तपत्रीय निवेदन **(सहपत्र : बावीस)** प्रसिद्ध करून शिक्षकांच्या मागण्यांचा शासन सक्रियपणे विचार करीत आहे. नियमित पगार वाटपाची व्यवस्था विचाराधीन असल्याचे त्यांनी जाहिर केले होते. नुटाच्या कार्यकारी मंडळाने तावडतोब दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३ सप्टेंबर १९७७ रोजी बैठक घेऊन शिक्षण खात्याच्या निवेदनावर आपली प्रतिक्रिया नमूद केली. वेतन वितरण व्यवस्थेचे तपशील हाताशी नसल्यामुळे तसेच थकीत वेतनाचा निपटारा करण्याबाबत निवेदनात कोणताही उल्लेख नसल्यामुळे ५ तारखेपासून सुरू होणारे आंदोलन मागे घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही अशा प्रकारचा एक तपशीलवार ठराव त्या दिवशी नुटाच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केला व तो एका पत्रपरिषदेतून प्रसृत केला. हा ठराव समाविष्ट असलेले पत्रपरिषदेतील निवेदन सोबत **सहपत्र : एकवीस** म्हणून प्रसृत केलेले आहे.

### मा. कुलगुरूंचे आवाहन

**११८.** एका बाजूला राज्याच्या शिक्षण खात्याने दिनांक २ सप्टेंबर १९७७ रोजी निवेदन प्रसिद्ध करून शिक्षकांनी आंदोलन करू नये असे आवाहन केले होते, तर दुसऱ्या बाजूला त्याच दिवशी बहुधा शासनातून कोणीतरी विनंती केल्यावरून मा.कुलगुरूंनी सुद्धा मा.शिक्षणमंत्री या सर्व मागण्यांवर सक्रियपणे विचार करीत आहेत असे नमूद करून एका निवेदनाद्वारे शिक्षकांनी आंदोलन करू नये असे आवाहन केले होते. आंदोलन मागे घेण्याविषयी कुलगुरूंनी केलेल्या विनंतीचा विचार दिनांक ३ सप्टेंबर १९७७ रोजी नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये करण्यात आला व ही सभा तहकूब करून प्रा.बी.टी.देशमुख, प्रा.अरविंद बारहाते, प्रा.व्ही.एस.कुळकर्णी, प्रा.एम.के.देशपांडे व प्रा.एस.डी.जोगळेकर या पाच सदस्यांचे प्रतिनिधी मंडळ कुलगुरूंच्या भेटीसाठी गेले. प्रतिनिधी मंडळाने मा.कुलगुरूंना "शासनाशी आपले जे काही बोलणे झाले आहे, त्यानुसार "सप्टेंबर महिन्यापर्यंतचा पगार ऑक्टोबरच्या सुरुवातीला दिला जाईल" असे लिखित आश्वासन आपण देऊ शकता काय?" अशी विचारणा केली. अशा प्रकारचे आश्वासन देण्यास कुलगुरूंनी आपली असमर्थता व्यक्त केली. त्यांचे पुन्हा पुन्हा म्हणणे असे होते की, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे व शासनाच्या पातळीवर याबाबतीत लवकरात लवकर निर्णय होण्याची शक्यता आहे. कुलगुरूंशी झालेल्या चर्चेचे सारे तपशील ऐकून घेतल्यानंतर कुलगुरूंनी आंदोलन मागे घेण्याबाबत केलेली विनंती मान्य करता येत नाही, असे नुटाच्या कार्यकारी

*(सहपत्र एकोणवीस : परिच्छेद ११५ पहा)*

Nagpur University Teachers' Association

## *दिनांक ५-९-१९७७ शिक्षक दिनाच्या दिवशी*

## *– मार्चे, मिरवणूका व सभा –*

*दि. ५ सप्टेंबर रोजी महाविद्यालये असलेल्या सर्व शहरी शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मिळून मोर्चे व मिरवणूका काढतील. तसेच सभांचे आयोजन करतील.*

## *– नागपूर येथील मोर्चा –*

*नागपूर शहरातील प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मिरवणूकीने १०.३० वाजेपावेतो नागपूर विद्यापीठ कार्यालयाच्या मुख्य इमारतीच्या मागे असलेल्या पटांगणात पोचतील व तेथून हा मोर्चा निघेल. मोर्चाबाबत इतर तपशील नागपूर कृतिसमिती ठरवील.*

## *: अमरावती येथील मोर्चा :*

***अमरावती शहरातील असाच मोर्चा सकाळी १०.३० वाजता नेहरू मैदानातून निघेल***

## *: इतर शहरातील मोर्चे :*

*इतर सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी (जिल्हा शाखांचे पदाधिकारी ठरवतील त्या तपशीलानुसार) सकाळी १०.३० वाजता विद्यार्थी - शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोर्चे निघतील. महाविद्यालयाच्या इतर ठिकाणी, त्या त्या ठिकाणी काढावयाचे मोर्चे मिरवणूका व सभांच्या कार्यक्रमाचे तपशील त्या त्या ठिकाणचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ठरवतील.*

मंडळाने त्याच दिवशीच्या बैठकीत ठरविले व ते तसे लेखी पत्राद्वारे मा.कुलगुरूंना कळविण्यात आले.

### शासनाची भूमिका नमूद असलेले तपशीलवार निवेदन

**११९.** दिनांक २ सप्टेंबर १९७७ रोजी राज्याच्या शिक्षण खात्याने जे वृत्तपत्रीय निवेदन प्रसिद्धीसाठी दिले होते त्याचा वृत्तांत वर्तमानपत्रात आलेला होता, त्यावरूनच नुटाच्या कार्यकारी मंडळाने आपली भूमिका जाहीर केली होती. २ तारखेला प्रसारित केलेले "Implementation of revised scales of pay and salary payment scheme for University and College Teachers" या विषयावरील वृत्तपत्रीय निवेदन (Press-Note) विशेष व्यवस्थेद्वारे नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख याच्याकडे पाठविण्यात आले होते. ३ तारखेला नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक आटोपल्यानंतर शिक्षण सचिव श्री.द.म.सुकथनकर यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडे पाठविलेले हे वृत्तपत्रीय निवेदन प्राप्त झाले. श्री.सुकथनकर यांचे पत्र व त्यासोबत २ तारखेचे वृत्तपत्रीय प्रसारण एकत्रितरीत्या **सहपत्र : बावीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

### नव्या वेतनश्रेणीबाबतची शासनाची भूमिका

**१२०.** मोघमपणे वृत्तपत्रातून ३ तारखेला जी गोष्ट आम्ही वाचली होती, तेच या वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये तपशीलवारपणे मांडण्यात आलेले होते. या वृत्तपत्रीय प्रसारणाच्या परिच्छेद २ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी करण्याची सद्यःस्थिती काय आहे? याबाबतचा तपशीलवार घटनाक्रम नमूद केलेला होता. उभयपक्षी झालेल्या समझोतापत्राच्या आधारावर उच्च न्यायालयाचा याबाबतीत निर्णय झाल्याबरोबर ऑक्टोबर १९७५ चा जुना शासननिर्णय दुरूस्त करून वेतनश्रेण्यांच्या योजनेची अंमलबजावणी केली जाईल, असे या परिच्छेदामध्ये नमूद होते. ते पुढील शब्दात :-

"As soon as the orders of the High Court on the pending Writ Petition in the light of this understanding become available, the earlier impugned orders issued in October, 1975 will be suitably modified and issued and the revised scales will stand implemented."

### वेतन वितरण व्यवस्थेबाबत शासनाची भूमिका

**१२१.** या वृत्तपत्रीय निवेदनाच्या परिच्छेद ३ मध्ये वेतन वितरण व्यवस्थेबाबतचे तपशील देण्यात आलेले होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे चार प्रतिनिधी व व्यवस्थापकांचे चार प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या एका समितीची स्थापना या कामासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली होती. या समितीने सुचविलेल्या योजनेच्या आधारावर वेतन वितरणाची व्यवस्था लागू करण्याचे शासनाने ठरविले आहे, असे परिच्छेद ३ मध्ये नमूद करण्यात आले होते. ते पुढील शब्दात :-

*(सहपत्र वीस : परिच्छेद ११६ पहा)*

## *आंदोलनाची दिशा व आंदोलनातील धोक्याच्या जागा*

(गेल्या १५ दिवसांमध्ये विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या अनेक सभा आयोजित करण्यात आल्या होत्या; त्यावेळी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी या सभातून दिलेली उत्तरे इतर शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या माहितीकरीता खाली दिलेली आहेत.)

**(१) प्रश्न - पगार उशीर होण्याचा प्रश्न फक्त विदर्भातच आहे काय?**

**उत्तर** - होय, हा प्रश्न फक्त विदर्भ व त्या मागोमाग मराठवाड्यात आहे, मुंबई, पुणे व कोल्हापूर भागात तो त्या प्रमाणात नाही.

**(२) प्रश्न - याचे कारण काय?**

**उत्तर** - मुख्य कारण म्हणजे आकृतिबंध हेच होय. या आकृतिबंधामुळे विदर्भातील महाविद्यालयातून पदवी परीक्षेचा एक वर्ग पूर्णपणे ओस पडलेला आहे व त्याच्या मागून अर्धवट भरणा असलेला एक वर्ग प्रवास करीत आहे व त्यामुळे पदवीवर्गाची विद्यार्थी संख्या जवळ जवळ निम्म्यावर आलेली आहे.

**(३) प्रश्न - मग ही स्थिती यापुढे सतत अशीच राहील काय?**

**उत्तर** - नाही. मुळीच नाही. १९८०-८१ साली आकृतिबंध स्थिर झाला म्हणजे या स्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल.

**(४) प्रश्न - आकृतिबंधाशिवाय पगार उशीरा होण्याला दुसरे कोणतेच कारण नाही काय?**

**उत्तर** - मुख्य कारण आकृतिबंधच होय! त्याबरोबर काही ठिकाणी हजारो रुपयाची फी व अनुदाने यांचा विनियोग उचित पद्धतीने होत नाही. अशी ठिकाणी कमी असली तरी दुर्लक्ष करता येण्यासारखी नाहीत.

**(५) प्रश्न - नवीन वेतनश्रेणी बाबतचा शासकीय ठराव आणून केवळ तेवढ्याने आंदोलन फोडण्यासाठी दडपण वाढविले जाईल हे तुम्हा लोकांच्या लक्षात आहे काय?**

**उत्तर** - (१) होय. १९७५ च्या आंदोलनात खोटी आश्वासने (दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांची अंमलबजावणी करण्यात आली नाही या अर्थाने) देऊन त्यावेळी शासनाने आंदोलनावरील दबाव वाढविला होता हे आमच्या लक्षात आहे. यावेळी सुद्धा नवीन वेतनश्रेणीसारखी एखादी बाब पुढे करून इतर बाबतीत "चर्चा" करू असा दबाव वाढविला जाईल पण विद्यार्थी व शिक्षक या दबावाला बळी पडणार नाहीत.

(२) हे लक्षात आल्यावर थकित पगाराच्या निपटाऱ्याची व्यवस्था नसलेली "नियमित पगाराची तात्विक योजना" शासन पुढे आणील व पुन्हा एकदा आंदोलन तोडण्यासाठी दबाव वाढविला जाईल असेही आमच्यापैकी अनेकांना वाटते.

**(६) प्रश्न - थकीत पगाराचा निपटारा ही काय बाब आहे?**

**उत्तर** - आम्ही आपणाला सुरुवातीलाच सांगितले की, आकृतिबंधाच्या वाटचालीमुळे विदर्भातील महाविद्यालये भरडली गेलीत. त्याचा जबर फटका शिक्षकांना बसला. ६ ते १० महिन्यांचे पगार अनेक ठिकाणी थकले. हेच मुंबई पुण्यात घडले नाही. ही गोष्ट शासनाला वारंवार सांगितली. गेल्या एप्रिलमध्ये नोंदविलेल्या मतैक्यपत्रात "थकित पगाराचा निपटारा करण्याची जबाबदारी शासनाने मान्य केली" पण अजून ती अंमलात आली नाही.

**(७) प्रश्न - आपल्या या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांवर अभ्यासाच्या दृष्टीने अन्याय होणार नाही काय?**

**उत्तर** - भारतात कोणता तरी वर्ग ६ ते १० महिने पगार न घेता काम करतो काय? हे आतावर सहन करण्यात खरे म्हणजे आम्ही त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. हा प्रश्न सुटताच जादा काम करूनसुद्धा शिक्षक ही भरपाई करतील हे निश्चित समजावे.

**(८) प्रश्न - निवडणुकीच्या बाबतीत काही ठिकाणच्या प्रतिनिधींना भाग घेता न आल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होणार नाही काय?**

**उत्तर** - 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाची त्याबाबतची निश्चित भूमिका यापूर्वीच मांडलेली आहे.

**(९) प्रश्न - मा.मुख्यमंत्री व मा. शिक्षणमंत्र्यांची भूमिका याबाबत कशी आहे?**

**उत्तर** - मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील व मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी प्राध्यापकांच्या प्रश्नावर जेवढा वेळ देऊन शिक्षकांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली तेवढा वेळ यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्याने व शिक्षणमंत्र्याने दिला नाही. ही गोष्ट जाहिरपणे कबूल केली पाहिजे. दुसरे म्हणजे ठरलेली प्रत्येक गोष्ट - चर्चेमध्ये मान्य झालेली प्रत्येक बाब - लिहून काढून बैठकीचे कार्यवृत्त उभयपक्षांकडून 'कायम' करण्याचा मोठेपणा या मुख्यमंत्र्यांनी व शिक्षणमंत्र्यांनी दाखविला (यापूर्वी तसे होत नव्हते) प्रांजळपणा व त्या प्रश्नात लक्ष घालण्याची कळकळ असल्याशिवाय हे होत नाही हेही कबूल केले पाहिजे.

**(१०) प्रश्न - मग अडले कुठे?**

**उत्तर** - (१) मुख्य म्हणजे ३० जून पावेतो ५ परिच्छेदांच्या बाबतीत अंतिम निर्णय होतील असे ठरले असतांना एकाही बाबतीत निर्णय होऊ नये याचे शिक्षकांना आश्चर्य वाटत आहे. लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल जेवढ्या आतुरतेने ऐकले गेले तेवढ्याच आतुरतेने शिक्षक १ जुलै ते ७ जुलै पर्यंत रेडिओ ऐकत होते. वृत्तपत्रे वाचत होते. ३० जुलै सुद्धा गेली.

(२) विदर्भामध्ये मुख्यत्वेकरून पगाराच्या प्रश्नावर होरपळून गेलेल्या शिक्षकांना आम्ही जे भाजले जात आहोत ते तुमच्या आकृतिबंधाने असे वाटते. हे शासनाच्या का लक्षात येत नाही व एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नावरसुद्धा असा उशीर होतो यामुळे संताप व चिड व्यक्त केली जात आहे.

(३) दरम्यानच्या काळात शासनाने जे विकृत न्यायाधिकरण आणले त्यामुळे शिक्षकांना आपली थट्टा केली जात आहे. आपल्या जखमेवर मीठ चोळण्याचा शासनाने क्रूर प्रयत्न केलेला आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. **१ सप्टेंबर १९७७** *(P79NB1977)*

"Government has decided that a scheme for ensuring regular and full payment of salaries and allowances of the teaching and non-teaching staff of the aforesaid affiliated colleges should be implemented broadly on the lines of the scheme recommended by the Committee."

### शासनाने ठरविले व शासननिर्णय यातील फरक

**१२२.** शासनाच्या या वृत्तपत्रीय निवेदनातील परिच्छेद ३ काळजीपूर्वक वाचला तर "शासनाने ठरविले आहे" (Government has decided) या शब्दांचा अर्थ व "शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे" किंवा " या तारखेच्या आत निर्गमित करण्यात येईल" या शब्दांचे अर्थ यामध्ये फरक आहे. उच्च शिक्षण विभागाने ठरविले म्हणजे त्या प्रकारचा शासननिर्णय निर्गमित होतोच असे नाही. ती गोष्ट ठरविल्यानंतर वित्त विभागाची मान्यता व त्यानंतर मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतरच शासननिर्णय निर्गमित होतो. त्यामुळे नुसते शासनाने ठरविले आहे या शब्दरचनेवर शिक्षकांचे समाधान होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशी संघटनेची भूमिका होती.

### वेतन खाते व वेतनेतर खर्च खाते

**१२३.** वृत्तपत्रीय निवेदनाच्या परिच्छेद ४ मध्ये वेतन वितरणाची व्यवस्था ही कशी राहिल? याबाबतचे तपशील नमूद करण्यात आले होते व ते तपशील समितीने अहवालामध्ये ज्या शिफारशी केल्या, त्याप्रमाणे होते. प्रत्येक महाविद्यालयाला बँकेमध्ये दोन खाती उघडावी लागतील. वेतन खाते व वेतनेतर खर्च खाते अशी दोन खाती उघडली जातील. महाविद्यालयामध्ये वर्षात येणाऱ्या उत्पन्ना पैकी ८० टक्के रक्कम ही वेतन खात्यामध्ये जमा करावी लागेल व त्यातून वेतनासाठीच खर्च करावा लागेल. ती रक्कम इतर प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे या परिच्छेद ४ मध्ये नमूद होते. याच परिच्छेदामध्ये पुढे असेही नमूद होते की, उरलेली २० टक्के रक्कम ही वेतनेतर खर्च खात्यामध्ये जमा केली जाईल व त्यातून महाविद्यालयाचा वेतनेतर खर्च भागविण्यात येईल.

### 'शासनाची मंजुरी' व 'समितीची शिफारस' यातील फरक

**१२४.** वेतन नियमित व्हावे यासाठी शासनातर्फे प्रथम दोन महिन्याच्या वेतन खर्चा इतकी रक्कम ॲडव्हान्स म्हणून दिली जाईल व याच आर्थिक वर्षात आणखी एक महिन्याची रक्कम ॲडहॉक असिस्टन्स म्हणून दिली जाईल. हा खर्च समितीच्या अहवालाप्रमाणे जवळ जवळ ३.५० कोटी रूपयापर्यंत असू शकतो. निवेदनातील मूळ शब्दरचना पुढीलप्रमाणे :-

"It is estimated that the ad hoc assistance to be given to the Colleges, as contemplated under the scheme, will be of the order of Rs. 3.50 crores per annum."

"थकित पगाराच्या निपटाऱ्यासाठी शासनाने ३.५० कोटी रुपये मंजूर केलेले आहेत." या वाक्याचा अर्थ वेगळा आणि "समितीच्या अहवालाप्रमाणे ३.५० कोटी रुपयाचे तदर्थ सहाय्य अपेक्षित आहे." या वाक्याचा अर्थ वेगळा.

परिच्छेद ४ चा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येते की, त्यामध्ये शासनातर्फे कोणतेही आश्वासन समाविष्ट नव्हते. राज्यस्तरीय समितीने सुचविलेल्या वेतन वितरण व्यवस्थेची ढोबळ वैशिष्ट्ये त्यामध्ये नमूद केलेली होती.

### निवेदनातील शेवटचा परिच्छेद

**१२५.** शेवटच्या म्हणजे पाचव्या परिच्छेदामध्ये महत्त्वाच्या दोन बाबतीत शासनाने वरप्रमाणे समाधानकारकपणे निर्णय घेतला असल्यामुळे शिक्षकांनी आंदोलनाचा मार्ग सोडून द्यावा आणि नव्या आकृतिबंधाच्या अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.

### नागपूर येथील मोर्चा व सभा

**१२६.** दिनांक ५ सप्टेंबर १९७७ रोजी विदर्भभर हे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू झाले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने नागपूर येथे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या मागे असलेल्या पटांगणात सकाळी १०.३० वाजता एकत्र आले. मोर्चानंतर सभेचे आयोजन करण्यात आले. सभेत नुटाचे उपाध्यक्ष प्रा.आबा फणसाळकर, सचिव प्रा.अरविंद बारहाते, कोषाध्यक्ष डॉ.अरूण सातपुतळे, ज्येष्ठ नेते डॉ.म.गो.बोकरे, डॉ.वि.शि.शेणवाई, यादवराव वडस्कर यांची भाषणे झाली. "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना झाल्याशिवाय आंदोलन मागे घ्यावयाचे नाही" असा ठाम निर्धार सभेत व्यक्त करण्यात आला. त्याच दिवशी विदर्भातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे मोर्चे निघाले व असाच निर्धार व्यक्त करण्यात आला.

### शिक्षक दिनाचा शासकीय कार्यक्रम बंद पडला

**१२७.** अमरावती येथे आंदोलनकर्त्यांनी शिक्षक दिनाचा हा कार्यक्रम वेगळ्या पद्धतीने साजरा केला. अमरावती शहरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोर्चा ठरल्याप्रमाणे सकाळी १०.३० वाजता नेहरू मैदानातून निघाला. नेहरू मैदानाला लागूनच असलेल्या वनिता समाजाच्या इमारतीच्या पहिल्या माळ्यावरील सभागृहात शिक्षक दिनाचा शासकीय कार्यक्रम चालू झालेला होता. या शासकीय कार्यक्रमाला शासनातील मा. उर्जा राज्यमंत्री श्री.मल्हारराव माहूलकर हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. नेहरू मैदानातून निघालेला हा मोर्चा शे-पन्नास फूट समोर गेल्यावर वनिता समाजाच्या इमारतीमध्ये शिरला. सभागृहात फारशी उपस्थिती नव्हती. पण हा मोर्चा सभागृहामध्ये शिरल्यामुळे सभागृह भरगच्च भरले व काही लोकांना बाहेरच उभे रहावे लागले. मोठमोठ्या आवाजात घोषणा सुरू झाल्यामुळे शिक्षक दिनाचा शासकीय कार्यक्रम जवळ जवळ बंदच पडला.

### काळे झेंडे व घोषणा

**१२८.** वनिता समाजाच्या तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावरील सभागृहात जातांना असलेल्या पायऱ्यांवर "काळ्या झेंड्यांची" उपलब्धी करण्यात आली.

*(सहपत्र एकवीस : परिच्छेद ११७ पहा)*

## नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ, नागपूर

### पत्र परिषदेतील निवेदन : नुटाच्या कार्यकारिणीचा ठराव दि. ३.९.७७

माननीय शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनाचा ह्या कार्यकारिणीने काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर या कार्यकारी मंडळाचे असे मत बनलेले आहे की, या योजनेमुळे थकित पगाराचा प्रश्न जेथल्या तेथेच राहील. नियमित व पूर्ण पगार वाटपाची योजना मा.शिक्षणमंत्र्यांनी जाहिर केलेली आहे. (तिचे तपशील अजूनही हाती आलेले नसतांना) ती योजना समाधानकारक व स्वागतार्ह आहे असे गृहित धरून चालले तरीही थकित पगाराचा निपटारा करण्याचे जे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलेले होते, त्याची जोड या योजनेला नसल्याने, या महत्त्वाच्या योजनेमुळे सुद्धा थकित पगाराचा प्रश्न मुळीच सुटणार नाही, म्हणून ५ तारखेपासून सुरू होणारे आंदोलन मागे घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. या संदर्भात पुढील ३ बाबी समाजाच्या व शासनाच्या निदर्शनास आणून देणे हे या कार्यकारिणीचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटते.

(१) पगाराची समस्या ही विदर्भात मुख्यत्वे नव्या आकृतिबंधामुळे निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राच्या इतर भागात पदवी परीक्षेचे तीन वर्ग पूर्ण वर्ग आहेत, तर विदर्भात ही संख्या १९८० पर्यंत अर्धी राहणार आहे.

(२) ज्युनिअर कॉलेजच्या संचालनातून अंदाजे २ कोटीच्या जवळपास शासनाला नफा होत असतांनाही शिक्षकांच्या थकित पगाराबाबत हयगय होत रहावी, याबाबत या सभेला तीव्र दुःख होत आहे.

(३) आकृतिबंधामुळे फक्त विदर्भात विविध महाविद्यालयात अनेक महिन्यांचे पगार थकित असल्याचे शासनाच्या अनेकदा लक्षात आणून दिल्यावरही आणि त्याबाबत ३० जून ७७ पर्यंत अंतिम निर्णय घेतल्या जाईल असे मा.मुख्यमंत्र्यांचे आश्वासन मिळूनही, त्याबाबतचा मागमूसही शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनात नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

केवळ आंशिक रीतीने शिक्षकांच्या समस्या हाताळण्याच्या शासनाच्या या धोरणामुळे आमच्या विद्यार्थ्यांना गैरसोय सोसावी लागण्याचा प्रसंग पुनःपुन्हा उद्‌भवू नये यासाठी संपूर्ण समस्येचा सोक्षमोक्ष लागणे आवश्यक आहे असे या संघटनेचे मत आहे.

दि. ३.९.७७ च्या वृत्तपत्रात शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या कल्याणासाठी देणग्या देण्याचे आवाहन शिक्षण मंत्रालयामार्फत जाहिरात देऊन करणे व दुसरीकडे शिक्षकांना अनेक महिने पर्यंत "विना वेतन" काम करावयास लावणे या सारखी दुर्दैवी विसंगती शोधूनही सापडणार नाही. याच बरोबर न्यायाधिकरणाच्या व्यवस्थेत दुरूस्ती करणे, एल.एम.सी. ची फेररचना करणे, कामावरून काढल्या गेलेल्या शिक्षकांना कामावर परत घेणे, समान सेवा शर्ती खाली एकत्रिकृत शिक्षकवृंद ठेवणे, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षक यांच्या नवीन वेतन श्रेणी बाबत निर्णय घेणे आदी प्रश्नांचीही सोडवणूक त्वरीत होणे आवश्यक आहे. *(P81NB1977)*

आठ बाय आठ इंच आकाराच्या पातळ काळ्या कागदाचे मधोमध कापून करण्यात आलेले दोन त्रिकोणी तुकडे एका शिक्षकाजवळ, पेन्सिलीच्या आकाराचे ९ इंच लांबीचे वेळूतुकडे दुसऱ्या शिक्षकाजवळ व तळमजल्यावरील वनिता मुद्रणालयातून मिळविलेली अर्धा किलो चिक्की तिसऱ्या शिक्षकाजवळ असे या त्रिपदरी साहित्याचे वाटप पायऱ्यांवर सुरू झाले. सभागृहामध्ये प्रवेश करणारा प्रत्येक आंदोलक या काळ्या झेंड्यासह प्रवेश करीत होता व उजवा हात उंचावून तो झेंडा फडकवित असल्यामुळे ९ इंचाच्या त्या मूळ झेंड्याची उंची सुद्धा वाढलेली दिसत होती. जोरात घोषणा सुरू झाल्या.

### राज्य पुरस्कारास नकार

**१२९.** शिक्षक दिनाच्या या शासकीय कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती नलिनीताई लढके यांना राज्यस्तरीय पुरस्कार

*(सहपत्र बावीस : परिच्छेद ११७ व १६५.३ पहा)*

## EDUCATION AND YOUTH SERVICES DEPARTMENT, MANTRALAYA

## PRESS NOTE : 02.09.1977

**Subject :** Implementation of revised scales of pay and salary payment scheme for University and College Teachers.

The University and College teachers have expressed their concern at the alleged delay in the implementation of the revised scales of pay as recommended by the UGC and in the Institution of a scheme to ensure regular and full payment of their salaries by the College Managements.

**2.** As regards the implementation of the revised UGC recommended scales of pay, it will be recalled that the State Government had issued orders in October, 1975 sanctioning the implementation of these revised scales of pay subject to certain conditions. The Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations had expressed dis-satisfaction regarding some of these conditions, particularly those relating to qualifications, workload, vacation and examination remuneration. The Federation had also filed a Writ Petition in the High Court of Bombay challenging the validity of these orders. The Writ Petition is still pending. However, following the first round of discussions of the representatives of the MFUCTO with the Chief Minister in April last, protracted discussions were in progress with the representatives of the MFUCTO with a view to exploring these conditions. Government is happy to announce that full understanding has since been reached between the State Government and the representatives of the MFUCTO regarding these conditions. **As soon as the orders of the High Court on the pending Writ Petition in the light of this understanding become available, the earlier impugned orders issued in October, 1975 will be suitably modified and issued and the revised scales will stand implemented.**

**3.** As regards the implementation of a scheme to ensure regular and full payment of salaries and allowances of the teaching and non-teaching staff of affiliated Arts, Science, Commerce and Education Colleges in the State, Government had appointed a Committee in May, 1977, under the Chairmanship of the Director of Higher Education, Maharashtra State, comprising 4 representatives each of the Managements of Colleges and the MFUCTO. After full consideration, **Government has decided that a scheme for ensuring regular and full payment of salaries and allowances of the teaching and non-teaching staff of the aforesaid affiliated colleges should be implemented broadly on the lines of the scheme recommended by the Committee.**

**4.** The salient features of the salary payment scheme approved by Government are as follows:-

(i) For every College, the Management will be required to open **two bank accounts;** (A) Salary Payment Account and (B) Non-Salary Account, in a scheduled or other approved bank, jointly in the names of the Principal of the College and a designated representative of the Management. Eighty per cent of the total receipts accruing to the college by way of fees, Government grants of various types etc. will be creditable to the Salary Payment Account, while the residual twenty per cent of the receipts will be creditable to the Non-Salary Account. Staff members of the College will also open their accounts in the same bank so that their salaries will be paid by transfer.

(ii) The amounts credited to the Salary Payment Account shall have to be utilised **exclusively for disbursement of the due salary** and allowances of the approved teaching and non-teaching staff of the college. The amounts credited to the Non-Salary Account will be available for meeting the expenditure of the college on approved items other than staff salary and allowances.

(iii) In order to ensure that sufficient balance is available from time to time in the Salary Payment Account for regular disbursement of Salary and allowances of the College Staff, Government will give ad hoc assistance in suitable instalments to every college according to its need but not exceeding the amount equal to the salary bill of the College staff for three months.

(iv) To facilitate expeditious implementation of the scheme, Government has decided to sanction immediately, as first instalment during the current year, an ad hoc assistance to Colleges, according to their need, not exceeding their two months staff salary bill. Further second instalment will be released later on, at appropriate time, during the current financial year. It is estimated that the ad hoc assistance to be given to the Colleges, as contemplated under the scheme, will be of the order of Rs. 3.50 crores per annum.

**5.** From the foregoing it will be evident that two important matters agitating the minds of the University and College teachers have now been satisfactorily resolved. Government earnestly hopes that the teachers will give up their agitational approach, extend their full cooperation and support for the effective implementation of the new three year degree course which has come into effect from the current academic year and discharges the debt they owe to the students in particular and the society in general. (P74EX77)

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
No. USG-1177 XXXII (Cell)
**Education and Youth ServicesDepartment, Mantralaya**
**Annexe Bombay-400032**
Dated 2nd September, 1977

To,
Shri B.T.Deshmukh,President,
Nagpur University Teachers' Associations,
Near, Vidarbha Mahavidyalaya, Amravati.

**Subject :** Implementation of revised scales of pay and salary payment scheme for University and College Teachers.

Sir,

I am directed to enclose for your information a copy of a Press Note issued by this Department yesterday, on the above mentioned subject.

Yours faithfully,
Sd/- (D.M.Sukthankar)
Secretary, Education and
Youth Service Deptt.

Encl. : As above. (P73EX77)

वितरित केला जाणार होता. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या श्रीमती नलिनीताई लढके उभ्या राहिल्या व त्यांनी माईक हाती घेतला. सभागृहात स्तब्ध शांतता पसरली. खणखणीत आवाजात श्रीमती नलिनीताई लढके यांनी "शेकडो महाविद्यालयीन शिक्षकांना अनेक महिन्यांचे वेतन मिळालेले नाही ही अतिशय दुःखद गोष्ट असून त्यामुळे राज्यशासनाचा पुरस्कार न स्वीकारण्याचे मी ठरविले आहे" असे आपल्या भाषणाच्या शेवटी जाहीर केले. शिक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

### आकृतिबंधाने विदर्भातील महाविद्यालयांची कंबरच मोडली

**१३०.** श्रीमती नलिनीताई लढके यांच्या भाषणानंतर मोर्चाच्या एक एका नेत्याची भाषणे सुरू झाली. शासनाने कशा कशा प्रकारची मुदतबंद लेखी आश्वासने यापूर्वी दिलेली आहेत व त्यातील एकाही आश्वासनाची पूर्ती करण्यात आलेली नाही, याबाबतचे विचार मांडले गेले. शेवटी नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी तपशीलवार भाषण करून मंत्रिमहोदयांना या असंतोषाच्या उगमस्थानाविषयी अवगत केले. आपल्या भाषणाच्या शेवटी "**आकृतिबंधाने विदर्भातील महाविद्यालयांची कंबरच मोडली**" असा मथळा असलेले व "थकित पगाराची समस्या सोडविण्यासाठी आर्थिक मदत देणे ही शासनाचीच जबाबदारी आहे. का म्हणून?" या उपमथळ्याचे एक संक्षिप्त निवेदन मा.राज्यमंत्र्यांना सादर केले. हे निवेदन दुसऱ्या दिवशीच्या बहुतेक वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले होते. तसेच १९७७ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८३ वर प्रकाशित करण्यात आले होते. त्यावेळच्या स्थितीची यथार्थ कल्पना या निवेदनाच्या वाचनाने आपणास होऊ शकते म्हणून ते शब्दश सोबत **सहपत्र : तेवीस** म्हणून प्रसृत केलेले आहे.

### शासनाच्या वतीने राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार नको

**१३१.** आम्ही व्यासपीठावरच उभे होतो. संघटनेच्या वतीने निवेदन देण्यासाठी मी ज्यावेळी मा.राज्यमंत्र्यांच्या जवळ गेलो, त्यावेळी त्यांनी निवेदन स्वीकारले व माझ्या समक्षच कार्यक्रमाच्या संचालकांना "आता कार्यक्रम संपल्याचे जाहीर करा" असे सांगितले. कार्यक्रमाच्या संचालकांनी "आता शासनाच्या वतीने मा.मंत्रिमहोदय हे डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतील व त्यानंतर हा कार्यक्रम संपेल" अशी घोषणा केली. ही घोषणा झाल्याबरोबर सभागृहातून "नाही ऽ नाही ऽ नो ऽ नो ऽ" अशा घोषणा व्हायला लागल्या. माझ्यासह आम्ही ५-७ शिक्षक व्यासपीठावरच उपस्थित होतो. होत असलेल्या या घोषणांनी आम्ही चकित झालो. पण क्षणभरातच लक्षात आले ते असे की, शासनाच्यावतीने पुष्पहार अर्पण करण्यासाठी लोक नाही ऽ नाही ऽ म्हणत होते.

### संघटनेच्या वतीने हारार्पण

**१३२.** व्यासपीठावर माझ्या बाजुला माझ्याच महाविद्यालयातील इंग्रजीचे ज्येष्ठ प्राध्यापक बी.रामाराव उभे होते, मी त्यांना म्हणालो, "सर! या नाही ऽ नाही ऽ नो ऽ नो ऽ चा अर्थ डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यास शिक्षकांनी नकार दिला असा लावून आंदोलनाचे विरोधक त्याबाबतीत अपप्रचार करू शकतील." तिक्ष्ण बुद्धीच्या प्रा.रामाराव यांनी तावडतोब माईक हाती घेऊन शिक्षक दिनाचे महत्त्व व डॉ.राधाकृष्णन यांची थोरवी याबद्दल अस्खलीत इंग्रजीत व खणखणीत आवाजात छोटेसे पण अत्यंत प्रभावी भाषण केले. शिक्षक दिनाच्या दिवशी डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्याचा अधिकार शासनाने गमावला आहे असे सांगून आपल्या भाषणाच्या शेवटी आता आमच्या संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख हे डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतील व मग हा कार्यक्रम संपेल, अशी घोषणा केली. पुन्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि त्या कडकडाटातच नुटाच्या अध्यक्षांनी डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला व नम्रतापूर्वक अभिवादन केले व कार्यक्रम संपला असल्याचे जाहीर केले.

### कार्यक्रम संपला एकदाचा

**१३३.** सभागृह भरगच्च भरलेले, पुन्हा घोषणा जोरात सुरू झालेल्या, सभागृहाच्या एका टोकाला व्यासपीठ व दुसऱ्या टोकाला बाहेर जाण्याचा दरवाजा. शिक्षकांचाच कार्यक्रम असल्यामुळे व शिक्षकांचाच मोर्चा असल्यामुळे पोलीस बंदोबस्त काही फारसा नव्हता. वातावरण अतिशय उद्दीपीत झालेले होते. आमच्यापैकी अनेकांचे व्यक्तिशः श्री.मल्हारराव माहूलकर यांच्याशी मैत्रीचे संबंध होते. आंदोलनाच्या या पूर्ण कालखंडामध्ये श्री.मल्हारराव माहूलकर यांनी आम्हा सर्वांशी अतिशय सौजन्यपूर्ण वागणूक ठेवलेली होती व त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांना त्यांच्या गाडीपर्यंत पोहचविणे ही आता आपली जबाबदारी आहे, अशी आम्हा सर्वांची भावना होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची सर्वांनाच काळजी होती. या सर्व गराड्यामध्ये १५-२० ज्येष्ठ प्राध्यापकांनी कडे केले व त्या कड्यातून मा.मंत्रिमहोदयांना गाडीपर्यंत पोहचविले. या सर्व गोंधळात क्षुब्ध झालेल्या एका ज्येष्ठ भगिनी प्राध्यापिकेने आपल्या हातातील बांगड्या

---

*(सहपत्र तेवीस : परिच्छेद १३० पहा)*

## *आकृतिबंधाने विदर्भातील महाविद्यालयांची कंबरच मोडली*

### *थकित पगाराची समस्या सोडविण्यासाठी आर्थिक मदत देणे ही शासनाचीच जबाबदारी आहे. कां म्हणून?*

(१) आकृतिबंधामुळे विदर्भात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या अर्ध्यांवर आलेली आहे. (ही परिस्थिती मुंबई विद्यापीठात नाही. त्यामुळे तेथे पगार थकण्याचा प्रश्न आला नाही.) ही स्थिती १९८० पर्यंत रहाणार आहे. याची जबाबदारी व्यवस्थापकांवर टाकता येत नाही, तशीच ती शिक्षकावरही टाकता येत नाही. आकृतिबंध आणणाऱ्या शासनानेच ती स्वीकारली पाहिजे.

(२) ज्युनिअर कॉलेजेसच्या संचालनातून लाखो रु.चा नफा महाराष्ट्र शासन मिळवित आहे. ज्या महाविद्यालयाकडून हा नफा उकळला जातो त्याच महाविद्यालयात सिनिअर कॉलेजमध्ये अनेक महिन्यांचे पगार थकले आहेत.

(३) शासकीय महाविद्यालयामध्ये दरडोई होणाऱ्या खर्चाच्या कितीतरी पट कमी खर्चात खाजगी महाविद्यालये तेच काम करतात. (उदा.१९७५-७६ या वर्षी दर विद्यार्थ्यामागे होणारा खर्च विदर्भ महाविद्यालय या शासकीय महाविद्यालयामध्ये २१६० रुपये आहे, तर तो त्याच वर्षी खाजगी महाविद्यालयातून पुढील प्रमाणे आहे. यशवंत, वर्धा २५७ रुपये, जिजामाता, बुलढाणा २८३ रुपये, जी.एस.वर्धा, ३३० रुपये, नागपूर, जी.एस.३६१ रुपये, शिवाजी अमरावती ४३५ रुपये, नॅशनल, नागपूर ४५६ रुपये. कमी खर्चात व काटकसरीने हे काम केले जाते. हा त्यांचा गुन्हा आहे काय? त्यात १९८० पर्यंत शासननिर्मित आकृतीबंधाचे गंडांतर. अशावेळी मदत करणे हे शासनाचेच काम आहे.

(४) नागपूर विद्यापीठातील महाविद्यालये कितीतरी कमी फी आकारुन शिकविण्याचे काम करतात. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांची फी (१२०० रु. च्या आतील उत्पन्न गट) शासन भरत असते. ही फी मुंबई, पुण्यामध्ये जास्त असल्यामुळे या खात्यावर तिकडील खाजगी महाविद्यालयांना कितीतरी जास्त रक्कम शासन देते. पुण्याइतकी फी विदर्भात असती तर गेल्या १० वर्षांमध्ये विदर्भात शासनाला किती रुपये जास्त द्यावे लागले असते याचा शासनाने हिशोब करावा. म्हणूनच आपत्तीच्यावेळी विदर्भातील महाविद्यालयांच्या मदतीला येणे हे शासनाचेच काम आहे. (आर्टस कॉमर्स मध्ये पदवी वर्गाला दर विद्यार्थ्यामागे वर्षाला फी पुढीलप्रमाणे आहे. नागपूर २२५ रु. मुंबई ३३० रु. पुणे व मराठवाडा ४०० रु.)

(A) वेठ बिगारीची पद्धती बंद करूच हा आमचा निर्धार आहे. ती चालू रहाण्यास शासनच जबाबदार आहे हा आमचा आरोप साधार आहे. आजवर आम्ही सहन केलेले क्लेष व आज आमच्या प्रिय विद्यार्थ्यांची आमच्या पाठिशी उभी असलेली अपार सहानुभूती हा आमचा आधार आहे.

(B) वर्षानुवर्षे वेतनकपात, अनियमित वेतन, अस्थैर्य, अप्रतिष्ठा, अन्याय, छळणूक व पिळवणूक या सर्व परिस्थितीला कायमचा पुर्णविराम देण्याकरिता प्रतिष्ठेसह कर्तव्य करू इच्छिणारा प्राध्यापक आज वर्गातून बाहेर पडलेला आहे.

(C) महाराज! शिक्षक दिनाचे हे सोंग बंद करा! शिक्षक कल्याण निधीसाठी उदारहस्ते देणग्या द्या अशा जाहिराती हजारो रुपये खर्च करून वर्तमानपत्रांत देता आणि शिक्षकांना त्यांच्या श्रमाचा-घामाचा मोबदला देण्याची वेळ आली तर तिकडे कानाडोळा करता. दीन होऊन जगण्यास आमचा स्पष्ट नकार आम्ही कळवित आहोत, असा हा आजचा शिक्षक दिन!

*महाराष्ट्राचे मा. उर्जा राज्यमंत्री श्री. मल्हारराव माहूलकर यांना दिनांक ५.९.१९७७ रोजी अमरावती येथे वनिता समाजातील शिक्षक दिनाच्या सरकारी समारोहाच्या वेळी नुटातर्फे अध्यक्षांनी वरील निवेदन सादर केले.* (P83NB1977)

काढून मंत्रिमहोदयांना अर्पण करण्याचा प्रयत्न केला. प्रसंगाच्या वृत्तांताबरोबर पुढचे दोन-चार दिवस वृत्तपत्रांमध्ये हे बांगडी प्रकरणसुद्धा चर्चिल्या गेले.

### निवडणूक मार्गदर्शन शिबिर व निदर्शने

**१३४.** शिक्षक दिनाच्या दिवशीचा आंदोलनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर त्याच आठवड्यात अमरावती येथे सत्ताधारी पक्षाच्या वतीने पुढे होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांचे एक शिबिर आयोजित करण्यात आले होते. राजकमल चौकाला लागून असलेल्या नमूना वस्तीमध्ये कोल्हटकर मंगल कार्यालयामध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या ठिकाणी निदर्शने आयोजित करण्याचा कार्यक्रम ठरविला. त्याप्रमाणे सर्व जिल्ह्यांच्या पदाधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा करून शक्य होईल तेवढ्या प्राध्यापकांनी या निदर्शनाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे असे ठरविण्यात आले. खासदार श्री.मधुसूदन ऊर्फ नानासाहेब वैराळे हे या शिबिरामध्ये मुख्य मार्गदर्शक होते. कोल्हटकर मंगल कार्यालयामध्ये हे शिबिर प्रत्यक्ष सुरू झाले, तेव्हा विदर्भातून आलेल्या जवळ जवळ एक हजार प्राध्यापकांनी मंगल कार्यालयासमोर जोराजोरात घोषणा द्यायला सुरूवात केली.

### निवडणूक प्रचार प्रशिक्षण शिबिरापुढे निदर्शने

**१३५.** निवडणूक प्रचार प्रशिक्षणाच्या या शिबिरामध्ये उपस्थिती ही मोजक्याच निमंत्रितांची होती. मंगल कार्यालयाच्या द्वारावर जवळ जवळ एक हजार बाराशे प्राध्यापक मोठमोठ्या आवाजात घोषणा देत होते. शिबिरामध्ये आत कोण कोणाशी काय बोलत होते? हे त्यांना घोषणांच्या आवाजामुळे ऐकू येत नव्हते. शिबिर सुरू होण्याच्या १५-२० मिनिटे अगोदर मोठ्या संख्येने प्राध्यापक निदर्शनासाठी उपस्थित झाल्यामुळे वेळेवर शिबिरासाठी आलेल्या अनेक निमंत्रितांना मंगल कार्यालयात शिरतासुद्धा आले नाही. अगदी सर्वांच्याच ठळकपणे लक्षात राहिलेली नमूद करण्यासारखी घटना म्हणजे विदर्भातील ज्येष्ठ नेते व माजी शिक्षण मंत्री श्री.अण्णासाहेब ऊर्फ पी.के.देशमुख यांचे निवासस्थान बाजूलाच गांधी चौकातच असल्यामुळे पायी चालत ते शिबिराच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी आले. त्यावेळेला मंगल कार्यालयाच्या दारासमोर प्राध्यापकांची इतकी गर्दी होती की, त्यांनी आत न जाता मंगल कार्यालयाच्या पुढे असलेल्या एका घराच्या ओट्यावर खुर्ची टाकून बसून राहणे पसंत केले. निदर्शनाचा सबंध कार्यक्रम शेवटपर्यंत बाजूच्या ओट्यावर बसून ते पहात होते. त्यांच्या सोबत आलेल्या अनेक निमंत्रितांना सुद्धा बाहेरच थांबावे लागले.

### खासदार वैराळे यांच्याशी चर्चा

**१३६.** कोणतीही विशेष चर्चा न होता काही वेळाने हे शिबिर गुंडाळावे लागले. शिबिरातून बाहेर पडतांना निदर्शने करणाऱ्या प्राध्यापकांपैकी प्रा.डॅडी देशमुख यांच्याशी श्री.नानासाहेब वैराळे यांनी बोलणे केले व तुमच्या शिष्टमंडळाशी मला चर्चा करावयाची आहे असे सांगून विश्रामगृहावर चर्चेसाठी निमंत्रण दिले. शिबिर संपल्यामुळे निदर्शनाचा कार्यक्रम सुद्धा संपला. दुपारी विश्रामगृहावर जाऊन नुटाच्या प्रतिनिधी मंडळाने श्री.नानासाहेब वैराळे यांची भेट घेतली व त्यांच्याशी आंदोलनामध्ये अंतर्भूत असलेल्या प्रश्नांच्या बाबतीत चर्चा केली. श्री.नानासाहेब वैराळे यांनी तुम्ही मुख्यमंत्र्यांशी किंवा शिक्षणमंत्र्यांशी चर्चा का करीत नाही? असे आम्हाला विचारले, त्यावर त्यांना आम्ही असे सांगितले की, चर्चा खूप झालेल्या आहेत, तीन मतैक्यपत्रे नोंदविल्या गेली आहेत. त्या तीनही मतैक्यपत्रात दिलेल्या मुदतबंद आश्वासनांची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही, ही आमची मुख्य तक्रार आहे. विशेषतः ८-१० महिने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे वेतन होत नाही, या गोष्टीचे श्री.नानासाहेब वैराळे यांना आश्चर्य वाटले व आपण मुख्यमंत्र्यांच्या कानावर ही गोष्ट घालू असे त्यांनी आम्हाला सांगितले.

### शासनस्तरावर हालचाली

**१३७.** श्री.मल्हारराव माहूलकर व श्री.नानासाहेब वैराळे या दोन ज्येष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या किंवा शिक्षणमंत्र्यांच्या कानावर काय गोष्टी टाकल्या असतील? हे आम्हाला काही कळले नाही. मात्र या शिक्षकांमधील असंतोष अत्यंत तीव्र स्वरूपाचा आहे, निश्चितपणे आपले काहीतरी चुकत आहे व त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे अशा प्रकारची भावना राज्यकर्त्यांच्या कानावर या दोनही नेत्यांनी निश्चितपणे घातली असावी असा अंदाज करण्याला जागा आहे. याचे कारण शासनस्तरावर आंदालेनकर्त्यांशी तातडीने चर्चा घडवून आणली पाहिजे याबाबतच्या हालचाली जोरात सुरू झालेल्या होत्या. **दिनांक ११ सप्टेंबर १९७७ रोजी मा.शिक्षणमंत्र्यांनी चर्चेसाठी बोलाविले असल्याचे निमंत्रण नुटाच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत येऊन पोहचले होते.**

### शासनाकडून चर्चेसाठी निमंत्रण

**१३८.** नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक ९ सप्टेंबर १९७७ रोजी भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्व जिल्ह्यांच्या प्रतिनिधींनी त्या त्या जिल्ह्यातील आंदोलनाची स्थिती कशी आहे? याबाबतचा तपशीलवार आढावा सादर केला. सर्व जिल्ह्यांमध्ये वेतन वितरणाची योजना तातडीने लागू झाली पाहिजे याबाबत शिक्षकांच्या भावना अत्यंत तीव्र असून आंदोलनाची स्थिती उत्तम आहे, असे सर्व जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी नमूद केले. दिनांक ११ सप्टेंबर १९७७ रोजी दुपारी ३.०० वाजता मुंबई येथे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी चर्चेसाठी निमंत्रण दिले आहे, अशी माहिती संघटनेच्या अध्यक्षांनी कार्यकारी मंडळाला दिली. संघटनेच्या वतीने चर्चेसाठी जाणाऱ्या शिष्टमंडळामध्ये प्राचार्य अण्णासाहेब वैद्य यांचा समावेश करण्यात यावा, असा एक स्वतंत्र ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला.

### आंदोलन तीव्र करण्याचा ठराव

**१३९.** वेतन वितरणाची व्यवस्था स्थापीत करण्याबाबत प्रतिनिधी मंडळाने आग्रही राहावे व अशी व्यवस्था स्थापन होणार नसेल तर २० सप्टेंबर पासून आंदोलन आणखी तीव्र केल्या जाईल अशा प्रकारचा आणखी एक ठराव त्या दिवशीच्या बैठकीत संमत करण्यात आला. हा संपूर्ण ठराव **सहपत्र : चोवीस** म्हणून सोबत प्रसृत करण्यात आला आहे.

### नुटाचे प्रतिनिधीमंडळ मुंबईत

**१४०.** संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख, उपाध्यक्ष प्रा.शरद कळणावत, सरकार्यवाह प्रा.अरविंद बारहाते, कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा.डी.एस.जाजुर्ले, प्राचार्य बी.एस ऊर्फ डॅडी देशमुख आणि प्राचार्य जी.एस.ऊर्फ अण्णासाहेब वैद्य अशा सहा सदस्यांचे नुटाचे प्रतिनिधी मंडळ दिनांक ११ सप्टेंबर १९७७ रोजी मुंबई येथे पोहचले. दुपारी ३.०० वाजताची वेळ मा. शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी देण्यात आलेली होती. प्रतिनिधी मंडळाने सकाळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.शंकरराव गेडाम व राज्यमंत्री श्री.सुधाकरराव नाईक या दोन विदर्भातील मंत्र्यांची भेट घेतली व विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्रासमोर निर्माण झालेली परिस्थिती त्यांच्या कानावर घातली व करावयाच्या उपाययोजनेबाबत त्यांच्याशी चर्चा केली.

### समझोतापत्र न्यायालयात सादर होणार

**१४१.** दिनांक ११ सप्टेंबर १९७७ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी प्रतिनिधी मंडळाची चर्चा सुरू झाली. नुटाच्या वतीने प्रतिनिधी मंडळाचे उपरोक्त सहाही सदस्य या चर्चेला उपस्थित होते. शासनाच्या वतीने मा. उच्च शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्याशिवाय उच्च शिक्षण संचालक श्री.सु.द.वाळ हे चर्चेला उपस्थित होते. विशेष निमंत्रणावरून नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्राचार्य श्री.मो.म.लांजेवार हे उपस्थित होते.

---

*(सहपत्र चोवीस : परिच्छेद १३९ पहा)*

## *२० सप्टेंबर पासून आंदोलन तीव्र केले जाईल*

### *नुटाच्या कार्यकारी मंडळाचा ठराव*

**दिनांक ०९.०९.१९७७**

थकित पगारासह नियमित पगार वाटपाची व्यवस्था व इतर सर्व मागण्यांसाठी दि. ५.९.७७ पासून सुरू केलेले हे आंदोलन २०.९.७७ पासून अधिक तीव्र केले जाईल व त्यासाठी प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

(१) २०.९.७७ पासून व त्यानंतर महाराष्ट्र शासनाचे मंत्री विदर्भात कोणत्याही ठिकाणी सार्वजनिक सभेत भाग घेत असतील तर त्या त्या ठिकाणचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी काळे झेंडे घेऊन शांततापूर्वक निदर्शने करतील. आकृतीबंधाच्या वाटचालीमुळे विदर्भातील महाविद्यालये कशी मोडून निघत आहेत, हे घोषणांच्या द्वारे व्यक्त करतील.

(२) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री किंवा शिक्षणमंत्री हे नागपूर किंवा अमरावती यापैकी कोणत्याही ठिकाणी २० तारखेनंतर ज्या दिवशी येतील त्या दिवशी विदर्भातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात काळी निशाणे दाखवून शांततापूर्वक निदर्शने करतील.

(३) दि. २५.९.७७ पासून सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम अंमलात आणल्या जाईल.

जे काम शासकीय महाविद्यालयामध्ये २१६३ रूपयात सरकार करीत आहे ते काम ४०० रुपयामध्ये खाजगी महाविद्यालये करीत असतांना व शासनाच्या (आ)कृतीबंधाने ती महाविद्यालये मोडून पडायला लागली असतांना शासन मख्खपणे बसले आहे. याचा धिक्कार करणे ही या कायदेभंगामागची शिक्षकांची भूमिका राहील. *(P80NB1977)*

या शिवाय प्राचार्य डॉ. देवीसिंग शेखावत हेही या चर्चेला उपस्थित होते. दिनांक ११ सप्टेंबर १९७७ रोजी झालेली ही चर्चा अनिर्णित राहिली व ती दिनांक १२ रोजी सुरू राहिली. दिनांक १२ सप्टेंबर १९७७ रोजीच्या चर्चेमध्ये मा. उच्च शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या एक गोष्ट लक्षात आणून दिली ती अशी की, मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये झालेल्या तीन मतैक्यपत्राच्या आधारावर समझोतापत्राचा एकत्रित मसुदा सादर करण्यासाठी मा.खंडपीठाने उद्याची तारीख दिलेली आहे. समझोतापत्राचा असा एकत्रित मसुदा न्यायालयात सादर केला जाईल.

### समझोतापत्राबाबत घ्यावयाची काळजी

**१४२.** अगदीच तांत्रिकदृष्ट्या विचार केला तर वेतन वितरण व्यवस्थेच्या स्थापनेसाठीचे हे आंदोलन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या परिषदेने दिनांक ६ व ७ मार्च १९७७ रोजी केलेल्या ठरावानुसार महाराष्ट्रात सुरू होते. प्रत्यक्ष व्यावहारिक विचार केला तर हे आंदोलन फक्त नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रातच सुरू होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ६ व ७ मार्च १९७७ च्या ठरावात २८ ऑगस्ट १९७७ रोजीच्या ठरावान्वये महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दुरूस्ती केली होती. या दुरूस्तीप्रमाणे घटक संघटनांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात या आंदोलनात सहभागी होण्याची तारीख स्वतंत्रपणे ठरविण्याची मुभा दिलेली होती. ५ तारखेला प्रत्यक्ष आंदोलन नागपूर विद्यापीठ क्षेत्रात सुरू झाले होते. १३ तारखेपर्यंत इतर कोणतीही घटक संघटना या आंदोलनात उतरलेली नव्हती. त्यामुळे आंदोलनातून मार्ग काढण्याच्या प्रश्नावर शासनाशी चर्चा करण्याचे काम नुटाचे प्रतिनिधी मंडळ करीत होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी बाबत समझोत्याचा असा एकत्रित मसुदा सादर केला जाणार आहे याची नुटाच्या प्रतिनिधींना जाणीव होती. मात्र असा मसुदा तयार करतांना वेतन वितरण व्यवस्थेबाबत किंवा त्यासाठी चालू असलेल्या आंदोलनाबाबत काही विपरित मजकूर मतैक्यपत्रात समाविष्ट होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक झाले होते.

### न्यायालयातील उपस्थिती

**१४३.** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी उपरोक्त माहिती दिल्यामुळे दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी न्यायालयात होणाऱ्या घटनाक्रमाकडे जागरुकपणे पाहणे हे एक जास्तीचे काम नुटाच्या प्रतिनिधी मंडळासमोर उभे झाले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांबाबतीत उभयपक्षी एकत्रित मसुदा सादर व्हायला कोणाचीही कोणतीही हरकत असण्याचे काहीही कारण नव्हते. मात्र मतैक्यपत्रातील वेतन वितरण योजनेच्या मसुद्याविषयीचा उल्लेख अतिशय मोघम असल्यामुळे त्याबाबतीत कोणत्याही प्रकारची अट महासंघातर्फे मान्य केली जाणार नाही, हे पाहणेसुद्धा आवश्यक होते. त्यामुळे दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी नुटाचे आम्ही प्रतिनिधी न्यायालयाच्या खंडपीठासमोर उपस्थित झालो. मा. न्यायमूर्ती श्री.तुळजापूरकर यांच्या चेम्बरमध्ये दुपारी २.४० वाजता कामाला सुरुवात झाली. शासनातर्फे शासनाचे वकील श्री.गुरशानी, शिक्षण सचिव श्री.द.म.सुकथनकर व उपसचिव श्री.टेंबे हे हजर होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे संघटनेचे कायदेपंडित श्री.मदन फडणीस, महासंघाचे अध्यक्ष प्रा.एल.बी.केणी, सचिव श्री.किशोर ठेकेदत्त व कोषाध्यक्ष प्रा.कामत व नुटाच्या प्रतिनिधी मंडळातर्फे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख, उपाध्यक्ष शरद कळणावत, सचिव प्रा.अरविंद बारहाते, प्रा.डी.एस.जाजुर्ले व बी.एस.देशमुख असे आम्ही न्यायालयात हजर होतो.

### न्यायमूर्तींनी पुढची तारिख दिली

**१४४.** मला एक गोष्ट येथे नमूद केली पाहिजे ती अशी की, वेतन वितरण व्यवस्थेबाबत किंवा चालू असलेल्या आंदोलनाबाबत कोणताही विपरित मजकूर न्यायालयात सादर करावयाच्या समझोतापत्रात समाविष्ट होणार नाही याची पुरेपूर काळजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या उपरोक्त तिनही शीर्षस्थ नेत्यांनी घेतली होती. उभयपक्षी तयार होऊन आलेला मसुदा हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांच्या योजनेशीच संबंधित होता. पण त्या मसुद्यातसुद्धा दोन महत्त्वाच्या उणिवा राहिलेल्या होत्या. सुनावणी होत असतांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांबाबतचा शासननिर्णय कोणत्या तारखेच्या आत निघेल हे एक व दुसरे म्हणजे १ जानेवारी १९७३ पासूनची थकबाकी कोणत्या तारखेच्या आत दिली जाईल याबाबत शासनाने निश्चित तारीख ठरवावी अशी विनंती महासंघाच्या वकिलांनी न्यायमूर्तींना केली. त्यावर "३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी असा शासननिर्णय काढल्या जाईल" असे आश्वासन शिक्षण सचिवांनी न्यायमूर्तींसमोर दिले. १.१.१९७३ पासूनची थकबाकी ही कोणत्या तारखेपावेतो देण्यात येईल हे सांगता येणार नाही असे शिक्षण सचिवांनी सांगितले. त्यावर मा.न्यायमूर्तींनी असे मत व्यक्त केले की, ही बाब बरीच रेंगाळलेली आहे, तेव्हा निश्चित तारखेच्या आत थकबाकी अदा करणे किंवा गरज पडल्यास ॲडहॉक पेमेंट करणे जास्त बरे होईल व त्याबाबत सल्ला मसलत करून खंडपीठासमोर निश्चित भूमिका सांगण्यासाठी २२ सप्टेंबर १९७७ रोजी पुन्हा हजर रहा असे आदेश मा.खंडपीठाने दिले.

### अहवालातील शिफारशींच्या आधारावर वेतन वितरण व्यवस्थेची बांधणी असावी

**१४५.** दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी सायंकाळी मा. शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाशी पुन्हा चर्चा सुरू झाली. चर्चेमध्ये मुख्य विषय वेतन वितरणाची व्यवस्था स्थापीत करणे हाच होता. उच्च शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालामुळे वेतन वितरण व्यवस्थेचे स्वरूप जवळ जवळ स्पष्ट झालेले होते. ढोबळमानाने त्या **अहवालातील शिफारशींच्या आधारावर वेतन वितरण व्यवस्थेची बांधणी असावी** याबाबत उभयपक्षी जवळ जवळ एकमत झाले. दिनांक १२ सप्टेंबर १९७७ रोजी व दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी झालेल्या चर्चेमध्ये नुटाच्या प्रतिनिधी मंडळाने मा. शिक्षणमंत्र्यांच्या समोर असा प्रस्ताव मांडला की, "सबंध आकडेवारीचा अभ्यास केला असता तीन महिन्यांच्या वेतनाइतके तदर्थ सहाय्य दिल्यास वेतन वितरण व्यवस्था उत्तमपणे चालू शकते. **समितीच्या अहवालामध्ये तीन महिन्याचे तदर्थ सहाय्य व ते कमी पडल्यास शासनाच्या मान्यतेने "एक महिन्याचे अतिरिक्त तदर्थ सहाय्य" अशी शब्दरचना आहे."** त्या ऐवजी **"तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम तदर्थ सहाय्य म्हणून देण्यात यावी व कमी पडल्यास "एक महिन्याच्या**

*(सहपत्र पंचवीस : परिच्छेद १४५ व १५० पहा)*

**Document containing different assurances given by E. & Y.S.D.**
**Appendix "A"**

## Education & Youth Services Department
## 14th September, 1977

**(1)** As assured in the course of the hearing before the High Court of Bombay on 13th September 1977 the Government Resolution sanctioning the implementation of the revised UGC recommended scale of pay with effect from 1.1.1973 **will be issued on or before 31st October 1977.**

**(2)** Government orders sanctioning a Scheme to ensure regular and full payment of due salary and allowances to the teaching and non-teaching staff of aided non-Government Arts, Science, Commerce and Education Colleges **will also be issued on or before 30th September 1977.** The Scheme contemplates the release of adhoc assistance to these Colleges of the order of their three months' salary bill, in general. The Scheme also provides that, if need be, with the prior approval of Government, an adhoc assistance even in excess of three months' salary bill may be given to Colleges to fulfil the requirements of the Scheme.

**(3)** To enable the Colleges to make **latest by 10th November 1977,** the payment of salary etc. of their teaching and non-teaching staff relating to the period from 1.4.1977 to 30.9.1977, orders releasing an adhoc assistance to Colleges, as mentioned in (2) above, of an aggregate amount of Rs. 2.30 crores will be issued immediately.

**(4)** As regards arrears of salary for the period prior to 1st April 1977, the matter will be examined separately.

14.9.77 **Sd/- D.M.Sukthankar, Secy. E. & Y.S.D.**

(P86NB1977)

**वेतनाइतकी जादा रक्कम शासनाच्या मान्यतेने देण्यात येईल." या शब्दरचनेच्या ऐवजी "कमी पडल्यास आवश्यक तेवढी रक्कम शासनाच्या मान्यतेने देण्यात येईल" अशी शब्दरचना असावी" अशी विनंती करण्यात आली.** अशा शब्दरचनेमुळे आर्थिकदृष्ट्या शासनावर काही जादा भार पडत नसला तरी शिक्षकांच्या दृष्टीने सेवानिवृत्ती वेतन योजना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना, रजा प्रवास सवलत योजना इत्यादी सुविधा प्रदान करतांना येणाऱ्या अडचणी त्यामुळे दूर होऊ शकतात. नुटाच्या प्रतिनिधी मंडळाचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घेतल्यानंतर मा. शिक्षणमंत्र्यांनी नुटाच्या अध्यक्षांकडे पाहून पुढीलप्रमाणे उद्‌गार काढलेत :- "तुम्ही स्वतः या समितीचे सदस्य होता. समितीने एकमताने अहवाल दिलेला आहे. त्या अहवालामध्ये "तीन अधिक एक" महिन्याच्या वेतनाइतके तदर्थ सहाय्य अशी शिफारस करण्यात आलेली आहे. मंत्रिमंडळासमोर ठेवावयाचा प्रस्ताव आज (१३.०९.१९७७) तयार झाला असतांना किंवा होत असतांना वेळेवर असा बदल करणे कितपत शक्य होईल हे पहावे लागेल. याबाबतीत काय करता येईल ते आपण पाहू." थकित वेतन अदा करण्याच्या प्रयोजनार्थ २ कोटी रुपयाच्या वर निधीची आवश्यकता असेल, असा अंदाज उच्च शिक्षण संचालकांनी या चर्चेत सांगितला. दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये योजनेच्या स्वरूपाविषयी उभयपक्षी एकमत झालेले असले, तरी आर्थिक बाबतीत त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या काही बाबींना मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेल, असे मा.शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी सकाळी १०.०० वाजता मंत्रिमंडळाची बैठक आहे, तेव्हा त्याच दिवशी दुपारी २.०० वाजता पुन्हा प्रतिनिधी मंडळाशी चर्चा होईल असे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगितल्यावर १३ तारखेची याबाबतची बैठक संपली.

### आश्वासन पत्राचे स्वरूप

**१४६.** दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी सकाळी मंत्रिमंडळाची बैठक आटोपल्यानंतर दुपारी २.०० वाजता पुन्हा नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी चर्चा सुरू झाली. या चर्चेच्या वेळी उपरोक्त उपस्थितांशिवाय शिक्षण खात्याचे सचिव श्री.द.म.सुकथनकर हेही या बैठकीला उपस्थित होते. सुरुवातीलाच झालेल्या चर्चेवरून आमच्या असे लक्षात आले की, वेतन वितरणाची व्यवस्था स्थापीत करण्याच्या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या आर्थिक भाराच्या प्रस्तावाला शिक्षणमंत्र्यांनी मंत्रिमंडळाची मान्यता मिळविलेली होती आणि त्यामुळे चर्चेचा मार्ग बराच सुलभ झालेला होता. चर्चेच्या शेवटी शासनाने मान्य केलेल्या मुद्यांबाबतचे एक आश्वासनपत्र शिक्षण सचिवांच्या सहीने प्रतिनिधी मंडळाच्या सुपूर्द करावे असे ठरले. या आश्वासनपत्रामध्ये पहिला मुद्दा हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांबाबतचा होता. त्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "१३ सप्टेंबर १९७७ रोजी मा.उच्च न्यायालयामध्ये शासनाने कबूल केल्याप्रमाणे १.१.१९७३ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू करण्याबाबतचा शासननिर्णय हा दिनांक ३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी प्रसृत करण्यात येईल." शासनाच्या वतीने उच्च शिक्षण सचिवांनी स्वाक्षरीत करून द्यावयाच्या या आश्वासनपत्रामध्ये दुसरा मुद्दा हा वेतन वितरणाच्या स्थापनेबाबतचा असावा असे ठरले. त्यामध्ये शासनातर्फे असे नमूद करण्यात आले होते की, "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करणारा शासननिर्णय दिनांक ३० सप्टेंबर १९७७ रोजी किंवा त्यापूर्वी निर्गमित करण्यात येईल." "१ एप्रिल १९७७ ते ३० सप्टेंबर १९७७ या कालखंडातील थकीत पगाराचा निपटारा करण्यासाठी महाविद्यालयांना २ कोटी ३० लक्ष इतक्या रूपयांपर्यंतचे तदर्थ अर्थसहाय्य १० नोव्हेंबर १९७७ पूर्वी उपलब्ध करून देण्यात येईल." असेही मान्य करण्यात आले.

### आंदोलन मागे घेण्याचा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळामध्येच होईल

**१४७.** ही सर्व चर्चा आटोपली असतांना व शासनाच्या वतीने शिक्षण सचिवांनी स्वाक्षरीत करून द्यावयाच्या आश्वासन पत्राचा मजकूर टंकलिखित होत असतांना "आता आंदोलन मागे घेतल्याचा निर्णय तुम्ही जाहीर करा" असे शिक्षणमंत्र्यांनी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला सुचविले. त्यावेळी नुटाच्या प्रतिनिधी मंडळातर्फे मा. शिक्षणमंत्र्यांना असे सांगण्यात आले की, "झालेल्या चर्चेमुळे व टंकलिखित होत असलेल्या आश्वासन पत्रामुळे आमचे समाधान झालेले आहे हे खरे असले तरी हे आंदोलन नुटाच्या कार्यकारी मंडळाने सुरू केलेले असल्यामुळे ते मागे घेण्याबाबतचा निर्णयसुद्धा नुटाच्या कार्यकारी मंडळामध्येच होईल. नुटाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक उद्या सकाळी अमरावती येथे बोलाविण्यात आलेली असून तेथेच त्या बैठकीत अंतिम निर्णय घेतल्या जाईल."

### शिक्षण सचिवांनी दिलेले आश्वासन पत्र

**१४८.** एवढ्यात आश्वासन पत्राचा मजकूर टंकलिखित होऊन आला व शिक्षण खात्याचे सचिव श्री.द.म.सुकथनकर यांनी स्वाक्षरीत करून ते आश्वासन पत्र नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या हवाली केले व ही बैठक संपली. हे आश्वासन पत्र सोबत **सहपत्र : पंचवीस** म्हणून प्रसृत करण्यात आले आहे. बैठक संपत असतांना १९७५ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्र्यांशी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली व त्यानंतर शिक्षणमंत्र्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा महाराष्ट्रात अंमलात आणण्याचे मान्य केले व त्या प्रकारचे निवेदनसुद्धा दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी विधानमंडळामध्ये केले. प्रत्यक्ष शासननिर्णय निर्गमित झाला तो मात्र विपरित निघाला. या गोष्टीची आठवण करून देऊन मा. शिक्षणमंत्र्यांना आम्ही अशी विनंती केली की, "आज आपले जे लेखी ठरलेले आहे, ते अतिशय समाधानकारक आहे. यात काही वाद नाही. मात्र त्याप्रमाणेच शासननिर्णय निघाला पाहिजे याची आपण काळजी घ्यावी." आमची ही विनंती ऐकल्यावर शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी असे उद्‌गार काढले की, "आता कोणतीही काळजी न करता उद्यापासून तुम्ही सर्व लोक शिकविण्याचे काम उत्तमपणे सुरू करा" व तेथेच त्या दिवशीची बैठक संपली.

### नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक

**१४९.** आम्ही बैठकीच्या ठिकाणाहून बाहेर पडल्याबरोबर दुसऱ्या दिवशी नुटाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक अमरावती येथे बोलाविण्याचे निरोप वेगवेगळ्या माध्यमातून आमच्या सहकाऱ्यांमार्फत पाठविले. व्ही.टी. रेल्वे स्टेशनवर बसल्या बसल्या तीन परिच्छेदांचा एक लहानसा अहवाल (Report of the Delegation of NUTA) संघटनेचे सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी तयार केला व स्टेशनलाच लागून असलेल्या एका टाईपिंग इन्स्टिट्युट मधून तो टंकलिखित करून घेतला. रात्रीच्या गाडीने आम्ही सारे परत आलो. दिनांक १५ सप्टेंबर १९७७ रोजी सकाळी ११.३० वाजता नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे सुरू झाली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सभेला उपस्थिती अतिशय चांगली होती. कार्यकारी मंडळाच्या सदस्यांशिवाय आंदोलनामध्ये सक्रिय असलेले काही ज्येष्ठ नेते व जिल्ह्याचे पदाधिकारी यांना सुद्धा विशेष निमंत्रित म्हणून बोलाविण्यात आले होते. याबाबतचा कार्यकारी मंडळाच्या बैठकीच्या अधिकृत कार्यवृत्तातील लागुपूरता भाग शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"Minutes of the meeting of the Executive Committee of NUTA held on 15.09.1977 at 11.30 A.M. at Bhartiya Mahavidyalaya, Amravati. The following members were present :- (1) Shri B.T.Deshmukh, in Chair (2) Shri S.K.Kalnawat (3) Shri A.V.Barhate (4) Shri E.H.Kathale (5) Shri A.S.Satputaley (6) Shri D.S.Jajurley (7) Shri B.B.Heda (8) Shri M.K.Deshpande (9) Shri V.S.Kulkarni (10) Shri V.K.Wasu (11) Shri U.S.Pande (12) Shri P.V.Gosawi (13) Shri B.S.Deshmukh (14) Shri S.D.Joglekar

Shri R.G.Kale, Shri Y.W.Wadaskar, Shri V.S.Shenwai, Shri N.Shanware, Shri N.S.Vaidya, Shri S.B.Chanchamaltpure, Shri V.H.Ghorpade, Shri R.G.Tatte, Shri S.A.Tiwari attended the meeting on special invitation."

### दोन महत्वपूर्ण दस्तऐवज

**१५०.** कार्यकारी मंडळाच्या बैठकीसमोर शिक्षण सचिवांच्या सहीने देण्यात आलेले आश्वासन पत्र **(सहपत्र : पंचवीस)** हे एक व संघटनेचे सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी तयार केलेला तीन परिच्छेदांचा एक लहानसा अहवाल **(सहपत्र : सव्वीस)** असे दोन दस्तऐवज प्रसृत करण्यात आले होते. याबाबतचा कार्यवृत्तातील भाग शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"At the outset, in the meeting following two documents were circulated amongst the members:-

(1) "Report of the Delegation of NUTA" prepared by the Secretary of NUTA regarding the negotiations with Government at Bombay.

(2) Appendix-A Document of assurances signed by Secretary E.&Y.S.D. Government of Maharashtra.

Prof.B.T.Deshmukh also placed on the table the copy of the agreement (terms of settlement) between the Government of Maharashtra and MFUCTO submitted to the Court on 13th Sept. 1977 and explained the stand taken by the Delegation."

### आंदोलन मागे घेण्याचा निर्णय

**१५१.** नुटाच्या प्रतिनिधी मंडळाने सादर केलेला अहवाल व आश्वासन पत्र विचारात घेऊन कार्यकारी मंडळाने आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"शासन नियंत्रित नियमित व पूर्ण पगार वाटपाच्या मा.शिक्षणमंत्र्यांनी दि. २ सप्टेंबर १९७७ रोजी घोषित केलेल्या योजनेतील दोष दूर करून ती दुरूस्त स्वरूपांत मान्य केल्यामुळे, तसेच १ एप्रिल १९७७ पासूनच्या थकीत पगाराच्या निपटाऱ्याचे मुदतबंद अभिवचन देण्यात आलेले असल्याने व त्या बरोबरच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणी विषयीचा शासकीय ठराव दि. ३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी काढला जाईल असे शासनाने उच्च न्यायालयात दिलेले आश्वासन लक्षात घेऊन, दि. १ ऑगस्ट १९७७ पासून नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने सुरू केलेले आंदोलन शुक्रवार, दि. १६.९.१९७७ पासून मागे घेण्यात येत आहे." *(P86NB1977)*

### मा. शिक्षणमंत्र्यांचे आभार

**१५२.** राज्याच्या मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी ज्या तत्परतेने लक्ष घालून हा प्रश्न हाताळला त्याबद्दल त्यांचे आभार मानणारा ठराव सुद्धा कार्यकारी मंडळाच्या त्या दिवशीच्या बैठकीत संमत करण्यात आला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"Committee also expressed its deep sense of gratitude to the Education Minister Shrimati Pratibhatai Patil for the cooperation she has given during negotiations and also to other ministers from Vidarbha who helped in finding out the solution to the problems faced by the College Teachers in Vidarbha."

### मा. शिक्षणमंत्र्यांची अमरावती भेट

**१५३.** दिनांक १५ सप्टेंबर १९७७ रोजी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतला. दुसऱ्या दिवसापासून विद्यापीठीय व महाविद्यालयातील कामकाज नियमित सुरू झाले. त्याच आठवड्यात घडलेल्या एका महत्त्वपूर्ण घटनेचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अगोदरच्या दिवशी डॉ. देवीसिंग शेखावत यांनी फोनवरून मला असा निरोप दिला की, "उद्या शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील सकाळी मेलने अमरावतीला येत आहेत. येतांना वेतन वितरण व्यवस्थेच्या तयार झालेल्या शासननिर्णयाचा मसुदा सुद्धा त्या सोबत घेऊन येणार आहेत. तुम्ही स्वतः तो एकदा पाहून घ्यावा, अशी त्यांची इच्छा आहे."

### नुटा नेत्यांची अनौपचारिक बैठक

**१५४.** उपरोक्त निरोप मिळाल्यानंतर मी नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांना फोनवरून निरोप देऊन सायंकाळी अमरावती येथे येण्याची विनंती केली. त्याप्रमाणे बहुतेक सदस्य उपस्थित झाले. वेळ इतका कमी होता की, कार्यकारी मंडळाची औपचारिक बैठक घेणे शक्य नव्हते. संध्याकाळी आमची अनौपचारिक बैठक झाली. या बैठकीमध्ये मा.शिक्षणमंत्री ह्या उद्या अमरावती येथे येत असून बहुधा शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्थेच्या शासननिर्णयाचा मसुदा त्या सोबत घेऊन येतील. आपण तो मसुदा काळजीपूर्वक पाहून काही सूचना करावयाच्या असतील तर आपल्याला त्या करता येतील. खरे म्हणजे १४ तारखेला जे आश्वासन पत्र नुटाला देण्यात आले होते, त्याप्रमाणे हा शासननिर्णय ३० सप्टेंबर १९७७ पूर्वी काढला जाईल असे त्यात नमूद होते. पण एका आठवड्यातच असा शासननिर्णय निघेल अशी आम्ही कल्पना केली नव्हती. याबाबतीत इतक्या लवकर हा शासननिर्णय निर्गमित होत आहे, यामुळे सर्वच सदस्यांना आनंद झालेला होता व त्या आनंदाच्या वातावरणामध्ये उद्या आपण बडनेरा येथे मेल वर जावे अशा प्रकारची भावना सर्वच सदस्यांनी व्यक्त केली.

### शासननिर्णय निर्गमित झाला

**१५५.** दुसऱ्या दिवशी सकाळी नुटाच्या कार्यकारी मंडळाचे आम्ही अमरावतीला उपस्थित असलेले सदस्य बडनेरा रेल्वे स्टेशनवर गेलो. प्लॅटफॉर्मवर मुंबई-हावडा मेल थांबली व मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील प्रथम श्रेणीच्या डब्यातून प्लॅटफॉर्मवर बाहेर आल्या. संघटनेच्या वतीने पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. प्लॅटफॉर्मवर उतरता क्षणी त्यांनी त्यांचे खाजगी सचिव श्री.अक्षीकर यांना सर्वांसमक्ष "तुम्ही जो शासननिर्णयाचा मसुदा सोबत आणलेला आहे तो प्रा.बी.टी.देशमुख यांना द्या" असे सांगितले व माझ्याकडे पाहून त्या असे म्हणाल्या की, "शासननिर्णयाचा मसुदा तयार आहे, तुम्ही तो नीटपणे पाहून घ्या व दुपारी ४ वाजता सर्कीट हाऊसवर त्यामध्ये काही दुरुस्ती आवश्यक असल्यास तसे सांगा, म्हणजे तो शासननिर्णय निर्गमित करण्यात येईल." मा. शिक्षणमंत्र्यांचा ताफा रवाना झाल्यानंतर त्यांच्या मागोमाग स्कुटरवर आम्ही सारे भारतीय महाविद्यालयात आलो व आमच्या अनौपचारिक बैठकीला सुरुवात झाली. "A scheme to ensure regular and full payment by College Managements of the salary and allowances of the teaching and non-teaching staff of aided non-government Colleges of Arts, Science, Commerce and Education in Maharashtra" या मथळ्याच्या शासननिर्णयाच्या मसुद्याच्या परिच्छेदनिहाय वाचनाला सुरुवात झाली. जवळ जवळ दीड तासानंतर शासननिर्णय व त्या शासननिर्णयाचे परिशिष्ट यांचे तपशीलवार वाचन होऊन मसुदा समाधानकारक असल्याचे आम्हा सर्वांचे मत झाले. दुपारी ४ वाजता आम्ही सर्वांनी सर्कीट हाऊसवर मा.शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भेट घेतली. "शासननिर्णयाचा मसुदा व्यवस्थित झालेला आहे, त्यामध्ये कोणतीही दुरूस्ती सुचविण्याची आवश्यकता आहे, असे आम्हाला वाटत नाही." असे आम्ही त्यांना सांगितले. आमच्या समोरच त्यांनी त्यांचे खाजगी सचिव श्री.अक्षीकरांना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना शासननिर्णय निर्गमित करण्याविषयी सूचना देण्यासाठी सांगितले. **तदनुसार उपरोक्त मथळ्याचा शासननिर्णय (No.NGC 1277/122166/**

*(सहपत्र सव्वीस : परिच्छेद १५० पहा)*

## Report of the Delegation of NUTA

The NUTA delegation consisting of, (1) Prof.B.T.Deshmukh, President, NUTA (2) Prof.S.K.Kalnavat, Vice-President, NUTA (3) Prof.A.V.Barhate, Secretary, NUTA (4) Prof.D.S.Jajurley, Member of the Executive Committee (5) Prof.B.S.Deshmukh, Member of the Executive Committee and (6) Principal, G.S.Vaidya, left for Bombay on 10th, on the invitation of the Education Minister, Shrimati Pratibhatai Patil, to have a dialogue regarding the demands of the University and College Teachers.

**(2)** The delegation met the Hon'ble Minister for Food and Civil Supplies, Shri Shankarrao Gedam and the Hon'ble Minister for Education and Youth Services, Shrimati Pratibhatai Patil, at the residence of the Education Minister on 11th Sept. 1977 at 3.00 P.M. Shri M.M.Lanjewar,Vice-Chancellor, Nagpur University, Shri S.D.Bal, Director of Higher Education and Principal Dr.Shekhawat were also present and participated in the discussions between the delegation and the Government. The discussions were inconclusive.

**(3)** on 12th and 13th there were other rounds of discussions between the delegation and the Minister for Education. The delegation also contacted several Ministers from Vidarbha area and appraised them of the situation being faced by the College Teachers. On 13th evening the Education Minister told the delegation that some of the issues will have to be placed before the Cabinet. Accordingly, she requested the delegation to meet again at 2.00 P.M. on 14.09.77. After the Cabinet meeting which was held at 10.30 A.M. on 14.09.77, the Education Minister again discussed the matter in detail with the delegation at 2.00 P.M. The Secretary of Education Dept. Shri D.M.Sukhthankar, and Shri Bal, Director of Higher Education were also present. In the said meeting **a document containing different assurances was prepared and signed by Shri D.M.Sukhathankar,** and the same was handed over to the delegation. The said document is enclosed herewith as Appendix (A). The Education Minister also requested the delegation to announce the withdrawal of the agitation. But the delegation told her that the decision in the matter will be taken by the Executive Committee of NUTA, in its meeting convened on 15th September, 1977 at Amravati.

The delegation expressed thanks to the Education Minister for the cooperation given by her.

**Dated : 15th Sept. 1977** **(A.V.Barhate) Secretary, NUTA**

*(P86NB1977)*

**XXXII (Cell) दिनांक २१ सप्टेंबर १९७७ रोजी निर्गमित झाला.**

## आमसभेसमोर नाराजीचा ठराव

**१५६.** मुंबई येथील चर्चा संपताना "ठरते एक व शासननिर्णय वेगळाच निघतो तेव्हा ठरल्याप्रमाणे शासननिर्णय निघावा" अशी आम्ही विनंती केली होती. शासननिर्णयाचा मसुदा तयार होत असतांना मा.शिक्षणमंत्र्यांनी तो ठरल्याप्रमाणेच निघाला पाहिजे याबाबत चांगलीच काळजी घेतली होती ही गोष्ट स्पष्ट झाली. इतकेच नव्हे तर तयार झालेला मसुदा प्रथम आम्हाला दाखवून, "काही दुरूस्त्या असल्यास सांगा," ही त्यांनी घेतलेली भूमिका, त्या भूमिकेला प्रतिसाद म्हणून आम्ही शिक्षणमंत्र्यांचे केलेले स्वागत, या घटनाक्रमाच्या परिणामी व्यक्तिशः मला संघटनेचा अध्यक्ष म्हणून संघटनांतर्गत एका कटू प्रसंगाला सामोरे जावे लागले. मा. शिक्षणमंत्र्यांचे संघटनेतर्फे करण्यात आलेले स्वागत यामुळे डाव्या विचारांच्या संघटनेतील काही सदस्यांमध्ये नाराजी निर्माण झालेली होती, असे पुढील घटनाक्रमावरून आढळून आले. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या घटनेप्रमाणे वर्षातून किमान दोन आमसभा झाल्याच पाहिजे असे बंधन आहे. त्यात आजपर्यंत कधीही खंड पडला नाही. त्याप्रमाणे पुढची जी आमसभा बोलाविण्यात आली त्या आमसभेच्या विचारार्थ संघटनेचे ज्येष्ठ सदस्य प्रा.उदयन शर्मा यांनी एक ठराव पाठविला होता. हा ठराव शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"नुटाने आंदोलन मागे घेतल्यानंतर नुटाचे अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुखांच्या नेतृत्वाअंतर्गत काही प्राध्यापक मंडळींनी बडनेरा रेल्वे स्टेशनवर माननीय नामदार सौ. प्रतिभाताई पाटील आणि नामदार श्री. माहूलकर ह्यांचे जे विशेष स्वागत नुटाच्या वतीने करण्यात आले ते संघटनेच्या संघर्षात्मक स्वरूपाला हितावह नसून सर्वसाधारण सदस्यांमध्ये गैरविश्वास निर्माण करणारे आहे."

## नाराजीचा ठराव कामकाज पत्रिकेत

**१५७.** नुटाच्या कामकाजाच्या पद्धतीप्रमाणे आमसभेसमोर येवू घातलेले सर्व ठराव हे नुटाच्या कार्यकारी मंडळापुढे विचारार्थ ठेवले जातात. त्या प्रत्येक ठरावावर कार्यकारी मंडळाचे धोरण ठरविले जाते. त्या ठरावाला पाठिंबा द्यायचा किंवा नाही याचा विचार कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये केला जातो. कार्यकारी मंडळातर्फे पर्यायी ठराव द्यावा किंवा कसे? याचाही विचार केला जातो. त्या नंतर तो ठराव आमसभेच्या कामकाज पत्रिकेत प्रसृत केला जातो. रविवार, दिनांक ३० ऑक्टोबर १९७७ रोजी वर्धा येथे झालेल्या नुटाच्या आमसभेमध्ये विषय क्रमांक २० वर प्रा.उदयन शर्मा यांचा उपरोक्त ठराव समाविष्ट करण्यात आला होता. कार्यकारी मंडळामध्ये ज्यावेळेला चर्चा झाली त्यावेळेला शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्थेच्या बाबतीत अतिशय चांगला शासननिर्णय निर्गमित झालेला असतांना अशा प्रकारचा ठराव प्रा.उदयन शर्मा यांनी मांडू नये म्हणून त्यांच्याशी कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी चर्चा करावी असे मत कार्यकारी मंडळामध्ये काही सदस्यांनी मांडले. त्याबाबतीत मी कार्यकारी मंडळामध्ये असे विचार मांडले की, प्रा.उदयन शर्मा यांनी हा ठराव काही व्यक्तिगत आकसापोटी मांडलेला आहे, असे मला मुळीच वाटत नाही. त्यामागे त्यांचे एक निश्चित धोरण आहे. तेव्हा आपण सुद्धा धोरण धारणेच्या निश्चितीची संधी म्हणूनच या ठरावाकडे पाहिले पाहिजे. प्रा.उदयन शर्मा यांच्या ठरावामुळे या विषयावर आमसभेला धोरणात्मक निर्णय करण्याची संधी मिळणार आहे, तेव्हा आमसभेच्या कामकाज पत्रिकेत हा ठराव प्रसृत करण्यात यावा व त्याबाबतीत आमसभेतच यथोचित निर्णय केला जावा असे ठरले.

## आभाराचा ठराव कामकाज पत्रिकेत

**१५८.** नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने वेतन वितरण व्यवस्थेचा शासननिर्णय निर्गमित केल्याबद्दल मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील व मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांच्या प्रती आभार व्यक्त करणारा ठराव आमसभेमध्ये मांडण्यात यावा. असेही कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ठरले. प्रा.उदयन शर्मा यांचा ठराव कामकाज पत्रिकेमध्ये प्रसृत झालेला असल्यामुळे व त्याचबरोबर वेतन वितरण व्यवस्थेचा शासननिर्णय निर्गमित झाल्याबद्दल आभार व्यक्त करणारा कार्यकारी मंडळाचा तपशीलवार ठराव सुद्धा कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला असल्यामुळे आमसभेला उपस्थिती खूपच चांगली होती. आमसभेमध्ये घडलेल्या घटनाक्रमाची माहिती मी आता नमूद करू इच्छितो. आमसभेच्या कामकाज पत्रिकेवर विषय क्रमांक ५ वर **नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने संघटनेचे सचिव प्रा. श्री. अरविंद बारहाते व कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा.पी.पी.गोसावी यांनी मांडलेला पुढील ठराव एकमताने संमत करण्यात आला:-**

"महाराष्ट्र शासनाने दि. २१.९.१९७७ रोजी प्रसृत केलेल्या शासकीय ठराव क्र. NGC 1277/122166/XXXII (cell) अन्वये महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता शासन नियंत्रित नियमित पगार वाटपाची जी व्यवस्था प्रस्थापित केलेली आहे त्याबद्दल हे सभागृह महाराष्ट्र शासनाप्रती हार्दिक आभार व्यक्त करीत आहे. ही व्यवस्था प्रस्थापित करण्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील व शिक्षणमंत्री श्रीमती प्रतीभाताई पाटील यांनी जी विधायक व कळकळीची भूमिका घेतली त्याबद्दल त्यांच्याही प्रती अशाच भावनेची नोंद करणे हे सभागृह आपले कर्तव्य मानते." *(P44NB78)*

## आमसभेतील घटनाक्रम

**१५९.** वर्धेला ही आमसभा ३० ऑक्टोबर १९७७ रोजी वर्धा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या रेल्वे स्टेशन जवळील सभागृहामध्ये पार पडली. सभागृह खचाखच भरलेले होते. विषय क्रमांक २० वर प्रा.उदयन शर्मा यांचा ठराव सभागृहामध्ये ज्यावेळेला चर्चेसाठी आला त्या वेळेला "ठरावामध्ये व्यक्तिशः माझे नाव असल्यामुळे व या ठरावावरील चर्चेत मला भाग घ्यावयाचा असल्यामुळे अध्यक्ष म्हणून संघटनेच्या उपाध्यक्षांनी काम करण्यास सभेने अनुमती द्यावी" अशी विनंती प्रा.बी.टी.देशमुख यांनी केली. त्याप्रमाणे या ठरावावरील चर्चेच्या वेळी उपाध्यक्ष यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. शासननियंत्रित वेतन व्यवस्थेचा २१.९.१९७७ रोजीचा शासननिर्णय निर्गमित होऊन जवळ जवळ एक महिन्यापेक्षा जास्त काळ झाला होता. संघटनेने मोठे यश मिळविले आहे, अशी शिक्षकांची भावना होती. अनेक महिन्याच्या विलंबाने वेतन होण्याच्या दुस्थितीला कंटाळलेल्या शिक्षकांना त्या शासननिर्णयामुळे मनापासून आनंद झाला होता. हा आनंद इतका एकतर्फी होता की, एकामागून एक सदस्यांनी विचार व्यक्त करतांना असा ठराव आपण मंजूर करू नये अशी भावना व्यक्त केली. संघटनेचा अध्यक्ष या नात्याने मी असा विचार मांडला की, "शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनाला बाधक होतील अशा तरतुदी शासननिर्णय काढून अंमलात येत असतील तर त्याला ठामपणे विरोध करणे हे जसे संघटनेचे काम आहे तसेच व्यावसायिक जीवन सुसह्य होईल अशा तरतुदींचा शासननिर्णय निर्गमित होणार असेल किंवा झाला असेल तर त्या शासननिर्णयाचे स्वागत करणे हे सुद्धा आपले कर्तव्य समजले पाहिजे."

## नाराजीचा ठराव मागे घेतला

**१६०.** बडनेरा रेल्वे स्टेशनवर जाऊन मा. शिक्षणमंत्र्यांचे स्वागत करण्याच्या प्रसंगाची तपशीलवार माहिती मी सभेला दिली व पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केले :-

"राज्याचे मुख्यमंत्री किंवा शिक्षणमंत्री किंवा मंत्री जिल्ह्याच्या ठिकाणी दौऱ्यावर आल्यास त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या ठिकाणी निदर्शने करण्याचा कार्यक्रम आंदोलनाचा भाग म्हणून नुटाने जाहीर केला होता. आंदोलनाच्या या संपूर्ण कालखंडामध्ये राज्याच्या शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी अमरावतीला येण्याचे टाळले व नंतर त्या अमरावतीला आल्या तर वेतन वितरण व्यवस्था स्थापनेच्या शासननिर्णयाचा मसुदा घेऊनच आल्यात. केवळ त्यांनी मसुदा सोबत आणला असे नव्हे तर संघटनेच्या अध्यक्षांना निरोप देऊन हा मसुदा एकदा पाहून घ्या, ठरल्याप्रमाणे झाले नसेल, काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्या आपल्याला दुरूस्त करता येतील, असे सांगून शासननिर्णय निर्गमित करण्यापूर्वी त्या शासननिर्णयाच्या मसुद्याची प्रत संघटनेच्या सुपुर्द केली. महाविद्यालयीन शिक्षकांच्या एका अत्यंत जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या प्रश्नाला हाताळतांना मा. शिक्षणमंत्र्यांनी जी भावना व्यक्त केली त्याला जर संघटनेचा अध्यक्ष म्हणून मी योग्य तो प्रतिसाद दिला नसता तर ती गोष्ट संघटनेच्या दृष्टीने अत्यंत अनुचित ठरली असती."

मुंबई येथे चर्चेच्या शेवटी आम्ही केलेली विनंती, त्याला मा.शिक्षणमंत्र्यांनी दिलेला प्रतिसाद, शासननिर्णयाच्या मसुद्याची संघटनेला देण्यात आलेली प्रत हा घटनाक्रम प्रा.उदयन शर्मा यांना ठराव पाठवितांना निश्चितच ठाऊक नव्हता. चर्चेच्या शेवटी सभागृहातील एकंदर भावना लक्षात घेऊन प्रा.उदयन शर्मा यांनी आपला ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची परवानगी मागितली व सभागृहाने ती दिली. *(P44NB78)*

## मा. मुख्यमंत्र्यांना निमंत्रण

**१६१.** कार्यकारी मंडळाच्या सर्वच सदस्यांमध्ये शिक्षणमंत्र्यांबद्दल केवळ आभार प्रदर्शनाचा ठराव करून आपण थांबू नये तर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दृष्टीने या शासननिर्णयाचे एवढे महत्त्व आहे की, आपण शिक्षणमंत्र्यांचा जाहिरपणे सत्कार केला पाहिजे अशा प्रकारची भावना तीव्रतेने व्यक्त होत होती. आमसभेतील चर्चेमुळे व घटनाक्रमामुळे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या या भावनेला आम शिक्षकांचे भरपूर पाठबळ आहे ही गोष्ट सुद्धा स्पष्ट झाली होती. नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या आम्ही काही सदस्यांनी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भेट घेतली व त्यांना अशा सत्कार समारंभाचे निमंत्रण दिले. त्यावेळेला त्यांनी जे उद्‌गार काढले ते असे की, "तुम्ही माझा काय सत्कार करीत आहात? खरा सत्कार राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा करायला पाहिजे. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी याबाबतीत पाठबळ दिले नसते, तर मला ही योजना अंमलात आणणे कठीण गेले असते आणि म्हणून सत्कार करावयाचा असेल तर तो राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा करा." त्यावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना निमंत्रण देण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. श्रीमती प्रतिभाताई पाटील

यांनी स्वतः पुढाकार घेऊन मुख्यमंत्री व आमची भेट घडवून आणली. त्यांच्या उपस्थितीतच या सत्कार समारंभाचे निमंत्रण आपण स्वीकारावे अशी आम्ही मा. मुख्यमंत्र्यांना विनंती केली व त्यांनी ती मान्य केली.

### एकमेव प्रसंग

**१६२.** शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्था स्थापित केल्याबद्दल व उरलेल्या प्रश्नांच्या बाबतीत सुद्धा शासनातर्फे सहकार्यच राहील या समाधानकारक आश्वासनाबद्दल राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील व शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचा नागपूर विद्यापीठ शिक्षक (नुटा) संघातर्फे करण्यात आलेला सत्कार समारंभ दिनांक ४ नोव्हेंबर १९७७ रोजी सकाळी ८.१५ वाजता नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.डी.वाय.गोहोकार हे होते. सन १९७७ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १९९ वर या समारंभाची निमंत्रण पत्रिका प्रसृत करण्यात आली होती आणि विदर्भाच्या सर्व भागातून शिक्षकांची भरगच्च उपस्थिती या समारंभाला लाभली होती. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने जाहीरपणे सत्कार केलेले श्री.वसंतदादा पाटील हे पहिले व एकमेव मुख्यमंत्री असून श्रीमती प्रतिभाताई पाटील ह्या पहिल्या व एकमेव शिक्षणमंत्री होत. सन १९६३ मध्ये नुटाची स्थापना झाल्यापासून तर आजपर्यंतच्या काळात राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा किंवा शिक्षणमंत्र्यांचा असा जाहीर सत्कार आयोजित करण्याचा या संघटनेच्या प्रदीर्घ संघटनात्मक व संघर्षमय प्रवासातील हा एकमेव प्रसंग आहे, हे नमूद करणे मला आवश्यक वाटते.

### आंदोलनातील पूर्व पक्ष व उत्तर पक्ष

**१६३.** शिक्षकांच्या संघटनांनी तीव्रतेने व तर्कशुद्ध पद्धतीने आपले प्रश्न मांडल्याशिवाय व त्या प्रश्नांच्या तीव्रतेचे प्रमाण लक्षात घेऊन तेवढ्याच तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटत नाहीत हे तर खरेच आहे. या अर्थाने विचार करू जाता **संघटना हा आंदोलनातील पूर्व पक्ष असतो.** व्यावसायिक जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांची तर्कशुद्ध पद्धतीने निवड करणे, निवड केलेल्या प्रश्नांची शास्त्रीय आधारावर मांडणी करणे, प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीची तीव्रता आपल्या सदस्यांच्या लक्षात आणून देणे, ज्यांचे प्रश्न त्यांनाच सोडवावे लागतात हे खरे असले तरी ढोबळमानाने प्रश्नांच्या तीव्रतेबाबत समाज मनामध्ये जाणीव निर्माण करणे, या समाजाचा भाग असलेल्या आपल्या विद्यार्थ्यांच्या मनाचा कल सांभाळणे, हे शिक्षक संघटनांसाठी महत्त्वाचे काम असते. आपल्या विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करणाऱ्या व आपला व्यवसाय निष्ठापूर्वक सांभाळणाऱ्या शिक्षकांचा व शिक्षक नेत्यांचा समूह संघटनेच्या सर्व स्तरावरील नेतृत्त्व मंडळात कार्यरत असेल तर लाभणारे विद्यार्थ्यांचे उदंड पाठबळ हा त्या संघटनेच्या वैभवाचा भाग असतो. जबाबदारीची जाणीव ठेवून या वैभवाचा वापर करावा लागतो. शासनाच्या वतीने प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय नेत्यांची संवेदन क्षमता ही सुद्धा महत्त्वाची बाब असते. **असे राजकीय नेते हा या आंदोलनातील उत्तर पक्ष असतो.** आंदोलनात अंतर्भूत असलेल्या प्रश्नांची योग्यायोग्यता समजावून घेण्याची शक्ती सत्ताधारक राजकीय नेत्यांच्या ठायी असली पाहिजे **ही पहिली बाब,** अशी शक्ती केवळ असून भागत नाही तर आंदोलनाधीन प्रश्न सोडविण्याची इच्छाही अशा राजकीय नेत्यांकडे असावी लागते **ही दुसरी बाब, तिसरी महत्त्वाची बाब** म्हणजे एखादा निर्णय अंमलात आणावयाचा असेल तर शासन नावाच्या यंत्रणेतील कोणकोणत्या मांडवात कोणकोणती प्रक्रिया पार पाडावी लागते, ती प्रक्रिया सहजपणे पार पाडावयाची कार्यवाही पुरी करण्याची क्षमता असणे ही होय. या तीन पैकी एक जरी बाब कमी असेल तर आंदोलने चिघळली जातात. फार मोठे आंदोलन करून अत्यंत अल्प यश मिळते अशी कितीतरी उदाहरणे नमूद करता येतील.

### योजनेच्या प्रवासातील प्रत्येक टप्प्यावर शिक्षणमंत्र्यांचे लक्ष

**१६४.** एका बाजूला नुटाच्या कार्यकारी मंडळाने मा. शिक्षणमंत्र्यांचे आभार मानणारा ठराव १५ सप्टेंबर १९७७ रोजीच्या बैठकीत मंजूर केला होता, तर दुसऱ्या बाजूला नुटाच्या आमसभेने सुद्धा शिक्षणमंत्र्यांचे आभार मानणारा ठराव दिनांक ३० ऑक्टोबर १९७७ रोजीच्या बैठकीत संमत केला होता. त्यानंतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा व शिक्षणमंत्र्यांचा जाहीर सत्कारच संघटनेने केलेला होता. याबाबतीत हे नमूद केले पाहिजे की, केवळ औपचारिकता पार पाडावयाची म्हणून हे ठराव केलेले नव्हते किंवा सत्कार समारंभाचे आयोजन ही सुद्धा केवळ औपचारिकता नव्हती. शिक्षणमंत्री या नात्याने श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी या वेतन वितरण व्यवस्थेच्या स्थापनेसाठी जे मन ओतून काम केले होते, मंत्री या नात्याने आपले पूर्ण कर्तृत्व कामी लावले होते त्याबद्दल व्यक्त करण्यात आलेली ती भावना होती. **पूर्वपक्षाने उत्तर पक्षाच्या कर्तृत्वाला दिलेला तो मनःपूर्वक प्रतिसाद होता.** वेतन वितरण व्यवस्थेच्या स्थापनेमध्ये शिक्षणमंत्री या नात्याने श्रीमती प्रतिभाताई पाटील या प्रत्येक घटनाक्रमावर व प्रत्येक टप्प्यावर बारिक लक्ष ठेवून होत्या. त्यातील काही टप्पे मी नमूद करू इच्छितो. या प्रत्येक टप्प्यात त्यांनी आपले कर्तृत्व कामी लावले होते, असे आपणास दिसून येईल. ते टप्पे पुढीलप्रमाणेः-

**(१) सल्लामसलत ते राज्यस्तरीय समिती :** वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करण्याबाबतचा विचार दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या मतैक्यपत्रामध्ये मान्य करण्यात आला होता. मतैक्यपत्रातील तो मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"It was agreed that to fulfil these commitments made by Government, a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges will be evolved **after consultation with the Managements of Colleges and the M.F.U.C.T.O.** The scheme will be finalised before the end of June, 1977." *(P209NB19)*

मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या पहिल्या मतैक्यपत्रात अशा योजनेची स्थापना करण्याचे उद्दिष्ट मान्य करण्यात आले असले तरी त्यात इतर तपशीलाबाबतचे उल्लेख मोघम आहेत. या कामासाठी समिती नेमण्याचा उल्लेख त्या मतैक्यपत्रात नाही. **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी व व्यवस्थापकांशी सल्लामसलत करण्याचा उल्लेख त्यात आहे.** ढोबळमानाने मान्य करण्यात आलेल्या या मोघम आश्वासनाला काटेकोरपणे कार्यप्रवण करण्याचे काम खात्याचे नेतृत्व करणाऱ्या शिक्षणमंत्र्यांनी पार पाडले होते. त्या दृष्टीने विचार केला तर **औपचारिक राज्यस्तरीय समिती नेमण्याचा निर्णय घेऊन या सल्लामसलतीच्या (consultation) उल्लेखाला त्यांनी निश्चित असे रेखिव स्वरूप दिले.**

**(२) राज्यस्तरीय समितीची रचना :** समिती नेमण्याचा निर्णय मा. शिक्षणमंत्री यांनी त्यांच्या स्तरावर घेतला. त्यामुळे समितीची रचनासुद्धा त्यांनीच ठरविली. ही रचना काळजीपूर्वक पाहिली तर निश्चित उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी ही रचना ठरविली होती असे दिसून येते. दिनांक ५ मे १९७७ रोजी समिती स्थापनेचा शासननिर्णय शिक्षण विभागाने निर्गमित केला. उच्च शिक्षण संचालक हे या राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष होते. त्या शिवाय मंत्रालयातील या विभागाचे उपसचिव हे या समितीचे शासकीय सदस्य होते. ११ सदस्यांच्या या समितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे चार प्रतिनिधी होते. तर व्यवस्थापकांचे ४ प्रतिनिधी या समितीमध्ये नेमण्यात आले होते. मुंबईच्या उच्च शिक्षण विभागाच्या कार्यालयातील अधिक्षक यांची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करण्यात आली होती. अशी ही ११ सदस्यांची राज्यस्तरीय समिती या शासननिर्णयाप्रमाणे नेमण्यात आली होती. **समितीची ही एकंदर रचना वेतन वितरणाची उत्तम व्यवस्था स्थापित करण्याच्या दृष्टीने झालेली व एका बाजूला झुकलेली अशी व्यवस्था होती असे निश्चितपणे म्हणता येईल.**

**(३) समितीचे अध्यक्ष :** समितीचे अध्यक्ष म्हणून उच्च शिक्षण संचालक यांची नेमणूक करण्यात आलेली होती. अनेकदा अशा समितीचा अध्यक्ष हा शासन यंत्रणेचा भाग नसतो. तो अशासकीय व्यक्ती असेल तर समितीच्या बैठका बोलाविणे, समितीच्या कामाचा वेग वाढविणे किंवा कमी करणे, समितीच्या अहवालामध्ये येणारे निष्कर्ष यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहत नाही. समितीचा अध्यक्ष हा जर शासकीय यंत्रणेचा भाग असेल तर शासनाला योग्य वाटणारी बाब करवून घेण्यात त्या पदधारकाची मोठीच मदत होते. उदा. समितीच्या बैठका बोलाविणे, समितीचा अहवाल मुदतीच्या आत सादर करवून घेणे ही तर कामे पार पाडता येतातच पण त्याचबरोबर **समितीमध्ये काय घडामोडी झाल्या आहेत याची वेळोवेळी माहिती शिक्षणमंत्र्यांपर्यंत पोहचू शकते व त्या माध्यमातून समितीच्या कामाला यथोचित वळण देता येते.**

**(४) समितीची कार्यकक्षा :** ज्या शासननिर्णयाने ही राज्यस्तरीय समिती नेमली होती, त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये या समितीच्या कार्यकक्षासुद्धा नमूद केलेल्या होत्या. शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"To formulate and recommend to Government for its consideration **a suitable scheme to ensure, henceforth, regular and full payment of due salaries and allowances of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges in the State by the College Managements,** after taking into account the existing sources of receipts (i.e. fees and Government grants as per existing grant-in-aid formula) and items of admissible expenditure of the Colleges."

इतक्या काटेकोरपणे कार्यकक्षा ठरवून दिल्यानंतरसुद्धा समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये उच्च शिक्षण संचालक व शासनाचे उपसचिव यांनी शासकीय अनुदानाच्या विद्यमान मर्यादेतच शिफारशी करण्याचा आग्रह धरला होता. "विद्यमान अनुदान

सूत्राच्या मर्यादेतच अहवाल देण्यात यावा" या वाक्याचा अर्थ वेगळा होतो व "नियमित वेतन वितरणाची व्यवस्था स्थापित करतांना विद्यमान अनुदान सूत्र लक्षात घ्यावे" या वाक्याचा अर्थ वेगळा होतो. पुढच्या बैठकीमध्ये उच्च शिक्षण संचालकांची भूमिका पूर्णपणे बदललेली होती. महासंघाचे प्रतिनिधी व व्यवस्थापकांचे प्रतिनिधी यांचा त्यांच्या भूमिकेला ठाम विरोध हे तर कारण होतेच पण त्याबरोबरच **ती बदललेली भूमिका समितीमध्ये सांगतांना उच्च शिक्षण संचालकांनी आपली स्वतः शिक्षणमंत्र्यांशी याबाबत चर्चा झालेली आहे असे समितीच्या बैठकीमध्ये सांगितले होते.**

**(५) अहवाल सादर करण्यासाठी मुदत :** दिनांक ५ मे १९७७ रोजीच्या शासननिर्णयाने नेमण्यात आलेल्या या समितीने १ महिन्यात म्हणजे ५ जून १९७७ पर्यंत आपला अहवाल शासनाला सादर करावयाचा होता. शासननिर्णयातील याबाबतचा परिच्छेद ४ पुढीलप्रमाणे:-

"The Committee should be requested to submit its report to Government within one month, i.e. on or before 5th June 1977."

एखाद्या समितीला कार्य पूर्ण करण्यासाठी किती मुदत द्यायची, ती मुदत वाढवून देण्याची सवलत शासननिर्णयातच टाकायची किंवा शासननिर्णयात नसली तरी नंतर ती मुदत वाढवून द्यायची या बाबी निश्चित उद्दिष्ट समोर ठेवून केल्या जातात हे सर्वांनाच ठावूक आहे. समिती नेमण्याचा शासननिर्णय हे शिक्षणमंत्र्यांचे अपत्त्य होते. त्या शासननिर्णयात काटेकोरपणे अहवाल सादर करण्यासाठीची मुदत नमूद करण्यात आली होती व **ही मुदत वाढविली जाणार नाही असे समितीचे अध्यक्ष वारंवार समितीला सांगत होते.**

**(६) शासननिर्णयाचा मसुदा :** वेतन वितरण व्यवस्थेची रचना सूचविणारा जो अहवाल सादर करण्यात येणार आहे त्या अहवालाचा भाग म्हणून त्यासाठी निर्गमित करावयाच्या शासननिर्णयाचा मसुदा सुद्धा त्या अहवालात समाविष्ट असावा अशा स्पष्ट सूचना समितीच्या अध्यक्षांना देण्यात आलेल्या होत्या. समितीच्या कार्यकक्षेमध्ये तसे काही नमूद नसतांना केवळ शिक्षणमंत्र्यांनी सूचना केल्यावरूनच अध्यक्षांच्या पुढाकाराने समितीने अशा शासननिर्णयाचा मसुदा तयार केला व तो त्या अहवालाचा भाग म्हणून आठव्या प्रकरणामध्ये समाविष्ट केला. अहवाल सादर होईल मग त्या अहवालाचा कोणीतरी अभ्यास करतील व **तदुपरान्त शासननिर्णयाचा मसुदा तयार करतील यात होणारा कालापव्यय त्यामुळे टळला.**

**(७) उच्च न्यायालयातील घडामोडीबाबत सूचना :** दिनांक ११ ते १४ सप्टेंबर १९७७ या चारही दिवस नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची मा. शिक्षणमंत्र्यांशी चर्चा सुरू होती. या चर्चेमध्ये दिनांक १२ सप्टेंबर १९७७ रोजी खुद्द शिक्षणमंत्र्यांनी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला असे सांगितले की, "तुम्ही येथे वेतन वितरण व्यवस्थेबाबतच्या योजनेची चर्चा करीत आहात व उद्या उभयपक्षी वाटाघाटीचा मसुदा सादर करण्यासाठी उच्च न्यायालयामध्ये तारीख देण्यात आलेली आहे." तेथे सादर होणारा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांबाबत राहणार आहे ही गोष्ट खरी असली तरी वेतन वितरण व्यवस्थेबाबत किंवा एकूणच सुरू असलेल्या आंदोलनाबाबत हायकोर्टाचे काही आदेश झालेत तर या चर्चेवर सुद्धा त्याचे परिणाम होऊ शकतात. ह्या बाबतीत काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. **१३ सप्टेंबर १९७७ रोजी उच्च न्यायालयातील कामकाज पार पडले व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांबाबत काही मुद्यांची माहिती देण्यासाठी कोर्टाने पुढची तारीख दिली.**

**(८) आर्थिक भाराला मान्यता :** दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची मा. शिक्षणमंत्र्यांशी जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये शिक्षणमंत्र्यांनी स्पष्टपणे असे सांगितले की, "उद्या सकाळी मंत्रिमंडळाची बैठक आहे आणि आपल्या चर्चेमध्ये ठरलेल्या योजनेचा भाग असलेल्या काही बाबींना मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेल. तेव्हा उद्या मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर आपण पुन्हा चर्चेसाठी बसू." एका बाजूला वेतन वितरण व्यवस्थेची अंमलबजावणी करतांना येणारा जादा खर्च व दुसऱ्या बाजूला एप्रिल ते सप्टेंबर १९७७ या कालखंडाची थकबाकी अदा करण्यासाठी येणारा आर्थिक भार समाविष्ट असलेल्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे आवश्यक होते. दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदरहू प्रस्तावाला मा.शिक्षणमंत्र्यांनी मंत्रिमंडळाची मान्यता मिळविली असे दिसून येते. शिक्षणमंत्र्यांचा प्रस्ताव त्या दिवशीच्या (१४.०९.१९७७) **मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य करण्यात आला.**

**(९) ठरलेल्या मुदतीच्या आत शासननिर्णय निर्गमित होणे :** अमुक एका विषयावर अमुक एका तारखेच्या आत शासननिर्णय निर्गमित केल्या जाईल अशा प्रकारचे आश्वासन अनेकदा शासनातर्फे दिल्या जाते. मात्र त्याचे पालन होतेच असे नाही. कबूल केलेल्या तारखेच्या आत शासननिर्णय निघाला नाही म्हणून अनेकदा संघटनांना आंदोलने करावी लागतात अशी अनेक उदाहरणे नमूद करता येतील. "दिनांक ३० सप्टेंबर १९७७ च्या आत या संदर्भातील शासननिर्णय निर्गमित केल्या जाईल" अशा प्रकारचे लेखी आश्वासन दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी देण्यात आले होते. प्रत्यक्ष शासननिर्णय २१ सप्टेंबर १९७७ रोजीच निर्गमित झाला. **अशा प्रकारचे हे दुर्मीळ उदाहरण होय असे म्हणता येईल.**

**(१०) शासननिर्णयाचा मसुदा :** विभागाच्या मंत्र्यांची संमती झाल्या नंतरच शासननिर्णय निर्गमित होतो हे खरे असले तरी जवळ जवळ मंत्रालयामध्ये ही स्थिर झालेली पद्धती आहे की, कोणताही शासननिर्णय निर्गमित करावयाचा असेल तर मंत्रालयातील संबंधित विभागातील खालपासून तर वर पर्यंतची नोकरशाही अशा शासननिर्णयाचा मसुदा तयार करते. जो शासननिर्णय आपण निर्गमित करीत आहोत, तो बिनदोष निघाला पाहिजे याची फारशी काळजी कोणालाही नसते. आपल्याला जो काही शासननिर्णय काढावयाचा आहे तो काढून टाकावयाचा, त्यात काही दोष राहिले तर त्या दोषामुळे विपरितरीत्या प्रभावित होणारे लोक हे त्याबाबतीत आरडाओरड करतात व मग त्यानंतर त्याबाबतीत काय कारवाई करायची किंवा करायची नाही हे ठरवावयाचे अशी ही एकंदर रुढ पद्धती आहे. हा शासननिर्णय निर्गमित होत असतांना तो ठरल्याप्रमाणे बिनचूक आणि बिनदोष निघाला पाहिजे याची काळजी घेण्यात आली. संबंधित संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना त्या शासननिर्णयाचा मसुदा सुपूर्द करून त्याबाबतीत काही सूचना असल्यास सांगा **ही जी भूमिका शिक्षणमंत्र्यांनी घेतली ती शासनाच्या एकंदर कामकाजामध्ये दुर्मीळ असे उदाहरण म्हणावे लागेल.**

## सर्वात मोठी उपलब्धी

**१६५.** वेतन वितरण व्यवस्थेचा शासननिर्णय निर्गमित होत असतांना शिक्षणमंत्री त्या एकंदर प्रवासावर किती काळजीपूर्वक लक्ष ठेऊन होत्या याबाबतचे काही मुद्दे मी पूर्वपरिच्छेदातून नमूद केलेले आहेत. आता याबाबतीत सर्वात मोठी उपलब्धी म्हणून ज्याचे वर्णन करता येईल असा एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मी नमूद करीत आहे. "अनुदान सूत्रानुसार वेतन भागत नसेल तर वेतन खात्यामध्ये "**अमुक इतकी रक्कम**" तदर्थ सहाय्य (Ad hoc Assistance) म्हणून शासनातर्फे दिली जाईल" हे एक वाक्य आणि "अनुदान सूत्रानुसार वेतन भागत नसेल तर वेतन खात्यामध्ये "**आवश्यक तेवढी रक्कम**" तदर्थ सहाय्य (Ad hoc Assistance) म्हणून शासनातर्फे दिली जाईल" हे दुसरे वाक्य. या दोन वाक्यातील फरक लक्षात घेण्याबाबतचा हा मुद्दा आहे.

**१६५.१** संघटना ज्या वेळेला शासनाकडे एखादी मागणी करते त्या वेळेला बहुधा त्या मागणीची मांडणी ढोबळमानाने (Unformulated) केली जाते. क्वचित प्रसंगी, एखादी मागणी रचित मागणी (Formulated) अशा स्वरूपाची असते. रचित मागणीमध्ये अनेकदा योजावयाच्या उपाययोजनेचे बारीक सारिक तपशील हे नमूद केलेले असतात. वेतन वितरण व्यवस्थेच्या बाबतीत संघटनेने केलेली मागणी ही ढोबळमानाने केलेली मागणी होती. "महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासननियंत्रित वेतन वितरण व्यवस्थेची त्वरित स्थापना करण्यात यावी" अशा स्वरूपाची संघटनेची मागणी होती. ही ढोबळमानाने केलेली मागणी होती. या व्यवस्थेचे कोणतेही बारिकसारिक तपशील संघटनेतर्फे मांडण्यात आले नव्हते. नाही म्हणायला "विद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या व्यवस्थेसारखी ही व्यवस्था असावी" असा उल्लेख मागणीपत्रात होता. एवढाच काय तो तपशील.

**१६५.२** वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करण्यासाठी शिफारशी करणारा अहवाल देण्यासाठी म्हणून नेमण्यात आलेल्या समितीने याबाबतीत सर्वप्रथम योजनेचे बारीक सारिक तपशील आपल्या अहवालात अंतर्भूत केले. योजनेच्या यशस्वीतेसाठी कळीचा मुद्दा म्हणजे तदर्थ सहाय्याचा (Ad hoc Assistance) होय. या समितीने केलेल्या शिफारसीमध्ये निर्धारित दराने येणारे शिक्षण शुल्क व इतर मार्गांनी येणारे उत्पन्न व त्या शिवाय परिरक्षा अनुदानाच्या (Deficit Grants) माध्यमातून मिळणारे अनुदान व इतर अनुदाने हे महाविद्यालयाच्या उत्पन्नाचे मुख्य उद्भव धरले. यातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च व मान्य अशा बाबींवरील वेतनेतर खर्च महाविद्यालयाला भागवावा लागतो. या उत्पन्नातून वेतन खर्च भागत नसेल तर वेतन खर्चासाठी म्हणून **तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम महाविद्यालयाला तदर्थ सहाय्य** म्हणून दिली जाईल व ते देण्याचा अधिकार उच्च शिक्षण संचालक यांना असेल. तेवढ्या वरही वेतन खर्च भागत नसेल तर आणखी **एक महिन्याच्या वेतन खर्चा इतकी रक्कम शासनाच्या परवानगीने तदर्थ सहाय्य** म्हणून दिली जाईल अशा प्रकारची या समितीची शिफारस होती. समितीच्या अहवालातील आठव्या प्रकरणाच्या परिच्छेद सहा मध्ये नमूद असलेली ही शिफारस मी शब्दशः उधृत करीत आहे. ती पुढीलप्रमाणे:-

"The Committee therefore recommends to the Government that the Government should consider the Question of payment of an additional salary grant to a college **equal to its 3 months salary expenditure."**

"…. further additional fourth instalment of grant equal to **one**

**month's salary expenditure** of the college be released by the Director of Higher Education after (a) having ascertained the financial position of the college and the need for the payment of such additional assistance and (b) after obtaining final orders from the State Government to that effect. The payment of the fourth instalment should entirely depend upon the decision of the state Government."

**१६५.३** आंदोलन दिनांक ५ सप्टेंबर १९७७ रोजी सुरू होणार त्याच्या अगोदर २ तारखेला शिक्षणखात्याने एक तपशीलवार वृत्तपत्रीय निवेदन (Press Note) प्रसृत करून शिक्षकांनी आंदोलन करू नये अशी विनंती केली होती. या वृत्तपत्रीय निवेदनाची प्रत **(सहपत्र : बावीस)** दिनांक ०२.०९.१९७७ रोजीच्या पत्रान्वये शिक्षण सचिव श्री.द.म.सुकथनकर यांनी नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडे पाठविलेली होती. ते निवेदन काळजीपूर्वक वाचले तर त्या वेळेपर्यंत या योजनेला मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली नव्हती हे स्पष्टपणे दिसून येत होते. त्या निवेदनामध्ये फक्त तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम तदर्थ अनुदान म्हणून देण्याचा उल्लेख होता. तो पुढीलशब्दात:-

"(iii) In order to ensure that sufficient balance is available from time to time in the Salary Payment Account for regular disbursement of Salary and allowances of the College Staff, Government will give ad hoc assistance in suitable instalments to every college according to its need **but not exceeding the amount equal to the salary bill of the College staff for three months."**

शासनाच्या परवानगीने आणखी एका महिन्याच्या वेतनाइतके तदर्थ सहाय्य देण्याचा उल्लेख या निवेदनात आढळून येत नाही. दिनांक २ मे १९७७ च्या शासनाच्या वृत्तपत्रीय निवेदनाच्या काळजीपूर्वक अभ्यासानंतर आंदोलन मागे घेता येणार नाही असा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतला होता व त्याप्रमाणे आंदोलन सुरू झाले होते.

**१६५.४** दिनांक १३ सप्टेंबर १९७७ रोजी उच्च न्यायालयातील घटनाक्रम आटोपून परत आल्यावर नुटाच्या प्रतिनिधी मंडळाशी मा. शिक्षणमंत्र्यांनी चर्चा केली व "उद्या याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवलेला आहे व त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पुन्हा आपण चर्चेसाठी बसू" असे सांगितले. या साऱ्या घटनाक्रमाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, मंत्रिमंडळासमोर जो प्रस्ताव मा. शिक्षणमंत्र्यांनी ठेवला होता त्या प्रस्तावामध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी "तीन अधिक एक असे एकूण चार" महिन्याचे तदर्थ सहाय्य देणाऱ्या तरतुदीमध्ये फार मोठा अनुकूल बदल मंत्रिमंडळासमोर ठेवला होता व तो तेथे मान्य झाला होता. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी शिक्षणमंत्र्यांशी चर्चा झाली आणि जे आश्वासन पत्र शासनाच्या वतीने श्री.द.म.सुकथनकर यांनी स्वाक्षरीत करून नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या सुपूर्द केले. त्यातील याबाबतचा परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"(2) Government orders sanctioning a Scheme to ensure regular and full payment of due salary and allowances to the teaching and non-teaching staff of aided non-Government Arts, Science, Commerce and Education Colleges will also be issued on or before 30th September 1977. The Scheme contemplates the release of adhoc assistance to these Colleges of the order of their three months' salary bill, in general. The Scheme also provides that, if need be, with the prior approval of Government, **an adhoc assistance even in excess of three months' salary bill** may be given to Colleges to fulfil the requirements of the Scheme."

**१६५.५** अनुदान सूत्रानुसार "वेतन खात्यामध्ये अमुक इतकी रक्कम तदर्थ सहाय्य (Ad hoc Assistance) म्हणून दिली जाईल" ही व्यवस्था बदलून "अनुदान सूत्रानुसार वेतन खात्यामध्ये वेतन वितरणार्थ कमी पडेल इतकी रक्कम तदर्थ सहाय्य (Ad hoc Assistance) म्हणून दिली जाईल" अशा व्यवस्थेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. आश्वासन पत्रातील याबाबतचा

*(सहपत्र सत्तावीस : परिच्छेद १७४ पहा)*

**From : Prof.B.T.Deshmukh,**
President, NUTA, Phone : 3646
Near Vidarbha Mahavidyala, Amravati-444604

**Dated 17.11.1977 : No.NT/F/16**

To,
**The Honorable Minister of Education,**
Government of Maharashtra.

**Subject :** Implementation of Para 3 of the letter of assurances signed by Secretary, E. and Y.S.D. dated 14.9.1977.

Respected Madam,

I am to invite your attention to the letter of assurances signed by Shri D.M.Sukthankar, Secretary E. and Y.S.D. Government of Maharashtra, dated 14th Sept. 1977. I am enclosing herewith a copy of the same for your ready reference. (Appendix 'A') This letter was a result of the negotiations held at Bombay on 11th Sept. to 14th Sept, 1977 between six men delegation of NUTA and Hon'ble Education Minister, Shri D.M.Sukthankar, Secretary E. and Y.S.D. and Shri. S.B.Bal, Director of Higher Education were also present.

2. As was assured in Para 1 and 2 of the said letter, Govt. Resolution No. USG.1177/129387/XXXII (CELL) dated 25th October, 1977, sanctioning the implementation of the revised UGC recommendation scales was issued before 31.10.77. Govt. Resolution No. NGC 1277/122166/XXXII (CELL), dated 21st September, 1977, was also issued within the date assured, I express sincere thanks on behalf of the teachers for the same.

3. However, much concern is expressed by teaching community regarding the implementation of Para 3 of the said letter. This Para reads as follows :-

"To enable the Colleges to make latest by 10th November, 1977, the payment of salary etc. of their teaching & non-teaching staff relating to the period from 1.4.1977 to 30.9.1977, orders releasing an adhoc assistance to colleges, as mentioned in (2) above, of an aggregate amount of Rs.2.30 Crores will be issued immediately."

I have not seen any G.R. or Government Order specifying the payment of salary etc. of the teaching and non-teaching staff of aided non-Government colleges relating to the period from 1.4.1977 to 30.9.77.

4. Under the circumstances it is very much urgently required that a NUTA delegation be granted interview with your goodself, alongwith the Secretary E. and Y.S.D. and Director of Higher Education, as early as possible. Teachers from different places are rightly pressing NUTA Executive and office bearers to explain the correct position. Before NUTA Executive meets for consideration of the situation, such an interview is very much desirable to have a correct picture of the Government efforts in this respect. I hope you will kindly grant the same.

5. May I mention here that Teachers and non-teachers at G.S.College, Khamgaon have not received their due salary and allowances since 1st January, 77, inspite of the issuing of the above mentioned G.R., I am authentically informed that none of the teachers have also received a single rupee on account of adhoc advance also. May I invite your urgent attention to the great hardships faced by these teachers and non-teachers?

6. Taking into consideration the urgency of the matter and the short time available I am mentioning below the names of the NUTA delegation. They may kindly be communicated the date, time and place of the interview, if granted, directly.

Yours sincerely,
**(B.T.Deshmukh)**
President, NUTA

**Copy to :-** (1) Secretary, E & Y.S.D. Bombay (2) Director of Higher Education, Pune (3) All the members of NUTA Delegation. (4) All the members of NUTA Executive Committee. (P113NB1977)

परिच्छेद काळजीपूर्वक पाहिला तर "तीन महिने अधिक एक महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम तदर्थ अनुदान" म्हणून देण्याची शब्दरचना बदलून त्या जागी "तीन महिन्याची रक्कम व त्यानंतर कमी पडल्यास वेतन खर्चासाठी आवश्यक तेवढी रक्कम" अशी शब्दरचना प्रस्तावात आलेली होती. दिनांक १४.९.१९७७ रोजी सकाळच्या बैठकीत मंत्रिमंडळाने उपरोक्त निर्णय घेतला होता व त्याच दिवशी सायंकाळी मा.शिक्षणमंत्र्यांशी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये खुद्द शिक्षण सचिवांनी जे आश्वासनपत्र आमच्या सुपूर्द केले त्यातील उपरोक्त उल्लेख हा नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या सर्वच सदस्यांसाठी एक सुखद धक्का होता. त्याबाबतची कोणतीही जादा चर्चा करण्याची आवश्यकता त्या ठिकाणी नव्हती. फक्त "आता ठरल्याप्रमाणेच शासननिर्णय निघावा याची आपण काळजी घ्यावी" अशी आम्ही मा.शिक्षणमंत्र्यांना विनंती केली व त्या दिवशीची चर्चा संपली.

**१६५.६** पुढे याबाबतीत शासननिर्णय निर्गमित होण्यापूर्वी मा.शिक्षणमंत्र्यांची अमरावती भेट व त्यातून पुढे जो घटनाक्रम घडला त्याची तपशीलवार माहिती यापूर्वीच्या परिच्छेदातून देण्यात आलेली आहे. दिनांक २१ सप्टेंबर १९७७ रोजी निर्गमित झालेल्या शासननिर्णयातील परिशिष्टाच्या सहाव्या परिच्छेदामध्ये आश्वासन पत्रातील उपरोक्त उल्लेख जसाच्या तसा समाविष्ट करण्यात आला होता. तो पुढीलप्रमाणे :-

"**Ad Hoc assistance to Colleges :** Tuition and other fees at the prevailing rates and the grants of various types released by Government constitute the main sources of income of a College from which it meets its recurring expenditure on approved items including salary and allowances of the College employees. Pending rationalisation of the existing income and expenditure structure of the Colleges, the Director of Higher Education shall release, from time to time in a financial year, as per need, ad hoc assistance, in general, to Colleges to the extent of their three months salary bill. **If need be, with the prior approval of Government, ad hoc assistance in excess of three months salary bill may be released by the Director of Education (Higher Education) to fulfil the requirements of this Scheme.** The ad hoc assistance so released to a College shall be credited fully to the College Salary Payment Account and shall be used in its entirety for the payment of the salary and allowances of the employees of the College."

समितीच्या शिफारशीमधील वेतन वितरणार्थ वेतन खात्यात "रक्कम कमी पडल्यास "**अमुक इतकी रक्कम**" तदर्थ सहाय्य म्हणून दिली जाईल" ही शब्दरचना बदलवून त्या जागी "**कमी पडेल तेवढी रक्कम**" अशी शब्दरचना मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवतांना दाखल करून व त्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन व त्यानंतर तसा शासननिर्णय निर्गमित करून मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी या वेतन वितरण व्यवस्थेचा पाया भक्कम व मजबूत केला. ही पायाभरणी इतकी भक्कम व मजबूत होती की, पुढच्या ४०-५० वर्षात त्यात एक तसूभरसुद्धा बदल कोणाला करता आला नाही. **संघटनेच्या सर्व स्तरावर झालेले आभार व्यक्त करणारे ठराव किंवा मुख्यमंत्र्यांचा व मा. शिक्षणमंत्र्यांचा आयोजित करण्यात आलेला सत्कार समारंभ या केवळ औपचारिकता नव्हत्या हे कोणाच्याही लक्षात येईल.**

**१६५.७ तुलना करण्याचा मोह आवरत नाही यामुळेच केवळ काही तुलनात्मक बाबी समोर मांडत आहे.** वस्तुतः या प्रकरणामध्ये राज्यस्तरीय समितीचा अहवाल हा एकमताचा अहवाल होता. या समितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माझ्यासह आम्ही एकूण चार प्रतिनिधी सदस्य होतो. समितीच्या या एकमताच्या अहवालामध्ये "महाविद्यालयाचे नियमित उत्पन्न वेतन अदा करण्यासाठी कमी पडल्यास तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम तदर्थ सहाय्य (Adhoc Assistance) म्हणून देण्याचा अधिकार उच्च शिक्षण संचालकांना असावा व त्याऊपर वेतनार्थ रक्कम कमी पडल्यास **आणखी एक महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम** शासनाच्या पूर्वपरवानगीने तदर्थ सहाय्य म्हणून दिली जाईल," अशा प्रकारची शिफारस समाविष्ट होती. त्यामुळे त्याबाबतीत तशी अंमलबजावणी झाली असती तर आम्हा कोणालाही तक्रार करायला जागा नव्हती. मात्र नुटाच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा चालू असतांना १२ व १३ सप्टेंबर १९७७ रोजी नुटाच्या प्रतिनिधी मंडळातर्फे वर परिच्छेद १४५ मध्ये नमूद असल्याप्रमाणे मा. शिक्षणमंत्र्यांना विनंती करण्यात आली होती. समितीच्या शिफारशीमधील वेतन वितरणार्थ वेतन खात्यात "रक्कम कमी पडल्यास शासनाच्या पूर्व परवानगीने "**अमुक इतकी रक्कम**" तदर्थ सहाय्य म्हणून दिली जाईल" ही शब्दरचना बदलवून त्या जागी शासनाच्या पूर्व परवानगीने "**कमी पडेल तेवढी रक्कम**" अशी शब्दरचना मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवतांना दाखल करून व त्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन व त्यानंतर तसा शासननिर्णय निर्गमित करण्यात मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यशस्वी झाल्यात. हे यापूर्वी नमूद केलेले आहे.

**१६५.७.१ मंत्री या नात्याने उपलब्ध झालेल्या विधिमय अधिकाराचा वापर करतांना तुलनात्मक विचारासाठी एक उदाहरण :** दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी राज्याचे मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविले होते.

**(i)** या चर्चेच्या अधिकृत कार्यवृत्तामध्ये विषय क्रमांक ३ वर मा. मंत्रिमहोदयांचे निदेश पुढीलप्रमाणे नमूद आहेत :-

"**विषय :- सातवा वेतन आयोग लागू करावा. : मा. मंत्री यांचे निदेश :-** राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसोबतच विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात येईल. ७ व्या वेतन आयोगाअंतर्गत केंद्र सरकार जी ५०% थकबाकी देणार असेल तर त्यासाठी उच्च शिक्षण विभागामार्फत विशेष कक्ष उभारून **जानेवारी, २०१९ पूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून केंद्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल जेणेकरून त्यांच्याकडून आलेली थकबाकी प्राध्यापकांना अदा केली जाईल.**"

**(ii)** सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला जे अभिवचन आपण उच्च शिक्षणमंत्री या नात्याने दिलेले आहे त्याची इमानेइतबारी अंमलबजावणी व्हावी म्हणून श्री. विनोद तावडे यांनी उच्च शिक्षणमंत्री या नात्याने बरीच धावपळ केली असे दिसून येते. त्यांची ही धावपळ मंत्रिमंडळापुढे ठेवावयाचा प्रस्ताव तयार करेपर्यंत व तो प्रस्ताव मंत्रिमंडळामध्ये मान्य करवून घेण्यापर्यंत योग्य दिशेने चालू होती, असे म्हणता येईल. दिनांक ५ मार्च २०१९ रोजीच्या बैठकीत राज्य मंत्रिमंडळाने याबाबतीत यथोचित निर्णय घेतला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**(iii)** शासकीय कामकाजाच्या नियमाप्रमाणे मा. मंत्रिमहोदयांची संमती दर्शक स्वाक्षरी झाल्याशिवाय शासननिर्णय निर्गमित होऊ शकत नाही, हे सर्वांनाच ठाऊक आहे. उपरोक्त प्रमाणे ५ मार्च २०१९ रोजी मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला असल्यामुळे याबाबतचा शासननिर्णय दिनांक ८ मार्च २०१९ रोजी निर्गमित झाला. प्राध्यापकांमधील कमकुवत दुवे हेरून त्यांच्याशी पुढे अर्थपूर्ण चर्चा करण्याची संधी उपलब्ध राहावी म्हणून अधिकाऱ्यांनी शासननिर्णयाचा मसुदा तयार करतांना थकबाकी अदा करण्याचा भाग मंत्रिमंडळाने मान्य केलेला असला तरी शासननिर्णयाच्या मसुद्यातून वगळून टाकला. "थकबाकी प्राध्यापकांना अदा केली जाईल" असे लेखी आश्वासन आपण प्राध्यापक संघटनेला दिलेले आहे, याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने संमत केलेला आहे, या बाबी शासननिर्णयाला संमती देतांना श्री.विनोद तावडे यांच्या लक्षात राहिल्या नाहीत. श्री. विनोद तावडे यांच्या या विसरभोळेपणाची फार मोठी किंमत शिक्षकांना मोजावी लागत आहे. लक्षावधी रूपये खर्च करून प्रदिर्घ काळपर्यंत मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयात हे शेकडो शिक्षक आज न्यायालयीन संघर्ष करीत आहेत.

**१६५.७.२** विभागाचे प्रमुख या नात्याने मंत्रिमहोदयांचे उत्तरदायित्व याबाबतीत तुलनाच करण्याचा प्रश्न समोर आला म्हणून आणखी एक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे.

**(i)** महाराष्ट्र शासनातील अधिकारी व नेते यापैकी कोणालाही "प्राध्यापकांचा संप" व "प्राध्यापकांचा परीक्षेच्या कामाशी असहकार" या दोन मधील फरक प्रकरण उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात जाईपर्यंत कळला नाही, असे स्पष्टपणे दिसून येते. उच्च शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. या चर्चेचे शासनातर्फे जे अधिकृत कार्यवृत्त तयार करण्यात आले त्यातील विषय क्रमांक दोनवर मा.मंत्रिमहोदयांचे निदेश पुढीलप्रमाणे आहेत :-

"**विषय :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे. : मा. मंत्री यांचे निर्देश** :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतनाबाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव याचा अर्थ अध्यापकांनी परिक्षा काळातील काम हे उशीरा का होईना पण पूर्ण केले असून त्याला मा. सर्वोच्च न्यायालयाचे No work no pay हे निर्देश लागू होत नाहीत. तरी याबाबत विभागाकडून वित्त विभागाला परत गेलेली रक्कम विभागाला परत मिळावी जेणेकरून **७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन अध्यापकांना देण्यात येईल.**"

**(ii)** श्री. विनोद तावडे यांनी उपरोक्त प्रमाणे निदेश दिले पण त्याबाबतीत पुढे कोणतीही कारवाई केली असे दिसून येत नाही. काही महिन्यांनी ज्यावेळेला संघटनेचे पदाधिकारी त्यांच्याकडे गेले तेंव्हा त्यांनी याबाबतीत मंत्र्यांनी दिलेल्या निदेशावर निरनिराळ्या विभागातील बाबू लोकांनी काय शेरे-ताशेरे मारले याच्या हस्तलिखित टिपणीची एक झेरॉक्स प्रत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सुपूर्त केली. विदर्भातील काही प्राध्यापक त्यांना भेटायला गेले असता, मी माझ्याकडून प्रस्ताव पाठविलेला आहे. अर्थमंत्री हे विदर्भातील आहे, मुख्यमंत्री हे विदर्भातील आहे तेव्हा तुम्ही त्यांना भेटा असे ते सांगत होते. पण स्वतः ते याबाबतीत काहीच करीत नव्हते. वस्तुतः उच्च शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली निरनिराळ्या ७-८ विभागाच्या सचिवांच्या समितीमध्ये एकमताने हा निर्णय झालेला होता व त्या समितीचे अध्यक्ष व उच्च शिक्षणमंत्री या नात्याने विभाग प्रमुख म्हणून समितीच्या एकमताच्या निर्णयाप्रमाणे श्री. विनोद तावडे यांनी निदेश दिलेले होते.

*(सहपत्र अठ्ठावीस : परिच्छेद १७५ पहा)*

Nagpur University Teachers' Association

**प्रा.भा.तु.देशमुख,** अध्यक्ष 'नुटा' फोन नं. ३६४६

विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती - ४४४६०४.

दिनांक : २७.११.७७ : क्र.एन.टी. : एफ : १८

**माननीय शिक्षणमंत्री,**

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

**संदर्भ** :- माझे दिनांक १७ नोव्हेंबरचे पत्र क्रमांक : एनटी.एफ.:१६

माननीय महोदया,

माझ्या वर संदर्भ दिलेल्या पत्रामध्ये नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या प्रतिनिधी मंडळाला आपण वेळ द्यावा अशी मी आपणास आग्रहपूर्वक विनंती केली होती. दिनांक १४.९.७७ रोजी शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासन पत्रातील तिसऱ्या परिच्छेदामध्ये अंतर्भूत असलेल्या आश्वासनाच्या अंमलबजावणी संबंधी तपशील समजावून घेण्यासाठी अशी चर्चा आवश्यक होती. दुर्दैवाने या कामासाठी आपणाला वेळ देता आला नाही. याबद्दल मला दुःख होते.

एप्रिल, १९७७ ते सप्टेंबर १९७७ च्या वेतनाच्या संदर्भात देण्यात आलेल्या आश्वासनाची शासकीय अधिकारी इमानेइतबारे अंमलबजावणी करीत नाहीत, अशी तीव्र भावना शिक्षकांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. २२ सप्टेंबर १९७७ पर्यंत या थकिती बाबतचे तपशील आपण महाविद्यालयाकडून मागविले होते. १० नोव्हेंबर पर्यंत त्या बाबतचे आदेश निघावयाचे होते. अशा प्रकारचे स्पष्ट आदेश निघाल्याचे दिसत नाही.

आम्ही आपणाला हे वारंवार सांगितलेले आहे की, शासनाने लादलेल्या आकृतीबंधामुळे विदर्भातील महाविद्यालये भरडून निघाली आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, नेमकी विदर्भात आठ ते बारा महिन्याचा पगार ज्या महाविद्यालयात थकला आहे त्या महाविद्यालयात १० नोव्हेंबर पर्यंत शासनाकडून एक पैसाही पाठविण्यात आला नव्हता. आता कुठे डायरेक्टर महादेयांनी एक महिन्याच्या वेतना इतकी रक्कम पाठविल्याचे समजले आहे. खामगावचे महाविद्यालय अतिशय जुने महाविद्यालय आहे. अनेक फॅकल्टिज, अनेक विषय व अनेक माध्यमातील शिक्षण तेथे दिले जाते. शासनाच्या आकृतीबंधाने गेल्या दोन वर्षात तेथील संख्या पार निम्म्यावर आली. (पुढच्या वर्षापासून ती वाढायला लागेल) पण त्या ठिकाणी 'अॅडव्हॉक असिटन्स' पोचू शकला नाही. मानवी प्रश्नांचे शासनाने निर्माण केलेले हे गुंते सोडवितांना जो अधिकारी हृदयशून्य व्यवहार करीत आहेत त्याचा करावा तेवढा धिक्कार थोडाच आहे.

शासकीय आदेशाच्या (No.NGC/1277/122166 XXXII (CELL)) परिशिष्टातील परिच्छेद ६ कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. या परिच्छेदातील तरतुदीप्रमाणे उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी या बाबतीत करावयाची कारवाई त्वरेने न केल्यामुळे थकित पगार मिळण्याचा प्रश्न सुटण्यास विलंब लागतो आहे. आपण स्वतः लक्ष घालून उच्च शिक्षण संचालक परिच्छेद ६ प्रमाणे आवश्यक असलेली कारवाई त्वरेने करतील असे पहावे. जे १० नोव्हेंबर पर्यंत होणे आवश्यक होते ते निदान १० डिसेंबर पर्यंत होईल, अशी अपेक्षा शिक्षकांनी केल्यास त्यात त्यांची चूक होणार नाही.

या प्रश्नाचे तपशील कळवून घेण्यासाठी, समजून घेण्यासाठी चर्चेला बोलाविण्यास आपण सांगू शकला नाहीत याबद्दल खेद व्यक्त करून पुन्हा एकदा मी आपणास अशी आग्रहाची विनंती करतो की, वस्तुस्थितीचे तपशील चर्चेच्या माध्यमातून जाणून घेण्याचा नुटाचे प्रतिनिधी मंडळास अधिकार आहे.

शासकीय ठरावाच्या परिच्छेद ६ ला अभिप्रेत असलेली कारवाई १० डिसेंबरच्या आत पूर्ण करण्यासाठी आपण खात्याला सांगावे व दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करावी अशी आग्रहाची विनंती आहे.

आपला विनित

**(भा.तु.देशमुख)**

अध्यक्ष, नुटा

Copy to :- (1) Secretary, E & Y.S.D. Bombay (2) Director of Higher Education, Pune (3) All the members of NUTA Delegation. (4) All the members of NUTA Executive Committee. (P114NB1977)

**(iii)** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्याबाबतीत पुढे काहीही कृति केली नाही. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठासमोर सन २०१३ ची याचिका क्रमांक १९१३ ही ज्यावेळेला दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी सुनावणीसाठी आली त्यावेळेला विभाग प्रमुख या नात्याने मंत्र्यांनी निदेश देऊनही त्याची अंमलबजावणी होत नाही ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट न्यायालयासमोर आली. दुसरी गोष्ट म्हणजे परीक्षेच्या कामाशी असहकाराला संप असे शासनातर्फे संबोधल्या जात आहे, याचेसुद्धा मा. न्यायालयाला आश्चर्य वाटले व न्यायालयाने त्यादिवशी याबाबतीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :-

"P.C. : Having heard both sides and finding that issue raised in these Petitions **is resolved at a joint meeting** of all the stakeholders, including the members of the petitioner's association, what remains is to pay the amount equivalent to 71 days salary for the period **which was according to the respondents a strike.**

2. Now, that the issue has been resolved and it is agreed that the pay for this duration has to be released, we direct that in terms of the decision taken in the meeting held on 25/09/2018 (see Minutes of 08/10/2018) amount be released as expeditiously as possible and, in any event, before 30/03/2019. The Writ Petitions are disposed of with these directions."

**(iv)** मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय काळजीपूर्वक वाचला तर उच्च शिक्षण मंत्रालयातील जे तज्ज्ञ लोक या "परीक्षा असहकार" आंदोलनाला "प्राध्यापकांचा संप" म्हणून कुत्सितपणे संबोधत होते त्यांना मा. न्यायालयाने चांगलीच चपराक लगावली होती. "हे शहाणे त्याला संप म्हणत आहेत." (The period which was according to the respondents a strike.) असा तिरकस उल्लेख या निर्णयात आहे. आणखी मौजेची गोष्ट म्हणजे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी जे निदेश दिले त्याची अंमलबजावणी त्यांना करता आली नाही, मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे त्यांच्या निदेशाची अंमलबजावणी तीन महिन्यात करण्याचे बंधन शासनावर पडले. **खरे म्हणजे उच्च शिक्षणमंत्र्यांच्या निदेशाची अंमलबजावणी उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे का होईना झालेली आहे याचा आनंद होण्याऐवजी उच्च शिक्षण विभागाने मुंबई खंडपीठासमोर पूनर्विलोकन याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला.**

**(v)** उच्च शिक्षण विभागाने दाखल केलेली ही पूनर्विलोकन याचिका म्हणजे सन २०१९ ची पूनर्विलोकन याचिका क्रमांक ३३ होय. (R. P. (L) 33 of 2019) खरे म्हणजे उच्च न्यायालयातील कामकाजाकडे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी किती निष्काळजीपणे पहातात याचा पूरावाच या याचिकेमध्ये आपल्याला दिसून येतो. शासनाच्यावतीने न्यायालयासमोर बिनशर्त क्षमायाचना करण्यात आली. खरी वस्तुस्थिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नव्हती, हेही शासनातर्फे मान्य करण्यात आले. शासनाच्या या पूनर्विलोकन याचिकेच्या परिच्छेद ६ मधील पुढील उल्लेख पहाः-

"6. At the outset, the Applicants render an unconditional apology to this Hon'ble Court for not being able to place before this Hon'ble Court true and correct facts, at the time when the aforesaid Order itself was passed by this Hon'ble Court."

**(vi)** बिनशर्त क्षमायाचनेचा भाग निश्चितच उच्च शिक्षण विभागाची शोभा वाढविणारा नाही. पण खरी गंमत त्यापुढे आहे. स्वतः उच्च शिक्षण विभागाचे सचिव व शिक्षण संचालक उच्च शिक्षण हे २५ सप्टेंबर २०१८ च्या समितीच्या बैठकीला उपस्थित होते. तशी कार्यवृत्तात नोंद आहे. ते कार्यवृत्त मा.उच्च न्यायालयात सादर झालेले आहे. त्या समितीने "No Work, No Pay" हे

सर्वोच्च न्यायालयाचे निदेश येथे लागू होत नाही... ७१ दिवसाच्या संपकाळातील थकित वेतन अध्यापकांना देण्यात येईल" असा निर्णय एकमताने घेतला त्यात सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही सहभागी होते आणि "या शिक्षकांना ७१ दिवसाचे वेतन देण्यात येऊ नये" अशी पूनर्विलोकन याचिका (Review Petition) उच्च न्यायालयात दाखल करणाऱ्या याचिकेमध्ये पहिले याचिकाकर्ते उच्च शिक्षण विभागाचे सचिव होते व दुसरे याचिकाकर्ते हे उच्च शिक्षण संचालक होते. **अत्यंत हिन दर्जाच्या दुतोंडीपणाच्या या दोन अधिकाऱ्यांच्या वर्तनाने शासनाची केवढी प्रतिष्ठा वाढली याचा विचार ते केव्हातरी करतील, अशी अपेक्षा आपण करू या.**

**(vii)** राज्यशासनाची ही पूनर्विलोकन याचिका मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ रोजी सुनावणीला आली. पूनर्विलोकन याचिका (Review Petition) आणि Memo of Appeal यामधील फरक याचिकाकर्त्यांना कळू नये याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. पूनर्विलोकन याचिकेच्या नावाखाली Appeal Memo दाखल करणे हे अनुचित आहे, असे नमूद करून शासनाची पूनर्विलोकन याचिका फेटाळून लावली. ती पुढील शब्दात :-

**"2. The Review Petition is nothing but a Memo of Appeal.** All the paragraphs and the grounds therein denote that the order of this Court is stated to be passed on incorrect factual assumptions and this Court has not appreciated the powers of the Grievance Redressal Committee. If the grounds (a) to (e) are perused together with the preceding and following substantive paragraphs, it is evident **that this is not a Petition which can be entertained within the limited parameters of Review.** The review jurisdiction is not to be equated with Appeal or Revision. In Appeal whole judgment and order is open for scrutiny and verification on facts and law. In review it is not so. If we entertain this Review Petition we have to reconsider the matter in its entirety. **That is impermissible in review jurisdiction.** Though we condone the delay in filing the Review Petition, **we find no merits in the same. It is accordingly dismissed."**

**(viii)** शासनाने नेमलेल्या समितीमध्ये एकमताने "७१ दिवसाचे रोखलेले वेतन देण्यात यावे" असा निर्णय करणाऱ्या अधिकाऱ्यांनीच मा. सर्वोच्च न्यायालयात "ते देण्यात येऊ नये" म्हणून विशेष अनुमती याचिका दाखल केली. त्यातील भोंगळपणाच्या अनेक बाबी नमूद करण्यासारख्या आहेत. स्थलाभावी तसे करता येत नाही, पण एका बाबीचा उल्लेख अवश्य केला पाहिजे.

मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झाली. या समितीच्या बैठकीत "काम नाही, वेतन नाही हे तत्त्व या ठिकाणी लागू होत नाही कारण त्या शिक्षकांनी आपले काम पार पाडलेले आहे," असा एकमताने निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये वित्त विभाग (व्यय) सचिव श्री. राजीव कु. मित्तल हे एक सदस्य होते. ते समितीच्या बैठकीला उपस्थित होते. तशी समितीच्या अधिकृत कार्यवृत्तामध्ये नोंद आहे. हे कार्यवृत्त मा.सर्वोच्च न्यायालयात सादर झाले आहे. समितीचा एकमताने निर्णय झाल्यानंतर तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी याबाबतचे निदेश पारित केले. असे असतांना श्री.राजीव कु. मित्तल यांची त्या निर्णयाच्या विरोधात टिपणी सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली. वित्त विभागाच्या सचिव पदावर काम करणाऱ्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने समितीच्या बैठकीला उपस्थित राहून मंत्रिमहोदयांच्या अध्यक्षतेखाली **त्या बैठकीमध्ये एकमताने "नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही" असा निर्णय करावयाचा व नेमके त्याच्या विरुद्ध "नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल, उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही" असे मत मांडणारी टिपणी सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करावयाची,** हे कृत्य प्रशासनाचा अत्यंत क्षुद्र दर्जा दर्शविणारे आहे. हा प्रकार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आल्याशिवाय राहीला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाची विशेष अनुमती याचिका दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी (SLP (Civil) Diary No. 1076/2020) फेटाळून लावली. इतकेच नव्हे तर भारतीय घटनेच्या कलम १३६ अंतर्गत विशेष अनुमती देण्याच्या लायकीचे हे प्रकरण नाही, असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले. ते पुढील शब्दात :-"Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.The Special Leave Petition is accordingly **DISMISSED."** *(P14NB2020)* तुलना करण्यासाठी अनेक नामवंत प्रकरणे समोर असतांना त्यातील अति नामवंत अशा दोन प्रकरणांचा उल्लेख करण्याचा मोह मला का आवरता आला नाही, हे वाचकांच्या निश्चितच लक्षात येईल.

## उच्च शिक्षण संचालक हे मुख्य देखरेख अधिकारी

**१६६.** "A scheme to ensure regular and full payment by College Managements of the salary and allowances of the teaching and non-teaching staff of aided non-Government Colleges of Arts, Science, Commerce and Education in Maharashtra" या मथळ्याचा शासननिर्णय दिनांक २१ सप्टेंबर १९७७ रोजी निर्गमित झाला हे यापूर्वी नमूद केलेले आहे. या शासननिर्णयाची वैशिष्ट्ये नमूद करणे मला आवश्यक वाटते. या शासननिर्णयाने राज्याच्या उच्च शिक्षण संचालकांकडे प्रमुख देखरेख अधिकारी म्हणून या योजनेची अंमलबजावणी करण्याचे काम सोपविले होते. शासननिर्णयामध्ये याबाबतचा उल्लेख पुढील शब्दात नमूद करण्यात आलेला आहे :-

"The Director of Education (Higher Education), Maharashtra State, Pune, shall be in overall charge of the administration of and supervision over the scheme."

या कामासाठी त्यांना अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी वर्ग शासनाने मंजूर करून दिला होता व त्याबाबतचा शासननिर्णयसुद्धा त्याच तारखेला निर्गमित करण्यात आला. उच्च शिक्षण खात्याचे संचालक यांची या सबंध योजनेच्या अंमलबजावणीवर प्रशासकीय देखरेख असेल आणि या प्रयोजनासाठी महाविद्यालयातून आवश्यक त्या प्रपत्रामध्ये आवश्यक त्या बाबींची माहिती वेळोवेळी मागण्याचा त्यांना हक्क असेल.

## बँकेमध्ये दोन स्वतंत्र खाती

**१६७.** प्रत्येक अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाला राष्ट्रीयकृत बँकेत किंवा शेड्युल्ड बँकेत किंवा जिल्हा सहकारी बँकेत या योजनेच्या प्रयोजनार्थ दोन खाती उघडावी लागतील. त्यातील पहिले खाते हे College Salary Paymet Account या नावाने असेल व दुसरे खाते College Non-Salary Expenditure Account या नावाने असेल.

## वेतन खाते

**१६८.** महाविद्यालयाच्या वेतन खात्यामध्ये जमा करण्यात आलेली रक्कम ही फक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच खर्च करता येईल. दुसऱ्या कोणत्याही कामी त्या खात्यातून खर्च करता येणार नाही असे स्पष्टपणे या शासननिर्णयात नमूद आहे. तथापि, हे वेतन अदा करतांना भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, इनकम टॅक्स पोटी करावयाची कपात, प्रोफेशन टॅक्स व लाईफ इन्शुरन्स प्रिमियम यासारख्या रकमा वेतनातून कपात करण्याचा महाविद्यालयाला अधिकार असेल.

## वेतनेतर खर्च खाते

**१६९.** वेतनेतर खर्चासाठी काढण्यात आलेल्या खात्यातून शासननिर्णयाने मान्य करून दिलेल्या वेतनेतर खर्चाच्या बाबींवर खर्च करण्यासाठी या खात्यातून रक्कम काढण्याचा प्राचार्यांना अधिकार असेल. शासनाने मान्य केलेल्या खर्चाच्या बाबी व्यतिरिक्त एखाद्या अमान्य बाबीवर खर्च या खात्यामधून करण्यात आला असेल तर तेवढ्या रकमेचा भरणा या खात्यामध्ये पुढील एक महिन्याच्या आत करावा लागेल.

## ८० : २० ची विभागणी

**१७०.** महाविद्यालयाला येणाऱ्या पुढील चार प्रकारच्या उत्पन्नातून ८० टक्के रक्कम ही वेतन खात्यामध्ये जमा करावी लागेल असे या शासननिर्णयात नमूद असून त्या चार बाबी पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) अस्तित्वात असलेल्या अनुदान सूत्राप्रमाणे मिळत असलेले परिरक्षा अनुदान

(२) स्वातंत्र सैनिकांच्या पाल्यांना फी माफी, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना व मागासवर्ग विद्यार्थी यांच्या फीचा परतावा म्हणून शासनाकडून महाविद्यालयाकडे येणारी रक्कम

(३) शिक्षण शुल्काच्या पोटी महाविद्यालयामध्ये येणारी रक्कम

(४) उपरोक्त तीन शिवाय इतर मार्गांनी महाविद्यालयाला येणारे थेट उत्पन्न

या चारही मार्गांनी आलेल्या एकूण रकमेपैकी ८० टक्के हिस्सा हा वेतन खात्यामध्ये जमा करावा लागेल व २० टक्के हिस्सा हा वेतनेतर खात्यामध्ये जमा करावा लागेल. असे या योजनेमध्ये नमूद करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे वेतन खाते ज्या बँकेमध्ये असेल त्याच बँकेमध्ये महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपले वैयक्तिक खाते उघडावे लागेल.

**तदर्थ सहाय्य (Ad hoc Assistance)**

**१७१.** वेळोवेळी शासनाकडून मिळणारे अनुदान व मान्य दराने वसूल करण्यात आलेले शिक्षण शुल्क हा महाविद्यालयाच्या उत्पन्नाचा मुख्य भाग असेल. या उत्पन्नाची उपरोक्त प्रमाणे वाटणी केल्यावर वेतनास रक्कम कमी पडत असेल तर तीन महिन्यांच्या वेतनाइतकी रक्कम त्या महाविद्यालयाला अदा करण्याचा उच्च शिक्षण संचालकांना स्थायी स्वरूपाचा अधिकार या शासननिर्णयाने

*(सहपत्र एकोणतीस : परिच्छेद १७८ व १७९ पहा)*

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

**प्रेषक : प्रा.भा.तु.देशमुख**

अध्यक्ष, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ

विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती - ४४४६०४. फोन नं. ३६४६

***क्र.एन.टी. एफ/२० : दिनांक : ५.१२.१९७७***

**प्रति,**

**माननीय शिक्षणमंत्री,**

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय :** एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्ती न झाल्याबाबत.

**संदर्भ :** माझे (१) दि. १७.११.७७ चे पत्र क्र. एन.टी.एफ. १६

(२) दि. २७.११.७७ चे पत्र क्र. एन.टी.एफ १८

माननीय महोदया,

दिनांक १४ सप्टेंबर १९७७ या दिवशी नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या प्रतिनिधीमंडळाला शिक्षण सचिवांच्या सहीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने जे आश्वासनपत्र देण्यात आले होते त्याच्या परिच्छेद तीनकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. हा परिच्छेद तीन पुढीलप्रमाणे आहे :-

"To enable the Colleges to make latest by 10th Nov. 1977, the payment of salary etc. of their teaching & non-teaching staff relating to the period from 1.4.77 to 30.9.77, orders releasing an adhoc assistance to colleges, as mentioned in (2) above, of an aggregate amount of Rs.2.30 Crores will be issued immediately."

ह्या परिच्छेदाचा अर्थ अतिशय सरळ व स्पष्ट आहे तो असा की, (१) एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील (यापुढे याचा उल्लेख मागील काळातील पगार असा करण्यात आला आहे.) वेतन वितरणासाठी म्हणून खाजगी संलग्न महाविद्यालयांना ताबडतोब तदर्थ सहाय्य (Adhoc assistance) दिले जाईल.

(२) यासाठी देण्यात येणारे हे सहाय्य २ कोटी ३० लक्ष रुपये इतके असेल व त्याबाबतचे आदेश १० नोव्हेंबर १९७७ च्या आत काढले जातील.

(३) या काळातील वेतनाची रक्कम २.३० कोटीपेक्षा जास्त होत असल्यास वेतन वाटपाच्या योजनेनुसार शासनाची ताबडतोब पूर्व संमती घेऊन ती रक्कम तदर्थ सहाय्य म्हणून दिली जाईल.

गेल्या एक महिन्यामध्ये शासनाच्या अधिकाऱ्यांनी जे वेगवेगळे आदेश या संदर्भामध्ये काढले आहेत व **नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या कार्यकर्त्यांनी मागील काळातील पगाराबाबतची जी माहिती संबंध महाराष्ट्रातून गोळा केलेली आहे ती एकत्र करून जे निष्कर्ष निघतात ते अत्यंत धक्का देणारे, संतापजनक व सरळ सरळ फसवणूक करणारे आहेत.**

(१) शासकीय अधिकाऱ्यांनी जे आदेश काढले आहेत त्यामध्ये अमुक या तदर्थ सहाय्याच्या रकमेतून मागील पगार द्यावा असे कोठेही म्हटलेले नाही.

(२) ही रक्कम चालू पगारासाठी (म्हणजे ऑक्टोबर व त्यापुढच्या) द्यावी असेही आदेशात कोठेही म्हटलेले नाही. तोंडी मात्र सरकारी अधिकारी तसे सांगत सुटले आहेत.

(३) मागील पगारासाठी २ कोटी ३० लक्ष तदर्थ सहाय्य देण्याचे स्पष्ट आश्वासन (परिच्छेद ३) शासनाने दिले होते ते या कामासाठी शासनातर्फे पाठविण्यात आले काय? असा आमचा या बाबतीत प्रश्न आहे. त्याला स्पष्ट उत्तर नाही असे आहे.

(४) मागील वेतन (म्हणजे एप्रिल ते सप्टेंबर १९७७) किती थकीत आहे? याबाबतचे विवरण शासनाने २१ सप्टेंबर १९७७ पावेतो प्रत्येक महाविद्यालयाकडून मागविले होते. ही सारी माहिती एकत्र करून त्या त्या महाविद्यालयांना २ कोटी ३० लक्ष रूपयांचे तदर्थ सहाय्य १० नोव्हें. च्या आत पोहचविण्याचे काम अधिकाऱ्यांनी करावयाचे होते. शासकीय अधिकाऱ्यांनी या विवरण पत्राकडे ढुंकूनही पाहीले नाही असे सबळ पुराव्याच्या आधारे आम्ही नमूद करीत आहोत कारण असे की, जर त्यांनी तसे केले असते तर महाराष्ट्रातील कोणत्याही महाविद्यालयामध्ये मागील पगारापैकी एकाही महिन्याचा पगार देणे बाकी राहिले नसते.

(५) महाराष्ट्रातील मागील थकित वेतनाची स्थिती काय आहे याबाबत नुटाच्या कार्यकर्त्यांनी जी माहिती गोळा केली व जी संपूर्णपणे बरोबर आहे अशी मी खात्री करून घेतलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहेः-

**एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकीत पगाराची स्थितीः**

| जिल्हा | रुपये |
|---|---|
| नागपूर | १७,२५,२८१ |
| अमरावती | १६,१६,०४० |
| वर्धा | २,९६,८१६ |
| यवतमाळ | २,९६,८६७ |
| बुलढाणा | ८,०७,८३२ |
| चंद्रपूर | ५,३९,७७६ |
| अकोला | ७,९२,६६३ |
| भंडारा | ५,३९,५५६ |
| माहिती न पोचू शकलेल्या २० महाविद्यालयांसाठी धरलेली अंदाजे रक्कम | ८,००,००० |
| नागपूर विद्यापीठांतर्गत महाविद्यालये | ७४,१४,८६१ |
| मराठवाडा विद्यापीठांतर्गत महाविद्यालये | ४०,००,००० |
| एकूण | १,१४,१४,८६१ |

आम्ही आपणास वारंवार हे सांगितले आहे की, मुंबई, पुणे व शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांना आकृतिबंधाची झळ न पोचल्यामुळे थकबाकीचा प्रश्न त्या विभागात उद्‌भवला नाही. तरीही या कामासाठी त्या विभागांना प्रत्येकी २५ लाख रुपये लागतील असे मानल्यास (वस्तुतः एवढ्या सुद्धा रकमेची तेथे आवश्यकता नाही ही खात्रीलायक माहिती आहे.) **कोणत्याही परिस्थितीत आणि कसाही हिशेब केला तरी संबंध महाराष्ट्रातील मागील पगाराची रक्कम २ कोटी रुपयांपेक्षा जास्त होऊच शकत नाही.** अशा परिस्थितीमध्ये थकित वेतनासाठी तदर्थ सहाय्य म्हणून २ कोटी ३० लक्ष रुपये आजपावेतो का पाठविण्यात आले नाही? आणि पाठविण्यात आले असतील तर मागील वेतन पूर्ण का झाले नाही? आणि या कामासाठी रक्कम अपुरी पडत असेल तर त्याला शासन मान्यता घेऊन ती अजून पावेतो का पाठविण्यात आली नाही? या प्रश्नांची ताबडतोब उत्तरे मिळाली पाहिजेत.

अनेक विद्याशाखा असलेल्या प्रत्येक माध्यमातून शिक्षण देणाऱ्या विदर्भातील खामगावच्या बऱ्याच नावाजलेल्या व जुन्या कॉलेजची आर्थिक परिस्थिती केवळ आपल्या आकृतिबंधाने (तात्पुरत्या काळासाठी का होईना) मोडकळीस आलेली आहे. ही गोष्ट 10+2+3 चे परिणाम विदर्भात व महाराष्ट्रात वेगवेगळे कसे होत आहे हे जाणणारा सामान्य माणूस सुद्धा सांगू शकेल व त्यामुळे तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार ११ महिने पर्यंत होऊ शकले नाहीत. असे असतांना आपल्या कर्तबगार अधिकाऱ्यांनी १० नोव्हेंबर पावेतो एक महिन्याचे सुद्धा तदर्थ सहाय्य तिथे पोचणार नाही याचा जो बंदोबस्त केला तो पाहून "केवढे हे क्रौर्य" असेच कुणीही म्हणेल. अधिकाऱ्यांनी ही जी अंमलबजावणी केली ती आपल्या संमतीने केली असेल तर ती गोष्ट शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अत्यंत घोर फसवणूक करणारी ठरेल.

**महाराष्ट्र शासनाच्या आकृतिबंधाने महाविद्यालयावर आणून टाकलेल्या गंडांतराचा परिणाम म्हणून महिनोंमहिने पगाराशिवाय काम करण्याला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा स्पष्ट नकार मी पुन्हा एकदा आपल्याला निर्धारपूर्वक कळवीत आहे.**

आश्वासन पत्राच्या परिच्छेद ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे मागील वेतनासाठी आश्वासित तदर्थ सहाय्य १५ डिसेंबर पर्यंत त्या त्या महाविद्यालयामध्ये विवरणपत्र पाहून पाठविले गेले पाहिजे. त्याला काही रक्कम कमी पडत असल्यास शासकीय ठरावामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय संमती घेऊन ते या तारखेच्या आत पाठविले जाईल याबाबतची कारवाई झाली पाहिजे. दुर्दैवाने असे न होऊ शकल्यास शासनाच्या या निर्णयाचा तीव्र प्रतिकार करण्याच्या आम्हा शिक्षकांच्या निर्धाराचे पहिले पाऊल म्हणून दिनांक २० डिसेंबर १९७७ पासून मी व नुटाच्या कार्यकारी मंडळातील माझे दोन सहकारी प्रा.श्री.बी.बी.हेडा व प्रा. श्री. व्हि. एस. कुळकर्णी असे तीन शिक्षक उपोषणास प्रारंभ करु.

त्वरीत कारवाईच्या स्वरूपात पत्राचे उत्तर आल्यास मी आपला आभारी होईन.

आपला नम्र

**(भा.तु.देशमुख)**

अध्यक्ष, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ

Copy to :- (1) Secretary, E & Y.S.D. Bombay (2) Director of Higher Education, Pune (3) All the members of NUTA Delegation. (4) All the members of NUTA Executive Committee.

(P114NB1977)

देऊन ठेवलेला आहे. या उपरही एखाद्या महाविद्यालयात वेतन वेळेवर होत नसेल तर वेतन वितरण व्यवस्था उत्तमरितीने कार्यरत राहावी म्हणून तीन महिन्यांपेक्षा जास्त रक्कम सुद्धा शासनाच्या पूर्वपरवानगीने अदा करण्याचे अधिकार उच्च शिक्षण संचालकांना असतील. हे जे तदर्थ सहाय्य आहे ते तदर्थ सहाय्य पूर्णपणे वेतन खात्यामध्ये जमा करावे लागेल.

### सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची करामत

**१७२.** वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करणारा शासननिर्णय दिनांक ३० सप्टेंबर १९७७ रोजीच्या आत निर्गमित केला जाईल अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे 'नुटा'ला देण्यात आले होते. त्याप्रमाणे याबाबतचा शासननिर्णय दिनांक २१ सप्टेंबर १९७७ रोजी निर्गमित झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या अंमलात आणण्याबाबतचा शासननिर्णय ३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी निर्गमित करण्यात येईल असे शासनाने मा. उच्च न्यायालयासमोर कबूल केले होते. त्याप्रमाणे त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित झाला. तिसऱ्या एका महत्त्वाच्या बाबतीत शासनाने नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला मुदतबंद आश्वासन दिले होते, ते असे की, "**१ एप्रिल १९७७ ते ३० सप्टेंबर १९७७ या काळातील थकबाकी अदा करण्यासाठी तदर्थ सहाय्य अदा करण्याचे आदेश उशिरात उशिरा म्हणजे १० नोव्हेंबर १९७७ पूर्वी निर्गमित केले जातील.**" १० नोव्हेंबर १९७७ ही तारीख उलटून गेली तरी याबाबतची कोणतीही कारवाई शासनातर्फे करण्यात झालेली नव्हती. अशी कारवाई करण्यात आलेली आहे किंवा करण्यात येत आहे असेही दिसून येत नव्हते. त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली होती. एकंदर घटनाक्रमाचा विचार करता असे दिसून येते की, विभागाच्या प्रमुख असलेल्या मंत्र्यांनी कितीही तळमळीने काम केले तरी प्रशासनातील सचिव दर्जाचा एखादा अधिकारी त्यामध्ये कसा बिब्बा घालू शकतो याचे एक नमुनेदार उदाहरण या प्रकारणी पहायला मिळाले. त्याबाबतचे तपशील पुढील परिच्छेदातून नमूद केलेले आहेत.

### आश्वासनपत्रातील तिसरा परिच्छेद

**१७३.** नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला दिनांक १४ सप्टेंबर १९७७ रोजी शिक्षण सचिवांच्या स्वाक्षरीने जे आश्वासनपत्र देण्यात आले होते, त्या आश्वासनपत्रातील परिच्छेद तीन पुढीलप्रमाणे होता :-

"To enable the Colleges to make latest by 10th November, 1977, the payment of salary etc. of their teaching & non-teaching staff relating to the period from 1.4.1977 to 30.9.1977, orders releasing an adhoc assistance to colleges, as mentioned in (2) above, of an aggregate amount of Rs.2.30 Crores will be issued immediately."

हा परिच्छेद काळजीपूर्वक वाचला तर असे दिसून येईल की, अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये काही बाबी शासनातर्फे आश्वासित करण्यात आल्या होत्या.

(१) एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकीत वेतन वाटपासाठी तदर्थ सहाय्य (ad hoc assistance) शासनातर्फे दिले जाईल.

(२) हे तदर्थ सहाय्य देणारे आदेश १० नोव्हेंबर १९७७ पूर्वी काढले जातील.

(३) १० नोव्हेंबर १९७७ पर्यंत अदा करावयाच्या तदर्थ सहाय्याची रक्कम ही २ कोटी ३० लक्ष रूपये इतकी असेल.

(४) या काळातील वेतनाच्या थकबाकीची रक्कम ही २ कोटी ३० लक्ष रुपयापेक्षा जास्त असल्यास वेतन वितरणाच्या योजनेनुसार शासनाची पूर्व संमती घेऊन ती रक्कम अदा केल्या जाईल.

### मा. शिक्षणमंत्र्यांना संघटनेतर्फे पहिले पत्र : १७.११.१९७७

**१७४.** नुटाच्या प्रतिनिधींना देण्यात आलेल्या आश्वासनपत्रातील तिसऱ्या परिच्छेदाबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे दिनांक १७ नोव्हेंबर १९७७ रोजी मा.शिक्षणमंत्र्यांना संघटनेचा अध्यक्ष या नात्याने मी स्वतः एक पत्र पाठविले. या पत्रामध्ये मी त्यांना असे कळविले की, तिसऱ्या परिच्छेदाची अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे व होत नसल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. खामगाव येथील जी.एस.कॉलेज हे अतिशय जुने महाविद्यालय असून त्या महाविद्यालयामध्ये जानेवारी १९७७ पासून तर आतापर्यंतचे एका महिन्याचे सुद्धा वेतन अदा करण्यात आलेले नाही. "त्या महाविद्यालयामध्ये तदर्थ सहाय्य म्हणून एक रुपयाची रक्कमसुद्धा आजपावेतो पोहचलेली नाही." ही बाब या पत्राद्वारे मी मा. शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती. या पत्रात असेही नमूद करण्यात आले होते की, नुटाच्या पदाधिकाऱ्यांना या सर्व प्रकरणांबाबत निश्चित भूमिका घेऊनच शिक्षकांसमोर जावे लागेल व तशी भूमिका घेण्यापूर्वी चर्चा करून वस्तुस्थिती काय आहे ती समजावून घ्यावी अशी आमची इच्छा आहे. तेव्हा नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला आपण चर्चेसाठी वेळ द्यावी अशी विनंती या पत्रान्वये मा.शिक्षणमंत्र्यांना करण्यात आलेली होती. हे पत्र **सहपत्र : सत्तावीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

### मा. शिक्षणमंत्र्यांना संघटनेतर्फे दुसरे पत्र : २७.११.१९७७

**१७५.** दिनांक १० नोव्हेंबर १९७७ च्या आत पूर्ण करावयाची कार्यवाही १० नोव्हेंबर ही तारीख उलटून गेली तरी पूर्ण झालेली नव्हती व त्याबाबतीत १७ नोव्हेंबरचे पत्र मिळाल्यानंतरसुद्धा शासनातर्फे चर्चेसाठी वेळ देण्यात आलेली नव्हती. या पार्श्वभूमीवर आणखी १० दिवसांनी म्हणजे २७ नोव्हेंबर १९७७ रोजी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने मी मा. शिक्षणमंत्र्यांना पुन्हा एक दुसरे पत्र पाठविले व या पत्रामध्ये मी सरळ सरळ पुढीलप्रमाणे तक्रार केली होती :-

"एप्रिल, १९७७ ते सप्टेंबर १९७७ च्या वेतनाच्या संदर्भात देण्यात आलेल्या आश्वासनाची शासकीय अधिकारी इमानेइतबारे अंमलबजावणी करीत नाहीत, अशी तीव्र भावना शिक्षकांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. २२ सप्टेंबर १९७७ पर्यंत या थकिती बाबतचे तपशील आपण महाविद्यालयांकडून मागविले होते. १० नोव्हेंबर पर्यंत त्या बाबतचे आदेश निघावयाचे होते. अशा प्रकारचे स्पष्ट आदेश निघाल्याचे दिसत नाही." हे संपूर्ण पत्र सोबत **सहपत्र : अठ्ठावीस** म्हणून प्रसृत केलेले आहे.

### थकबाकीची आकडेवारी संघटनेतर्फे मिळविण्यात आली

**१७६.** मा. शिक्षणमंत्र्यांना दुसरे पत्र पाठविण्याच्या पूर्वीपासूनच संघटनेच्या वतीने एक जोरदार कार्यक्रम हाती घेण्यात आलेला होता. निरनिराळ्या महाविद्यालयांना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन त्या त्या महाविद्यालयातून एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकित वेतनाची आकडेवारी गोळा करण्याचे काम पार पाडणे असा तो कार्यक्रम होता. दिनांक १ नोव्हेंबर पासूनच या कामी संघटनेच्या सर्वच स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना या कामी खूप मेहनत घ्यावी लागली हे खरे असले तरी त्या मेहनतीला उत्तम यश मिळाले. उच्च शिक्षण संचालकांच्या कार्यालयाने एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील वेतनाची किती थकबाकी देणे आहे याबाबतचे तपशील २१ सप्टेंबर १९७७ पावेतो प्रत्येक महाविद्यालयाकडून मागविले होते. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या स्थळप्रतिवरून निरनिराळ्या महाविद्यालयात त्याबाबतची स्थिती दर्शविणारी अधिकृत माहिती ही उपलब्ध होती. विदर्भातील निरनिराळ्या २० महाविद्यालयांची माहिती मिळू शकली नाही. मात्र इतर सर्व महाविद्यालयांची थकबाकी बाबतची अधिकृत माहिती संघटनेच्या स्तरावर उपलब्ध झाली. माहिती न मिळालेल्या २० महाविद्यालयांची माहिती सरासरीच्या आधारे अंदाजित करण्यात आली. **तेव्हा विदर्भातील महाविद्यालयांची ही थकबाकी ७४ लक्ष रुपयापेक्षा जास्त होत नाही असा निष्कर्ष हाती आला.**

*(सहपत्र तीस : परिच्छेद १७९ पहा)*

**OFFICE OF the**
**Minister for Education**
**Government of Maharashtra**
Mantralaya, Bombay-400032
**Dated : 11 Dec. 1977.**

**To,**

(1) Prof. B.T.Deshmukh, Amravati.
(2) Shri. S.K.Kalnawat, Yeotmal.
(3) Shri. A.V.Barhate, Nagpur.
(4) Shri. D.S.Jajurley, Warora
(5) Shri.B.S. Deshmukh, Akola
(6) Shri. G.S. Vaidya, Amravati

Ref :- **(1)** Letter No. NT/F/16 dt. 17.11.17. **(2)** Letter No. NT/F/18 dt. 27.11.17. **(3)** Letter No. NT/F/20 dt. 5.11.17. from President NUTA, Addressed to Education Minister.

Dear Sir,

A meeting to discuss the problems mentioned in above referred letters, has been arranged in the Chamber of Minister of Education, Mantralaya at 12.00 noon on 15th December 1977. You are requested to kindly make it convenient to attend the same.

Yours sincerely,

sd/- Personal Assistant
to the Education Minister

(P116NB1977)

## मराठवाड्यातील व उर्वरित महाराष्ट्रातील थकित बाकीची माहिती

**१७७.** नुटाच्या काही पदाधिकाऱ्यांनी मराठवाड्यामध्ये जाऊन तेथील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क करून त्यांची मदत घेतली. प्राध्यापक संघटनेचे मराठवाड्यातील ज्येष्ठ नेते प्रा.वसंत पुजारी यांची या कामी चांगलीच मदत झाली. वस्तुतः प्रत्येक महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालकांकडे सप्टेंबर महिन्यातच माहिती पाठविली होती. त्या माहितीच्या स्थळ प्रतीवरून अधिकृत माहिती उपलब्ध होणे सहज शक्य होते पण तेथील सर्व महाविद्यालयांची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. जेवढ्या महाविद्यालयांची माहिती उपलब्ध झाली त्यावरून सरासरीच्या पद्धतीने इतर महाविद्यालयांची रक्कम अंदाजित केली असता मराठवाड्यामध्ये या थकबाकीची रक्कम जवळ जवळ ४० लक्ष रुपयाच्या आसपास होईल असा निष्कर्ष हाती आला. मुंबई, पुणे व शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयाच्या थकबाकीच्या अधिकृत रकमा गोळा करणे हे वेळे अभावी शक्य नव्हते. शिवाय तेथे फारशी थकबाकी नाही अशी आमची माहिती होती. तरीही प्रत्येक विद्यापीठातील सर्व महाविद्यालयांसाठी २५ लक्ष रूपये याप्रमाणे तीन विद्यापीठांसाठी ७५ लक्ष रूपयाचा आम्ही अंदाज धरला. अशारितीने थकबाकीची महाराष्ट्राची एकूण रक्कम अंदाजित करता आली.

*(सहपत्र एकतीस : परिच्छेद १८५ पहा)*

**माननीय शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या प्रतिनिधी मंडळाने शिक्षण मंत्र्यांशी दिनांक १५.१२.७७ रोजी केलेल्या चर्चेचा अहवाल**

प्रतिनिधी मंडळामध्ये सर्वश्री बी.टी.देशमुख, शरद कळणावत, अरविंद बारहाते, दि.स.जाजुर्ले व बी.एस.देशमुख यांचा समावेश होता. शासनाच्या वतीने शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे शिवाय शिक्षणसचिव श्री.डी.एम्.सुकथनकर, संयुक्त सचिव श्री.डी.के.जैन व उच्च शिक्षण संचालक श्री.सु.दा.बाळ हे उपस्थित होते.

(२) दिनांक १४.९.७७ ला शिक्षण सचिवांच्या सहीने देण्यात आलेल्या आश्वासन पत्राच्या परिच्छेद ३ ची अंमलबजावणी झालेली नाही. हा मुद्दा प्रतिनिधी मंडळाने मांडला व त्या सोबत आपली आकडेवारी सादर केली. उच्च शिक्षण संचालकांनी त्यांच्या जवळ असलेली आकडेवारी दिली. उभय पक्षांनी दिलेल्या आकडेवारीत फारसा फरक नाही असे दिसून आले. उच्च शिक्षण संचालकांनी एप्रिल ७७ ते सप्टेंबर ७७ ह्या काळातील महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत पगारांची महसूल विभागवार आकडेवारी पुढीलप्रमाणे दिली.

| | |
|---|---|
| नागपूर विभाग | ७३ लाख ५० हजार रुपये |
| औरंगाबाद विभाग | ५० लाख ६८ हजार रु. |
| पुणे विभाग (पुणे व शिवाजी विद्यापीठ मिळून) | १६ लाख २२ हजार रु. |
| मुंबई विभाग | ६ लाख १ हजार रुपये |
| एकूण | १ कोटी ४६ लाख रुपये |

प्रतिनिधी मंडळाने आकडेवारी मान्य केली व असे असतांना थकीत पगाराचा प्रश्न १० नोव्हेंबरच्या आत का निकालात निघाला नाही अशी पृच्छा केली.

(३) एप्रिल ७७ ते सप्टेंबर ७७ च्या काळातील थकीत पगाराची रक्कम देण्याबाबतचे आदेश १० नोव्हेंबरच्या आत काढण्याचे स्पष्ट आश्वासन प्रतिनिधी मंडळाला शासनातर्फे देण्यात आले आहे. ही गोष्ट शिक्षणमंत्र्यांनी निसंदिग्ध शब्दात मान्य केली. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांनी सुद्धा असेच ठरले होते असे सांगितले. बऱ्याच चर्चेनंतर शिक्षण सचिवांनी दिनांक ११ सप्टेंबर ७७ ह्या दिवशी, तसेच १२ व १३ तारखेच्या चर्चेच्या वेळी आपण उपस्थित नव्हतो. फक्त १४ सप्टेंबर रोजी शेवटच्या क्षणी ह्या चर्चेला उपस्थित होतो आणि त्यामुळे परिच्छेद ३ च्या अर्थाच्या व अंमलबजावणीच्या संदर्भात आपला जो समज झाला तो बिनचुक नसल्याचे सांगितले.

याबाबत प्रतिनिधी मंडळाने आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली असता शेवटी शिक्षण सचिवांनी "That was a bonafide misunderstanding and when it is accepted, now none should be blamed or cursed" असे उद्‌गार काढले. त्यानंतर मग या बाबतची चर्चा थांबली.

एप्रिल ते सप्टेंबरच्या थकीत पगाराचा निपटारा करण्यासाठी तदर्थ सहाय्य महाविद्यालयांना देण्याचे आदेश काढण्याचे काम पुढच्या १० दिवसात खात्यामार्फत पूर्ण केले जाईल असे शासनातर्फे सांगण्यात आले. त्यानंतर ६ वाजता चर्चा थांबली व शिक्षण सचिव आणि प्रतिनिधी मंडळाने बसून चर्चेचे कार्यवृत्त तयार केले.

ह्या कार्यवृत्ताला माननीय शिक्षण मंत्र्यांची संमती घेण्याकरिता रात्री ८ वाजता माननीय शिक्षण सचिव, संयुक्त सचिव, नुटाचे अध्यक्ष आणि सचिव असे चारजण शिक्षणामंत्र्यांच्या निवासस्थानी गेले. कार्यवृत्त वाचल्यावर "आपण १० दिवसाची वेळ टाकताहात ते दहा दिवसात बरोबर झाले पाहिजे याची काळजी घ्या, नाहीतर आताच ४-५ दिवस वाढवून घ्या" असे उद्‌गार शिक्षण सचिवांना उद्देशून शिक्षणमंत्र्यांनी काढले व शेवटी टंकलिखित प्रतीवर १० दिवस हे शब्द खोडून तेथे पंधरवाडा असे शब्द शिक्षण सचिवांनी टाकले व कार्यवृत्तावर सही करून त्याची प्रत संघटनेच्या अध्यक्षांना दिली. कार्यवृत्ताची प्रतिलिपी सोबत जोडली आहे.

**15.12.1977** *(P116NB1977)* **अरविंद बारहाते, सचिव, नुटा**

## मा. शिक्षणमंत्र्यांना संघटनेतर्फे तिसरे पत्र : ०५.१२.१९७७

**१७८.** उपरोक्त आकडेवारीचे विश्लेषण केल्यानंतर अधिकृतपणे काही निष्कर्ष हाती आले, ते असे की, राज्यामध्ये या थकबाकी पोटी अदा करावयाची रक्कम ही कोणत्याही परिस्थितीमध्ये २ कोटी रुपयापेक्षा जास्त होऊ शकत नाही. मंत्रिमंडळाने २ कोटी ३० लक्ष रुपये या कामासाठी मंजूर केलेले असतांना ही थकबाकी अजूनपर्यंत का अदा होत नाही? याचे आम्हाला आश्चर्य वाटत होते. मी मा.शिक्षणमंत्र्यांना तिसरे पत्र **(सहपत्र : २९)** दिनांक ५ डिसेंबर १९७७ रोजी लिहिले. त्या पत्रातील परिच्छेद ५ शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"(५) महाराष्ट्रातील मागील पगाराची स्थिती काय आहे याबाबत नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी जी माहिती गोळा केली व जी संपूर्णपणे बरोबर आहे अशी मी खात्री करून घेतलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे :-

एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकित पगाराची स्थितीः

(जिल्हा : रुपये) नागपूर : १७,२५,२८१, अमरावती : १६,१६,०४०, वर्धा : २,९६,८१६, यवतमाळ : २,९६,८६७, बुलढाणा :८,०७,८३२,

*(सहपत्र बत्तीस : परिच्छेद १८५ पहा)*

**Minutes of the meeting of NUTA Delegation with the Hon'ble Minister for Education Govt. of Maharashtra, held on 15.12.1977 at Mantralaya, Bombay.**

A further discussion was held in the Chamber of Minister (Edu.) today when the following persons were present :-

1. Minister for Education in the chair.
2. Secretary, Education & Youth Services Deptt.
3. Joint Secretary, Education & Youth Service Deptt.
4. Director of Education (Higher Education)

**On behalf of NUTA**

1. Prof. B.T.Deshmukh
2. Shri S.K. Kalnawat
3. Shri A.V. Barhate
4. Shri D.S. Jajurley
5. Shri B.S.Deshmukh

The representatives of the NUTA pointed out that in their view, clause (3) of the statement dated 14th September, 1977 signed by the Secretary E & YSD had not been implemented at all and this had created dis-satisfaction amongst the ranks of teachers in Vidarbha region.

**The discussion revealed that there had been a gap in understanding the implications of the aforesaid clause (3) and its implementation.** Minister (Edn) reiterated that in the earlier discussion, there was a clear commitment to the effect that Colleges will be given requisite adhoc assistance to wipe out the dues of salary etc. relating to the period from 1st April, 1977 to 30th September, 1977 so that before the Salary Payment Scheme is implemented from October, 1977 onwards (which would ensure regular payment of salaries from that month onwards.) the current dues of salaries etc. from the beginning of the current financial year upto the end of September would have been cleared.

In pursuance of the aforesaid commitment, it was decided that the E & YSD will take up the question of issue of orders within next **fortnight** for release of adhoc assistance to the Colleges in Maharashtra to enable them to wipe out the salary dues of College staff for the period from 1.4.1977 to 30.9.77.

**Sd/- D.M.Sukthankar,**
15.12.77 Secretary E & YSD
*(P116NB1977)*

चंद्रपूर : ५,३९,७७६, अकोला : ७,९२,६६३, भंडारा : ५,३९,५५६, माहिती न पोचू शकलेल्या २० महाविद्यालयांसाठी धरलेली अंदाजे रक्कम : ८,००,०००,नागपूर विद्यापीठ महाविद्यालये : ७४,१४,८६१, मराठवाडा विद्यापीठ महाविद्यालये : ४०,००,०००, एकूण : १,१४,१४,८६१

आम्ही आपणास वारंवार हे सांगितले आहे की, मुंबई, पुणे व शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांना आकृतिबंधाची झळ न पोचल्यामुळे थकबाकीचा प्रश्न त्या विभागात उद्‌भवला नाही. **तरीही या कामासाठी त्या विभागांना प्रत्येकी २५ लाख रुपये लागतील असे मानल्यास (वस्तुतः एवढ्या सुद्धा रकमेची तेथे आवश्यकता नाही ही खात्रीलायक माहिती आहे.) कोणत्याही परिस्थितीत आणि कसाही हिशेब केला तरी संबंध महाराष्ट्रातील मागील पगाराची रक्कम २ कोटी रुपयांपेक्षा जास्त होऊच शकत नाही.** अशा परिस्थितीमध्ये थकित वेतनासाठी तदर्थ सहाय्य म्हणून २ कोटी ३० लक्ष रुपये आजपावेतो का पाठविण्यात आले नाहीत? आणि पाठविण्यात आले असतील तर मागील पगार पूर्ण का झाला नाही? आणि या कामासाठी निधी अपुरा पडत असेल तर त्याला शासन मान्यता घेऊन तो अजून पावेतो का पाठविण्यात आला नाही? या प्रश्नांची ताबडतोब उत्तरे मिळाली पाहिजेत."

## मा. शिक्षणमंत्र्यांकडून चर्चेसाठी निमंत्रण

**१७९.** संघटनेच्या वतीने टोकाची कारवाई केल्याशिवाय मंत्रालयातील अधिकारी वर्ग ऐकणार नाही व हा प्रश्न सुटणार नाही अशी भावना तीव्रपणे शिक्षक व्यक्त करीत होते आणि त्या भावनेच्या पोटी तीन शिक्षक उपोषणास प्रारंभ करतील असेही या पत्रान्वये मा. शिक्षणमंत्र्यांना कळविण्यात आले होते. हे संपूर्ण पत्र स्वयंस्पष्ट असून ते **सहपत्र : एकोणतीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

दिनांक ५ डिसेंबर १९७७ रोजीचे तिसरे पत्र गेल्यानंतर शासनाच्या स्तरावर याबाबतीत हालचाली सुरू झाल्या असे दिसून येते. मा. शिक्षणमंत्र्यांच्या कार्यालयाकडून दिनांक ११ डिसेंबर १९७७ रोजी नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या सहाही सदस्यांना एक पत्र पाठविण्यात आले. त्या पत्रामध्ये नुटाच्या अध्यक्षांनी यापूर्वी लिहिलेली तिनही पत्रे संदर्भामध्ये नमूद करण्यात आली होती व त्या अनुषंगाने मा.शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १५ डिसेंबर १९७७ रोजी त्यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये चर्चा आयोजित केलेली असून त्या चर्चेला आपण उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले होते. ते लहानसे पत्र **सहपत्र : तीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

## थकित वेतनाची रक्कम किती?

**१८०.** दिनांक १५ डिसेंबर १९७७ रोजी नुटाचे प्रतिनिधी मंडळ मुंबई येथे पोहचले व त्या दिवशी दुपारी १२ वाजता मा. शिक्षणमंत्र्यांच्या दालनात उपरोक्त तीनही पत्रात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या बाबतीत चर्चा सुरू झाली. मा. शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील ह्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होत्या. याशिवाय शासनाच्या वतीने शिक्षण सचिव श्री. डी. एम. सुकथनकर, संयुक्त सचिव श्री.डी.के.जैन व उच्च शिक्षण संचालक श्री.सु.दा.बाळ हे उपस्थित होते. नुटाच्या वतीने नुटाच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य सर्वश्री प्रा.बी.टी.देशमुख, प्रा.शरद कळणावत, प्रा.अरविंद बारहाते, प्रा.दि.स.जाजुर्ले व प्रा.बी.एस.देशमुख हे या चर्चेला उपस्थित होते. **चर्चेमध्ये सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे थकबाकी अजून का अदा करण्यात आलेली नाही? हाच होता.** या मुद्याची चर्चा करीत असतांना निश्चित थकबाकी किती आहे? हे या चर्चेमध्ये समोर येणे आवश्यक होते. नुटा तर्फे गोळा करण्यात आलेली माहिती ही मोठ्या प्रमाणात अधिकृत कागदपत्रांच्या स्थळप्रतीवरून घेतलेली होती हे खरे असले तरी त्या माहितीमध्ये काही आकडेवारी अंदाजे स्वरूपात समाविष्ट केलेली होती. अशा परिस्थितीत एकूण थकबाकी किती होती हे नुटाच्या अध्यक्षांनी मा. शिक्षणमंत्र्यांना लिहिलेल्या तिसऱ्या पत्रात नमूद केलेले आहे. आज आता ही चर्चा पुढे न्यायची असेल तर उच्च शिक्षण संचालकांनी याबाबतची अधिकृत आकडेवारी बैठकीसमोर ठेवली पाहिजे अशा प्रकारची मागणी नुटाच्या प्रतिनिधी मंडळातर्फे करण्यात आली.

## थकित वेतनाची अधिकृत आकडेवारी

**१८१.** उच्च शिक्षण संचालकांनी सप्टेंबर महिन्यातच ही आकडेवारी प्रत्येक महाविद्यालयाकडून मागविली होती. सप्टेंबरच्या शेवटापर्यंत ही सर्व माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये पोहचलेली होती. त्यावर ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असा दोन महिन्यांचा काळ उलटून गेलेला होता. त्यामुळे त्यांच्या जवळ ही अधिकृत आकडेवारी तयार होती. एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील निरनिराळ्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाची महसूल विभागवार अधिकृत आकडेवारी नमूद असलेला तक्ताच उच्च शिक्षण संचालकांनी या बैठकीत सादर केला. त्यानुसार ही आकडेवारी पुढीलप्रमाणे होती:-

(१) **नागपूर विभाग :** ७३ लाख ५० हजार रुपये (२) **औरंगाबाद विभाग :** ५० लाख ६८ हजार रुपये (३) **पुणे विभाग** (पुणे व शिवाजी विद्यापीठ मिळून) : १६ लाख २२ हजार रुपये (४) **मुंबई विभाग :** ६ लाख १ हजार रुपये (५) **एकूण महाराष्ट्र :** १ कोटी ४६ लाख रुपये

## संघटनेची व उच्च शिक्षण संचालकांची आकडेवारी

**१८२.** नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने गोळा केलेली व नुटाच्या अध्यक्षांनी आपल्या तिसऱ्या पत्रान्वये मा. शिक्षणमंत्र्यांना कळविलेली आकडेवारी व या सभेमध्ये उच्च शिक्षण संचालकांनी सादर केलेली अधिकृत आकडेवारी यामध्ये फारसा फरक नव्हता असे आढळून आहे.

(i) **विदर्भ विभागामध्ये** ही थकबाकी ७४,१४,६८१ रूपये इतकी आहे असे संघटनेने मा.शिक्षणमंत्र्यांना कळविले होते. प्रत्यक्षात उच्च शिक्षण संचालकांनी सादर केलेल्या अधिकृत आकडेवारी प्रमाणे ही रक्कम ७३,५०,००० रुपये एवढी होती. हा थोडासा फरक पडण्याचे कारण असे की, बहुसंख्य महाविद्यालयांची आकडेवारी ही महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या अधिकृत स्थळप्रतीवरून घेतलेली असली तरी २० महाविद्यालयांच्या बाबतीत ती अंदाजे धरलेली होती. त्यामुळे हा फरक पडला असे म्हणता येईल.

(ii) **मराठवाड्यासाठी** थकबाकीची रक्कम संघटनेच्या पत्रामध्ये ४० लक्ष रूपये दाखविण्यात आली होती. प्रत्यक्षात अधिकृत आकडेवारीप्रमाणे ही रक्कम ५०,६८,००० रूपये होती. संघटनेच्या आणि उच्च शिक्षण संचालकांच्या अधिकृत आकडेवारीमध्ये १० लाख रूपयांपेक्षा जास्त फरक होता. हा फरक पडण्याचे मुख्य कारण म्हणजे मराठवाड्यातील फार कमी महाविद्यालयांची अधिकृत स्थळप्रतीवरून मूळ आकडेवारी मिळाली होती. मोठ्या प्रमाणात ही आकडेवारी अंदाजे धरण्यात आलेली होती.

*(सहपत्र तेहत्तीस : परिच्छेद १८८ पहा)*

**BALRAJ AHER,**
M.A. (Pol. Sc.) M.A. (Soc.) D.B.M.
**Registrar, Nagpur University, Nagpur**
**28th December, 1977**

Dear Shri Deshmukh,

Shri D.M.Sukhtankar, Secretary, Department of Education, Government of Maharashtra had informed me on telephone, today evening, that he has already sent a letter at your Amravati address. He has dictated the contents of the same to me on telephone. He desires me that the same be forwarded to you for your information.

Yours Sincerely,
**Sd/- (B.Y.Aher)**

**Prof.B.T.Deshmukh,** President,
NUTA, Camp, Nagpur (P1NB1978)

*(सहपत्र चौतीस : परिच्छेद १८८ पहा)*

To,
**Shri B.T.Deshmukh,** President
Nagpur University Teachers' Association, Amravati

**28th December, 1977**

Sir,

With reference to the discussion, which you and four other Office Bearers of Nagpur University Teachers' Association, had with the Minister of Education, on 15th December, 1977 (a copy of the brief record of which was handed over personally to you later in the evening on that day), **I am directed to inform you that instructions have been issued to day to the Director of Higher Education, M.S.Poona, authorising him to release additional Ad hoc assistance not exceeding 75 lakhs in the aggregate, to the aided non-Government Arts, Science, Commerce and Education Colleges affiliated to Nagpur University,** to enable them to clear the actual arrears of salary and allowances of their teaching and non-teaching staff, relating to the period from 1.4.77 to 30.9.77. The Director of Higher Education, has decided to have two meetings with the college authorities - one at Nagpur from 7th to 9th (both days inclusive) and the other at Amravati on the 10th and 11th January, 1978 - to verify the actual arrears on the spot where after the additional Ad hoc assistance equal to the verified amount of arrears relating to the aforesaid period, will be released by him expeditiously.

Yours faithfully,
(P1NB1978) **Sd/- D.M.Sukhtankar**

(iii) **पुणे विभागाच्या** बाबतीत अधिकृत आकडेवारी नुसार पुणे व शिवाजी विद्यापीठ मिळून सर्व महाविद्यालयांमध्ये थकबाकीची रक्कम १६,२२,००० रूपये होती. संघटनेने आपल्या पत्रामध्ये ५० लाख रूपये म्हणजे खुपच जास्त धरलेली होती. कारण ती पूर्णपणे कोणतीही स्थळप्रत न पाहता ढोबळमानाने व अंदाजे धरलेली रक्कम होती.

(iv) **मुंबई विद्यापीठाशी** संलग्न असलेल्या अनुदानित महाविद्यालयांमध्ये एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील वेतन थकबाकीची रक्कम अधिकृत आकडेवारीप्रमाणे ६ लाख १ हजार रूपये होती. संघटनेने ती पूर्णपणे अंदाजे व ढोबळमानाने २५ लाख रूपये धरलेली होती.

**(v) सारांश काय तर सबंध महाराष्ट्रातील वेतन थकबाकी ही कोणत्याही परिस्थितीमध्ये २ कोटी रूपयापेक्षा जास्त असू शकत नाही, असे नुटाच्या अध्यक्षांनी आपल्या तिसऱ्या पत्रान्वये मा. शिक्षणमंत्र्यांना कळविले होते व आता उच्च शिक्षण संचालकांनी या सभेत सादर केल्याप्रमाणे अधिकृत आकडेवारीनुसार ही थकबाकी १ कोटी ४६ लाख रूपये इतकी होती. संघटनेच्या अंदाजापेक्षा ती रक्कम बरीच कमी होती.**

## शिक्षणमंत्र्यांची ठाम भूमिका

**१८३.** मंत्रिमंडळाने या थकबाकीसाठी २ कोटी ३० लक्ष रुपये इतका निधी मंजूर केलेला असतांना व मा. शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीत खुद्द शिक्षणमंत्र्यांनी हा निधी थकबाकीसाठीच मंजूर करण्यात आलेला आहे असे स्पष्ट केलेले असतांना व तो १० नोव्हेंबरच्या आत अदा करावयाचा असतांना विदर्भातील एकाही महाविद्यालयाला थकबाकीचा एकही रूपया मिळाला नाही. या मुद्यावर मग चर्चा सुरू झाली. **"एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकीत वेतनाची रक्कम देण्याबाबतचे आदेश १० नोव्हेंबरच्या आत काढण्याचे स्पष्ट आश्वासन नुटाच्या प्रतिनिधी मंडळाला शासनातर्फे देण्यात आलेले होते," ही गोष्ट या चर्चेमध्ये शिक्षणमंत्र्यांनी निःसंदिग्ध शब्दात स्पष्ट केली.** त्यांची ही भूमिका त्यांनी कार्यवृत्तामध्ये सुद्धा नमूद केली. उच्च शिक्षण संचालकांनी असेच ठरले होते असे या सभेमध्ये सांगितले.

*(सहपत्र पस्तीस : परिच्छेद १९१ पहा)*

***क्रमांक - बियूडी-२००४/६७८९०/आ.त./लेखा-२***
***शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)***
***महाराष्ट्र राज्य, पुणे-१***
**दिनांक - २३ फेब्रुवारी, २००५**

प्रति,
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय** : अशासकीय कला वाणिज्य विज्ञान व विधी आणि अध्यापक महाविद्यालयाचे वेतन अनुदानाबाबत.

वरील विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की सन २००४-०५ या आर्थिक वर्षामध्ये शासनाकडून उपलब्ध झालेले अनुदान दरमहा वेळोवेळी वितरीत करण्यात आलेले आहे. माहे जानेवारी २००५ या महिन्याचे वेतन अनुदान देण्यासाठी शासनाकडून जी तरतूद उपलब्ध झालेली आहे ती तरतूद सदर महिन्याच्या वेतनास अपुरी पडल्यानुसार सर्व विभागीय सहसंचालकांना तरतूद वितरीत करतांना त्या त्या प्रमाणामध्ये तरतुदी कमी करुन वेतन अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात आलेले आहे.

शासनाकडून शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग क्रमांक एनजीसी-१२७७/१२२१६६/३२(सेल) दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासन आदेशान्वये अशासकीय महाविद्यालयांना वेतन अनुदान योजना लागू करण्यात आलेली आहे. **सदर आदेशान्वये अशासकीय महाविद्यालयांना/संस्थांना शासनामार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अनुदान मंजूर करण्यात येते. महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची जबाबदारी ही संस्था प्रमुखांची असून शासनामार्फत मान्य पदांचे वेतन अदा करण्यासाठी शासन वेतन अनुदान वितरीत करीत असते.**

माहे जानेवारी २००५ मध्ये कमी प्रमाणात वेतन अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. माहे फेब्रुवारी, २००५ च्या वेतनासाठी सद्यःस्थितीत तरतूद उपलब्ध नाही. तथापि, विभागीय सहसंचालकांनी आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये मागणी केल्यानुसार सुधारित अंदाजपत्रकान्वये वेतन अनुदानाची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे. शासनाकडून माहे जानेवारीमध्ये कमी प्रमाणात दिलेले वेतन अनुदान व माहे फेब्रुवारीचे वेतन अनुदान शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल ही बाब आपल्या विभागातील महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## शिक्षण सचिवांचा सदभावमूलक गैरसमज

**१८४.** शिक्षण सचिव हे बरेच कोंडीत सापडलेले होते. ११ सप्टेंबर तसेच १२ व १३ सप्टेंबर १९७७ या तारखेच्या चर्चेच्या वेळी आपण उपस्थित नव्हतो. त्यामुळे आश्वासनपत्रातील परिच्छेद तीनच्या अंमलबजावणीबाबत आपला 'सदभावमूलक गैरसमज' (Bonafide misunderstanding) झाला असे शिक्षण सचिवांनी सांगितले. त्यावर नुटाच्या प्रतिनिधी मंडळाच्या सदस्यांनी अतिशय कडक व तीव्र शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. तेव्हा शिक्षण सचिवांनी "That was a bonafide misunderstanding and when it is accepted, now none should be blamed or cursed" असे उद्‌गार काढले. त्यानंतर आता यावर चर्चा करण्यासारखे काहीही शिल्लक उरले नव्हते.

## संघटनेचा अहवाल व शिक्षण सचिवांचे कार्यवृत्त

**१८५.** एप्रिल १९७७ ते सप्टेंबर १९७७ या काळातील थकीत वेतनाचा निपटारा करण्यासाठी तदर्थ सहाय्य महाविद्यालयांना देण्याचे काम पुढच्या १० दिवसात खात्यामार्फत करण्यात येईल असे शासनातर्फे सांगण्यात आले व त्यानंतर ही चर्चा सायंकाळी ६ वाजता थांबली. शिक्षण सचिवांनी, अधिकाऱ्यांनी व नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी आताच्या आता बसून आजच्या चर्चेचे कार्यवृत्त तयार करावे असे आदेश मा.शिक्षणमंत्र्यांनी दिले. दिवसभर झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त तयार करण्याचे काम मंत्रालयातच एक ते दीड तास चालले. रात्री ८ वाजता मा. शिक्षण सचिव, शिक्षण खात्याचे संयुक्त सचिव, नुटाचे अध्यक्ष व सचिव असे चारजण शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी गेले. शिक्षणमंत्र्यांनी कार्यवृत्त काळजीपूर्वक पाहिल्यानंतर **"आपण १० दिवसाची वेळ टाकताहात ते दहा दिवसात बरोबर झाले पाहिजे याची काळजी घ्या, नाहीतर आताच ४-५ दिवस वाढवून घ्या"** असे उद्‌गार काढले व टंकलिखित प्रतीवर १० दिवस हे शब्द खोडून तेथे Fortnight असे शब्द हातानी लिहून त्यावर सही करून त्याची प्रत शिक्षण सचिवांनी संघटनेच्या अध्यक्षांना दिली व त्यादिवशीचे कार्य संपले. त्या दिवशीच्या चर्चेचा नुटाचे सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी तयार केलेला अहवाल सोबत **सहपत्र : एकतीस** म्हणून दिलेला आहे. शिक्षण सचिवांच्या सहीने त्या दिवशीच्या चर्चेचे जे कार्यवृत्त संघटनेच्या सुपूर्द करण्यात आले ते **सहपत्र : बत्तीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

## नुटाच्या कार्यकारी मंडळाचा ठराव

**१८६.** दिनांक १५ डिसेंबर १९७७ रोजी मुंबई येथे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांशी जी चर्चा झाली त्यानंतर ताबडतोबच नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक दिनांक १७ डिसेंबर १९७७ रोजी नागपूर येथे बोलाविण्यात आली. या बैठकीसमोर मुख्यत्वे दोन दस्तऐवज विचारार्थ ठेवण्यात आले होते. एक नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची शासनाशी जी चर्चा झाली त्या चर्चेचे शिक्षण सचिवांनी तयार केलेले कार्यवृत्त **(सहपत्र : बत्तीस)** व या चर्चेबाबत नुटाचे सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी तयार केलेला अहवाल. **(सहपत्र : एकतीस)** या दोनही कागदपत्रांचा विचार करून बैठकीमध्ये २० डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या आंदोलनाचा कार्यक्रम रद्द करण्यात यावा असे ठरले. मात्र त्याच दिवशीच्या बैठकीत कार्यकारी मंडळाने दुसरा एक पाच परिच्छेदांचा ठराव संमत केला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"३० डिसेंबर पर्यंत आश्वासनपूर्ती न झाल्यास ३ जानेवारी पासून काम बंद केले जाईल

नुटाच्या प्रतिनिधी मंडळाची मा. शिक्षणमंत्र्यांशी दि. १५.१२.७७ रोजी मुंबई येथे मा. मंत्र्यांच्या कार्यालयात जी चर्चा झाली तिचा प्रतिनिधी मंडळाने सादर केलेला अहवाल व या चर्चेचे शिक्षण सचिवांच्या सहीने दिलेले कार्यवृत्त यांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला.

(२) एप्रिल ते सप्टेंबर ७७ या काळातील थकीत पगाराचा निपटारा पगार वाटपाच्या योजनेच्या माध्यमातून १० नोव्हें. ७७ च्या आत करण्याच्या शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्ती केवळ अधिकाऱ्यांच्या गैरसमजामुळे होऊ न शकल्याबद्दल ही सभा तीव्र संताप व्यक्त करीत आहे.

(३) सदरहू आश्वासनाची पूर्ती ३० डिसेंबर ७७ च्या आत शासनातर्फे करण्यात येईल असे आता पुन्हा जे लेखी नमूद करण्यात आले आहे त्याची पूर्तता ३०.१२.७७ च्या आत न झाल्यास शिक्षकांनी पुन्हा धीर धरावा असे सांगण्याचा शासनाला नैतिक अधिकार उरणार नाही व विदर्भातील महाविद्यालयीन शिक्षक **३ जानेवारी ७८ पासून आपले शिकवण्याचे काम थांबवतील.**

(४) प्रतिनिधी मंडळाशी झालेल्या चर्चेत उच्च शिक्षण संचालक यांनी सादर केलेले महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकबाकीचे महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातील आकडे अवलोकन केले असता **आकृतीबंधाचा जबर**

**फटका हा फक्त विदर्भ व मराठवाड्यालाच कसा बसला हे चटकन लक्षात येते व त्यामुळे थकीत पगाराची ही समस्या विदर्भात आकृतिबंधामुळेच निर्माण झाली आहे ही नुटाने घेतलेली भूमिका शासकीय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या आकडेवारीने सिद्ध झालेली आहे.**

(५) अन्याय निवारणार्थ आंदोलन ही अलग गोष्ट आहे. पण लेखी स्वरुपात मान्य करण्यात आलेल्या मुदतबंद आश्वासनाची पूर्ती करवून घेण्यासाठी शिक्षकांवर आंदोलन करण्याची पाळी यावी ही दुर्दैवी गोष्ट आहे. आकृतिबंधामुळे विदर्भात निर्माण झालेल्या समस्यांचे शासनाला योग्य वेळी नीट आकलन न झाल्यामुळे अगोदरच विदर्भातील विद्यार्थ्यांचे अतीव नुकसान झाले आहे. ३० डिसेंबर ७७ पर्यंत आश्वासनाची पूर्ती न झाल्यास ३ जानेवारी ७८ पासून शिकविण्याचे काम बंद होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र शासनावर राहील."

### शासनाच्या पातळीवर जोरदार धावपळ

**१८७.** नुटाच्या कार्यकारी मंडळाचा उपरोक्त ठराव ताबडतोबच शासनाकडे पाठविण्यात आला. तिकडे १५ डिसेंबरच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे १५ दिवसाच्या आत म्हणजे ३० डिसेंबर पर्यंत थकबाकी अदा करण्याबाबतचे आदेश निर्गमित होणे आवश्यक होते. त्यासंदर्भात शासनाच्या पातळीवर मोठ्या प्रमाणात धावपळ सुरू झाली होती असे दिसून येते. दिनांक १५ डिसेंबर १९७७ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ७५ लक्ष रुपयाचा निधी उच्च शिक्षण संचालकांच्या स्वाधीन करणारे आदेश शिक्षण सचिवांनी निर्गमित केले होते व नागपूर विद्यापीठांतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांची एप्रिल १९७७ पासून तर सप्टेंबर १९७७ पर्यंतची सर्व थकबाकी अदा करण्याचे त्या आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. राज्याच्या शिक्षण सचिवांनी दिनांक २८ डिसेंबर १९७७ रोजी नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांना एक पत्र अमरावतीच्या पत्त्यावर पाठवून हे तपशील कळविले होते. त्या पत्रात त्यांनी असेही कळविले होते की, शिक्षण संचालक हे जानेवारी महिन्याच्या ७, ८ आणि ९ तारखेला नागपूर येथे व १० आणि ११ तारखेला अमरावती येथे सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्याकडून ही विवरणपत्रे प्राप्त करतील व त्याच वेळेला तिथेच त्यांची पडताळणी करून प्रत्यक्ष थकबाकी किती आहे? हे निश्चित करतील व त्याप्रमाणे थकबाकीची रक्कम अदा करतील. २८ डिसेंबरचे हे पत्र मला अमरावती येथे मिळू शकले नाही. कारण त्यावेळी मी नागपूर येथे मुक्कामी होतो. शिक्षण सचिवांनी प्रथम अमरावती येथे फोन करून चौकशी केली असता मी नागपूर येथे असल्याचे कळल्यावरून त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या मार्फत ते पत्र माझ्या सुपूर्द करण्याच्या मार्गाची निवड केली.

### शिक्षण सचिवांचे नुटाच्या अध्यक्षांना पत्र व नुटाच्या कार्यकारी मंडळाचा ठराव

**१८८.** शिक्षण सचिवांनी २८ तारखेलाच नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव श्री.बलराज अहेर यांना फोन वरून अशी विनंती केली की, प्रा.बी.टी.देशमुख यांचे पत्र आपण उतरवून घ्यावे व टंकलिखित करावे आणि त्याची प्रत नागपूरमध्ये मुक्कामी असलेल्या प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडे सुपुर्द करावी. नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव श्री.बलराज अहेर यांनी ताबडतोबच त्याबाबतची कार्यवाही पूर्ण केली. नागपूर विद्यापीठाच्या कार्यालयातच एका बैठकीमध्ये मी व्यस्त असतांना "बैठक आटोपल्यावर महत्त्वाच्या कामासाठी तुमच्याशी बोलायचे आहे." असा निरोप कुलसचिवांनी दिला. मी भेटायला गेलो असता त्यांनी विद्यापीठाचे कुलसचिव या नात्यांने मला जे पत्र दिले ते **सहपत्र : तेहत्तीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे. कुलसचिवांनी पत्रासोबत टेलिफोनवरून सांगितल्याप्रमाणे लिहून घेतलेली शिक्षण सचिव श्री.द.म.सुकथनकर यांनी नुटाच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्राची टंकलिखित प्रत माझ्या सुपूर्द केली. ते पत्र **सहपत्र : चौतीस** म्हणून सोबत प्रसृत करीत आहे. या नंतर दिनांक ३० डिसेंबर १९७७ रोजी नागपूर येथे नुटाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्यात आली. दरम्यानच्या काळामध्ये शिक्षण सचिवांनी पाठविलेले मूळ पत्र अमरावती येथे माझ्या निवासस्थानी सुद्धा प्राप्त झाले होते. श्री.बलराज अहेर यांचे पत्र आणि शिक्षण सचिवांचे पत्र विचारात घेतल्यानंतर नुटाच्या कार्यकारी मंडळाने पुढीलप्रमाणे ठराव संमत केला :-

"**ठराव :** एप्रिल ७७ ते सप्टेंबर ७७ या काळातील थकित पगाराचा निपटारा करण्यासाठी शासनातर्फे जी कारवाई करण्यात आल्याचे नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाला कळविण्यात आले आहे ते लक्षात घेता दिनांक ३ जानेवारी ७८ पासून सुरू होऊ घातलेले "कामबंद आंदोलन" स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे."

### योजनेचा समाधानकारक अंमल सुरू झाला

**१८९.** २१ सप्टेंबर १९७७ रोजी वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करणारा जो शासननिर्णय निर्गमित झाला त्या शासननिर्णयानुसार वेतन वितरण व्यवस्था प्रत्यक्षात महाराष्ट्रामध्ये कार्यान्वित झालेली होती. एप्रिल ते सप्टेंबर १९७७ या कालखंडातील थकबाकी अदा करण्याचा प्रश्न उच्च शिक्षण संचालकांनी नागपूर व अमरावती येथे घेतलेल्या बैठकांमुळे मार्गी लागलेला होता. ७, ८ व ९ जानेवारी १९७८ रोजी नागपूर येथे बैठका घेऊन व १० व ११ जानेवारी १९७८ रोजी अमरावती येथे बैठका घेऊन त्या कालखंडातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची जवळ जवळ ७५ लक्ष रुपयांची थकबाकी उच्च शिक्षण संचालकांनी अदा करण्याचे काम पार पाडले होते. **महाराष्ट्राच्या इतर भागात सुद्धा अशी थकबाकी अदा करण्याचे काम पूर्ण झाले. अशारीतीने वेतन वितरण व्यवस्था यथोचितरित्या सुरू झालेली होती. इथेच या लेखमालेचा समारोप करता येईल.**

*****         *****         *****

*(सहपत्र छत्तीस : परिच्छेद १९४ पहा)*

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१*

Web:www.dirhe.org : E-mail:dirhe@pn2.vsnl.net.in (०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ : फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

*क्रं. उशिसं/२००५/परीप/वे.अ./मवि-१ : दि. २८.३.२००५ : परिपत्रक*

प्रति,

राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

**विषय :- अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी आणि अध्यापक महाविद्यालयाचे वेतन अनुदानाबाबत**

सन २००४ व २००५ या शैक्षणिक वर्षासाठी वित्त विभागाकडून संचालनालयास उपलब्ध झालेली तरतुद अपूरी पडल्यामुळे माहे जानेवारी, २००५ च्या पगारासाठी १०० टक्के आवश्यक अनुदान संचालनालय खाजगी अनुदानित महाविद्यालयांना उपलब्ध करुन देऊ शकले नाही व त्यामुळे संचालकांनी खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन अनुदानासंबंधी क्रमांक बीयुडी/२००४/६७८९०/आ.त./लेखा-२, दिनांक २३/२/२००५ रोजी एक परिपत्रक काढले होते. संचालनालय या पत्राद्वारे आता सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना कळवित आहे की, **सदरचे परिपत्रक रद्द समजण्यात यावे.**

शासन निर्णय व युवक सेवा विभाग क्रमांक एनजीसी/१२७७/१२२१६६/३२(सेल), दिनांक २१/९/१९७७ च्या शासन निर्णयाचा हवाला देऊन अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची आहे असे जे म्हटले होते ते वाक्य परत घेण्यात येत असून त्याऐवजी** उपलब्ध झालेल्या शासन अनुदानानुसार वेतन अदा करण्यात येईल असे स्पष्टीकरण या पत्राद्वारे करण्यात येत आहे.

शिक्षकांचे १०० टक्के पगार व्हावेत अशा हेतुने शिक्षण संचालकांनी दिनांक २३/२/२००५ चे पत्र दिले होते परंतु शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा गैरसमज झालेला असल्याने **संचालनालय दिलगिर आहे आणि दिनांक २३/२/२००५ चे पत्र संचालनालयाकडून रद्द करण्यात येत आहे.** सुधारीत अंदाज मंजुर झाल्यानंतर माहे जानेवारी २००५ च्या वेतनासाठी कमी पडलेली तरतूद संचालनालयाचे पत्र क्रमांक बीयुडी/२००३/१२३४५/आ.त./लेखा-२, दिनांक २२/३/२००५ नुसार सर्व विभागीय सहसंचालकांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

आपले स्तरावरुन सदर बाब संबंधितांचे त्वरीत निदर्शनास आणून द्यावी.

**शिक्षण संचालक (उ.शि.)**
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## योजनेवर येणारी / आलेली संकटे

**१९०.** वेतन वितरणाची उपरोक्त व्यवस्था दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासननिर्णयाने अस्तित्वात आली व गेली ४०-५० वर्षे ती निर्बाधपणे चालू आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की, त्या योजनेवर कोणतेही संकट आले नाही किंवा येण्याची शक्यता नाही. पुढे काय संकटे येतील याविषयीचा विचार ही एक कल्पना असू शकते, मात्र यापूर्वी काय संकटे येऊन गेलीत याविषयीची माहिती नमूद करणे मला आवश्यक वाटते.

## कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार

**१९१.** उच्च शिक्षण संचालक हे या योजनेचे मुख्य देखरेख अधिकारी आहेत व या योजनेचे ते प्रमुख प्रशासक सुद्धा आहेत. महाविद्यालयांना वर्षभरात मिळणाऱ्या उत्पन्नाशिवाय तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम प्रत्येक महाविद्यालयाला देण्याचा स्थायी अधिकार या शासननिर्णयाने उच्च शिक्षण संचालकांना प्रदान केलेला आहे व प्रमुख प्रशासक या नात्याने ती योजना उत्तम रीतीने चालेल, त्यात कोणताही अडथळा येणार नाही, वेतन नियमितपणे मिळत राहील हे पाहण्याची जबाबदारी शासननिर्णयाने उच्च शिक्षण संचालक या अधिकाऱ्यांकडे सोपविलेली आहे. आपल्या या जबाबदारीचा संपूर्ण विसर पडण्याचा प्रकार एखादे वेळी उच्च शिक्षण विभागातील अतिउच्च पदावर बसणाऱ्या या ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या हातून घडू शकतो. दिनांक २३ फेब्रुवारी २००५ रोजी उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांनी एक परिपत्रक काढले. "**अशासकीय कला वाणिज्य विज्ञान व विधी आणि अध्यापक महाविद्यालयाचे वेतन अनुदानाबाबत**" असा या परिपत्रकाचा विषय असून या परिपत्रकामध्ये त्यांनी योजनेच्या विरोधात जाणाऱ्या अनेक गोष्टी नमूद केलेल्या होत्या. त्यांच्या या परिपत्रकातील अत्यंत आक्षेपार्ह मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासन आदेशान्वये अशासकीय महाविद्यालयांना वेतन अनुदान योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर आदेशान्वये **अशासकीय महाविद्यालयांना/संस्थांना शासनामार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अनुदान मंजूर करण्यात येते. महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची जबाबदारी ही संस्था प्रमुखांची असून शासनामार्फत मान्य पदांचे वेतन अदा करण्यासाठी शासन वेतन अनुदान वितरीत करीत असते.**"

वेतन वितरण व्यवस्थेवर बेकायदेशीरपणे कठोर आघात खुद्द उच्च शिक्षण संचालकांच्या या २३ फेब्रुवारी २००५ च्या परिपत्रकान्वये केला होता. कुंपणानेच शेत खाण्याचा हा प्रकार होता. हे परिपत्रक सोबत **सहपत्र : पस्तीस** म्हणून प्रसृत केलेले आहे.

## प्रत्येक वाक्य चुकीचे

**१९२.** त्यांच्या उपरोक्त मजकुरातील प्रत्येक वाक्य हे शासननिर्णयाच्या विरोधात आहे, असे दिसून येईल. दिनांक २१ सप्टेंबर १९७७ चा शासननिर्णय त्यांना ठावूक नव्हता असे म्हणता येणार नाही. कारण त्या शासननिर्णयाचा स्पष्ट उल्लेख त्यांनी त्यांच्या पत्रामध्ये केलेला आहे. हे प्रत्येक वाक्य शासननिर्णयाच्या विरोधात कसे आहे, हे पाहणे आवश्यक आहे.

(i) "दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासन आदेशान्वये अशासकीय महाविद्यालयांना **वेतन अनुदान योजना** लागू करण्यात आलेली आहे." हे वाक्य त्यांनी शासननिर्णय न वाचताच लिहिले असावे असे म्हणता येते. कारण त्या शासननिर्णयाचा नुसता मथळा जरी वाचला तरी ही वेतन अनुदान योजना नसून "Scheme to ensure regular and full payment" याबाबतची ती योजना आहे. वेळेवर आणि पूर्ण वेतन अदा करावयाच्या योजनेचा एक लहानसा भाग म्हणून वेतन अनुदानाचा त्यामध्ये समावेश आहे, ही गोष्ट खरी असली तरी त्याला वेतन अनुदान योजना म्हणणे हे पूर्णपणे चुकीचे आहे.

(ii) "सदर आदेशान्वये अशासकीय महाविद्यालयांना/संस्थांना शासनामार्फत **निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अनुदान** मंजूर करण्यात येते." हे वाक्य सुद्धा पूर्णपणे चुकीचे आहे व शासननिर्णय न वाचताच लिहिलेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान देण्याची ही योजना नसून वेतन नियमित करण्यासाठी आवश्यक तो निधी उच्च शिक्षण संचालकांना स्थायी स्वरूपात उपलब्ध करून देणारी ही योजना आहे. ही गोष्ट सुद्धा संचालकांना कळली नाही.

(iii) "महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची जबाबदारी ही संस्था प्रमुखांची आहे." हे त्यांच्या परिपत्रकातील वाक्य सुद्धा शासननिर्णय न वाचताच त्यांनी लिहिलेले आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. याचे कारण असे आहे की, या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये "The Director of Education (Higher Education), Maharashtra State, Pune, shall be in overall charge of the administration of and supervision over the scheme." हा असलेला उल्लेख त्यांनी अजिबात वाचला नाही किंवा त्यांच्या वाचण्यात आला असेल तर त्या वाक्याचा अर्थ त्यांना कळला नाही असे म्हणावे लागेल.

(iv) "शासनामार्फत मान्य पदांचे वेतन अदा करण्यासाठी शासन वेतन अनुदान वितरीत करीत असते." हे त्यांचे वाक्य खरे आहे पण शासनाने मान्य करून दिलेले अनुदान वितरित करून या योजनेचे प्रमुख प्रशासक म्हणून नियमित वेतन होईल हे पाहणे ही जबाबदारी प्रमुख प्रशासक म्हणून उच्च शिक्षण संचालकांची असते. याचा त्यांना विसर पडला असे म्हणता येईल.

## विधानपरिषदेत लक्षवेधी

**१९३.** उच्च शिक्षण संचालकांच्या या दिनांक २३ फेब्रुवारी २००५ च्या परिपत्रकामुळे महाराष्ट्रभर सर्वत्र असंतोष निर्माण झाला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने १७ मार्च २००५ रोजी शासनाला एक निवेदन देऊन उच्च शिक्षण संचालकांच्या बडतर्फीची मागणी केली. अनेकांनी याबाबतच्या तक्रारी शासनाकडे पाठविल्या होत्या. विधानपरिषद सदस्य या नात्याने माझ्याकडे सुद्धा अशा तक्रारी आल्या. या शिवाय अनेक मुद्यांबाबत उच्च शिक्षण संचालकांच्या कारभाराच्या विरोधात अनेकांच्या तक्रारी आलेल्या होत्या. ह्या सर्व तक्रारी एकत्र करून आम्ही एक लक्षवेधी सूचना विधानपरिषदेमध्ये सादर केली होती. ही लक्षवेधी सूचना मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी आली. आजच्या विवेचनाचा मुख्य विषय वेतन वितरण व्यवस्था हाच असल्यामुळे इतर मुद्दे बाजूला ठेवून वेतन वितरण व्यवस्थेबाबत या लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद असलेला मुद्दा मी शब्दशः नमूद करीत आहे तो पुढीलप्रमाणे :-

"दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासन निर्णयान्वये नियमित व वेळेवर वेतन करण्यासाठीच्या योजनेचे प्रमुख प्रशासक व देखरेख अधिकारी म्हणून संचालक यांचेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यात उच्च शिक्षण संचालक यांना आलेले अपयश, आपले अपयश झाकण्यासाठी "महाविद्यालयातील

---

*(सहपत्र सदतीस : परिच्छेद १९८ पहा)*

**क्रं. उशिसं/२००५-२००६/**

***शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१***

***दिनांक ४ एप्रिल, २००५.***

***कार्यालयीन आदेश***

संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/परीप/अनु/मवि-१ दिनांक ३०/३/२००५ नुसार राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना व सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन सर्व लाभांशासह काढण्यासंबंधी आपणास मिळालेच असेल. त्याप्रमाणे आपण आपल्या स्तरावर वेतन वितरण कक्ष (Salary Distribution Cell) स्थापनही केला असेल. या कक्षामध्ये आपल्या कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी आहेत त्यांची नांवे संचालनालयास त्वरित कळवावीत कारण त्याप्रमाणे त्यांच्या कामाची नोंद संचालनालयाच्या स्तरावर घेण्यात येईल. **आपण प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून सुधारित वेतन प्रत्येक शिक्षकनिहाय काढून आपल्या विभागाची एकूण मागणी मे, २००५ महिन्यासाठी नोंदवावयाची आहे.** यामध्ये जी प्रकरणे आपल्याकडे स्थाननिश्चितीसाठी प्रलंबित असतील त्या प्रकरणांचा देखील निपटारा करुन शिक्षकनिहाय व महाविद्यालयनिहाय ही मागणी नोंदवावयाची आहे. यासाठी संचालनालय स्तरावर खालील प्रमाणे कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १. डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक (मुख्यालय) | अध्यक्ष |
| २. श्री. एम.बी. ढेंगळे, प्रशासन अधिकारी | सदस्य |
| ३. श्री. बी.बी. सोनवणे, वरिष्ठ लिपिक | सदस्य |
| ४. श्री. बी.टी. डोणे, कनिष्ठ लिपिक | सदस्य |
| ५. श्री. ए.एम. भागवत, कनिष्ठ लिपिक | सदस्य |

सदर कक्षास आपण आपली मागणी कोणत्याही परिस्थितीमध्ये दिनांक २०/४/२००५ पर्यंत पाठवावयाची आहे किंवा समक्ष डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक, मुख्यालय यांच्याकडे येऊन या कक्षाच्याद्वारे तपासून मंजूर करुन घ्यावयाची आहे. **नंतरच आपणास आपल्या विभागासाठी मे पेड इन जून वाढीव तरतूद देण्यात येईल व राज्यामध्ये कोणत्याही शिक्षकाचे अपूर्ण वेतन दिले जाणार नाही याची खबरदारी हे संचालनालय घेईल.** तसेच आपल्या स्तरावरुन आपण आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळवावे व सदर आदेशानुसार कार्यवाही करावी.

(डॉ. एस.एन. पठाण)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची असल्याचे" शासन निर्णयाच्या विरुध्द परिपत्रक दिनांक २३ फेब्रुवारी, २००५ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी काढणे, त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष, दिनांक १७ मार्च,२००५ रोजी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी उच्च शिक्षणमंत्री यांना एक निवेदन सादर करुन बेमुदत काम बंद आंदोलनासह धरणे, निदर्शने इत्यादी आंदोलनाचा सादर केलेला कार्यक्रम, उच्च शिक्षण संचालकांच्या बडतर्फीची करण्यात आलेली मागणी,"

### उच्च शिक्षण संचालकांनी परिपत्रक रद्द केले

**१९४.** ही लक्षवेधी सूचना दाखल झाल्यानंतर उच्च शिक्षण विभागात व उच्च शिक्षण संचालकांच्या कार्यालयात मोठी खळबळ उडाली होती असे दिसून आले. आपल्या कडून ही मोठी चूक झालेली आहे. आपणच या योजनेचे प्रमुख प्रशासक आहोत याची जाणीव उच्च शिक्षण संचालकांना या लक्षवेधी सूचनेमुळे झाली व त्यांनी २८ मार्च २००५ रोजी एक परिपत्रक काढून २३ फेब्रुवारी २००५ च्या त्या परिपत्रकाबाबत "**संचालनालय या पत्राद्वारे आता सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना कळवित आहे की, सदरचे परिपत्रक रद्द समजण्यात यावे.**" असे कळविले. खरे म्हणजे त्यांनी २३ फेब्रुवारी २००५ चे परिपत्रक रद्द केल्यामुळे तो विषय तेथे संपतो. पण आपल्या हातून खूप मोठी चूक झालेली आहे याची जाणीव झाल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतन देण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे असे जे म्हटले होते **ते वाक्य परत घेत असल्याचे त्यांनी नमूद केले.** इतकेच नव्हे तर आपल्या "२३ फेब्रुवारीच्या त्या परिपत्रकामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गैरसमज झालेला **असल्याने संचालनालय दिलगीर आहे** आणि दिनांक २३.०२.२००५ चे पत्र संचालनालयाकडून रद्द करण्यात येत आहे" असेही या २८ मार्च

*( सहपत्र अडतीस : परिच्छेद २०१ व २०३ पहा )*

## *महाराष्ट्र राज्य*

***सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव***

आकाशवाणी केंद्राजवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पहिला मजला जळगाव

(दुरध्वनी फॅक्स क्र. ०२५७/२२३८५१०) Email : jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.भनिनि/ससउशि/नेट/सेट/२०१९-२०/२८८

**दिनांक : १४.०२.२०२०**

प्रति,

अशासकीय अनुदानित कला वाणिज्य विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, जळगाव, धुळे, नंदुरबार

**विषय** : शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व अनुषंगिक न्यायालयीन प्रकरणाबाबत.

**संदर्भ** : मा.शिक्षण संचालनालयाचे पत्र जा.क्र.उशिस/२०२०/नेटसेट न्या.प्र. आर्वि/विशि/१९६० दि.१४.०२.२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, या विभागातील अशासकीय अनुदानित कला वाणिज्य विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये येथील नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा शासननिर्णय दि.२७.०६.२०१३ अन्वये दि.२३.१०.१९९२ ते दि.३०.०४.२००० नियमित केल्या असल्यामुळे त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होणे संदर्भात शासन स्तरावर दि. ११.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुपंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास तातळीने करावयाची आहे.

१. दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत निवृत्त झालेल्या व जीपीएफ खाते उघडण्यात आलेले आहे अशा अद्यापकांची संख्या.

२. जीपीएफ खाते उघडण्यात आलेल्या अद्यापकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम किती आहे व त्यावरील व्याज किती परिगणित होत आहे. याबाबत तपशील.

३. संबंधित अद्यापकांना डीसीपीएस क्रमांक देऊन दि. २७.०६.२०१३ पासून संबंधित अद्यापकांच्या डीसीपीएफ खात्यात शासनाच्या हिश्याची रक्कम जमा करावी लागणार असल्याने त्याचा शासनावर किती आर्थिक भार येईल.

तरी प्रस्तुत प्रकरणी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती माहे फेब्रुवारी २०२० च्या वेतन देयकासोबत एक्सल सीट मध्ये सादर करावी. **जे महाविद्यालय सदरची माहिती सादर करणार नाही त्या महाविद्यालयाचे वेतन देयक स्वीकारता येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची राहील.**

सहसंचालक
उच्च शिक्षण, जळगाव
विभाग,जळगावकरिता

*** AF : P17 ***

२००५ च्या पत्रात त्यांनी नमूद केले होते. २८ मार्चचे ते पत्र **सहपत्र : छत्तीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

### विधानपरिषदेत शासनाचे उत्तर

**१९५.** सभागृहामध्ये ज्यावेळेला ही लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली त्यावेळेला मा. उच्च शिक्षणमंत्र्यांतर्फे जे निवेदन करण्यात आले त्या निवेदनामध्ये या मुद्यांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते :-

"जानेवारी २००५ चे वेतन अनुदान सर्व अनुदानित महाविद्यालयांना वितरित करण्यासाठी अपूरे पडत असल्याने उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक २३.२.२००५ रोजी परिपत्रक काढून शैक्षणिक संस्थांना अपूरी पडणारी तरतूद उपलब्ध करुन शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, सर्व शिक्षकांना वेतन मिळावे या उद्देशाने हे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. तथापि, या परिपत्रकामुळे गैरसमज निर्माण झाल्यामुळे, **सदर पत्र दिनांक २८.३.२००५ च्या परिपत्रकान्वये रद्द करण्यात आले आहे.** सद्यःस्थितीत सर्व महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे जानेवारी २००५ चे वेतन अदा करण्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या वेतनाच्या जवळजवळ ८० टक्के तरतूद वितरित करण्यात आली आहे. अध्यक्ष व सचिव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन यांनी दिनांक १७ मार्च २००५ रोजी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २८.३.२००५ रोजी शिवाजी युनिव्हर्सिटी टिचर्स असो. या संघटनेबरोबर बोलणी केली असून **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास बोलणी करण्यासाठी निमंत्रित केलेले आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १३९, क्रमांक १६, पृष्ठ ७५)*

### येथून पुढे हलगर्जीपणा होता कामा नये

**१९६.** वेतन वितरण व्यवस्थेच्या २५ वर्षांपेक्षा जास्त काळपर्यंत सुरू असलेल्या प्रवासावर आलेले एक मोठे संकट उच्च शिक्षणमंत्र्यांनी केलेल्या उपरोक्त निवेदनामुळे संपुष्टात आले. लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या इतर मुद्यांबाबत शासनातर्फे काय उत्तरे देण्यात आलेली होती हे विवेचन विषयाशी संबंधित नसल्यामुळे त्याचा परामर्श येथे घेण्यात आलेला नाही. मात्र एक गोष्ट याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखी आहे ती अशी की, उच्च शिक्षण संचालकांना आपण या योजनेचे प्रमुख प्रशासक आहोत हे लक्षात आल्यामुळे त्यांनी ती बाब फारच गंभीरपणे घेतली असे दिसून येते. उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक ११ एप्रिल २००५ रोजी "खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक तारखेस वेतन देणे बाबत" या विषयावरील एक परिपत्रक राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठविले. त्याच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे नमूद केले होते की, "**प्रत्येक महिन्याच्या वेतनासाठी आपल्या मागणीनुसार आवश्यक तेवढे अनुदान या संचालनालयाकडून दिले जाते परंतु शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मात्र १ तारखेस वेतन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीमध्ये संचालनालय अथवा विभागीय सहसंचालक कार्यालय यांच्या स्तरावर येथून पुढे हलगर्जीपणा होता कामा नये.**"

### एक तारखेस पगार देण्यात येईल याची खबरदारी घ्यावी

**१९७.** दिनांक ११ एप्रिल २००५ रोजीच्या या दहा परिच्छेदांच्या लांबलचक परिपत्रकामध्ये करावयाच्या उपाययोजनांचे बारीक सारिक तपशील उच्च शिक्षण संचालकांनी नमूद केले होते. "ज्या विभागीय कार्यालयाकडून दुसऱ्या आठवड्यामध्ये कोषागारात देयके सादर होणार नाहीत. **त्या विभागीय कार्यालयास कसूर म्हणून जबाबदार धरण्यात येईल.**" असेही या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले होते. याच परिपत्रकाने आणखी असेही सूचविले होते की, "चौथ्या आठवड्याच्या चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी धनाकर्ष हे त्या त्या महाविद्यालयात पोहचतील अशा पद्धतीचे नियोजन विभागीय सहसंचालक कार्यालयाने करावे. वरील पद्धतीने कामाचे नियोजन देखरेख अधिकाऱ्याने करावे, **म्हणजे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एक तारखेस पगार देण्यात येईल याची खबरदारी घ्यावी.**" या परिपत्रकामध्ये त्यांनी पुढे असेही कळविले होते की,

"८. तिसऱ्या आठवड्यात कोषागारातून सदर देयके मंजूर होण्यामध्ये काही अडचणी आहेत असे निदर्शनास आल्यास विभागीय सहसंचालकांनी थेट डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक (मुख्यालय) यांच्याशी संपर्क साधावा. ते स्वतः कोषागार अधिकाऱ्यांशी बोलून घेतील व कोषागार कार्यालयामध्ये देयके विलंबाने का मंजूर होत आहेत, याची माहिती स्वतः संचालकांना देतील व याबाबतीत शिक्षण संचालक थेट संचालक, कोषागारे यांच्याशी संपर्क साधतील परंतू **तिसऱ्या आठवड्यात देयके मंजूर करुन घेणे ही विभागीय सहसंचालक**

**कार्यालयाची जबाबदारी आहे."**

## संचालकाकडे वेतन कक्ष तसेच सहसंचालकाकडे कक्ष स्थापना

**१९८.** सभागृहामध्ये ही लक्षवेधी सूचना दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी चर्चेसाठी होती. त्याच्या एक दिवस अगोदर (दिनांक ४.४.२००५) शिक्षण संचालकांनी एक कार्यालयीन आदेश काढून सर्व विभागीय सहसंचालकांना पुढीलप्रमाणे कळविले होते :-

"आपण आपल्या स्तरावर वेतन वितरण कक्ष (Salary Distribution Cell) स्थापनही केला असेल. या कक्षामध्ये आपल्या कार्यालयातील जे अधिकारी/ कर्मचारी आहेत त्यांची नांवे संचालनालयास त्वरित कळवावीत कारण त्याप्रमाणे त्यांच्या कामाची नोंद संचालनालयाच्या स्तरावर घेण्यात येईल. **आपण प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून सुधारित वेतन प्रत्येक शिक्षकनिहाय काढून आपल्या विभागाची एकूण मागणी मे, २००५ महिन्यासाठी नोंदवावयाची आहे."**

इतकेच नव्हे तर ४ एप्रिल २००५ च्या कार्यालयीन आदेशान्वये त्यांनी आपल्याच कार्यालयात वेतन कक्ष स्थापन करून त्या कक्षाकडे पुढील जबाबदारी सोपविली होती :-

"सदर कक्षास आपण आपली मागणी कोणत्याही परिस्थितीमध्ये दिनांक २०/४/२००५ पर्यंत पाठवावयाची आहे किंवा समक्ष डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक, मुख्यालय यांच्याकडे येऊन या कक्षाच्याद्वारे तपासून मंजूर करुन घ्यावयाची आहे. **नंतरच आपणास आपल्या विभागासाठी मे पेड इन जून वाढीव तरतूद देण्यात येईल व राज्यामध्ये कोणत्याही शिक्षकाचे अपूर्ण वेतन दिले जाणार नाही याची खबरदारी हे संचालनालय घेईल."**

उच्च शिक्षण संचालकांचे ४ एप्रिल २००५ चे कार्यालयीन आदेश **सहपत्र : सदतीस** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहेत.

## योजनेवर सहसंचालकांचा हल्ला

**१९९.** नियमित वेतन वितरण व्यवस्थेने उच्च शिक्षण संचालक यांना सोपविलेले काम करण्याचे सोडून त्या योजनेवरच आघात करण्याचा ते कसा प्रयत्न करतात याची तपशीलवार माहिती वर दिलेली आहे. निरनिराळ्या विभागांमध्ये काम करणारे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक सुद्धा या योजनेवर हल्ला करण्याच्या बाबतीत मागे पुढे पहात नाहीत, याची कितीतरी उदाहरणे नमूद करण्यासारखी आहेत. वस्तुतः या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण विभागाची क्षेत्रीय कार्यालये निर्माण झालीत व त्या कार्यालयाचे प्रमुख म्हणून ओएसडी आणि एओ आणि त्यानंतर सहसंचालकांच्या दर्जाचे अधिकारी नेमण्यात आले. पण आपली नेमणूक कशासाठी करण्यात आलेली आहे याचे भान न राहून हे अधिकारी त्या योजनेवरच कसा हल्ला करतात याची काही उदाहरणे मी नमूद करीत आहे.

## द्राविडी प्राणायाम

**२००.** सन १९९२-२००० या काळात नियुक्त झालेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल अशा अर्थाचे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी निर्णय दिलेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या तीन खंडपीठांनी हे निर्णय कायम केलेत. एवढे सारे महाभारत झाल्यानंतर मंत्रालयामध्ये काही अधिकाऱ्यांना जाग आली व त्यांनी या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कृती सुरू करण्याऐवजी "या शिक्षकांना अजुनही डीसीपीएस क्रमांक दिला गेला नाही व परिणामी त्यांच्या वेतनातून नियमानुसार कपात झाली नाही. निवृत्ती वेतन अथवा नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतंर्गत मिळणारे लाभ या दोन्ही लाभांपासून हे कर्मचारी वंचित राहत आहे." अशी मोठी काळजी व्यक्त करणारा पोक्त विचार मंत्रालयात करण्यात आला. प्राणायामापासून शरीराला मिळणारे लाभ न मिळता नुकसान होईल अशारीतीने प्राणायाम करण्याच्या पद्धतीला द्राविडी प्राणायाम असे संबोधण्याची पद्धती रुढ झालेली आहे. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मंत्रालयातून निर्गमित करण्यात आलेल्या १३ फेब्रुवारी २०२० च्या पत्रान्वये हा द्राविडी प्राणायाम सुरू झाला. हे पत्र उच्च शिक्षण खात्याने लिहिले असून निरनिराळ्या तीन बाबतीतील माहिती शासनाला तावडतोब सादर करावी असे आदेश या पत्राने उच्च शिक्षण संचालकांना दिले. उच्च शिक्षण संचालकांनी लगोलगच दुसऱ्या दिवशी म्हणजे १४ फेब्रुवारी २०२० रोजी विभागीय सहसंचालकांना एक आदेश पाठवून त्या तीन मुद्यांबाबतची माहिती मागविली.

## तीन मुद्यांबाबत माहिती मागविली

**२०१.** उच्च शिक्षण संचालकांच्या परिपत्रकाप्रमाणे त्याच दिवशी म्हणजे १४ फेब्रुवारी २०२० रोजी जळगावच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना परिपत्रक **(सहपत्र : अडतीस)** पाठवून या तीन मुद्यांबाबतची माहिती मागविली. आजचा मुख्य विषय कोणत्याही गोष्टीचे निमित्त करून सहसंचालक वेतन वितरण योजनेवर कसा हल्ला करतात हा असल्यामुळे तेवढ्या पुरतीच माहिती याठिकाणी नमूद करीत आहे. शासनाच्या १३ फेब्रुवारी २०२० च्या पत्रामध्ये "शासननिर्णय दिनांक २७ जून २०१३ व अनुषंगिक न्यायालयीन प्रकरणाबाबत" असा विषय होता. उच्च शिक्षण संचालकांनी १४ फेब्रुवारी २०२० च्या पत्रामध्ये तो विषय तसाच ठेवला. जळगाव विभागाच्या सहसंचालकांनी तत्परतेने त्याच दिवशी १४ फेब्रुवारी २०२० रोजी जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना परिपत्रक पाठविले. तेथेही तोच विषय त्यांनी तसाच ठेवला.

## अद्यापकांची माहिती पाठवा

**२०२.** खरे म्हणजे उच्च शिक्षण संचालकांच्या पत्राची नक्कलच जळगावच्या सहसंचालकांना करावयाची होती पण ही नक्कल करतांना त्यांनी केलेला प्रताप नोंद घेण्यासारखा आहे. उच्च शिक्षण संचालकांनी दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त झालेल्या व जीपीएफ खाते उघडण्यात आलेले आहे अशा अध्यापकांची संख्या किती आहे या मुद्यावर माहिती मागितलेली होती. तो मुद्दा जसाच्या तसा नकलून काढतांना जळगावच्या सहसंचालकांनी मात्र अध्यापकांच्या संख्येऐवजी **अद्यापकांची** संख्या किती आहे? असे विचारले असे दिसून येते. उच्च शिक्षण संचालकांनी जीपीएफ खाते उघडण्यात आलेल्या अध्यापकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम किती आहे व त्यावरील व्याज किती परिगणित होत आहे याबाबतचे तपशील दुसऱ्या मुद्यान्वये मागितलेले होते. जळगावच्या सहसंचालकांनी हा मुद्दा आपल्या पत्रात जसाच्या तसा समाविष्ट करतांना अध्यापकांच्या ऐवजी **अद्यापकांचे** तपशील मागितले. तिसरा मुद्दा उच्च शिक्षण संचालकांच्या पत्रामध्ये संबंधित अध्यापकांना डीसीपीएस क्रमांक देऊन दि. २७.०६.२०१३ पासून संबंधित अध्यापकांच्या डीसीपीएफ खात्यात शासनाच्या हिश्याची रक्कम जमा करावी लागणार असल्याने त्याचा शासनावर किती आर्थिक भार येईल अशी विचारणा केली होती. ह्या मुद्यांची माहिती मागवित असतांना जळगावच्या सहसंचालकांनी अध्यापकांची माहिती मागण्याऐवजी **अद्यापकांची** माहिती मागविली होती.

## देयक स्वीकारता येणार नाही

**२०३.** एका पेक्षा जास्त ठिकाणी मुद्यांची माहिती मागवित असतांना अध्यापकांऐवजी अद्यापकांची माहिती मागणे या मुद्याला मी स्वतः व्यक्तिशः फारसे महत्त्व देऊ इच्छित नाही. कामाच्या रामरगाड्यामध्ये अनेक कामे समोर असतांना चित्त जागेवर नसलेल्या अधिकाऱ्यांच्या हातून अशी चूक होऊ शकते हे मान्य केलेच पाहिजे. तरीही मी हे सारे नमूद केले आहे याचे कारण मंत्रालयातून निघालेले १३ फेब्रुवारी २०२० चे पत्र व उच्च संचालकांच्या कार्यालयातून निघालेले १४ फेब्रुवारी २०२० चे पत्र यामध्ये नसलेला एक मुद्दा जळगावच्या सहसंचालकांच्या पत्रामध्ये स्वविवेकाने त्या सहसंचालकांनी जास्तीचा घुसाडलेला आहे. त्यांच्या परिपत्रकाच्या शेवटी त्यांनी एक परिच्छेद नमूद केला तो परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"तरी प्रस्तुत प्रकरणी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती माहे फेब्रुवारी २०२० च्या वेतन देयकासोबत एक्सल सीट मध्ये सादर करावी. **जे महाविद्यालय सदरची माहिती सादर करणार नाही त्या महाविद्यालयाचे वेतन देयक स्वीकारता येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची राहील."**

## वेतन देयक स्वीकारणार नाही म्हणजे काय?

**२०४.** "जे महाविद्यालय सदरची माहिती सादर करणार नाही **त्या महाविद्यालयाचे वेतन देयक स्वीकारता येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची राहील."** असे आदेश काढणाऱ्या सहसंचालकांना आपण काय आदेश काढत आहोत? याचे भान राहिले नाही असेच म्हणावे लागेल. हा सरळ सरळ 'ब्लॅकमेलींग'चा प्रकार आहे. वेतन नियमित झाले पाहिजे याची जबावदारी उच्च शिक्षण संचालकांची असतांना व उच्च शिक्षण संचालकांना मदत करण्यासाठी आपली नेमणूक असतांना, आपण आपल्या स्तरावर गैरकायदेशीर रीतीने वेतन देयके स्वीकारता येणार नाहीत असे आदेश काढतो म्हणजे त्या वेतन व्यवस्थेला उध्वस्त करीत आहोत, हे सहसंचालक पद धारण करणाऱ्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना कळू नये हे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणक्षेत्राचे मोठे दुर्दैव होय.

## वेतन व्यवस्था उध्वस्त करू

**२०५.** "वेतन देयके स्वीकारता येणार नाहीत" याचा अर्थ सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन होणार नाही असा आहे. कायद्याने व नियमाने जे वेतन देय आहे ते त्या शिक्षकाला किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्याला योग्य वेळी न मिळणे ही त्याला एक प्रकारे शिक्षा आहे व अशी शिक्षा करण्याचा अधिकार जळगावच्या उच्च शिक्षण सहसंचालकांना कायद्याने व नियमाने दिलेला आहे काय? याचा विचार या सहसंचालकांनी केलेला आहे असे वाटत नाही. भारतीय

संविधानाच्या कलम २० मध्ये अपराधाबद्दलच्या दोष सिद्धीबाबत अपराधी व्यक्तीला देण्यात आलेले संरक्षण नमूद करण्यात आलेले आहे.

### पूर्णपणे घटनाबाह्य कृति

**२०६.** अपराध स्वरूपाचे कृत्य एखाद्या व्यक्तीने केले असेल तर ते कृत्य करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचा त्यामुळे भंग झाल्याखेरीज अशा कोणत्याही अपराधाबद्दल त्या व्यक्तीला दोषी धरता येणार नाही असे घटनेच्या २० व्या कलमामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. इतकेच नव्हे तर त्या कलमामध्ये अशीही तरतूद आहे की, अपराध करण्याच्या वेळेला अंमलात असलेल्या कायद्याने जी शिक्षा ठरविण्यात आली असेल त्यापेक्षा त्या व्यक्तीला अपराध झाला आहे हे सिद्ध झाल्यास जास्त शिक्षा देता येणार नाही. "सहसंचालकांच्या एखाद्या कायदेशीर किंवा बेकायदेशीर आदेशाचे एखाद्या प्राचार्याने पालन केले नाही तर तो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अपराध समजला जाईल" असा कायदा अजून महाराष्ट्रात झालेला नाही. "अशा अपराधाबद्दल त्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन रोखण्याची शिक्षा दिली जाईल" असा कायदा सुद्धा महाराष्ट्रात अस्तित्वात नाही. आता या ठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो की, मुळात या शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अस्तित्वात असलेल्या एखाद्या कायद्याचा भंग करण्याचा अपराध केल्याचे सुद्धा सहसंचालकांनी सिद्ध केलेले नाही. असा अपराध केल्याबद्दल कायद्याने पगार रोखून ठेवण्याची शिक्षा कायद्यातील तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे असा कोणताही कायदा सहसंचालकांनी त्यांच्या आदेशात नमूद केलेला नाही. त्यामुळे प्राचार्यांनी माहिती पाठविली नाही म्हणून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन रोखून ठेवण्याची त्यांची कृती पूर्णपणे घटनाबाह्य असून वेतन वितरण व्यवस्थेला उध्वस्त करणारी आहे.

### बेकायदेशीर माहिती मागण्याचा अधिकार?

**२०७.** प्राचार्यांकडून माहिती मागविण्याचा अधिकार उच्च शिक्षण संचालक व सहसंचालकांना आहे, ही गोष्ट खरी असली तरीही त्यामध्ये कोणतीही असंबद्ध व बेकायदेशीर माहिती मागण्याचा अधिकार समाविष्ट नाही, एवढे सामान्य ज्ञान सहसंचालक पदासारखे उच्च पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्यास असते असे अपेक्षित आहे. "निरनिराळ्या सात खंडपीठांनी नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेश दिलेले असतांना व सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाच्या तीन विशेष अनुमती याचिका फेटाळल्या गेल्या असतांना त्यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत माहिती मागविण्याची कृती ही पूर्णपणे सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे व अशाप्रकारची बेकायदेशीर माहिती पाठविण्याचा आग्रह आपण मला करू शकत नाही" असे एखाद्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या सहसंचालकांना कळविल्यास ते पूर्णपणे कायदेशीरपणाचे ठरेल. या विषयी कोणताही वाद होऊ शकत नाही.

### निसर्ग नियमांचे पालन

**२०८.** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन आपल्या कृतीमुळे रोखले जाणार आहे त्यांना कोणतीही नोटीस आपण दिलेली नाही, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही व तरीही त्यांचे वेतन रोखून ठेवण्याची कृती आपल्या हातून पार पडली किंवा पडणार आहे. हे कृत्य निसर्ग नियमांच्या विरोधात तर आहेच पण न्यायशास्त्राच्या मूलतत्त्वाच्या विरोधात सुद्धा आहे. एवढे प्राथमिक ज्ञान सुद्धा सहसंचालक पद भूषविणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यास असू नये हे आश्चर्यकारक होय. खरे म्हणजे प्राचार्याला वरप्रमाणे धमकी देतांना प्रत्येक महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व्यक्तिशः नोटीस देऊन किंवा वृत्तपत्रातून जाहीर नोटीस काढून तुमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अमुक एक कृती केली नाही तर मी आपले वेतन रोखणार आहे याबद्दल तुमचे काही म्हणणे असल्यास माझ्यासमोर मांडावे अशी कृती या सहसंचालकांनी केली असती तर नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन केल्याचे सोंग पार पाडले एवढे तरी समाधान या सहसंचालकांना मिळाले असते.

### हा तर रानटीपणा

**२०९.** खरे म्हणजे जळगावच्या सहसंचालकांनी हे जे पत्र पाठविले आहे ते पत्र उच्च शिक्षण संचालकांच्या १४ फेब्रुवारी २०२० च्या आदेशानुसार काढले आहे व संचालकांनी आपले १४ फेब्रुवारी २०२० रोजीचे आदेश शासनाच्या १३ फेब्रुवारी २०२० रोजीच्या आदेशान्वये काढले आहे. राज्यशासनाच्या आदेशामध्ये किंवा संचालकांच्या आदेशामध्ये प्राचार्यांना धमकी देणारी "वेतन देयके स्वीकारता येणार नाहीत" ही वाक्यरचना व त्यातून वेतन वितरण व्यवस्था उध्वस्त करण्याची कृती पार पाडावयाच्या आदेशाचा समावेश नाही. असे असतांना जळगावच्या सहसंचालकांनी आपल्या स्तरावर हे आदेश काढलेले आहेत ही गोष्ट "I am the State" च्या थाटात जळगावच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी पार पाडावी हे निश्चितच अशोभनीय होय. शिवाय "मी अमुक एक कागदपत्र किंवा वेतन देयक स्वीकारणार नाही" असे लेखी कळविण्यासाठी जळगावचे सहसंचालकपद ही कोणाची खाजगी मालमत्ता नाही. ते एक महत्त्वाचे विभागीय शासकीय पद आहे. "देयक स्वीकारणार नाही" हा रानटीपणाचा न्याय झाला. देयक स्वीकारणे हे या पदधारकाचे विधिमय कर्तव्य आहे. ते स्वीकारल्यानंतर त्यावर कायद्याने काय कारवाई करावयाची हा त्या पदधारकाचा अधिकार आहे. "तुमच्या प्राचार्याने मला चहा पाजला नाही म्हणून ते देयक मी फाडून फेकले" असा निर्णय एखाद्या सहसंचालकाने घेतला तर तो त्याचा अधिकार आहे असेच म्हणावे लागेल. मात्र "मी देयक स्वीकारणार नाही" हा काय प्रकार आहे?

### तोंडी आदेश देऊन 'ब्लॅकमेलींग'

**२१०.** जळगावच्या सहसंचालकांनी केलेली कृती बेकादेशीर असेल पण त्यांना एका गोष्टीसाठी मुद्दाम धन्यवाद दिले पाहिजेत की त्यांनी असे बेकायदेशीर आदेश लेखी स्वरूपात पारित केलेले आहेत. अनेक ठिकाणी सहसंचालकांनी लेखी आदेश प्रसृत न करता प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे तोंडी आदेश देऊन 'ब्लॅकमेलींग'चा हा प्रकार एखाद्या उद्योगधंद्यासारखा मोठ्या बरकतीत सुरू ठेवला असे आढळून येते. सर्व उदाहरणे नमूद करता येत नाहीत, मात्र कागदोपत्री नमूद असलेली काही उदाहरणे प्रसृत करीत आहे.

### लक्षावधी रुपयांची थकबाकी अडविली

**२११.** अमरावतीच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी अतिशय प्रतिष्ठित अशा महाविद्यालयाच्या काही प्राचार्यांना तोंडी आदेश देऊन अमुक एक कारवाई करावी किंवा करू नये असे आदेशित केले व आपल्या आदेशाचे पालन न झाल्यास तुमच्या शिक्षकांची थकबाकी अदा करणार नाही अशीही भूमिका या सहसंचालकांनी घेतली. हा सारा तोंडोतोंडी व्यवहार होता. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती, ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय अमरावती, विद्याभारती महाविद्यालय अमरावती व मातोश्री विमलाबाई महाविद्यालय अमरावती या प्रतिष्ठित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सहसंचालकांच्या बेकादेशीर अशा तोंडी आदेशाचे पालन करावयाचे नाही अशी ठाम भूमिका घेतली. परिणाम असा झाला की, त्यांच्या महाविद्यालयातील अनेक शिक्षकांची लक्षावधी रुपयांची थकबाकी ही अनेक महिने अडून पडली.

### लक्षवेधी सूचना दाखल

**२१२.** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील अनेक शिक्षकांनी माझी भेट घेतली व ही बाब माझ्या लक्षात आणून दिली. जवळ जवळ ७०-८० लक्ष रुपयांची या शिक्षकांची थकबाकी अनेक महिन्यांपासून सहसंचालकांनी अडकवून ठेवली होती. चर्चेतून हे सारे तोंडोतोंडी चाललेले प्रकरण आहे हे सुद्धा लक्षात आले. त्यामुळे मी या शिक्षकांना असा सल्ला दिला की, त्यांनी तरी निदान याबाबतची स्पष्ट लेखी तक्रार आपल्या प्राचार्यामार्फत शासनाकडे करावी. त्याप्रमाणे या शिक्षकांनी ती कार्यवाही पूर्ण केली. संघटनेकडे त्या तक्रारीची प्रत सोपविली. संघटनेने सुद्धा तक्रार दाखल केली. या आधारावर विधानपरिषदेमध्ये आम्ही काही शिक्षक प्रतिनिधींनी मार्च २००८ च्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना दाखल केली. या लक्षवेधी सूचनेचा मसुदा पुढीलप्रमाणे होता:-

***पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय, सर परशुरामभाऊ महाविद्यालय आणि गरवारे महाविद्यालय या तीनही नामांकित महाविद्यालयांवर त्यापूर्वीच्या ५० वर्षात ओढवला नाही असा प्रसंग ओढवला होता व तो म्हणजे या तीनही महाविद्यालयातील शिक्षकांचे मासिक वेतन अदा करता येत नाही अशा स्थितीला व्यवस्थापकांना तोंड द्यावे लागत होते.***

*(परिच्छेद १ पहा.)*

"श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील अनेक प्राध्यापकांना वेतनवाढ व स्थाननिश्चितीच्या फरकातील लक्षावधी रुपयांची रक्कम गेल्या अनेक वर्षापासून उपलब्ध न होणे, दि. १६ फेब्रुवारी २००८ रोजी या महाविद्यालयाच्या अनेक प्राध्यापकांनी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांना सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती यांचेमार्फत दिलेले निवेदन, त्याच तारखेला अमरावती जिल्हा नुटा संघटनेच्या अध्यक्षांनी निवेदन देवून सुद्धा याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल २००८ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक ३१, पृष्ठ १७१)*

### ७७ लक्ष रुपयांची थकबाकी

**२१३.** उपरोक्त लक्षवेधी सूचना मार्चमध्ये दाखल केल्यानंतर मंत्रालयात व उच्च शिक्षण संचालनालयात जोरदार हालचाल सुरू झाली. अमरावतीच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी दिनांक १० एप्रिल २००८ रोजी मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "**लक्षवेधी विधानपरिषद सूचना : श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती वेतनवाढ व स्थाननिश्चिती**" या विषयावर पत्र पाठवून पुढीलप्रमाणे कळविले :-

"वरील बाब विचारात घेता, संचालनालयाचे आदेश क्र. अर्थसं-२००७/ थकित रक्कमा/अमरावती/लेखा-२/२५५९दिनांक ३० मार्च, २००८ अन्वये श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील सर्व प्राध्यापकांची/कर्मचाऱ्यांची थकीत रक्कम अदा करण्यासाठी रु. ७७,०३,१२३/- मंजुर करण्यात आलेले असून, सदर रक्कम महाविद्यालयाचे वेतन खात्यात जमा होताच तातडीने वाटप करण्याबाबत संबंधित महाविद्यालयास सुचना देण्यात आलेली आहे."

या पत्राची प्रतिलिपी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्यांना अग्रेषित करण्यात आली होती व त्यांना कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेशित केले होते. त्या पत्रातील दक्षता घेण्याबाबतचा मजकूर पुढीलप्रमाणे :-

"प्रतिलीपी - (१) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पूणे-१ यांना माहितीकरिता सादर, (२) प्राचार्य, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे रु. ७७,०३,१२३/- महाविद्यालयाचे वेतन खात्यात जमा होताच संबंधित कर्मचाऱ्यांना थकीत रक्कमेचे त्वरित वाटप करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा यापुढे वेतन थकीत रक्कमांचे वाटप करतांना कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी."

### थकबाकीची रक्कम अदा करण्याची दक्षता घेण्यात येत आहे

**२१४.** पुढे शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल २००८ रोजी या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन सभागृहामध्ये सादर झाले. या निवेदनात पुढीलप्रमाणे माहिती नमूद करण्यात आली होती :- "सध्या या महाविद्यालयाला निव्वळ देय रक्कम रु. ७७,०३,१२३ एवढी आहे. सदर थकबाकीची रक्कम ३१ मार्च, २००८ पर्यंत अदा करण्याची दक्षता घेण्यात येत आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल २००८ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक ३१, पृष्ठ १७१)* एप्रिल महिन्यामध्ये विधानपरिषदेत झालेल्या या घडामोडीमुळे ही गोष्ट जाहीर झाली त्यामुळे अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांना तोंडी आदेशाच्या आधारावर अमुक गोष्ट त्यांनी न केल्यास त्यांच्या शिक्षकांची थकबाकी अदा केली जाणार नाही अशा धमक्या देण्यात आलेल्या होत्या असे लक्षात आले. त्या अनेक महाविद्यालयांचे प्राध्यापक ज्यावेळेला मला भेटण्यासाठी आले त्यावेळेला मी त्यांना लेखी तक्रार करा असा सल्ला दिला. तीन महाविद्यालयांच्या प्राध्यापकांनी त्याप्रमाणे तक्रारींची निवेदने दाखल केलीत व त्यांच्या प्रती माझ्याकडे व संघटनेकडे पाठविल्या.

### अमरावती विभागातील अनेक प्राध्यापकांच्या थकबाकीची रक्कम अडवून ठेवल्याबाबत

**२१५.** "अमरावती विभागातील अनेक प्राध्यापकांच्या थकबाकीची रक्कम अडवून ठेवल्याबाबत" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ४६२५७ हा विधानपरिषदेच्या मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. प्रश्न भाग १, २ व ३ पुढीलप्रमाणे होता :-

"(१) अमरावती विभागातील ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, विद्याभारती महाविद्यालय, मातोश्री विमलाबाई महाविद्यालय या महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांना निवडश्रेणीतील स्थाननिश्चिती, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, वेतनवाढी इत्यादी पोटी शासनाने मंजूर केलेल्या रक्कमांची थकबाकी गेल्या अनेक महिन्यापासून अकारण अडवून ठेवल्याच्या तक्रारी या महाविद्यालयातील या शिक्षकांनी ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयात व सप्टेंबरच्या सुरुवातीला सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे दाखल केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,"

"(२) या तिन्ही महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या तक्रारी खऱ्या असल्याच्या निवेदनासह सहसंचालकाकडे सूपूर्त केल्या, हेही खरे आहे काय,"

"(३) महाराष्ट्राच्या इतर कोणत्याही भागात असा प्रकार घडलेला नसून फक्त अमरावती विभागातच हा प्रकार सतत घडत आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशच्या सहसचिवांनी दिनांक ८ सप्टेंबर, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान संचालक उच्च शिक्षण यांच्याकडे या सर्व कागदपत्रासह सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत पाठविले हेही खरे आहे काय," **या प्रश्न भाग एक, दोन व तीनला एकत्रितरीत्या एका शब्दात "होय" असे उत्तर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिले होते.**

"(४) असल्यास, शासनाने याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे," या प्रश्न भाग चारच्या उत्तरात त्यांनी "(४) सदर रक्कम त्वरीत अदा करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सूचना दिल्या आहेत." असे नमूद केले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १५०, क्रमांक ०७, पृष्ठ ६२)*

**२१६.** दिनांक २१ सप्टेंबर १९७७ रोजीच्या शासननिर्णयाने झालेली वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना, व्यवस्थेची अंमलबजावणी उत्तमरीतीने सुरू असतांना कालांतराने योजनेवर आलेली संकटे याची माहिती वर नमूद केलेली आहे. १९७७ पूर्वी याबाबतीत काय स्थिती होती, नव्या शैक्षणिक आकृतिबंधाचे परिणाम, त्या आकृतिबंधामुळे महाविद्यालयातून विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणे, शेकडो शिक्षक अतिरिक्त होण्याची निर्माण झालेली स्थिती, दोषपूर्ण अनुदानसूत्र व विद्यार्थ्यांची कमी झालेली संख्या त्यामुळे अनेक महिन्यांच्या विलंबाने वेतन अदा होण्याचे निर्माण झालेले संकट, कोणत्याही महाविद्यालयीन शिक्षकाला सेवेत कायम करण्यावर कायदा करून शासनाने आणलेली बंदी, याबरोबरच वेतन वितरण व्यवस्थेच्या स्थापनेसाठी बेमुदत कामबंद आंदोलनाचा कार्यक्रम घोषित करून हा संघर्ष फक्त नुटाच्या क्षेत्रामध्ये का म्हणून करावा लागला, याबाबतचे तपशील उपरोक्त परिच्छेदातून विदित केलेले आहेत. ही व्यवस्था उत्तमरितीने सुरू राहावी, शक्य झाल्यास त्यामध्ये आणखी सुधारणा व्हावी यासाठी चिंतन करणाऱ्या सर्वांनाच उपरोक्त लिखाणामुळे लाभान्वित होता येईल असे अपेक्षित आहे.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 22.12.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 30.12.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,..............................................................

.................................................................

.................................................................

.................................................................